दक्षिणामाशां राजन्प्रस्थापितास्त्वया २८ तेषामपनयं श्रुत्वा मेने स कृतकृत्यताम् । कृतार्थानां हि भृत्यानामेतद्भवति चेष्टितम् २९ स तद्रामाय मेधावी शशंस प्लवगर्षभः । रामश्चाप्यनुमानेन मेने दृष्टां तु मैथिलीम् ३० हनुमत्प्रमुखाश्चापि विश्रान्तास्ते प्लवङ्गमाः । अभिजग्मुर्हरीन्द्रं तं रामलक्ष्मणसन्निधौ ३१ गतिं च मुखवर्णं च दृष्ट्वा रामो हनूमतः । अगमत्प्रत्ययं भूयो दृष्टा सीतेति भारत ३२ हनूमत्प्रमुखास्ते तु वानराः पूर्णमानसाः । प्रणेमुर्विधिवद्रामं सुग्रीवं लक्ष्मणं तथा ३३ तानुवाचानतान्रामः प्रगृह्य सशरं धनुः । अपि मां जीवयिष्यध्वमपि वः कृतकृत्यता ३४ अपि राज्यमयोध्यायां कारयिष्याम्यहं पुनः । निहत्य समरे शत्रूनाहृत्य जनकात्मजाम् ३५ अमोक्षयित्वा वैदेहीमहत्वा च रणे रिपून् । हृतदारोवधूतश्च नाहं जीवितुमुत्सहे ३६ इत्युक्तवचनं रामं प्रत्युवाचानिलात्मजः । प्रियमाख्यामि ते राम दृष्टा सा जानकी मया ३७ विचित्य दक्षिणामाशां सपर्वतवनाकराम् । श्रान्ताः काले व्यतीते स्म दृष्टवन्तो

पाठविले होतेस तेहीं सर्व त्या वनाचा फडशा पाडीत आहेत " २८ हा त्यांचा अतिक्रम ऐकिल्यावर त्या सुग्रीवाला कृतकृत्यता वाटूं लागली. कारण, कार्यसिद्धि करून आलेल्या सेवकांचें असें वर्तन होत असतें २९. हा वृत्तांत त्या बुद्धिमान् वानरश्रेष्ठ सुग्रीवानें रामाला निवेदन केला; व रामानेंही मैथिली त्यांच्या दृष्टीं पडल्याचें अनुमानानें ताडिलें ३०. इतक्यांत मधुवनामध्यें विश्रांति घेतलेले ते मारुतिप्रभृति वानर रामलक्ष्मणांचे संनिध असलेल्या त्या वानरराज सुग्रीवाकडे आले असतां ३१, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, हनुमानाची ती चालण्याची ढब आणि मुखावरील कांति अवलोकन करून सीता दृष्टीं पडली असा पुनरपि त्या रामाला प्रत्यय आला ३२. तदनंतर मनोरथ सिद्धीस गेलेल्या त्या हनुमत्प्रभृति वानरांनीं यथायोग्य रीतीनें राम, सुग्रीव आणि लक्ष्मण ह्यांना प्रणाम केले ३३. तेव्हां बाणासहवर्तमान धनुष्य हातात घेऊन राम त्या नम्र झालेल्या वानरांना ह्मणाला " मला तुह्मी जिवंत ठेवणार आहां काय ? तुमची कार्यसिद्धि झाली काय ? ३४. समरांगणांत शत्रूंचा वध करून व जनककन्येला परत आणून अयोध्येमध्यें पुनरपि राज्य करण्याचा मला प्रसंग येणार आहे काय ? ३५. संग्रामामध्यें शत्रूंचा वध केल्याशिवाय आणि सीतेला सोडवून आणिल्याशिवाय स्त्रीचा अपहार झालेला आहे अशा अपमानास्पद स्थितींत जिवंत रहाण्याची माझी इच्छा नाहीं " ३६. ह्याप्रमाणें रामानें भाषण केलें असतां वायुपुत्र हनुमान् त्याला ह्मणाला " हे रामा, मी तुला प्रिय वार्ता कथन करितों. ती जानकी माझ्या दृष्टीं पडली ३७. पर्वत,

महामुहाम् ३८ प्रविशामो वयं तां तु बहुयोजनमायताम् । अन्धकारां सुविपिनां गहनां कीटसेविताम् ३९ गत्वा सुमहदध्वानमादित्यस्य प्रभां ततः । दृष्टवन्तः स्म तत्रैव भवनं दिव्यमन्तरा ४० मयस्य किल दैत्यस्य तदा सद्वेश्म राघव । तत्र प्रभावती नाम तपोतप्यत तापसी ४१ तया दत्तानि भोज्यानि पानानि विविधानि च । भुक्त्वा लब्धबलाः सन्तस्तयोक्तेन पथा ततः ४२ निर्याय तस्माद्देशात्पश्यामो लवणाम्भसः । समीपे सह्यमलयौ दर्दुरं च महागिरिम् ४३ ततो मलयमारुह्य पश्यन्तो वरुणालयम् । विषण्णा व्यथिताः खिन्ना निराशा जीविते भृशम् ४४ अनेकशतविस्तीर्णं योजनानां महोदधिम् । तिमिनक्रझषावासं चिन्तयन्तः सुदुःखिताः ४५ तत्रानशनसंकल्पं कृत्वासीना वयं तदा । ततः कथान्ते गृध्रस्य जटायोरभवत्कथा ४६ ततः पर्वतशृङ्गाभं घोररूपं भयावहम् । पक्षिणं दृष्टवन्तः स्म वैनतेयमिवापरम् ४७ सोऽस्मानतर्कयद्भोक्तुमथाभ्येत्य वचोऽब्र-

---

वनें आणि खाणी ह्यांसहवर्तमान दक्षिण दिशा धुंडाळून आह्मी श्रमलों असतां, आणि मुदतही टळून गेली असतां एक मोठी गुहा आमच्या दृष्टीं पडली ३८. ती गुहा पुष्कळ योजनें लांब होती; तिच्यामध्यें फारच जंगल वाढलेलें होतें; कीटकांचं तर तें निवासस्थानच होतें आणि ती अंधकारानें व्याप्त झालेली असून फारच दुर्गम होती. अशा त्या गुहेमध्यें आह्मीं प्रवेश केला ३९ आणि बराच मार्ग चालून गेल्यावर सूर्याची प्रभा व मध्येंच एक दिव्य गृह आह्मीं अवलोकन केलें ४०. हे रामा, मयासुराचें तें उत्कृष्ट निवासस्थान होतें; आणि प्रभावतीनामक एक तापसी तेथें तपश्चर्या करीत होती ४१. तिनें अर्पण केलेले नानाप्रकारचे भोज्य व पेय पदार्थ सेवन करून सामर्थ्य आल्यानंतर आह्मी तिनें सांगितलेल्या मार्गानें त्या प्रदेशांतून बाहेर पडलों असतां क्षारसमुद्राचे संनिध सह्य, मलय व महापर्वत दर्दुर हे आह्मीं अवलोकन केले ४२, ४३. तदनंतर मलयपर्वतावर जाऊन सागराकडे पाहूं लागलों असतां आमचे हातपाय मोडले; आह्मांला फारच उद्विग्नता प्राप्त झाली; व जीविताविषयीं सुद्धां अगदीं निराश होऊन आह्मी खिन्न झालों ४४. कारण, शेंकडों योजनें विस्तीर्ण आणि तिमि, नक्र व मत्स्य ह्यांचें निवासस्थान असलेल्या त्या महासागरासंबंधानें विचार करितां करितां आह्मी अतिशयच दुःखित झालों ४५. त्या ठिकाणीं प्रायोपवेशनाचा संकल्प करून आह्मी बसलों असतां बोलतां बोलतां गृध्रराज जटायूची कथा निघाली ४६. तेव्हां दुसरा गरुडच कीं काय असा एक भयंकर व आकृतीनेंही घोर असलेला पर्वतशिखरासारिखा धिप्पाड पक्षी आमच्या दृष्टीं

वीत् । भोः क एष मम भ्रातुर्जटायोः कुरुते कथाम् ४८ संपातिर्नाम तस्याहं ज्येष्ठो भ्राता खगाधिपः । अन्योन्यस्पर्धया रूढावावामादित्यसत्पदम् ४९ ततो दग्धाविमौ पक्षौ न दग्धौ तु जटायुषः । तदा मे चिरदृष्टः स भ्राता गृध्रपतिः प्रियः ५० निर्दग्धपक्षः पतितो ह्यहमस्मिन्महागिरौ । तस्यैवं वदतोस्माभिर्हतो भ्राता निवेदितः ५१ व्यसनं भवतश्चेदं संक्षेपाद्वै निवेदितम् । स संपातिस्तदा राजञ्श्रुत्वा सुमहदप्रियम् ५२ विषण्णचेताः पप्रच्छ पुनरस्मानरिन्दम । कः स रामः कथं सीता जटायुश्च कथं हतः ५३ इच्छामि सर्वमेवैतच्छ्रोतुं प्लवगसत्तमाः । तस्याहं सर्वमेवैतद्भवतो व्यसनागमम् ५४ प्रायोपवेशने चैव हेतुं विस्तरशोऽब्रुवम् । सोऽस्मानुत्थापयामास वाक्येनानेन पक्षिराट् ५५ रावणो विदितो मह्यं लङ्का चास्य महापुरी । दृष्टा पारे समुद्रस्य त्रिकूटगिरिकन्दरे ५६ भवित्री तत्र वैदेही न मेऽस्त्यत्र विचारणा । इति तस्य वचः श्रुत्वा वयमुत्थाय

पडला ४७. प्रथमतः आह्मांला भक्षण करून टाकण्याचाच त्याचा बेत होता; परंतु, पुढें तो जवळ येऊन ह्मणाला " अरे, हा कोण माझ्या भ्रात्या जटायूसंबधानें वृत्तांत कथन करीत आहे ? ४८. मी संपातिनामक पक्षिराज त्या जटायूचा ज्येष्ठ भ्राता आहें. आह्मी एकमेकाच्या चढाओढीनें सूर्यमंडलाकडे उड्डाण करूं लागलों असतां ४९ माझे हे पंख जळून गेले; परंतु, जटायूचे दग्ध झाले नाहींत. असो. पंख जळून गेल्यामुळें मी तेव्हांच ह्या महापर्वतावर पडलों; आणि ह्या कारणानें तो माझा प्रियभ्राता गृध्रराज पुष्कळ दिवसपर्यंत माझ्या दृष्टीं पडला नाहीं. " ह्याप्रमाणें जेव्हां तो सांगूं लागला तेव्हां त्याचा भ्राता वध पावल्याचें आह्मीं त्याला कळविलें ५०, ५१; आणि आपल्यावरील हें संकटही आह्मीं त्याला थोडक्यांत सांगितलें. तेव्हां फारच अप्रिय गोष्ट कानीं पडल्यामुळें, हे राजा, तो संपाति ५२ मनामध्यें फारच खिन्न झाला; आणि हे शत्रुतापना, पुनरपि तो आह्मांला ह्मणाला " तो राम कोण ? सीतेला रावणानें कसें हरण करून नेलें ? आणि जटायु कसा वध पावला ? ५३ हें सर्वच, हे वानरश्रेष्ठहो, ऐकण्याची माझी इच्छा आहे. " ह्याप्रमाणें तो बोलल्यावर मी त्याला " आपल्यावर संकट कसें आलें; आणि आह्मी प्रायोपवेशनाचा निश्चय करून बसण्याचें कारण काय ? " हें सर्वकांहीं सविस्तर सांगितलें असतां पुढील भाषण करून त्या पक्षिराजानें आह्मांला त्या प्रायोपवेशनापासून परावृत्त केलें ५४, ५५. (तो ह्मणाला) " रावण मला विदित आहे व समुद्राच्या पलीकडे त्रिकूटाचलाच्या गुहेमध्यें मी त्याची महानगरी लंका अवलोकन केली आहे ५६. त्या ठिकाणींच सीता असली

सत्वराः ५७ सागरक्रमणे मन्त्रं मन्त्रयामः परन्तप । नाध्यवास्यद्यदा कश्चित्सागरस्य विलङ्घनम् ५८ ततः पितरमाविश्य पुप्लुवेहं महार्णवम् । शतयोजनविस्तीर्णं निहत्य जलराक्षसीम् ५९ तत्र सीता मया दृष्टा रावणान्तःपुरे सती । उपवासतपःशीला भर्तृदर्शनलालसा ६० जटिला मलदिग्धाङ्गी कृशा दीना तपस्विनी । निमित्तैस्तामहं सीतामुपलभ्य पृथग्विधैः ६१ उपसृत्याब्रुवं चार्यामभिगम्य रहोगताम् । सीते रामस्य दूतोहं वानरो मारुतात्मजः ६२ त्वद्दर्शनमभिप्रेप्सुरिह प्राप्तो विहायसा । राजपुत्रौ कुशलिनौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ६३ सर्वशाखामृगेन्द्रेण सुग्रीवेणाभिपालितौ । कुशलं त्वाब्रवीद्रामः सीते सौमित्रिणा सह ६४ सखिभावाच्च सुग्रीवः कुशलं त्वानुपृच्छति । क्षिप्रमेष्यति ते भर्ता सर्वशाखामृगैः सह ६५ प्रत्ययं कुरु मे देवि वानरोस्मि न राक्षसः। मुहूर्तमिव च ध्यात्वा सीता मां प्रत्युवाच ह ६६ अवैमि त्वां हनूमन्तम-

---

पाहिजे ह्याविषयीं मला मुळींच संशय नाहीं ". हें त्याचें भाषण श्रवण करून आह्मी सत्वर उठलों ५७ आणि, हे शत्रुतापना, सागराचें उल्लंघन करण्याविषयीं आह्मीं आपआपसांत विचार करूं लागलों. परंतु, समुद्र उल्लंघन करून जाण्यास जेव्हां कोणीच तयार होईना ५८, तेव्हां वायुमार्गाचें अवलंबन करून मींच जातां जातां जलराक्षसीचा वध करून शंभर योजनें विस्तीर्ण असलेल्या महासागराचें उल्लंघन केलें ५९. समुद्राचें उल्लंघन करून लंकेमध्यें गेल्यावर रावणाच्या अंतःपुरामध्यें साध्वी सीता माझ्या दृष्टीं पडली. पतिदर्शनाविषयीं ती अगदीं उत्सुक झालेली आहे; आणि उपवासपूर्वक ती तपश्चर्या करीत बसली आहे ६०. तिची वेणी सुटलेली आहे; शरीर मलानें भरून गेलेलें आहे आणि ती बिचारी दीन व कृश झालेली आहे. ह्या व असल्या नानाप्रकारच्या चिन्हांवरून ती सीता असावी असा माझा तर्क झाला ६१. तेव्हां ती साध्वी एकटी असतांना जवळ जाऊन मी तिला ह्मणालों " हे सीते, मी रामदूत वायुपुत्र वानर ६२ तुझ्या दर्शनाकरितां आकाशमार्गानें येथें आलों आहें. राजपुत्र भ्राते रामलक्ष्मण खुशाल आहेत; ६३ आणि सर्व वानरांचा राजा, जो सुग्रीव त्यानें सर्व प्रकारें त्यांचें रक्षण केलें आहे. हे सीते, लक्ष्मणासहवर्तमान रामानें तुला कुशल विचारिलें असून ६४ मित्रभावामुळे सुग्रीवानेंही तुला कुशलप्रश्न केला आहे. सर्व वानरांना बरोबर घेऊन तुझा पति सत्वरच इकडे येईल ६५. हे राजपत्नि, तूं माझ्यावर विश्वास ठेव; मी वानर आहें; राक्षस नव्हे. " ह्यानंतर क्षणभर विचार केल्यासारिखें करून सीता मला ह्मणाली ६६

विन्ध्यवचनादहम् । अविन्ध्यो हि महाबाहो राक्षसो वृद्धसंमतः ६७ कथितस्तेन सुग्रीवस्त्वद्विधैः सचिवैर्वृतः । गम्यतामिति चोक्त्वा मां सीता प्रादादिमं मणिम् ६८ धारिता येन वैदेही कालमेतमनिन्दिता । प्रत्ययार्थं कथां चेमां कथयामास जानकी ६९ क्षिप्तामिषीकां काकाय चित्रकूटे महागिरौ । भवता पुरुषव्याघ्र प्रत्यभिज्ञानकारणात् ७० ग्राहयित्वाहमात्मानं ततो दग्ध्वा च तां पुरीम् । संप्राप्त इति तं रामः प्रियवादिनमार्चयत् ७१ [१०७९३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि हनूमत्प्रत्यागमने द्व्यशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८२ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ततस्तत्रैव रामस्य समासीनस्य तैः सह । समाजग्मुः कपिश्रेष्ठाः सुग्रीववचनात्तदा १ वृतः कोटिसहस्रेण वानराणां तरस्विनाम् । श्वशुरो वालिनः श्रीमान्सुषेणो राममभ्ययात् २ कोटीशतवृतौ चापि गजो गवय एव च । वानरेन्द्रौ महावीर्यौ पृथक्पृथगदृश्यताम् ३ षष्टिकोटिसहस्राणि प्रकर्षन्प्रत्यदृश्यत । गोलाङ्गूलो महाराज

" अविंध्याच्या सांगण्यावरून तू हनुमान् आहेस हें मी जाणीत आहें हे महापराक्रमी हनुमाना, वृद्धाना मान्य असा एक अविंध्य ह्मणून राक्षस आहे ६७; आणि त्या राक्षसानें सुग्रीवाजवळ तुझ्यासारिखे मंत्री आहेत असें मला सांगितलें आहे. आतां तू जा. " असें सांगून सीतेनें विश्वास यण्याकरितां मला हा मणि दिला. ह्याच मण्यामुळें ती निष्कलंक सीता इतका वेळपर्यंत जीव धरून राहिली आहे. हे पुरुषश्रेष्ठा, आपल्याला विश्वास पटण्याकरितां " चित्रकूट महापर्वतावर एका काकपक्ष्याला उद्देशून आपण इषीकास्त्र सोडिल्याची ही कथाही जानकीनें मला कथन केली ६८, ६९, ७०. असो. तदनतर मी रामदूतच आहें अशी सीतेची खात्री करून दिल्यावर ती लंकानगरी दग्ध करून मी आतां येथें आलों आहें. अशा प्रकारें तो हनुमान् प्रिय भाषण करूं लागला असतां रामानेंही त्याचा आदर केला ७१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वापैकीं हनुमान् परत आल्याविषयीं दोनशें ब्यांयशीवा अध्याय समाप्त झाला ॥ २८२ ॥

मार्कंडेय सांगतात:—तदनंतर त्या वानरांसहवर्तमान राम तेथेंच बसला असतांना सुग्रीवाच्या आज्ञेवरून श्रेष्ठ श्रेष्ठ वानर तेथें आले १. एक खर्व वेगवान् वानर बरोबर घेऊन वालीचा श्वशुर श्रीमान् सुषेण रामाकडे आला २. गज आणि गवय हे उभयतां महावीर्यवान् वानराधिपति एकेक अब्ज वानरसेना बरोबर घेऊन वेगळे वेगळे दृष्टीं पडूं

गवाक्षो भीमदर्शनः ४ गन्धमादनवासी तु प्रथितो गन्धमादनः । कोटी-
शतसहस्राणि हरीणां समकर्षत ५ पनसो नाम मेधावी वानरः सुमहा-
बलः । कोटीर्दश द्वादश च त्रिंशत्पञ्च प्रकर्षति ६ श्रीमान्दधिमुखो नाम
हरिवृद्धोतिवीर्यवान् । प्रचकर्ष महासैन्यं हरीणां भीमतेजसाम् ७
कृष्णानां मुखपुण्ड्राणामृक्षाणां भीमकर्मणाम् । कोटीशतसहस्रेण जाम्ब-
वान्प्रत्यदृश्यत ८ एते चान्ये च बहवो हरियूथपयूथपाः । असंख्येया
महाराज समीयू रामकारणात् ९ गिरिकूटनिभाङ्गानां सिंहानामिव
गर्जताम् । श्रूयते तुमुलः शब्दस्तत्र तत्र प्रधावताम् १० गिरिकूटनिभाः
केचित्केचिन्महिषसन्निभाः । शरदभ्रप्रतीकाशाः केचिद्धिङ्गुलकाननाः ११
उत्पतन्तः पतन्तश्च प्लवमानाश्च वानराः । उद्धुन्वन्तोपरे रेणून्समाजग्मुः
समन्ततः १२ स वानरमहासैन्यः पूर्णसागरसन्निभः । निवेशमकरोत्तत्र
सुग्रीवानुमते तदा १३ ततस्तेषु हरीन्द्रेषु समावृत्तेषु सर्वशः । तिथौ
प्रशस्ते नक्षत्रे मुहूर्ते चाभिपूजिते १४ तेन व्यूढेन सैन्येन लोकानुद्वर्तय-

---

लागले ३. हे महाराजा, भयंकर मुद्रेनें युक्त असलेला गवाक्ष वानर साठ खर्व वानर-सेना बरोबर घेऊन येत असलेला दिसूं लागला ४. गंधमादनपर्वतावर वास्तव्य कर-णारा प्रसिद्ध गंधमादन एक महापद्म वानरसेना बरोबर घेऊन तेथें आला ५. पनस-नामक अतिशय बलाढ्य व बुद्धिमान् वानर सत्तावन्न कोट वानरसेना घेऊन तेथें आला ६. दधिमुखनामक वीर्यवान् व श्रीमान् वृद्ध वानर उग्र तेजानें युक्त असलेल्या वानरांचें मोठें सैन्य बरोबर घेऊन आला ७. भयंकर कर्म करणारे व मुखावर तिलक असलेले एक पद्म कृष्णवर्ण ऋक्ष (ह्मणजे अस्वलें) बरोबर घेऊन आलेला जांबवान् दृष्टीं पडूं लागला ८. हे महाराजा, हे व इतरही पुष्कळ ह्मणजे असंख्य वानरसेनाधिपतींच्याही समुदायाचें रक्षण करणारे वानर रामाकरितां येथें आले ९. पर्वतशिखरासारिखीं ज्यांचीं शरीरें आहेत असे ते वानर सिंहांप्रमाणें गर्जना करीत करीत इकडे तिकडे धावूं लागले असतां त्यांचा तुमुल शब्द ठिकठिकाणीं ऐकूं येऊं लागला १०. शरीरानें काहीं पर्वतशिखरांसारिखे, कांहीं महिषांसारिखे, कांहीं शरदृतूंतील मेघासारिखे आणि कांहीं आरक्तवर्ण मुखांनीं युक्त असलेले ११ वानर कोणी उड्या टाकीत, कोणी उड्या मारीत आणि कोणी धांवत धांवत व कोणी धुरळा उडवीत उडवीत चोहोंकडून तेथें आले १२. भरती आलेल्या सागराप्रमाणें असलेल्या त्या प्रचंड वानरसैन्यानें सुग्रीवाच्या अनुमतानें तेथें तळ दिला १३; आणि ह्याप्रमाणें ते वानराधिपति सर्व बाजूनीं तेथें जुळल्यानंतर प्रशस्त तिथि, चांगलें नक्षत्र,

ग्निव । प्रययौ राघवः श्रीमान्सुग्रीवसहितस्तदा १५ मुखमासीत्तु सैन्यस्य हनूमान्मारुतात्मजः । जघनं पालयामास सौमित्रिरकुतोभयः १६ बद्ध-गोधाङ्गुलित्राणौ राघवौ तत्र जग्मतुः । वृतौ हरिमहामात्रैश्चन्द्रसूर्यौ ग्रहैरिव १७ प्रबभौ हरिसैन्यं तत्सालतालशिलायुधम् । सुमहच्छालिभ-वनं यथा सूर्योदयं प्रति १८ नलनीलाङ्गदक्राथमैन्दद्विविदपालिता । ययौ सुमहती सेना राघवस्यार्थसिद्धये १९ विविधेषु प्रशस्तेषु बहुमूलफलेषु च । प्रभूतमधुमांसेषु वारिमत्सु शिवेषु च २० निवसन्ती निराबाधा तथैव गिरिसानुषु । उपायाद्धरिसेना सा क्षारोदमथ सागरम् २१ द्वितीयसा-गरनिभं तद्बलं बहुलध्वजम् । वेलावनं समासाद्य निवासमकरोत्तदा२२ ततो दाशरथिः श्रीमान्सुग्रीवं प्रत्यभाषत । मध्ये वानरमुख्यानां प्राप्तका-लमिदं वचः२३ उपायः को नु भवतां मतः सागरलङ्घने । इयं हि महती सेना सागरश्चातिदुस्तरः २४ तत्रान्ये व्याहरन्ति स्म वानरा बहुमानिनः। समर्था

आणि शुभ मुहूर्त असताना १४ त्रैलोक्य उलथून टाकण्यासच प्रवृत्त झाला आहे की काय असा तो वैभवशाली राम सुग्रीवासहवर्तमान तें व्यवस्थित सैन्य बरोबर घेऊन निघाला १५. वायुपुत्र हनुमान् सैन्याच्या अग्रभागीं असून कसलेंही भय न बाळगणारा सुमित्रापुत्र लक्ष्मण पृष्ठभागानें सैन्याचें रक्षण करीत होता १६. ह्याप्रमाणें तलत्राण आणि अंगुलित्राण धारण केलेले व श्रेष्ठ श्रेष्ठ वानराधिपतींनीं परिवेष्टित असल्यामुळें ग्रहांनी परिवेष्टित झालेल्या चंद्रसूर्याप्रमाणें दिसूं लागलेले ते रघुवंशज रामलक्ष्मण लंकेकडे निघाले १७. तेव्हां साल, ताल व शिला हीं आयुधें बरोबर घेऊन त्यांच्या बरोबर चाललेलें तें वानरसैन्य सूर्योदयसमयीं बालकिरणांनीं युक्त झालेल्या अति विस्तीर्ण शालिक्षेत्राप्रमाणें शोभूं लागलें १८. सारांश, नल, नील, अंगद, क्राथ, मैंद आणि द्विविद ह्यानीं परिपालन केलेली ती अति प्रचंड वानरसेना रामाच्या कार्यसिद्धीकरितां लंकेकडे निघाली १९. ज्यांवर फळें व मुळें विपुल आहेत; मधु व मांस ह्यांची ज्या ठिकाणीं समृद्धि आहे, आणि जेथें उदक आहे अशा नानाप्रकारच्या सुखावह व प्रशस्त पर्वतशिखरांवर निर्भयपणें वास्तव्य करीत करीत ती वानरसेना क्षारसमुद्राला जाऊन पोंचली २०,२१; आणि दुसरा सागरच कीं काय असें तें असंख्य ध्वजांनीं युक्त असलेलें वानरसैन्य समुद्रतीरावरील वनामध्यें तळ देऊन राहिलें २२. तदनंतर दशरथपुत्र श्रीमान् राम श्रेष्ठ श्रेष्ठ वानरांमध्यें सुग्रीवाशीं असें समयोचित भाषण करूं लागला २३. (तो ह्मणाला) " सागराचें उल्लंघन करण्याविषयीं आपण कोणता उपाय योजण्याचा विचार केला आहे ?

लङ्घने सिन्धोर्न तु तत्कृत्स्नकारकम् २५ केचिन्नौभिर्व्यवस्यन्ति केचिच्च
विविधैः प्लवैः । नेति रामस्तु तान्सर्वान्सान्त्वयन्प्रत्यभाषत २६ शतयो-
जनविस्तारं न शक्ताः सर्ववानराः । क्रान्तुं तोयनिधिं वीरा नैषा वो
नैष्ठिकी मतिः २७ नावो न सन्ति सेनाया बह्व्यस्तारयितुं तथा ।
वणिजामुपघातं च कथमस्मद्विधश्चरेत् २८ विस्तीर्णं चैव नः सैन्यं
हन्याच्छिद्रेण वै परः । प्लवोडुपप्रतारश्च नैवात्र मम रोचते २९ अहं
त्विमं जलनिधिं समारप्स्याम्युपायतः । प्रतिशेष्याम्युपवसन्दर्शयिष्यति
मां ततः ३० न चेद्दर्शयिता मार्गं धक्ष्याम्येनमहं ततः । महास्त्रैरप्रतिह-
तैरत्यग्निपवनोज्ज्वलैः ३१ इत्युक्त्वा सहसौमित्रिरुपस्पृश्याथ राघवः ।
प्रतिशिश्ये जलनिधिं विधिवत्कुशसंस्तरे ३२ सागरस्तु ततः स्वप्ने दर्श-

---

कारण, ही सेना तर मोठी असून सागर तर अतिच दुस्तर आहे " २४. ह्यावर स्वतःसंबधानें बरीच घमेंड बाळगणारे वानर रामाला ह्मणाले " आह्मी समुद्राचें उल्लंघन करून जाण्यास समर्थ आहोंत (ही गोष्ट वेगळी; परंतु, समुद्र उल्लंघन करून जाणें) हें कांहीं सर्वांचें काम नव्हे २५ ह्यास्तव, कांहीं वानरांना नौकांच्या योगानें जाण्याचें ठरवावें लागेल; आणि त्याचप्रमाणें नानाप्रकारचीं तरणसाधनें योजून कित्येकांना जाणें भाग पडेल ". ह्यावर " असें होणें शक्य नाहीं " ह्मणून त्या सर्वांचें सान्त्वन करीत राम ह्मणाला २६ " शंभर योजनें विस्तीर्ण असलेला सागर (नौकादिसाधनाच्या योगानें का होईना परंतु) सर्व वानरांना उल्लंघन जाता येणें शक्य नाहीं. तस्मात्, हे वीरहो, तुमचा हा विचार तडीस जाणारा नव्हे २७. शिवाय, इतकी सेना तरून नेण्यासारिख्या पुष्कळ नावाही नाहींत; आणि व्यापारी (लोकांच्या नावा घ्याव्या ह्मणाल तर त्या) लोकांना आह्मासारिखा कसा बरें अडथळा[१] आणील? २८. त्यातूनही आपलें सैन्य पडलें विस्तीर्ण. तेव्हां कोठें तरी आपलें न्यून पाहून कदाचित् शत्रु त्याचा घातही करून टाकील. ह्याकरितां, अशा प्रसंगीं तरी, होडग्यां वगैरेंनीं समुद्र उल्लंघन जाणें मला रुचत नाहीं २९. मी कांहीं उपाय योजून ह्या जलनिधीची कृपा संपादन करून घेईन. प्रथमतः कांहीं दिवस मी येथें उपोषण करीत पडलो राहीन; ह्मणजे तो मला दर्शन देईल ३०. परंतु, इतकें करूनही जर तो मार्ग न देईल तर मात्र अग्नि व वायु ह्यापेक्षांही उज्ज्वल असलेल्या अप्रतिहत महास्त्राच्या योगानें मी ह्याला दग्ध करून टाकीन " ३१. असें वानरांना

---

१ व्यापाराला कांहीं झालें तरी हरकत आणावयाची नाहीं हें तत्त्व अति प्राचीन काळापासूनच हिंदुस्थानांत प्रचलित असल्याचें दिसतें.

यामास राघवम् । देवो नदनदीभर्ता श्रीमान्यादोगणैर्वृतः ३३ कौस-
ल्यामातरित्येवमाभाष्य मधुरं वचः । इदमित्याह रत्नानामाकरैः शतशो
वृतः ३४ ब्रूहि किं ते करोम्यत्र साहाय्यं पुरुषर्षभ । ऐक्ष्वाको ह्यस्मि
त्वज्ज्ञातिरिति रामस्तमब्रवीत् ३५ मार्गमिच्छामि सैन्यस्य दत्तं नदनदी-
पते । येन गत्वा दशग्रीवं हन्यां पौलस्त्यपांसनम् ३६ यद्येवं याचतो
मार्गं न प्रदास्यति मे भवान् । शरैस्त्वां शोषयिष्यामि दिव्यास्त्रप्रतिम-
न्त्रितैः ३७ इत्येवं ब्रुवतः श्रुत्वा रामस्य वरुणालयः । उवाच व्यथितो
वाक्यमिति बद्धाञ्जलिः स्थितः ३८ नेच्छामि प्रतिघातं ते नास्मि विघ्न-
करस्तव । शृणु चेदं वचो राम श्रुत्वा कर्तव्यमाचर ३९ यदि दास्यामि
ते मार्गं सैन्यस्य व्रजतोऽज्ञया । अन्येऽप्याज्ञापयिष्यन्ति मामेवं धनुषो
बलात् ४० अस्ति ह्यत्र नलो नाम वानरः शिल्पिसंमतः । त्वष्टुर्देवस्य
तनयो बलवान्विश्वकर्मणः ४१ स यत्काष्ठं तृणं वापि शिलां वा क्षेप्स्यते

सांगितल्यावर लक्ष्मणासहवर्तमान रामानें स्नान केलें; आणि नंतर दर्भास्तरणावर बसून तो यथाविधि समुद्रासमीप तपश्चर्या करीत राहिला ३२ तेव्हां नद व नद्या ह्यांचा अधिपति श्रीमान् सागरदेव जलचरगणांसहवर्तमान रामाच्या स्वप्नांत आला ३३ आणि "कौसल्यानंदना" अशी हाक मारून अशा मधुर शब्दांनीं त्याला ह्मणाला "रत्नांच्या शेकडों खाणी माझ्यापाशीं आहेत ३४. तस्मात्, हे पुरुषश्रेष्ठा, ह्याप्रसंगीं तुझ मीं कशा रीतीनें साहाय्य करावें तें सांग." ह्यानंतर राम त्याला ह्मणाला "मी इक्ष्वाकुकु-लामध्यें उत्पन्न झालेला तुझा भाऊबंदच आहे ३५. हे नदनदीपते, सैन्याला जाण्यास तूं मार्ग द्यावास अशी माझी इच्छा आहे ह्मणजे मी त्या मार्गानें (सैन्यासहवर्तमान) जाऊन पौलस्त्यकुलाला कलंक लावणाऱ्या रावणाचा वध करीन ३६; आणि ह्याप्रमाणें मी मार्ग मागत असतांना जर तू न देशील तर दिव्यास्त्रांनीं अभिमंत्रण केलेल्या बाणांनीं मी तुला शुष्क करून टाकीन" ३७ ह्याप्रमाणें राम बोलूं लागला असतां सागर दुःखित झाला आणि हात जोडून व उभा राहून त्याला ह्मणाला ३८ "हे रामा, तुला अडथळा करण्याची माझी इच्छा नाहीं; आणि मी तुझ्या मार्गामध्यें विघ्नही आणणारा नाहीं; परंतु, माझें हें बोलणें ऐकून घेऊन मग तला काय करावयाचें असेल तें कर ३९. तुझ्या आज्ञेप्रमाणें जर मी ह्या चाललेल्या सैन्याला मार्ग दिला तर धनुष्याच्या बलानें दुसरेही मला ह्याप्रमाणें आज्ञा करूं लागतील ४०. शिल्पी लोकांना संमत आणि विश्वकर्मा ह्मणून प्रसिद्ध असलेला जो देवशिल्पी त्याचा बला-ढ्य पुत्र नलनामक वानर ह्या तुझ्या सैन्यामध्यें आहे ४१ तो जे कांहीं काष्ठ, तृण

मयि । सर्वं तद्धारयिष्यामि स ते सेतुर्भविष्यति ४२ इत्युक्त्वान्तर्हिते तस्मिन्रामो नलमुवाच ह । कुरु सेतुं समुद्रे त्वं शक्तो ह्यसि मतो मम ४३ तेनोपायेन काकुत्स्थः सेतुबन्धमकारयत् । दशयोजनविस्तारमायतं शतयोजनम् ४४ नलसेतुरिति ख्यातो योऽद्यापि प्रथितो भुवि । रामस्याज्ञां पुरस्कृत्य निर्यातो गिरिसंनिभः ४५ तत्रस्थं स तु धर्मात्मा समागच्छद्विभीषणः । भ्राता वै राक्षसेन्द्रस्य चतुर्भिः सचिवैः सह ४६ प्रतिजग्राह रामस्तं स्वागतेन महामनाः । सुग्रीवस्य तु शङ्काभूत्प्रणिधिः स्यादिति स्म ह ४७ राघवः सत्यचेष्टाभिः सम्यक्च चरितेङ्गितैः । यदा तत्त्वेन तुष्टोऽभूत्तत एनमपूजयत् ४८ सर्वराक्षसराज्ये चाप्यभ्यषिञ्चद्विभीषणम् । चक्रे च मन्त्रसचिवं सुहृदं लक्ष्मणस्य च ४९ विभीषणमते चैव सोऽत्यक्रामन्महार्णवम् । ससैन्यः सेतुना तेन मासेनैव नराधिप ५० ततो गत्वा समासाद्य लङ्कोद्यानान्यनेकशः । भेदयामास कपिभिर्महान्ति च बहूनि च ५१ ततस्तौ रावणामात्यौ मन्त्रिणौ शुकसारणौ ।

अथवा पाषाण माझे ठिकाणीं टाकील तें सर्व मी धारण करीन; व तो तुझा सेतु होईल" ४२. असें ह्मणून तो अंतर्धान पावला असतां राम नलाला ह्मणाला "तूं समुद्रावर सेतु बांध. तू हें काम करण्यास समर्थ आहेस असें मी समजतों" ४३. असें नलाला सांगितल्यानंतर ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें समुद्रानें कथन केलेला तो उपाय योजून दहा योजनें रुंद व शंभर योजनें लांब असा सेतु समुद्रावर बांधविला ४४. तो नलसेतु ह्मणून अद्यापि पृथ्वीवर प्रसिद्ध आहे. रामाची आज्ञा शिरसा मान्य करून तो पर्वतप्राय नल सेतु बांधण्याकरितां तेथून निघून गेला ४५. तों इतक्यांत राम तेथें बसले असतांना तो राक्षसाधिपति रावणाचा भ्राता धर्मात्मा बिभीषण चार मन्त्र्यांसहवर्तमान त्याच्याकडे आला ४६. तेव्हां उदार मनानें युक्त असलेल्या रामांनीं स्वागत करून त्याचा आदरसत्कार केला असतां सुग्रीवाला "हा कोणी तरी रावणाचा गुप्त हेर असावा" अशी शंका आली ४७; आणि रामानेंही खऱ्या मार्गानें चाललेल्या त्याच्या उलाढाली, उत्तम रीतीचें त्याचें आचरण आणि हालचाल हीं पाहून खरोखर संतुष्ट झाल्यानंतरच त्याचें पूजन केलें ४८. सर्व राक्षसांच्या राज्यावर त्याला अभिषेक केला आणि आपला त्याला सल्लामसलतगार मंत्री करून लक्ष्मणाचीही त्याच्याशीं मैत्री केली ४९. सारांश, हे प्रजाधिपते युधिष्ठिरा, बिभीषणाचेंच मत घेऊन त्या रामानें त्या सेतूच्या योगानें सैन्यासहवर्तमान एका महिन्यांतच महासागराचें उल्लंघन केलें ५०. तदनंतर समुद्र उल्लंघून गेल्यावर लंकेमध्यें असलेल्या मोठ्या मोठ्या पुष्कळच बागांचा

चरौ वानररूपेण तौ जग्राह बिभीषणः ५२ प्रतिपन्नौ यदा रूपं राक्षसं तौ निशाचरौ । दर्शयित्वा ततः सैन्यं रामः पश्चादवासृजत् ५३ निवेश्योपवनं सैन्यं तत्पुरः प्राज्ञवानरम् । प्रेषयामास दौत्येन रावणस्य ततोऽङ्गदम् ५४ [१०८४७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि सेतुबन्धने त्र्यशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८३ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ प्रभूतान्नोदके तस्मिन्बहुमूलफले वने । सेनां निवेश्य काकुत्स्थो विधिवत्पर्यरक्षत १ रावणः संविधिं चक्रे लङ्कायां शास्त्रनिर्मिताम् । प्रकृत्यैव दुराधर्षा दृढप्राकारतोरणा २ अगाधतोयाः परिखा मीननक्रसमाकुलाः । बभूवुः सप्त दुर्धर्षाः खादिरैः शङ्कुभिश्चिताः ३ कपाटयन्त्रदुर्धर्षा बभूवुः सहुडोपलाः । साशीविषघटायोधाः

वानरांकडून रामानें विध्वंस करविला ५१. तेव्हां रावणाचे अमात्य व सल्लामसलतगार ते उभयतां शुकसारण संज्ञक हेर वानररूपानें आले असतां बिभीषणानें त्यांना पकडिलें ५२. तदनंतर जेव्हां त्या निशाचरानीं आपलें राक्षसरूप धारण केलें; तेव्हां रामानें त्यांना सैन्य दाखविल्यानंतर सोडून दिलें ५३. तदनंतर त्या लंकानगरीच्या उपवनामध्यें आपल्या सैन्याचा तळ देऊन रामानें रावणाकडे अंगदनामक प्राज्ञ वानराला निरोप सांगून पाठविलें ५४. ह्याप्रमाणे महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वांपैकीं सेतुबंधनाविषयीं दोनशें त्र्यायशीवा अध्याय समाप्त झाला ॥ २८३ ॥

मार्कंडेय सांगतातः— मुळें, फळें, अन्न व उदक ह्यांची ज्यांत समृद्धि आहे अशा वनामध्यें आपल्या सेनेचा तळ देऊन ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें तिचें यथाविधि रक्षणही केलें १; व रावणानेंही लंकेमध्यें शास्त्राला अनुसरून स्वारीची वगैरे तयारी केली. लंका दृढ प्राकारांनीं आणि मजबूत दरवाजांनीं युक्त असल्यामुळें स्वाभाविकच शत्रूचा हल्ला तिच्यावर होणें दुर्घट होतें २. त्या लंकेभोंवतीं सात खंदक होते; त्यांत अगाध जल भरलेलें होतें; मत्स्य व नक्र ह्यांची त्यांत खेंचाखेंच झालेली होती; खदिरशंकूंनीं ते व्याप्त झालेले होते; आणि इतक्या कारणामुळें शत्रूंच्या हातून त्यांचें उल्लंघन होणें अशक्य होतें ३. लंकेच्या भोंवतीं असलेल्या कोटांतील बुरुजावरून तोफा वगैरे ठेविल्या असल्यामुळें त्या कोटावर हल्ला होणें दुर्घट होतें; मूत्रादि गलिच्छ पदार्थ शत्रूचे अंगावर टाकण्याकरितां शृंगें आणि गोफणीनें मारितां यण्याकरितां धोंडे त्यावर ठेविलेले होते; सर्प, गजसमुदाय आणि योद्धे त्यावर असून राळ वगैरे ज्वालाग्राही पदार्थही त्यावर भरलेले

ससर्जरसपांसवः ४ मुसलालातनाराचतोमरासिपरश्वधैः । अन्विताश्च शतघ्नीभिः समधूच्छिष्टमुद्गराः ५ पुरद्वारेषु सर्वेषु गुल्माः स्थावरजङ्गमाः । बभूवुः पत्तिबहुलाः प्रभूतगजवाजिनः ६ अङ्गदस्त्वथ लङ्काया द्वारदेशमुपागतः । विदितो राक्षसेन्द्रस्य प्रविवेश गतव्यथः ७ मध्ये राक्षसकोटीनां बह्वीनां सुमहाबलः । शुशुभे मेघमालाभिरादित्य इव संवृतः ८ स समासाद्य पौलस्त्यममात्यैरभिसंवृतम् । रामसंदेशमामन्त्र्य वाग्मी वक्तुं प्रचक्रमे ९ आह त्वां राघवो राजन्कोसलेन्द्रो महायशाः । प्राप्तकालमिदं वाक्यं तदादस्व कुरुष्व च १० अकृतात्मानमासाद्य राजानमनये रतम् । विनश्यन्त्यनयाविष्टा देशाश्च नगराणि च । ११ त्वयैकेनापराद्धं मे सीतामाहरता बलात् । वधायानपराद्धानामन्येषां तद्भविष्यति १२ ये त्वया बलदर्पाभ्यामाविष्टेन वनेचराः । ऋषयो हिंसिताः पूर्वं देवाश्चाप्यवमानिताः १३ राजर्षयश्च निहता रुदत्यश्च हृताः स्त्रियः । तदिदं समनुप्राप्तं फलं तस्यानयस्य

होते ४. मुसळें, पलितें, नाराच बाण, तोमर, खड्ग, कुऱ्हाडी आणि शतघ्नीसंज्ञक आयुधें, मध व मुद्गर ह्यांनीं ते प्राकार युक्त होते ५. नगराच्या सर्वही वेशींजवळ कायमच्या व इकडे तिकडे जाणाऱ्या सेना पायदळ लोकांनीं आणि अश्व व गज ह्यांनीं भरलेल्या होत्या ६. असो. रामाची अनुज्ञा झाल्यानंतर अंगद लंकेच्या द्वाराशीं आला आणि राक्षसाधिपति रावणाला तो आल्याची वार्ता कळल्यानंतर तो निर्भयपणें लंकेमध्यें प्रविष्टही झाला ७. अनेक कोट राक्षस सभोंवतीं असतांना त्यांच्यामध्यें असलेला तो अत्यंतमहाबलाढ्य अंगद मेघसमूहांनीं आच्छादिलेल्या सूर्याप्रमाणें शोभूं लागला ८. लंकेमध्यें प्रविष्ट झाल्यानंतर अमात्यांनीं परिवेष्टित असलेल्या पुलस्त्यपुत्र रावणासमीप जाऊन व त्याला हाक मारून तो वक्ता अंगद रामाचा निरोप सांगूं लागला ९. (तो ह्मणाला) "हे राजा, कोसलाधिपति महाकीर्तिमान् रघुवंशज रामानें समयाला अनुरूप असें भाषण तुला उद्देशून केलें आहे; तें तूं ऐकून घे आणि त्याप्रमाणें कर १०. अन्याय करण्याविषयीं तत्पर आणि अजितेंद्रिय असा राजा प्राप्त झाला असतां देशांतील व नगरांतील लोकही अन्यायानें वागूं लागतात; आणि ह्यामुळें देशांचा व नगरांचा लोप होतो ११. सीतेला बलात्कारानें हरण करून नेऊन तूं एकट्यानें माझा अपराध केला आहेस. परंतु, हें तुझें कृत्य इतर निरपराध्यांच्याही वधाला कारण होईल १२. पूर्वी तुला बल प्राप्त होऊन गर्व झाल्यामुळें वनामध्यें संचार करणाऱ्या ऋषींचा तूं वध केला आहेस; देवांचा तूं अवमान केला

ते १४ हन्तास्मि त्वां सहामात्यैर्युध्यस्व पुरुषो भव । पश्य मे धनुषो वीर्यं मानुषस्य निशाचर १५ मुच्यतां जानकी सीता न मे मोक्ष्यसि कर्हिचित् । अराक्षसमिमं लोकं कर्तास्मि निशितैः शरैः १६ इति तस्य ब्रुवाणस्य दूतस्य परुषं वचः । श्रुत्वा न ममृषे राजा रावणः क्रोधमूर्च्छितः १७ इङ्गितज्ञास्ततो भर्तुश्चत्वारो रजनीचराः । चतुर्ष्वङ्गेषु जगृहुः शार्दूलमिव पक्षिणः १८ तांस्तथाङ्गेषु संसक्तानङ्गदो रजनीचरान् । आदायैव खमुत्पत्य प्रासादतलमाविशत् १९ वेगेनोत्पततस्तस्य पेतुस्ते रजनीचराः । भुवि संभिन्नहृदयाः प्रहारवरपीडिताः २० संसक्तो हर्म्यशिखरात्तस्मात्पुनरवापतत् । लङ्घयित्वा पुरीं लङ्कां स्वबलस्य समीपतः २१ कोसलेन्द्रमथागम्य सर्वमावेद्य वानरः । विशश्राम स तेजस्वी राघवेणाभिनन्दितः २२ ततः सर्वाभिसारेण हरीणां वातरंहसाम् । भेदयामास

आहेस १३; राजर्षींचा घात केला आहेस आणि शोक करणाऱ्या त्यांच्या स्त्रियांचाही नाश केला आहेस; परंतु, त्या तुझ्या पातकाचें फल आतां प्राप्त झालें आहे १४. हे राक्षसा, अमात्यांसहवर्तमान मी तुझा वध करीन; तू युद्ध कर; आपलें पुरुषत्व प्रकट कर आणि, हे राक्षसा, माझ्यासारिख्या मनुष्याच्या धनुष्याचें सामर्थ्य अवलोकन कर १५. जनककन्या सीतेला तूं सोडून दे. तू जर हिला सोडणार नाहींस तर तीक्ष्ण बाणाच्या योगानें मी हें जगत् राक्षसशून्य करून टाकीन" १६. ह्याप्रमाणें सांगू लागलेल्या त्या दूताचें कठोर भाषण ऐकिल्यावर रावणाला तें सहन झालें नाहीं; व तो क्रोधानें अगदीं व्याप्त झाला १७. तेव्हां आपले यजमानाचा आशय जाणणाऱ्या चार राक्षसांनीं त्याचे दोन हात व दोन पाय असे चार अवयव धरिले असतां व्याघ्राचे चार पाय धरणारे चार पक्षीच की काय असें ते दिसू लागले १८. ह्याप्रमाणें ते राक्षस त्याच्या चार अवयवांना बिलगले असतां त्यांच्यासहवर्तमान आकाशामध्यें उड्डाण करून अंगद त्या वाड्याच्या गच्चीवर जाऊन बसला १९; आणि तो उड्डाण करूं लागला असतां ते राक्षस भूमीवर पडले आणि फारच मोठा हबका बसल्यामुळें अतिशय पीडा होऊन त्यांचीं हृदयेंही विदीर्ण होऊन गेलीं २०. वाड्याच्या गच्चीवर जाऊन बसलेल्या त्या अंगदानें पुनरपि तेथून खालीं उडी टाकिली; आणि लंकानगरींतून निघून आपल्या सैन्यासमीप बसलेल्या २१ कोसलाधिपति रामाकडे जाऊन त्याला सर्व वृत्तांत त्यानें निवेदन केला; आणि रामानें अभिनंदन केल्यानंतर त्या तेजस्वी अंगदानें विश्रांति घेतली २२. तदनंतर वायूप्रमाणें वेगवान् असलेल्या सर्व वानरांकडून एकदम हल्ला करवून रघुनंदन

लङ्कायाः प्राकारं रघुनन्दनः २३ विभीषणर्क्षाधिपती पुरस्कृत्याथ लक्ष्मणः। दक्षिणं नगरद्वारमवामृद्नाद्दुरासदम् २४ करभारुणपाण्डूनां हरीणां युद्धशालिनाम्। कोटीशतसहस्रेण लंकामभ्यपतत्तदा २५ प्रलम्बबाहूरुकरजङ्घान्तरविलम्बिनाम्। ऋक्षाणां धूम्रवर्णानां तिस्रः कोट्यो व्यवस्थिताः २६ उत्पतद्भिः पतद्भिश्च निपतद्भिश्च वानरैः। नादृश्यत तदा सूर्यो रजसा नाशितप्रभः २७ शालिप्रसूनसदृशैः शिरीषकुसुमप्रभैः। तरुणादित्यसदृशैः शणगौरैश्च वानरैः २८ प्राकारं ददृशुस्ते तु समन्तात्कपिलीकृतम्। राक्षसा विस्मिता राजन्सस्त्रीवृद्धाः समन्ततः २९ बिभिदुस्ते मणिस्तम्भान्कर्णाट्टशिखराणि च। भग्नोन्मथितशृङ्गाणि यन्त्राणि च विचिक्षिपुः ३० परिगृह्य शतघ्नीश्च सचक्राः सगुडोपलाः। चिक्षिपुर्भुजवेगेन लङ्कामध्ये महास्वनाः ३१ प्राकारस्थाश्च ये केचिन्निशाचरगणास्तथा। प्रदुद्रुवुस्ते शतशः कपिभिः समभिद्रुताः ३२ ततस्तु राज-

रामानें लंकेचा कोट फोडून टाकिला २३ नंतर बिभीषण आणि ऋक्षाधिपति जांबवान् ह्यांना पुढें करून लक्ष्मणानें लंकानगरीच्या अजिंक्य दक्षिणद्वाराचा नाश केला २४; आणि उंटांच्या बालकांप्रमाणें कांहीं आरक्त व कांहीं श्वेत असा ज्यांचा वर्ण आहे असे एक महापद्म वानर बरोबर घेऊन त्यानें लंकेवर हल्ला केला २५. ज्यांचे दंड मांड्या, हात आणि अंडकोश लांब आहेत अशीं धूम्रवर्ण तीन कोट अस्वलें युद्धाकरितां तयार होतीं २६; आणि उंच, समोर व खालीं उड्या मारणाऱ्या वानरांच्या योगानें तर प्रभा आच्छादित झाल्यामुळें सूर्य दिसेनासाच झाला होता २७. भाताचीं लोंबटें, शिरसूचीं फुलें, प्रातःकालचा सूर्य आणि ताग ह्यांप्रमाणें ज्यांचा भिन्न भिन्न वर्ण आहे अशा वानरांनीं २८ लंकेचा सर्वही कोट सर्व बाजूंनीं व्याप्त झाला आहे आणि ठिकठिकाणीं तो पिंगटवर्णानें युक्त झालेला आहे असें त्या राक्षसांच्या दृष्टीं पडलें; आणि, हे धर्मराजा, स्त्रिया, व वृद्ध ह्यांसहवर्तमान ते सर्वही राक्षस विस्मित झाले २९. त्या वानरांनीं लंकेंतील रत्नखचित स्तंभ मोडून टाकिले; (उत्तरोत्तर लहान लहान होत गेलेल्या चौखंयांनीं ज्यांची बांधणी संपविलेली आहे अशीं) कर्णाट्टसंज्ञक शिखरें त्यांनीं फोडून टाकिलीं; ठिकठिकाणीं असलेले मनोरे त्यांनीं मोडून उलथून टाकिले; यंत्रेंही फेंकून दिलीं ३०; आणि भयंकर गर्जना करणाऱ्या त्या वानरांनीं आपल्या बाहुवेगाच्या योगानें लंकेमध्यें शतघ्नी, चक्रें, आणि गोफणींसहवर्तमान पाषाण हीं सर्व कोटावरील युद्धसाधनें फेंकून दिलीं ३१. तेव्हां कोटावर जे कांहीं राक्षसगण संरक्षणार्थ राहिलेले होते ते शेंकडों पळूं लागले; व त्यांच्या मागोमाग वानर धांवू

वचनाद्राक्षसाः कामरूपिणः । निर्ययुर्विकृताकाराः सहस्रशतसंघशः ३३ शस्त्रवर्षाणि वर्षन्तो द्रावयित्वा वनौकसः । प्राकारं शोभयन्तस्ते परं विक्रममास्थिताः ३४ स माषराशिसदृशैर्बभूव क्षणदाचरैः । कृतो निर्वानरो भूयः प्राकारो भीमदर्शनैः ३५ पेतुः शूलविभिन्नाङ्गा बहवो वानरर्षभाः । स्तम्भतोरणभग्नाश्च पेतुस्तत्र निशाचराः ३६ केशाकेश्यभवद्युद्धं रक्षसां वानरैः सह । नखैर्दन्तैश्च वीराणां खादतां वै परस्परम् ३७ निष्टनन्तो ह्युभयतस्तत्र वानरराक्षसाः । हता निपतिता भूमौ न मुञ्चन्ति परस्परम् ३८ रामस्तु शरजालानि ववर्ष जलदो यथा । तानि लङ्कां समासाद्य जघ्नुस्तान्रजनीचरान् ३९ सौमित्रिरपि नाराचैर्दृढधन्वा जितक्लमः । आदिश्यादिश्य दुर्गस्थान्पातयामास राक्षसान् ४० ततः प्रत्यवहारोऽभूत्सैन्यानां राघवाज्ञया । कृते विमर्दे लङ्कायां लब्धलक्ष्यो जयोत्तरः ४१ [१०८८८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां

लागले ३२. तदनंतर रावणाच्या आज्ञेवरून यथेष्ट रूप धारण करणारे राक्षस अकाळविक्राळ स्वरूपें घेऊन लाखालाखांच्या टोळ्यांनीं युद्धाकरितां बाहेर निघाले ३३; मोठ्या शौर्यानें अवलंबन करून त्या राक्षसांनीं शस्त्रांचा वर्षाव करून सर्व वानर हांकून लाविले आणि त्या कोटाला आपल्या समागमानें ते शोभा आणू लागले ३४. तेव्हां मांसाच्या राशीच कीं काय अशा प्रकारच्या त्या दिसण्यांतही भयंकर असलेल्या राक्षसांनीं पुनरपि तो सर्वही प्राकार (ह्मणजे कोट) वानररहित करून टाकिला ३५. नंतर शूलानें ज्यांच्या शरीरांना क्षतें पडलेलीं आहेत असे असंख्य मोठेमोठे वानर आणि वानरांनीं फेंकलेल्या स्तंभानीं रणामध्यें पराजित झालेले राक्षस पुनरपि एकमेकांच्या अंगावर तटून पडले ३६. ते उभयतांही वीर नखांनीं व दातांनीं परस्परांचे लचके काढू लागले; आणि वानरांसहवर्तमान त्या राक्षसांचें एकमेकांचे केश धरून युद्ध झालें ३७. असें होतां होतां वानर व राक्षस हे उभयतांही गर्जना करीत करीत जरी भूमीवर मरून पडूं लागले तरी एकमेकांला त्यांनीं सोडिलें नाहीं ३८. रामानें तर मेघाप्रमाणें बाणसमुदायांचा वर्षाव केला; व त्या बाणसमुदायांनीं लंकेंत जाऊन त्या राक्षसांचा वध केला ३९. कधींही न श्रमणाऱ्या सुमित्रापुत्र महाधनुर्धारी लक्ष्मणानेंही नाराच बाणांच्या योगानें कोटावर असलेल्या त्या राक्षसांचा अगदीं टिपून टिपून वध केला ४०; आणि नंतर ज्याचा प्रहार कधींही व्यर्थ गेला नाहीं आणि ज्याला उत्तरोत्तर जयच चाललेला आहे असें तें सर्वही सैन्य रामाच्या आज्ञेनें लंकेमध्यें दाणादाण उडवून दिल्यानंतर तळावर परत आलें ४१. ह्याप्रमाणें महर्षि-

संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि लङ्काप्रवेशे चतुरशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८४ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ततो निविशमानांस्तान्सैनिकान्रावणानुगाः। अभिजग्मुर्गणानेके पिशाचक्षुद्ररक्षसाम् १ पर्वणः पतनो जम्भः खरः क्रोधवशो हरिः। प्ररुजश्चारुजश्चैव प्रघसश्चैवमादयः २ ततोऽभिपततां तेषामदृश्यानां दुरात्मनाम्। अन्तर्धानवधं तज्ज्ञश्चकार स बिभीषणः ३ ते दृश्यमाना हरिभिर्बलिभिर्दूरपातिभिः। निहताः सर्वशो राजन्महीं जग्मुर्गतासवः ४ अमृष्यमाणः सबलो रावणो निर्ययावथ। राक्षसानां बलैर्घोरैः पिशाचानां च संवृतः ५ युद्धशास्त्रविधानज्ञ उशना इव चापरः। व्यूह्य चौशनसं व्यूहं हरीनभ्यवहारयत् ६ राघवस्तु विनिर्यान्तं व्यूढानीकं दशाननम्। बार्हस्पत्यं विधिं कृत्वा प्रत्यव्यूहन्निशाचरम् ७ समेत्य युयुधे तत्र ततो रामेण रावणः। युयुधे लक्ष्मणश्चापि तथैवेन्द्रजिता सह ८ विरूपाक्षेण सुग्रीवस्तारेण च निखर्वटः। तुण्डेन

व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वांपैकीं लंकाप्रवेशाविषयीं दोनशें चवऱ्यायशींवा अध्याय समाप्त झाला ॥ २८४ ॥

मार्कंडेय सांगतातः—तदनंतर ते रामसैनिक आपल्या तळावर येऊं लागले असतां पिशाच आणि क्षुद्र राक्षस यांचे, रावणाचे आज्ञेप्रमाणें वागणारे, अनेक समुदाय त्यांच्या मागोमाग गेले १. पर्वण, पतन, जंभ, खर, क्रोधवश, हरि, प्ररुज, अरुज, प्रघस वगैरे त्यांमध्यें मुख्य होते २. याप्रमाणें ते दुरात्मे अदृश्य राहून हल्ला करण्याकरितां येत असतांना बिभीषणानें त्यांच्या अंतर्धानशक्तीचा नाश केला. कारण, तें कर्म त्याला माहीत होतें ३. याप्रमाणें बिभीषणानें त्यांची आंतर्धानशक्ति नाहींशी केल्यानंतर ते दृश्य होऊं लागले; आणि लांब लांब उड्या मारणाऱ्या बलाढ्य वानरांनीं त्यांचा सर्वस्वी वध केला असतां ते गतप्राण होऊन पृथ्वीवर पडले ४; परंतु, तें रावणाला सहन न झाल्यामुळें राक्षस आणि पिशाच यांच्या घोर सैन्यांनीं परिवेष्टित असलेला तो रावण युद्धाकरितां बाहेर पडला ५. युद्धसंबंधीं शास्त्र आणि प्रत्यक्ष प्रयोग यांविषयीं तो दुसरा शुक्राचार्यच कीं काय असा ज्ञाता होता; आणि त्यानें शुक्राचार्यांनीं सांगितलेला व्यूह करून सर्व वानरांना गराडा दिला ६; परंतु, सैन्य वेढून टाकून रावण युद्धार्थ पुढें येत आहे असें अवलोकन करितांक्षणीं रामानें बृहस्पतींनीं सांगून ठेविलेला प्रयोग योजून उलट त्या राक्षसालाच वेढून टाकिलें ७. त्या संग्रामामध्यें रावणानें रामाशीं युद्ध केलें;

च नलस्तत्र पटुशः पनसेन च ९ विषह्यं यं हि यो मेने स स तेन समेयिवान् । युयुधे युद्धवेलायां स्वबाहुबलमाश्रितः १० स संप्रहारो ववृधे भीरूणां भयवर्धनः । लोमसंहर्षणो घोरः पुरा देवासुरे यथा ११ रावणो राममानर्छच्छक्तिशूलासिवृष्टिभिः । निशितैरायसैस्तीक्ष्णै रावणं चापि राघवः १२ तथैवेन्द्रजितं यत्तं लक्ष्मणो मर्मभेदिभिः । इन्द्रजिच्चापि सौमित्रिं बिभेद बहुभिः शरैः १३ विभीषणः प्रहस्तं च प्रहस्तश्च विभीषणम् । खगपत्रैः शरैस्तीक्ष्णै रभ्यवर्षद्गतव्यथः १४ तेषां बलवतामासीन्महास्त्राणां समागमः । विव्यथुः सकला येन त्रयो लोकाश्चराचराः १५ [१०९०३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि रामरावणादिद्वन्द्वयुद्धे पञ्चाशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८५ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ततः प्रहस्तः सहसा समभ्येत्य विभीषणम् । गदया ताडयामास विनद्य रणकर्कशः १ स तयाभिहतो धीमान्गदया

आणि लक्ष्मणही इंद्रजिताशीं युद्ध करूं लागला ८. त्याचप्रमाणें सुग्रीव विरूपाक्षाशीं भिडला; निखर्वट तारवानराशीं जुंपला; नल तुंडाशीं सामना करूं लागला आणि पटुश पनसाशीं लढूं लागला ९. सारांश, ज्याला जो अ हारीं आहे असें वाटलें तो त्याच्याशीं जाऊन भिडला आणि युद्धप्रसंगीं आपल्या बाहुबलाचा आश्रय करून त्याच्याशीं युद्ध करूं लागला १०. पूर्वीं देवदैत्यांमध्यें ज्याप्रमाणें अंगावर रोमांच उठविणारें व भीरूंचें भय वृद्धिंगत करणारें घोर युद्ध झालें होतें त्याप्रमाणें तें युद्ध सुरू झालें ११. रावणानें शक्ति, शूल आणि खड्ग यांचा वर्षाव करून रामाला पीडा दिली; आणि घासलेल्या लोहमय तीक्ष्ण बाणांनीं रामानेंही रावणास जेरीस आणिलें १२. त्याचप्रमाणें युद्धार्थ सज्ज झालेल्या इंद्रजिताला मर्मभेदक बाणांनीं लक्ष्मणानें टेंकीस आणिलें; व इंद्रजितानेंही अनेक बाणांनीं लक्ष्मणाला नकोनकोसें करून सोडिलें १३. बिभीषणानें प्रहस्ताला दमविलें; आणि प्रहस्तानेंही कांहींएक भीति न धरितां पक्ष्यांचीं पिसें लाविलेल्या तीक्ष्ण बाणांनीं बिभीषणाला पुरें पुरें करून सोडिलें १४. तात्पर्य, त्या बलाढ्य आणि महान् महान् अस्त्रवेत्त्या योद्ध्यांमध्यें संग्राम सुरू झाला असतां त्रैलोक्यांतील सर्व चराचर प्राणी भयभीत झाले १५ ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वापैकीं रामरावणादिकांच्या द्वंद्वयुद्धांविषयीं दोनशें पंचायशीवा अध्याय समाप्त झाला ॥२८५॥

मार्कंडेय सांगतातः—तदनंतर संग्रामामध्यें उग्र रूप धारण करणारा प्रहस्त एकाएकीं

भीमवेगया । नाकम्पत महाबाहुर्हिमवानिव सुस्थिरः २ ततः प्रगृह्य विपुलां शतघण्टां विभीषणः । अनुमन्त्र्य महाशक्तिं चिक्षेपास्य शिरः प्रति ३ पतन्त्या स तया वेगाद्राक्षसोऽशनिवेगया । हृतोत्तमाङ्गो ददृशे वातरुग्ण इव द्रुमः ४ तं दृष्ट्वा निहतं संख्ये प्रहस्तं क्षणदाचरम् । अभिदुद्राव धूम्राक्षो वेगेन महता कपीन् ५ तस्य मेघोपमं सैन्यमापतद्भीमदर्शनम् । दृष्ट्वैव सहसा दीर्णा रणे वानरपुङ्गवाः ६ ततस्तान्सहसा दीर्णान्दृष्ट्वा वानरपुङ्गवान् । निर्ययौ कपिशार्दूलो हनूमान्मारुतात्मजः ७ तं दृष्ट्वावस्थितं सङ्ख्ये हरयः पवनात्मजम् । महत्या त्वरया राजन्संन्यवर्तन्त सर्वशः ८ ततः शब्दो महानासीत्तुमुलो लोमहर्षणः । रामरावणसैन्यानामन्योन्यमभिधावताम् ९ तस्मिन्प्रवृत्ते संग्रामे घोरे रुधिरकर्दमे । धूम्राक्षः कपिसैन्यं तद्द्रावयामास पत्रिभिः १० तं स रक्षोमहामात्रमापतन्तं सपत्नजित् । प्रतिजग्राह

बिभीषणावर धांवून गला; आणि गर्जना करून त्यानें त्याला गदेचा प्रहार केला १. परंतु, भयंकर वेगानें युक्त असलेल्या त्या गदेचा प्रहार झाला असतांही तो विचारी महापराक्रमी बिभीषण स्थानापासून यत्किंचितूही न चळतां हिमालय पर्वताप्रमाणें अगदीं स्थिर उभा राहिला २. तदनंतर शंभर घंटा जिला लाविलेल्या आहेत अशी एक प्रचंड महाशक्ति अभिमंत्रण करून बिभीषणानें त्याच्या मस्तकावर फेंकिली असतां ३ विद्युल्लतेप्रमाणें जिचा वेग आहे अशा त्या शक्तीनें वेगानें पडतां पडतांच त्या राक्षसाचें मस्तक उडवून दिलें; आणि त्यामुळें तो राक्षस वाऱ्यानें वरचा शिरतार एकदम मोडून पडलेल्या वृक्षाप्रमाणें दिसू लागला ४. याप्रमाणें तो प्रहस्त राक्षस संग्रामामध्यें वध पावला असें अवलोकन करून धूम्राक्ष मोठ्या वेगानें वानरांवर धांवला ५; आणि दिसण्यांतही भयंकर असें त्याचें मेघतुल्य सैन्य चाल करून येत आहे असें दृष्टीं पडतांक्षणीं संग्रामामध्यें श्रेष्ठ श्रेष्ठ वानरांचीही एकाएकीं दाणादाण झाली ६. परंतु, एकाएकीं श्रेष्ठ श्रेष्ठ वानरांची त्रेधा उडालेली अवलोकन केल्याबरोबर वायुपुत्र वानरश्रेष्ठ हनुमान् पुढें सरसावला ७. तेव्हां संग्रामामध्यें तो वायुपुत्र उभा आहे असें दृष्टी पडतांक्षणीं, हे धर्मराजा, पळून गेलेली वानरसेना मोठ्या त्वरेनें सर्व बाजूंनीं संग्रामामध्यें परत फिरली ८. तदनंतर राम आणि रावण यांच्या सेना एकमेकींवर चाल करून जाऊं लागल्या असतां अंगावर कांटा आणण्यासारिखा मोठा प्रचंड ध्वनि तेथें होऊं लागला ९. अशाप्रकारें घोर संग्राम सुरू होऊन त्यामध्यें अत्यंत रक्तस्रावामुळें जिकडे तिकडे चिखल होऊन गेला असतां धूम्राक्षानें बाणांच्या योगानें तें वानरसैन्य पिटाळून लाविलें १०; परंतु, तो राक्षसश्रेष्ठ धूम्राक्ष आणखी पुढें चाल

हनुमांस्तरसा पवनात्मजः ११ तयोर्युद्धमभूद्घोरं हरिराक्षसवीरयोः ।
जिगीषतोर्युधान्योन्यमिन्द्रप्रह्लादयोरिव १२ गदाभिः परिघैश्चैव राक्षसो
जघ्निवान्कपिम् । कपिश्च जघ्निवान्रक्षः सस्कन्धविटपैर्द्रुमैः १३ ततस्तम-
तिकोपेन साश्वं सरथसारथिम् । धूम्राक्षमवधीत्क्रुद्धो हनूमान्मारुता-
त्मजः १४ ततस्तं निहतं दृष्ट्वा धूम्राक्षं राक्षसोत्तमम् । हरयो जातवि-
स्रम्भा जघ्नुरन्ये च सैनिकान् १५ ते वध्यमाना हरिभिर्बलिभिर्जितका-
शिभिः । राक्षसा भग्नसंकल्पा लङ्कामभ्यपतन्भयात् १६ तेऽभिपत्य पुरं
भग्ना हतशेषा निशाचराः । सर्वं राज्ञे यथावृत्तं रावणाय न्यवेदयन् १७
श्रुत्वा तु रावणस्तेभ्यः प्रहस्तं निहतं युधि । धूम्राक्षं च महेष्वासं ससैन्यं
वानरर्षभैः १८ सुदीर्घमिव निःश्वस्य समुत्पत्य वरासनात् । उवाच
कुम्भकर्णस्य कर्मकालोऽयमागतः १९ इत्येवमुक्त्वा विविधैर्वादित्रैः सुम-
हास्वनैः । शयानमतिनिद्रालुं कुम्भकर्णमबोधयत् २० प्रबोध्य महता

करूनही येऊं लागला असतां शत्रूंचा पराभव करणाऱ्या वायुपुत्र हनुमानानें वेगावे-
गानें त्याला आपल्या अंगावर घेतलें ११; व इंद्र आणि प्रल्हाद ह्यामध्यें ज्याप्रमाणें समरा-
मात एकमेकाला जिंकण्याच्या इच्छेनें युद्ध झालें त्याप्रमाणें त्या उभयतां वानरवीर व
राक्षसवीर यामध्यें घोर युद्ध झालें १२ गदा व परिघ याच्या योगानें राक्षसानें त्या हनुमान्
वानराला ताडण केलें; व त्या वानरानेंही खोड व शाखा ह्यांसहवर्तमान असलेल्या
वृक्षाच्या योगानें राक्षसाला प्रहार केले १३. इतकेंच नव्हे परंतु, वायुपुत्र हनुमान्
क्रुद्ध झाल्यामुळें अतिशय रागारागानें अश्व, रथ आणि सारथि ह्यांसहवर्तमान त्यानें
त्या धूम्राक्षाचा वध केला १४; राक्षसश्रेष्ठ धूम्राक्षाचा वध झाल्याचें दिसून आल्या-
वर जयाविषयीं विश्वास वाटून इतर वानरांनींही रावणाकडील सैनिकांचा वध
केला १५; आणि ह्याप्रमाणें वीरश्री चढलेल्या त्या बलाढ्य वानरांमुळें राक्षसांचा
एकसारखा वध होऊं लागला असतां राक्षस निराश होऊन भीतीनें लंकेकडे धांवत
गेले १६ संग्रामामध्यें वध न पावतां जे राक्षस अवशिष्ट राहिले होते ते पराभव
पावल्यावर लंकेमध्यें आले; आणि त्यांनीं तें इत्थंभूत वर्तमान रावणराजाला निवेदन
केलें १७ असो. युद्धामध्यें वानरश्रेष्ठांनीं प्रहस्ताचा आणि महाधनुर्धारी धूम्राक्षाचा
सैन्यासहवर्तमान वध केल्याचें त्यांचे मुखांतून श्रवण केल्यावर १८ रावणानें दीर्घ सुस्कारा
टाकिला आणि सिंहासनावरून खालीं उडी टाकून "कुंभकर्णानें पराक्रम करण्याचा हा समय
प्राप्त झाला आहे " असें तो ह्मणाला १९; व ह्याप्रमाणें बोलल्यावर, अतिशय झोपाळू
कुंभकर्ण घोरत पडला होता तो त्यानें अतिशयच प्रचंड ध्वनि करणारीं नानाप्रकारचीं

चैनं यत्नेनागतमाध्वसः । स्वस्थमासीनमव्यग्रं विनिद्रं राक्षसाधिपः २१
ततोऽब्रवीद्दशग्रीवः कुम्भकर्णं महाबलम् । धन्योऽसि यस्य ते निद्रा
कुम्भकर्णेयमीदृशी २२ य इदं दारुणाकारं न जानीषे महाभयम् २३
एष तीर्त्वार्णवं रामः सेतुना हरिभिः सह । अवमन्येह नः
सर्वान्करोति कदनं महत् २४ मया त्वपहृता भार्या सीता नामास्य
जानकी । तां नेतुं स इहायातो बद्ध्वा सेतुं महार्णवे २५ तेन चैव प्रह-
स्तादिर्महाञ्जः स्वजनो हतः । तस्य नान्यो निहन्तास्ति त्वामृते शत्रुक-
र्शन २६ स दंशितोऽभिनिर्याय त्वमद्य बलिनां वर । रामादीन्समरे सर्वा-
ञ्जहि शत्रूनरिन्दम २७ दूषणावरजौ चैव वज्रवेगप्रमाथिनौ । तौ त्वां
बलेन महता सहितावनुयास्यतः २८ इत्युक्त्वा राक्षसपतिः कुम्भकर्णं
तरस्विनम् । संदिदेशेतिकर्तव्यं वज्रवेगप्रमाथिनौ २९ तथेत्युक्त्वा तु तौ
वीरौ रावणं दूषणानुजौ । कुम्भकर्णं पुरस्कृत्य तूर्णं निर्ययतुः पुरात् ३०
[१०९३३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्या-

वाद्ये वाजवून जागा केला २०; आणि मोठ्या यत्नानें ह्याप्रमाणें त्याला जागा केल्या-नंतर निद्रा नाहींशी होऊन तो सावधपणें स्वस्थ बसला असतां भयभीत झालेला तो राक्षसाधिपति २१ रावण महाबलाढ्य कुंभकर्णाला ह्मणाला " हे कुंभकर्णा, ज्याअर्थी तुला अशाप्रकारची निद्रा आहे त्याअर्थी, बाबा, तुझी धन्य आहे २२. अरे, ज्याचें पूर्वरूपही भयंकर आहे असें हें प्रचंड भय प्राप्त झाल्याचें तुझ्या गावींही नाहीं २३. अरे, हा राम सेतूनें समुद्राचें उल्लंघन करून वानरांसहवर्तमान येथें आला आहे; आणि आपणां सर्वांचीही पर्वा न करिता त्यानें मोठें रणकंदन सुरू केलें आहे २४. मीं जी ह्याची जानकीनामक भार्या येथें हरण करून आणिली आहे तिला नेण्याकरितां महासागरामध्यें सेतु बांधून तो येथें आला आहे २५. त्यानें प्रहस्त-प्रभृति आपले मोठे मोठे पदरचे योद्धे मारिले आहेत; आणि, हे शत्रु-नाशका, तुझ्यावाचून दुसरा कोणी त्याचा वध करणारा नाहीं २६. तस्मात्, हे बलवानांमध्यें श्रेष्ठ कुंभकर्णा, तू आतां कवच घालून बाहेर नीघ; आणि हे शत्रुनाशका, रामप्रभृति सर्व शत्रूंचा तू संग्रामामध्यें वध कर २७. दूषणाचे कनिष्ठ भ्राते वज्रवेग व प्रमाथी मोठें सैन्य बरोबर घेऊन एका जुटीनें तुझ्या पाठोपाठ येतील " २८. ह्याप्र-माणें बलाढ्य कुंभकर्णाशी बोलून काय करावयाचें तें वज्रवेग व प्रमाथी ह्या दूषण-भ्रात्यांना राक्षसाधिपति रावणानें कळविलें असतां २९ " ठीक आहे " ह्मणून त्या वीर दूषणभ्रात्यांनीं रावणाला सांगितलें; आणि कुंभकर्णाला पुढें करून ते सत्वर

मारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि कुम्भकर्णनिर्गमने षडशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८६ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ततो निर्याय स्वपुरात्कुम्भकर्णः सहानुगः । अपश्यत्कपिसैन्यं तज्जितकाश्यग्रतः स्थितम् १ स वीक्षमाणस्तत्सैन्यं रामदर्शनकाङ्क्षया । अपश्यच्चापि सौमित्रिं धनुष्पाणिं व्यवस्थितम् २ तमभ्येत्याशु हरयः परिवव्रुः समन्ततः । अभ्यघ्नंश्च महाकायैर्बहुभिर्जगतीरुहैः ३ करजैरतुदंश्चान्ये विहाय भयमुत्तमम् । बहुधा युध्यमानास्ते युद्धमार्गैः प्लवङ्गमाः ४ नानाप्रहरणैर्भीमै राक्षसेन्द्रमताडयन् । स ताड्यमानः प्रहसन्भक्षयामास वानरान् ५ बलं चण्डबलाख्यं च वज्रबाहुं च वानरम् । तद्दृष्ट्वा व्यथनं कर्म कुम्भकर्णस्य रक्षसः ६ उदक्रोशन्परित्रस्तास्तारप्रभृतयस्तदा । तानुच्चैः क्रोशतः सैन्याञ्श्रुत्वा सहरियूथपान् ७ अभिदुद्राव सुग्रीवः कुम्भकर्णमपतभीः । ततो निपत्य वेगेन कुम्भकर्णं

नगरातून बाहेर पडले ३०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वापैकीं कुंभकर्णाच्या निर्गमनाविषयीं दोनशें शाहायशींवा अध्याय समाप्त झाला ॥ २८६ ॥

मार्कंडेय सांगतातः— तदनंतर वीरश्री चढलेला तो कुंभकर्ण आपल्या अनुयायांसहवर्तमान स्वतःच्या नगरांतून बाहेर पडला असतांना तें वानरसैन्य संमुख स्थित असलेलें त्यानें अवलोकन केलें १. तदनंतर रामाला अवलोकन करण्याकरितां तो सैन्याकडे पाहूं लागला असतां हातांत धनुष्य घेऊन संग्रामामध्यें उभा असलेला सुमित्रापुत्र लक्ष्मण त्याच्या दृष्टीं पडला २ तेव्हां कुंभकर्ण दृष्टीं पडतांक्षणीं वानरांनीं जवळ येऊन त्याला वेढा घातला; आणि अनेक प्रचंड वृक्षांनीं ते त्याला प्रहार करूं लागले ३. तदनंतर भय सोडून देऊन कांहीं वानरांनी नखांच्या योगानें त्याला त्रागलेंच ओरखाडिलें; आणि अनेक प्रकारांनीं वेगवेगळ्या युद्धमार्गांचें अवलंबन करून युद्ध करीत असलेल्या त्या वानरांनीं ४ अनेक प्रकारच्या भयंकर आयुधाच्या योगानें राक्षसाधिपति कुंभकर्णाला ताडण केलें. परंतु, वानर ताडण करूं लागले असतां तो कुंभकर्ण हंसत हंसत त्यांना भक्षण करूं लागला ५; आणि बल, चंडबल, वज्रबाहु वगैरे वानर त्यानें गट्टही करून टाकिले. तेव्हां कुंभकर्णराक्षसाचें तें भीतिजनक कर्म अवलोकन केल्यावर ६ तारप्रभृति वानर भयभीत होऊन आक्रोश करूं लागले; व वानरसेनाधिपतीसहवर्तमान ते सैनिक आक्रोश करीत आहेत असें ऐकून ७ मनामध्यें कांहींएक भय न आणितां सुग्रीव कुंभकर्णावर धांवून

महामनाः ८ शालेन जघ्निवान्मूर्ध्नि बलेन कपिकुञ्जरः । स महात्मा महा-
वेगः कुम्भकर्णस्य मूर्धनि ९ बिभेद शालं सुग्रीवो न चैवाव्यथयत्कपिः ।
ततो विनद्य सहसा शालस्पर्शविबोधितः १० दोर्भ्यामादाय सुग्रीवं
कुम्भकर्णोहरद्बलात् । ह्रियमाणं तु सुग्रीवं कुम्भकर्णेन रक्षसा ११
अवेक्ष्याभ्यद्रवद्वीरः सौमित्रिर्मित्रनन्दनः । सोभिपत्य महावेगं रुक्मपुङ्खं
महाशरम् १२ प्राहिणोत्कुम्भकर्णाय लक्ष्मणः परवीरहा । स तस्य देहा-
वरणं भित्त्वा देहं च सायकः १३ जगाम दारयन्भूमिं रुधिरेण समुक्षितः ।
तथा स भिन्नहृदयः समुत्सृज्य कपीश्वरम् १४ कुम्भकर्णो महेष्वासः प्रगृ-
हीतशिलायुधः । अभिदुद्राव सौमित्रिमुद्यम्य महतीं शिलाम् १५ तस्याभि-
पततस्तूर्णं क्षुराभ्यामुच्छ्रितौ करौ । चिच्छेद निशिताग्राभ्यां स बभूव
चतुर्भुजः १६ तानप्यस्य भुजान्सर्वान्प्रगृहीतशिलायुधान् । क्षुरैश्चिच्छेद
लघ्वस्त्रं सौमित्रिः प्रतिदर्शयन् १७ स बभूवातिकायश्च बहुपादशिरो-

---

गेला; आणि वेगावेगानें कुंभकर्णावर तुटून पडल्यानतर त्या महाशय ८ वानरश्रेष्ठ सुग्रीवानें शालवृक्ष हातांत घेऊन त्याच्या मस्तकावर जोरानें प्रहार केला. परंतु, त्या महात्म्या महावेगवान् सुग्रीववानरानें जरी कुंभकर्णाच्या मस्तकावर त्या शालवृक्षाचे तुकडे केले तरी सुद्धां कुंभकर्णाला कांहींएक व्यथा झाली नाहीं. शालवृक्षाचा तडाका बसल्यामुळें तो कुंभकर्ण झोंपेच्या गुंगींतून सावध झाला; एकाएकीं त्यानें गर्जना केली, आणि सुग्रीवाला हातांनीं धरून त्यानें आपल्याकडे जोरानें ओढिलें. परंतु, कुंभकर्णराक्षस सुग्रीवाला ओढीत आहे ९,१०,११ असें अवलोकन करून मित्रांला आनंद देणारा सुमित्रापुत्र वीर लक्ष्मण धांवला; पुढें आल्यावर त्या शत्रुपक्षीय-वीरनाशक लक्ष्मणानें सुवर्णपिसांनीं युक्त असा एक महावेगवान् प्रचंड बाण कुंभकर्णा-वर टाकिला; व तो बाण त्याचें कवच व देह फोडून १२,१३ बाहेर निघाल्यामुळें रक्तानें बरबटल्यावर भूमि विदीर्ण करीत करीत आंत गेला. असो. ह्याप्रमाणें लक्ष्म-णाच्या बाणानें हृदय विदीर्ण होऊन गेलें असतां वानराधिपति सुग्रीवाला सोडून देऊन १४ त्या महाधनुर्धारी कुंभकर्णानें पाषाणरूप आयुधें हातामध्यें घेतलीं; आणि एक प्रचंड शिला उगारून तो लक्ष्मणावर धांवला १५; परंतु शिला घेऊन तो आपल्या अंगावर येत आहे तोंच त्वरा करून लक्ष्मणानें त्याचे उगारिलेले दोन्ही हात तीक्ष्ण धारेनें युक्त असलेल्या क्षुरप्रबाणांनीं तोडून टाकिले; तथापि, तो (मायावी) कुंभकर्ण चतुर्भुज झाला १६. परंतु, शिलारूप आयुधें धारण केलेले तेही त्याचे सर्व हात अस्त्रलाघव दर्शविणाऱ्या लक्ष्मणानें क्षुरप्रबाणांनीं तोडून

भुजः । तं ब्रह्मास्त्रेण सौमित्रिर्ददाराद्रिचयोपमम् १८ स पपात महा-
वीर्यो दिव्यास्त्राभिहतो रणे । महाशनिविनिर्दग्धः पादपोऽङ्कुरवानिव १९
तं दृष्ट्वा वृत्रसंकाशं कुम्भकर्णं तरस्विनम् । गतासुं पतितं भूमौ राक्षसाः
प्राद्रवन्भयात् २० तथा तान्द्रवतो योधान्दृष्ट्वा तौ दूषणानुजौ । अवस्था-
प्याथ सौमित्रिं संक्रुद्धावभ्यधावताम् २१ तावाद्रवन्तौ संक्रुद्धौ वज्रवेग-
प्रमाथिनौ । अभिजग्राह सौमित्रिर्विनद्योभौ पतत्रिभिः २२ ततः सुतु-
मुलं युद्धमभवल्लोमहर्षणम् । दूषणानुजयोः पार्थ लक्ष्मणस्य च धीमतः २३
महता शरवर्षेण राक्षसौ सोऽभ्यवर्षत । तौ चापि वीरौ संक्रुद्धावुभौ तौ
समवर्षताम् २४ मुहूर्तमेवमभवद्वज्रवेगप्रमाथिनोः । सौमित्रेश्च महाबाहोः
संप्रहारः सुदारुणः २५ अथाद्रिशृङ्गमादाय हनुमान्मारुतात्मजः । अभि-
द्रुत्याददे प्राणान्वज्रवेगस्य रक्षसः २६ नीलश्च महता ग्राव्णा दूषणाव-
रजं हरिः । प्रमाथिनमभिद्रुत्य प्रममाथ महाबलः २७ ततः प्रावर्तत

टाकिले १७. तेव्हां त्यानें अपारमित शरीर व असंख्य पाय, मस्तकें आणि हात धारण केले. तथापि, त्या पर्वतप्राय कुंभकर्णाला लक्ष्मणानें ब्रह्मास्त्राच्या योगानें विदीर्ण करून टाकिलें १८; आणि दिव्यास्त्राचा तडाका बसल्यामुळें तो महावीर्यवान् कुंभकर्ण मोठी वीज पडून दग्ध झालेल्या पल्लवयुक्त वृक्षाप्रमाणें संग्रामामध्यें पडला १९. तेव्हां वृत्रासुरासारिखा तो बलाढ्य कुंभकर्ण गतप्राण होऊन भूमीवर पडल्याचें अवलोकन करितांक्षणीं राक्षस भीतीनें पळत सुटले २०. तदनंतर आपले सैनिक पळून जात आहेत असें दृष्टोत्पत्तीस आल्यावर त्या दूषणाच्या भ्रात्यांनीं त्याना थांबवून धरिले; आणि ते क्रुद्ध होऊन लक्ष्मणावर धांवले २१. तेव्हां ते उभयतां वज्रवेग व प्रमाथी क्रुद्ध होऊन येत असतांना लक्ष्मणानें गर्जना करून बाणांच्या योगानें त्या उभयतांचेंही स्वागत केलें २२. तदनंतर, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, दूषणाचे भ्राते आणि बुद्धिमान् लक्ष्मण ह्यांमध्यें शरीरावर रोमांच उठविणारें असें अतिशयच तुमुल युद्ध झालें २३. त्या लक्ष्मणानेंही राक्षसांवर बाणांचा मोठा वर्षाव केला; व त्या क्रुद्ध झालेल्या उभयतां वीरांनींही लक्ष्मणावर वृष्टि केली २४; आणि ह्याप्रमाणें वज्रवेग व प्रमाथी आणि महापराक्रमी लक्ष्मण ह्यामध्यें एक मुहूर्तपर्यंत अति भयंकर युद्ध झालें २५. तदनंतर वायुपुत्र हनुमानानें एक पर्वतशिखर हातामध्यें घेतलें आणि संमुख चाल करून जाऊन वज्रवेग राक्षसाचे प्राण हरण केले २६; व त्याचप्रमाणें महाबलाढ्य नीलनामक वानर प्रचंड पाषाण हातांमध्यें घेऊन दूषणाच्या प्रमाथीसंज्ञक कनिष्ठ भ्रात्याकडे धांवत गेला; आणि त्यानें त्याचा वध केला २७.

पुनः संग्रामः कटुकोदयः । रामरावणसैन्यानामन्योन्यमभिधावताम् २८
शतशो नैर्ऋतान्वन्या जघ्नुर्वन्यांश्च नैर्ऋताः । नैर्ऋतास्तत्र वध्यन्ते प्रायेण न
तु वानराः २९ [१०९६२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि-
तायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि कुम्भकर्णादिवधे
सप्ताशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः॥ २८७ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ततः श्रुत्वा हतं सङ्ख्ये कुम्भकर्णं सहानुगम् ।
प्रहस्तं च महेष्वासं धूम्राक्षं चातितेजसम् १ पुत्रमिन्द्रजितं वीरं रावणः
प्रत्यभाषत । जहि राममित्रघ्न सुग्रीवं च सलक्ष्मणम् २ त्वया हि मम
सत्पुत्र यशो दीप्तमुपार्जितम् । जित्वा वज्रधरं सङ्ख्ये सहस्राक्षं शचीप-
तिम् ३ अन्तर्हितः प्रकाशो वा दिव्यैर्दत्तवरैः शरैः । जहि शत्रूनमित्रघ्न
मम शस्त्रभृतां वर ४ रामलक्ष्मणसुग्रीवाः शरस्पर्शं न तेऽनघ । समर्थाः
प्रतिसोढुं च कुतस्तदनुयायिनः ५ अकृता या प्रहस्तेन कुम्भकर्णेन
चानघ । खरस्यापचितिः सङ्ख्ये तां गच्छ त्वं महाभुज ६ त्वमद्य निशि-
तैर्बाणैर्हत्वा शत्रून्ससैनिकान् । प्रतिनन्दय मां पुत्र पुरा जित्वेव वास-

---

तदनंतर राम आणि रावण ह्यांचे सैनिक परस्परांवर तुटून पडूं लागले असतां अनिष्ट-फलदायक युद्ध पुनरपि सुरू झालें २८. वानरांनीं शेंकडों राक्षसांचा वध केला; आणि राक्षसांनींही वानरांना मारिलें; परंतु, प्रायः त्या संग्रामामध्यें राक्षसांचाच वध होत असून वानरांचा विशेष होत नसे २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वांपैकीं कुंभकर्णादिकांच्या वधाविषयीं दोनशें सत्त्यांयशींवा अध्याय समाप्त झाला ॥ २८७ ॥

मार्कंडेय सांगतातः—अनुयायांसहवर्तमान कुंभकर्ण, महाधनुर्धारी प्रहस्त आणि अतितेजस्वी धूम्राक्ष संग्रामामध्यें वध पावल्याचें श्रवण करून १ इंद्रजित्संज्ञक वीर-पुत्राला रावण ह्मणाला " हे शत्रुनाशका, लक्ष्मणासहवर्तमान रामाचा आणि सुग्रीवाचा वध कर २. हे सत्पुत्रा, माझें उज्ज्वल यश सहस्रनयन वज्रपाणि इंद्राला संग्रामामध्यें जिंकून तूं संपादन केलें आहेस ३. ह्यास्तव, हे शत्रुनाशका, हे शस्त्रधारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, अदृश्य अथवा दृश्य राहून वरानें प्राप्त झालेल्या दिव्य बाणांच्या योगानें तूं माझ्या शत्रूंचा वध कर ४. हे निष्पापा, राम, लक्ष्मण आणि सुग्रीव हेही तुझ्या बाणांचा स्पर्श सहन करण्यास समर्थ नाहींत; मग त्यांच्या अनुयायांची तर गोष्ट कशाला पाहिजे ? ५. हे निष्पापा, हे महापराक्रमी इंद्रजिता, प्रहस्त आणि कुंभकर्ण ह्यांना संग्रामामध्यें खराचें उतराई होतां आलें नाहीं; परंतु, तूं त्याच्या उपकाराची फेड करून टाक ६. साराश, हे पुत्रा, पूर्वी ज्याप्रमाणें इंद्राला जिंकून तूं मला आनंद

वम् ७ इत्युक्तः स तथेत्युक्त्वा रथमास्थाय दंशितः । प्रययाविन्द्रजिद्रा-
जंस्तूर्णमायोधनं प्रति ८ ततो विश्राव्य विस्पष्टं नाम राक्षसपुङ्गवः ।
आह्वयामास समरे लक्ष्मणं शुभलक्षणम् ९ तं लक्ष्मणोऽभ्यधावच्च प्रगृह्य
सशरं धनुः । त्रासयंस्तलघोषेण सिंहः क्षुद्रमृगान्यथा १० तयोः
समभवद्युद्धं सुमहज्जयगृद्धिनोः । दिव्यास्त्रविदुषोस्तीव्रमन्योन्यस्प-
र्धिनोस्तदा ११ रावणिस्तु यदा नैनं विशेषयति सायकैः । ततो गुरु-
तरं यत्नमातिष्ठद्बलिनां वरः १२ तत एनं महावेगैरर्दयामास तोमरैः ।
तानागतान्स चिच्छेद सौमित्रिर्निशितैः शरैः ॥ ते निकृत्ताः शरैस्तीक्ष्णै-
र्न्यपतन्धरणीतले १३ तमङ्गदो वालिसुतः श्रीमानुद्यम्य पादपम् ।
अभिद्रुत्य महावेगस्ताडयामास मूर्धनि १४ तस्येन्द्रजिदसंभ्रान्तः प्रासे-
नोरसि वीर्यवान् । प्रहर्तुमैच्छत्तं चास्य प्रासं चिच्छेद लक्ष्मणः १५
तमभ्याशगतं वीरमङ्गदं रावणात्मजः । गदयाताडयत्सव्ये पार्श्वे वानर-

---

दिलास त्याप्रमाणें तीक्ष्ण बाणांच्या योगानें सैनिकांसहवर्तमान शत्रूचा वध करून,
आज मला आनंद दे ” ७. ह्याप्रमाणें रावणानें सांगितलें असतां “ ठीक आहे ”
असें ह्मणून त्या इंद्रजितानें कवच घातलें आणि, हे राजा, रथावर आरूढ होऊन तो
संग्रामामध्यें सत्वर चालता झाला ८. तदनंतर स्पष्टपणें आपलें नांव प्रतिपक्ष्यांना
कळवून त्या राक्षसश्रेष्ठ इंद्रजितानें संग्रामामध्यें शुभ लक्षणांनी युक्त असलेल्या लक्ष्मणाला
आह्वान केलें असतां ९ सिंह ज्याप्रमाणें क्षुद्र मृगांना त्रस्त करून टाकितो त्याप्रमाणें बाणा-
सहवर्तमान धनुष्य हातांत घेऊन हस्ततलांच्या घोषानेंच प्रतिपक्ष्यांना भीति उत्पन्न करीत
करीत तो लक्ष्मण त्याच्या अंगावर धांवला १०. तेव्हां एकमेकांची स्पर्धा करीत
असलेल्या त्या उभयतां जयाभिलाषी दिव्यास्त्रवेत्त्यांमध्यें मोठें युद्ध झालें ११.
इंद्रजिताच्या हातून बाणांच्या योगानें लक्ष्मणाचे जेव्हां कांहीं विशेष
होईना तेव्हां त्या बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या इंद्रजितानें लक्ष्मणाचा पाडाव
करण्याविषयीं पूर्वीपेक्षाही जास्त प्रयत्न केला १२. तदनंतर महावेगवान् तोमरांच्या
योगानें इंद्रजित लक्ष्मणाला पीडा देऊं लागला; परंतु, आपल्याकडे सुटलेले ते तोमर
तीक्ष्ण बाणांनीं लक्ष्मणानें तोडून टाकिले असतां तीक्ष्ण बाणांच्या योगानें तुकडे तुकडे
होऊन गेलेले ते तोमर भूतलावर पडले १३. नंतर वालिपुत्र वैभवशाली महावेगवान्
अंगदानें एक वृक्ष हातांत घेऊन आणि धांवत धांवत जाऊन इंद्रजिताच्या मस्तकीं
ताडण केलें १४: परंतु, त्या प्रहारानें यत्किंचितही गोंधळून न जातां इंद्रजितानें त्याच्या
वक्षस्थलाचे ठिकाणीं भाल्यानें प्रहार करण्याचें योजिलें असतां तो त्याचा भालाही
लक्ष्मणानें तोडून टाकिला १५. तेव्हां तो वीर अंगद आपल्या समीप आला असे

पुङ्गवम् १६ तमचिन्त्य प्रहारं स बलवान्वालिनः सुतः । ससर्जेन्द्र-
जितः क्रोधाच्छालस्कन्धं तथाङ्गदः १७ सोऽङ्गदेन रुषोत्सृष्टो वधायेन्द्र-
जितस्तरुः । जघानेन्द्रजितः पार्थ रथं साश्वं ससारथिम् १८ ततो
हताश्वात्प्रस्कन्द्य रथात्स हतसारथिः । तत्रैवान्तर्दधे राजन्मायया राव-
णात्मजः १९ अन्तर्हितं विदित्वा तं बहुमायं च राक्षसम् । रामस्तं
देशमागम्य तत्सैन्यं पर्यरक्षत २० स राममुद्दिश्य शरैस्ततो दत्तवरै-
स्तदा । विव्याध सर्वगात्रेषु लक्ष्मणं च महाबलम् २१ तमदृश्यं शरैः
शूरौ माययान्तर्हितं तदा । योधयामासतुरुभौ रावणिं रामलक्ष्मणौ २२
स रुषा सर्वगात्रेषु तयोः पुरुषसिंहयोः । व्यसृजत्सायकान्भूयः शतशोऽथ
सहस्रशः २३ तमदृश्यं विचिन्वन्तः सृजन्तमनिशं शरान् । हरयो विवि-
शुर्व्योम प्रगृह्य महतीः शिलाः २४ तांश्च तौ चाप्यदृश्यः स शरैर्विव्याध
राक्षसः । स भृशं ताडयामास रावणिर्मायया वृतः २५ तौ शरैराचितौ

असें अवलोकन करून रावणपुत्र इंद्रजितानें त्याच्या उजव्या बरगडीमध्यें गदेचा प्रहार केला १६; परतु, त्या प्रहाराकडे लक्ष्य न देतां त्या बलाढ्य वालिपुत्र अंगदानें रागारागानें एक शालवृक्ष इंद्रजितावर फेकिला १७ व, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, वालीनें इंद्रजिताच्या वधाकरितां रागारागानें फेकिलल्या त्या वृक्षानें सारथि आणि अश्व ह्यांसहवर्तमान इंद्रजिताच्या रथाचा चुराडा केला १८. तदनंतर, हे धर्मराजा, ज्याचा सारथि वध पावला आहे असा तो रावणपुत्र इंद्रजित् मृत अश्वांनीं युक्त झालेल्या त्या रथावरून खालीं उडी टाकून मायेनें तेथल्यातेथेंच गुप्त झाला १९. परंतु, तो बहुमायावी राक्षस इद्रजित् गुप्त झाला आहे असें समजून राम तेथें आला आणि आपल्या त्या सैन्याचें रक्षण करूं लागला २०. तेव्हां ज्याच्याविषयीं वर प्राप्त झालेला आहे अशा आपल्या बाणांच्या योगानें त्या इंद्रजितानें रामाला व महाबलाढ्य लक्ष्मणाला सर्व गात्रांचे ठिकाणीं वेध केला २१; व त्या उभयतां शूर रामलक्ष्मणांनींही मायेनें आच्छादित आणि ह्मणूनच गुप्त झालल्या इंद्रजिताशीं युद्ध केलें २२. त्या पुरुषश्रेष्ठांच्या एकून एक अवयवांचे ठिकाणीं इंद्रजितानें वारंवार रागारागानें शेंकडों हजारों बाण सोडिले २३; तेव्हां तो अदृश्य राहून एकसारिखे बाण सोडीत आहे असें आढळून आल्यावर वानर त्याला शोधण्याकरितां मोठ्या मोठ्या शिला हातांत घेऊन अंतरिक्षामध्यें गेलें २४. परंतु, अदृश्य झालेल्या त्या इंद्रजित् राक्षसानें बाणांच्या योगानें रामलक्ष्मणांना व त्या वानरांनाही वेध केला आणि अशा प्रकारें तो मायावी रावणपुत्र त्यांना एकसारिखें ताडण करूं लागला असतां २५ सूर्यचंद्रच आकाशांतून

वीरौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ । पेततुर्गगनाद्भूमिं सूर्याचन्द्रमसाविव २६
[१०९८८]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां०वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणीन्द्रजियुद्धेष्टाशीत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८८ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ तावुभौ पतितौ दृष्ट्वा भ्रातरौ रामलक्ष्मणौ । बबन्ध रावणिर्भूयः शरैर्दत्तवरैस्तदा १ तौ वीरौ शरबन्धेन बद्धाविन्द्रजिता रणे । रेजतुः पुरुषव्याघ्रौ शकुन्ताविव पञ्जरे २ तौ दृष्ट्वा पतितौ भूमौ शतशः सायकैश्चितौ । सुग्रीवः कपिभिः सार्धं परिवार्य ततः स्थितः ३ सुषेणमैन्दद्विविदैः कुमुदेनाङ्गदेन च । हनुमन्नीलतारैश्च नलेन च कपीश्वरः ४ ततस्तं देशमागम्य कृतकर्मा बिभीषणः । बोधयामास तौ वीरौ प्रज्ञास्त्रेण प्रबोधितौ ५ विशल्यौ चापि सुग्रीवः क्षणेनैतौ चकार ह । विशल्यया महौषध्या दिव्यमन्त्रप्रयुक्तया ६ तौ लब्धसंज्ञौ नृवरौ विशल्यावुदतिष्ठताम् । गततन्द्रीक्लमौ चापि क्षणेनैतौ महारथौ ७ ततो बिभीषणः

पृथ्वीवर पडले आहेत कीं काय असे ते उभयतां वीर भ्राते रामलक्ष्मण बाणांनीं व्याप्त होऊन भूमीवर पडले २६. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वापैकीं इंद्रजिताच्या युद्धाविषयीं दोनशें अठ्ठ्यायशींवा अध्याय समाप्त झाला ॥ २८८ ॥

मार्कंडेय सांगतातः—ते उभयतां भ्राते रामलक्ष्मण पृथ्वीवर पडलेले अवलोकन करून इंद्रजितानें आपल्या वरप्रदानयुक्त बाणांच्या योगानें त्यांना अगदीं बांधून टाकिलें १ व ह्याप्रमाणें बाणबंधनानें त्या वीरांना संग्रामामध्यें इंद्रजितानें बद्ध करून टाकिलें असतां ते पुरुषश्रेष्ठ पिंजऱ्यांत असलेले दोन पक्षीच कीं काय असे शोभूं लागले २. शेंकडों बाणांनीं व्याप्त झालेले ते रामलक्ष्मण भूमीवर पडलेले पाहून वानराधिपति सुग्रीव—सुषेण, मैंद, द्विविद, कुमुद, अंगद, हनुमान्, नील, तार आणि नल ह्या—वानरांसहवर्तमान त्यांच्या भोंवतीं गराडा देऊन उभा राहिला ३, ४. इतक्यांत तशीं कर्मे केलेला बिभीषण तेथें आला आणि प्रज्ञास्त्राच्या योगानें त्यानें त्या वीरांना देहभानावर आणिलें ५. ह्याप्रमाणें प्रज्ञास्त्राच्या योगानें ते देहभानावर आले असतां दिव्य मंत्रांनीं अभिमंत्रण केलेल्या विशल्यसंज्ञक महौषधीनें एका क्षणांत सुग्रीवानें त्यांच्या शरीरांतील बाणांचीं क्षतें नाहींशीं केलीं ६. आणि ह्याप्रमाणें ते देहभानावर आले असतां आणि त्यांच्या शरीरांतील बाण सर्व बाहेर निघाले असतां त्या महारथ्यांची तंद्री व थकवाही एका क्षणांत नष्ट होऊन ते उभे राहिले ७. तदनंतर, हे कुंतीपुत्रा धर्मराजा, इक्ष्वाकुनंदन राम निर्भय

पार्थ राममिक्ष्वाकुनन्दनम् । उवाच विज्वरं हृष्टा कृताञ्जलिरिदं वचः ८
इदमम्भो गृहीत्वा तु राजराजस्य शासनात् । गुह्यकोऽभ्यागतः श्वेतात्त्वत्स-
काशमरिन्दम ९ इदमम्भः कुबेरस्ते महाराज प्रयच्छति । अन्तर्हितानां
भूतानां दर्शनार्थं परन्तप १० अनेन मृष्टनयनो भूतान्यन्तर्हितान्युत ।
भवान्द्रक्ष्यति यस्मै च प्रदास्यति नरः स तु ११ तथेति रामस्तद्वारि
प्रतिगृह्याभिसंस्कृतम् । चकार नेत्रयोः शौचं लक्ष्मणश्च महामनाः १२
सुग्रीवजाम्बवन्तौ च हनुमानङ्गदस्तथा । मैन्दद्विविदनीलाश्च प्रायः प्लव-
गसत्तमाः १३ तथा समभवच्चापि यदुवाच विभीषणः । क्षणेनातीन्द्रि-
याण्येषां चक्षूंष्यासन्युधिष्ठिर १४ इन्द्रजित्कृतकर्मा च पित्रे कर्म तदा-
त्मनः । निवेद्य पुनरागच्छत्त्वरयाजिशिरः प्रति १५ तमापतन्तं संक्रुद्धं
पुनरेव युयुत्सया । अभिदुद्राव सौमित्रिर्विभीषणमते स्थितः १६ अकृताह्नि-
कमेवैनं जिघांसुर्जितकाशिनम् । शरैर्जघान संक्रुद्धः कृतसंज्ञोऽथ लक्ष्मणः १७
तयोः समभवद्युद्धं तदान्योन्यं जिगीषतोः । अतीव चित्रमाश्चर्यं शक्रप्रह्लादयो-

---

आहे असें आढळून आल्यावर बिभीषण हात जोडून त्याला ह्मणाला ८ " हे शत्रुता-पना रामा, कुबेराच्या आज्ञेनें हें उदक घेऊन एक गुह्यक कैलासपर्वतापासून तुझ्या-समीप आला आहे ९. हे महाराजा, हे शत्रुतापना, गुप्त रहाणार प्राणी दृष्टीं पडावे एतदर्थ कुबेरानें हें उदक तुला दिलें आहे १०. ह्यास्तव, हें डोळ्याला लाविलें असतां गुप्त रहाणारे प्राणी आपल्या दृष्टीं पडतील आणि ज्याला आपण हें उदक घाल त्या पुरुषाच्याही ते प्राणी दृष्टोत्पत्तीस येऊ लागतील " ११. ह्यावर " ठीक आहे " असें ह्मणून रामानें त्या अभिमंत्रण केलेल्या उदकाचा स्वीकार केला आणि तें उदक आपल्या नेत्रांना लाविलें, महाशय लक्ष्मणानेंही तें लावून पाहिलें १२ आणि सुग्रीव, जांबवान, हनुमान्, अंगद, मैंद, द्विविद, नील वगैरे प्रायः सर्व मोठ्या मोठ्या वानरांनीं तसें करून पाहिलें असतां १३ बिभीषणानें सांगितल्याप्रमाणेंच प्रत्ययाला आलें आणि, हे युधिष्ठिरा, एका क्षणामध्यें त्या सर्वांना अतींद्रिय दृष्टि प्राप्त झाली १४. इतक्यांत पराक्रम गाजविलेला तो इंद्रजित् आपलें तें कर्म पित्याला निवेदन करून त्वरेत्वरेनें रणभूमींतील अगदीं मान्याचे ठिकाणीं परत येत होता १५. तेव्हां बिभीषणाच्या मतानें वागणारा सुमित्रापुत्र लक्ष्मण पुनरपि युद्धाच्या इच्छेनें क्रुद्ध होऊन येत असलेल्या त्या इंद्रजितावर चाल करून गेला १६; आणि बिभीषणानें खूण केल्यानंतर त्या क्रुद्ध लक्ष्मणानें स्नानसंध्या न आटोपलेल्याच त्या वीरश्री चढलेल्या इंद्रजिताचा वध करण्याचा उद्देश मनांत धरून बाणांनीं त्याला प्रहार केला १७. तेव्हां इंद्र आणि

रिव १८ अविध्यदिन्द्रजित्तीक्ष्णैः सौमित्रिं मर्मभेदिभिः । सौमित्रिश्चानल-स्पर्शैरविध्यद्रावणिं शरैः १९ सौमित्रिशरसंस्पर्शाद्रावणिः क्रोधमूर्छितः । असृजल्लक्ष्मणायाष्टौ शरानाशीविषोपमान् २० तस्यासून्पावकस्पर्शैः सौमित्रिः पत्रिभिस्त्रिभिः । यथा निरहरद्वीरस्तन्मे निगदतः शृणु २१ एकेनास्य धनुष्मन्तं बाहुं देहादपातयत् । द्वितीयेन सनाराचं भुजं भूमौ न्यपातयत् २२ तृतीयेन तु बाणेन पृथुधारेण भास्वता । जहार सुनसं चापि शिरो भ्राजिष्णुकुण्डलम् २३ विनिकृत्तभुजस्कन्धं कबन्धं भीम-दर्शनम् । तं हत्वा सूतमप्यस्त्रैर्जघान बलिनां वरः २४ लङ्कां प्रवेशयामासुस्तं रथं वाजिनस्तदा । ददर्श रावणस्तं च रथं पुत्रविनाकृतम् २५ स पुत्रं निहतं दृष्ट्वा त्रासात्संभ्रान्तमानसः । रावणः शोकमोहार्तो वैदेहीं हन्तुमुद्यतः २६ अशोकवनिकास्थां तां रामदर्शनलालसाम् । खड्गमादाय

प्रल्हाद ह्यांमध्यें पूर्वी जसें अत्यंत आश्चर्यकारक अद्भुत युद्ध झालें होतें तसें परस्परांना जिंकण्याची इच्छा धरणाऱ्या त्या उभयतांमध्यें युद्ध सुरू झालें १८ इंद्रजितानें मर्मभेदक तीक्ष्ण बाणांनीं लक्ष्मणाला वेध केला व लक्ष्मणानेंही ज्यांचा स्पर्श अग्नीप्रमाणें दाहक आहे अशा बाणांनीं रावणपुत्राला वेध केला १९. लक्ष्मणाच्या बाणांचा स्पर्श होतांक्षणीं रावणपुत्र इंद्रजित् क्रोधानें अगदीं व्याप्त झाला आणि लक्ष्मणावर त्यानें सर्पासारिखे आठ प्राणनाशक बाण सोडिले २०. परंतु, अग्नितुल्य तीन बाणांच्या योगानें वीर लक्ष्मणानें त्याचें प्राणहरण कसें केलें तें (हे धर्मराजा,) माझ्या तोंडून श्रवण कर २१. एका बाणानें त्या इंद्रजिताचा धनुष्यासहवर्तमान बाहु लक्ष्मणानें देहापासून खालीं पाडिला; दुसऱ्या बाणानें नाराचबाणांनीं युक्त असलेला त्याचा दुसरा हात त्यानें भूमीवर उतरला २२ आणि विशालधारेनें युक्त अशा एका तिसऱ्या उज्ज्वल बाणानें उत्कृष्ट नासिका आणि उज्ज्वल कुंडलें ह्यांनीं युक्त असलेलें त्याचें शीर तोडून टाकिलें २३. इतकेंच नव्हे परंतु, हात व खांदे तोडून टाकिल्यामुळें भयंकर दिसूं लागलेलें तें धड पुरतें मारून टाकून बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या लक्ष्मणानें अस्त्रांच्या योगानें त्याच्या सारथ्याचाही वध केला २४ व इतकें झाल्यावर इंद्रजिताच्या रथाचे अश्व तो रथ घेऊन लंकेमध्यें प्रविष्ट झाले. असतां पुत्रावांचून आलेला आपला रथ रावणानें अवलोकन केला २५. सारांश, पुत्राचा वध झाला असें आढळून आल्यावर संतापानें रावणाचें मन क्षुब्ध झालें; शोकमोहांनीं व्याप्त झालेला तो रावण सीतेचा वध करण्यास उद्युक्त झाला २६; आणि भावमर्गें रामदर्शनाकरितां उत्सुक होऊन अशोकवनामध्यें असलेल्या त्या सीतेकडे तो

दुरात्मा जवेनाभिपपात ह २७ तं दृष्ट्वा तस्य दुर्बुद्धेरविन्ध्यः पापनिश्चयम् । शमयामास संक्रुद्धं श्रूयतां येन हेतुना २८ महाराज्ये स्थितो दीप्ते न स्त्रियं हन्तुमर्हसि । हतैवैषा यदा स्त्री च बन्धनस्था च ते वशे २९ न चैषा देहभेदेन हता स्यादिति मे मतिः । जहि भर्तारमेवास्या हते तस्मिन्हता भवेत् ३० न हि ते विक्रमे तुल्यः साक्षादपि शतक्रतुः । असकृद्धि त्वया सेन्द्रास्त्रासितास्त्रिदशा युधि ३१ एवं बहुविधैर्वाक्यैरविन्ध्यो रावणं तदा । क्रुद्धं संशमयामास जगृहे च स तद्वचः ३२ निर्याणे स मतिं कृत्वा निधायासिं क्षपाचरः । आज्ञापयामास तदा रथो मे कल्प्यतामिति ३३ [११०२१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणीन्द्रजिद्वधे ऊननवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २८९ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ ततः क्रुद्धो दशग्रीवः प्रिये पुत्रे निपातिते । निर्ययौ रथमास्थाय हेमरत्नविभूषितम् १ स वृतो राक्षसैर्घोरैर्विवि-

---

दुरात्मा रावण खड्ग घेऊन वेगावेगानें धांवतही गेला २७. तेव्हां त्या दुर्बुद्धि रावणाचा तो दुष्ट हेतु जाणून अविंध्य राक्षसानें त्या क्रुद्ध राक्षसाचें कोणत्या युक्तीनें सांत्वन केलें तें तूं आतां ऐक २८. (तो ह्मणाला) " हे रावणा, उज्ज्वल सार्वभौम राज्यावर स्थित असलेल्या तुला स्त्रीचा वध करणें योग्य नाहीं. अरे, ज्यावेळला ही स्त्री तुझ्या तावडींत सांपडून कारागृहामध्यें राहिली तेव्हांच हिचा वध झालेला आहे २९. देहाचे तुकडे करण्यानेंच हिचा काहीं विशेष वध होणार आहे असें मला वाटत नाहीं. तस्मात्, तूं हिच्या भर्त्याचाच वध कर; ह्मणजे त्याचा वध झाला असतां हिचा आपोआपच वध होईल ३०. अरे, साक्षात् इंद्रही पराक्रमामध्यें तुझी बरोबरी करणारा नाहीं. कारण, संग्रामामध्यें तूं अनेकवेळां इंद्रासहवर्तमान देवांना जर्जर करून सोडिलें आहेस " ३१. ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या भाषणांनीं अविंध्य राक्षसानें क्रुद्ध झालेल्या रावणाचें सांत्वन केलें व त्यानेंही त्याच्या ह्मणण्याला मान दिला ३२; आणि तदनंतर उपसलेला खड्ग बाजूला ठेवून आणि संग्रामामध्यें जाण्याचा विचार करून " माझा रथ सज्ज करा " ह्मणून त्या राक्षसानें आज्ञा केली ३३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वापैकीं इंद्रजिताच्या वधाविषयीं दोनशें एकूणनव्वदावा अध्याय समाप्त झाला ॥ २८९ ॥

मार्कंडेय सांगतात:—तदनंतर प्रियपुत्राचा वध झाला असतां क्रुद्ध झालेला

आयुधपाणिभिः । अभिदुद्राव रामं स योधयन्हरियूथपान् २ तमाद्रवन्तं संक्रुद्धं मैन्दनीलनलाङ्गदाः । हनूमाञ्जाम्बवांश्चैव ससैन्याः पर्यवारयन् ३ ते दशग्रीवसैन्यं तदृक्षवानरपुङ्गवाः। द्रुमैर्विध्वंसयाञ्चक्रुर्दशग्रीवस्य पश्यतः४ ततः स सैन्यमालोक्य वध्यमानमरातिभिः । मायावी चासृजन्मायां रावणो राक्षसाधिपः५तस्य देहविनिष्क्रान्ताः शतशोऽथ सहस्रशः । राक्षसाः प्रत्यदृश्यन्त शरशक्त्यृष्टिपाणयः ६ तान्रामो जघ्निवान्सर्वान्दिव्येनास्त्रेण राक्षसान् । अथ भूयोपि मायां स व्यदधाद्राक्षसाधिपः ७ कृत्वा रामस्य रूपाणि लक्ष्मणस्य च भारत । अभिदुद्राव रामं च लक्ष्मणं च दशाननः८ ततस्ते राममर्च्छन्तो लक्ष्मणं च क्षपाचराः । अभिपेतुस्तदा रामं प्रगृहीतशरासनाः ९ तां दृष्ट्वा राक्षसेन्द्रस्य मायामिक्ष्वाकुनन्दनः । उवाच रामं सौमित्रिरसंभ्रान्तो बृहद्वचः १० जहीमान्राक्षसान्पापानात्मनः प्रतिरूपकान् । जघान रामस्तांश्चान्यानात्मनः प्रतिरूपकान् ११ ततो

रावण सुवर्ण व रत्नें ह्यांनीं शृंगारिलेल्या रथावर आरूढ होऊन निघाला १. नानाप्रकारचीं आयुधें हातामध्यें घेतलेले घोर राक्षस त्याच्या बरोबर होते आणि वानरसेनाधिपतींशीं युद्ध करीत करीत तो रावण रामाकडे धांवून गेला २; परंतु, तो क्रुद्ध झालेला रावण चाल करून येत आहे असें अवलोकन करितांक्षणीं मैंद, नील, नल, अंगद, हनुमान् आणि जांबवान् ह्यांनीं आपआपल्या सैन्यासहवर्तमान त्याचें निवारण केलें ३; व त्या श्रेष्ठ श्रेष्ठ अस्वलांनीं आणि वानरांनीं रावणाचे समक्ष वृक्षांच्या योगानें त्याच्या सैन्याचा विध्वंस करून टाकिला ४. तेव्हां शत्रु आपल्या सैन्याचा वध करीत आहेत असें अवलोकन करून मायावी राक्षसाधिपति रावणानें मायेचें अवलंबन केलें असतां ५ बाण, शक्ति, आणि ऋष्टि ज्यांच्या हातांमध्यें आहेत असे शेंकडों हजारों राक्षस त्याच्या देहापासून बाहेर पडलेले दृष्टीं पडले ६. परंतु, रामानें त्या सर्व राक्षसांचा दिव्य अस्त्रानें वध केला. तेव्हां राक्षसाधिपति रावणानें पुनरपि मायेचें अवलंबन केलें ७; आणि, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, रामलक्ष्मणांसारिखीं रूपें धारण करून तो रावण रामलक्ष्मणांवर धांवून गेला ८. तदनंतर रामाला व लक्ष्मणाला पीडा करणाच्या उद्देशानें हातांमध्यें धनुष्य घेतलेले ते राक्षस रामावर तुटून पडूं लागले असतां ९ राक्षसाधिपतीची ती माया अवलोकन करून तो निर्भय लक्ष्मण गंभीर शब्दांनीं रामाला ह्मणाला १० "आपल्याप्रमाणें रूप धारण केलेल्या ह्या दुष्ट राक्षसांचा वध करून टाक." ह्याप्रमाणें लक्ष्मणानें सांगितलें असतां स्वतःप्रमाणें रूप धारण केलेल्या त्या व इतरही राक्षसांचा रामानें

हर्यश्वयुक्तेन रथेनादित्यवर्चसा। उपतस्थे रणे रामं मातलिः शक्रसारथिः १२
मातलिरुवाच ॥ अयं हर्यश्वयुग्जैत्रो मघोनः स्यन्दनोत्तमः । अनेन शक्रः
काकुत्स्थ समरे दैत्यदानवान् १३ शतशः पुरुषव्याघ्र रथोदारेण जघ्नि-
वान् । तदनेन नरव्याघ्र मया यत्तेन संयुगे १४ स्यन्दनेन जहि क्षिप्रं रावणं
मा चिरं कृथाः । इत्युक्तो राघवस्तथ्यं वचोऽशङ्कत मातलेः १५ मायैषा
राक्षसस्येति तमुवाच विभीषणः । नेयं माया नरव्याघ्र रावणस्य दुरा-
त्मनः १६ तदातिष्ठ रथं शीघ्रमिममैन्द्रं महाद्युते । ततः प्रहृष्टः काकु-
त्स्थस्तथेत्युक्त्वा विभीषणम् १७ रथेनाभिपपाताथ दशग्रीवं रुषान्वितः।
हाहाकृतानि भूतानि रावणे समभिद्रुते १८ सिंहनादाः सपटहा दिवि दिव्या-
स्तथानदन् । दशकन्धरराजसून्वोस्तथा युद्धमभून्महत् १९ अलब्धोपमम-
न्यत्र तयोरेव तथाभवत् । स रामाय महाघोरं विससर्ज निशाचरः २०
शूलमिन्द्राशनिप्रख्यं ब्रह्मदण्डमिवोद्यतम् । तच्छूलं सत्वरं रामश्चिच्छेद
निशितैः शरैः २१ तद्दृष्ट्वा दुष्करं कर्म रावणं भयमाविशत् । ततः क्रुद्धः

वध केला. ११ तेव्हां इतकें झाल्यानंतर हरिसंज्ञक अश्व ज्याला जोडिलेले आहेत आणि सूर्यासारिखी ज्याची प्रभा आहे असा रथ घेऊन इंद्राचा सारथि मातलि संग्राममध्यें रामाकडे आला १२. मातलि ह्मणाला, हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, हा हरिसंज्ञक अश्व जोडिलेला इंद्राचा विजयशाली श्रेष्ठ रथ होय. ह्या उत्कृष्ट रथाच्या योगानें समरांगणामध्यें, हे पुरुषश्रेष्ठा रामा, शेंकडों दैत्यांचा व दानवांचा इंद्रानें वध केला आहे. तस्मात्, हे पुरुषश्रेष्ठा, मी संभाळिलेल्या ह्या रथाच्या योगानें तूं संग्रामामध्यें रावणाचा सत्वर वध कर. आता विलंब लावूं नको. ह्याप्रमाणें मातलीनें सांगितलें असतांही त्याच्या सत्यभाषणाची शंका येऊन रामाला १३, १४, १५ही राक्षसाची माया असावी असें वाटलें. तेव्हां बिभीषण त्याला ह्मणाला " हे पुरुषश्रेष्ठा, दुरात्म्या रावणाची ही माया नव्हे १६. हे महातेजस्वी रामा, ह्या इंद्राच्या रथावर तूं सत्वर आरूढ हो ". तदनंतर ककुत्स्थकुलोत्पन्न राम आनंदित झाला आणि " ठीक आहे " असें बिभीषणाला ह्मणून १७ व त्या रथावर आरूढ होऊन क्रोधानें रावणा-वर चालून गेला. राम रावणावर चालून गेला असतां सर्व प्राणी हाहाकार करूं लागले १८; आणि डंक्यांसहवर्तमान स्वर्गामध्यें दिव्य सिंहनाद होऊं लागले. रावण आणि राजकुमार राम ह्यांमध्यें इतकें मोठें युद्ध झालें कीं १९ त्याला उपमा देण्या-सच कोठें कांहीं नाहीं. सारांश, रामरावणांचें युद्ध रामरावणांच्या युद्धाप्रमाणेंच झालें. त्या राक्षसानें उगारिलेला ब्रह्मदंडच कीं काय असा एक इंद्रवज्रतुल्य अति भयंकर

ससर्जाशु दशग्रीवः शिताञ्छरान् २२ सहस्रायुतशो रामे शस्त्राणि विविधानि च। ततो भुशण्डीः शूलानि मुसलानि परश्वधान् २३ शक्तीश्च विविधाकाराः शतघ्नीश्च शिताञ्क्षुरान्। तां मायां विकृतां दृष्ट्वा दशग्रीवस्य रक्षसः २४ भयात्प्रदुद्रुवुः सर्वे वानराः सर्वतोदिशम्। ततः सुपत्रं सुमुखं हेमपुङ्खं शरोत्तमम् २५ तूणादादाय काकुत्स्थो ब्रह्मास्त्रेण युयोज ह। तं बाणवर्यं रामेण ब्रह्मास्त्रेणानुमन्त्रितम् २६ जहृषुर्देवगन्धर्वा दृष्ट्वा शक्रपुरोगमाः। अल्पावशेषमायुश्च ततोमन्यन्त रक्षमः २७ ब्रह्मास्त्रोदीरणाच्छत्रोर्देवदानवकिंनराः। ततः ससर्ज तं रामः शरमप्रतिमौजसम् २८ रावणान्तकरं घोरं ब्रह्मदण्डमिवोद्यतम्। मुक्तमात्रेण रामेण दूराकृष्टेन भारत २९ स तेन राक्षसश्रेष्ठः सरथः साश्वसारथिः। प्रजज्वाल महाज्वालेनाग्निनाभिपरिप्लुतः ३० ततः प्रहृष्टास्त्रिदशाः सहगन्धर्वचारणाः। निहतं रावणं दृष्ट्वा रामेणाक्लिष्टकर्मणा ३१ तत्यजुस्तं महाभागं पञ्चभूतानि

शूल रामावर फेंकिला असतां तीक्ष्ण बाणांच्या योगानें त्या शूलाचे रामानें सत्वर तुकडे तुकडे करून टाकिले २०, २१. तदनंतर तें दुर्घट कर्म अवलोकन केल्यावर रावण भयभीत झाला; आणि क्रुद्ध होऊन तो रावण त्वरेत्वरेनें हजारों लाखों तीक्ष्ण बाण, नानाप्रकारचीं शस्त्रें, भुशुंडी, शूल, मुसलें, कुऱ्हाडी, नानाप्रकारच्या शक्ति, तोफा आणि धार लावलेले वस्तर ह्यांचा रामावर भडिमार करू लागला व रावणराक्षसाची ती विकृत माया अवलोकन करून २२,२३,२४ सर्व वानर भीतीनें चोहोंकडे पळू लागले. तदनंतर उत्कृष्ट पातें, उत्तम अग्र आणि सुवर्णपिच्छ ह्यांनीं युक्त असलेला एक उत्तम बाण २५ भात्यांतून काढून ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें त्याला ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रण केलें. तेव्हां रामानें तो श्रेष्ठ बाण ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रण केलेला २६ पाहून इंद्रप्रभृति देवगंधर्वांना हर्ष झाला; आणि रामानें शत्रूवर ब्रह्मास्त्राचा प्रयोग केल्यामुळें राक्षसाचें आयुष्य आतां अगदींच थोडकें राहिलें आहे असें देव, दानव व किन्नर ह्यांना वाटलें. तदनंतर अप्रतिम तेजानें युक्त आणि उगारिलेल्या ब्रह्मदंडाप्रमाणें भयंकर असा तो रावणनाशक बाण रामानें सोडिला; आणि, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, रामानें तो बाण लांब खेंचून सोडिला नाहीं तोंच २७,२८,२९ महाज्वालांनीं युक्त असलेल्या त्या बाणरूप अग्नीनें व्याप्त झालेला तो राक्षसश्रेष्ठ रथ, अश्व व सारथि ह्यांसहवर्तमान दग्ध होऊन गेला ३०. तदनंतर महापराक्रमी रामानें रावणाचा वध केल्याचें अवलोकन करून गंधर्व आणि चारण ह्यांसहवर्तमान देव आनंदित झाले ३१. त्या महाभाग्यवान् रावणाला पंचमहाभूतेंही

रावणम् । अंशितः सर्वलोकेषु म हि ब्रह्मास्त्रतेजसा ३२ शरीरधातवो ह्यस्य मांसं रुधिरमेव च । नेशुर्ब्रह्मास्त्रनिर्दग्धा न च भस्माप्यदृश्यत ३३ [११०५४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि रावणवधे नवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९० ॥

मार्कण्डेय उवाच ॥ स हत्वा रावणं क्षुद्रं राक्षसेन्द्रं सुरद्विषम् । बभूव हृष्टः ससुहृद्रामः सौमित्रिणा सह १ ततो हते दशग्रीवे देवाः सर्षिपुरोगमाः । आशीर्भिर्जययुक्ताभिरानर्चुस्तं महाभुजम् २ रामं कमलपत्राक्षं तुष्टुवुः सर्वदेवताः । गन्धर्वाः पुष्पवर्षैश्च वाग्भिश्च त्रिदशालयाः ३ पूजयित्वा यथा रामं प्रतिजग्मुर्यथागतम् । तन्महोत्सवसंकाशमासीदाकाशमच्युत ४ ततो हत्वा दशग्रीवं लङ्कां रामो महायशाः । बिभीषणाय प्रददौ प्रभुः परपुरंजयः ५ ततः सीतां पुरस्कृत्य बिभीषणपुरस्कृताम् । अविन्ध्यो नाम सुप्रज्ञो वृद्धामात्यो विनिर्ययौ ६ उवाच च महात्मानं काकुत्स्थं दैन्यमास्थितः । प्रतीच्छ देवीं सद्वृत्तां महात्मञ्जानकीमिति ७

सोडून गेलीं; आणि ब्रह्मास्त्राच्या तेजामुळें तो रावण सर्व लोकांना मुकला ३२. मांस, रक्त वगैरे त्याच्या शरीरांतील धातुही ब्रह्मास्त्रानें दग्ध झाल्यामुळें नाहींसे झाले; आणि त्यांचें भस्म देखील पहाण्याला शिलक राहिलें नाहीं. ३३. याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वापैकीं रावणवधाविषयीं दोनशें नव्वदावा अध्याय समाप्त झाला ॥ २९० ॥

मार्कंडेय सांगतात:— देवद्वेष्ट्या राक्षसाधिपति क्षुद्र रावणाचा वध केल्यावर तो राम, लक्ष्मण आणि सुहृत् ह्यांसहवर्तमान आनंदित झाला १. रावणाचा वध झाल्यावर ऋषी ज्यांमध्यें पुढें आहेत अशा देवांनीं जयसूचक आशीर्वादांनीं त्या महापराक्रमी रामाची प्रशंसा केली २. सर्व देवता कमलनयन रामाची स्तुति करूं लागल्या; आणि पुष्पवृष्टींनीं गंधर्व व संभाषणांनीं देव ३ रामाचें पूजन करून आल्या मार्गानें परत गेले; व, हे धर्मापासून च्युत न होणाऱ्या धर्मराजा, त्या वेळीं अंतरिक्षांतील प्रदेश महोत्सवयुक्त दिसूं लागला ४. असो. रावणाचा वध केल्यानंतर शत्रुसमूहनाशक महाकीर्तिमान् समर्थ रामानें बिभीषणाला लंका अर्पण केली ५. तदनंतर बिभीषणानें जिची मानमान्यता ठेविली आहे अशा त्या सीतेला पुढें करून रावणाचा अविंध्यनामक एक वृद्ध व महाज्ञानी अमात्य बाहेर निघाला ६ आणि दीन होऊन महात्म्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला म्हणाला "हे महात्म्या, आपण ह्या सदाचरणानें वागलेल्या देवी जानकी-

एतच्छ्रुत्वा वचस्तस्मादवतीर्य रथोत्तमात् । बाष्पेनापिहितां सीतां ददर्शे-
क्ष्वाकुनन्दनः ८ तां दृष्ट्वा चारुसर्वाङ्गीं यानस्थां शोककर्शिताम् । मलोप-
चितसर्वाङ्गीं जटिलां कृष्णवाससम् ९ उवाच रामो वैदेहीं परामर्शविशङ्कितः ।
गच्छ वैदेहि मुक्ता त्वं यत्कार्यं तन्मया कृतम् १० मामासाद्य पतिं भद्रे न त्वं
राक्षसवेश्मनि । जरां व्रजेथा इति मे निहतोऽसौ निशाचरः ११ कथं
ह्यस्मद्विधो जातु जानन्धर्मविनिश्चयम् । परहस्तगतां नारीं मुहूर्तमपि
धारयेत् १२ सुवृत्तामसुवृत्तां वाप्यहं त्वामद्य मैथिलि । नोत्सहे परिभो-
गाय श्वावलीढं हविर्यथा १३ ततः सा सहसा बाला तच्छ्रुत्वा दारुणं
वचः । पपात देवी व्यथिता निकृत्ता कदली यथा १४ योऽप्यस्या हर्षसं-
भूतो मुखरागस्तदाभवत् । क्षणेन स पुनर्नष्टो निःश्वास इव दर्पणे १५ ततस्ते
हरयः सर्वे तच्छ्रुत्वा रामभाषितम् । गतासुकल्पा निश्चेष्टा बभूवुः सहल-
क्ष्मणाः १६ अमृष्यमाणा सा सीता वचनं राघवोदितम् । लक्ष्मणं प्राह
मे शीघ्रं प्रज्वालय हुताशनम् १७ विश्वासार्थं हि रामस्य लोकानां ।

कन्येचा स्वीकार करा" ७. हें भाषण एकिल्यावर इक्ष्वाकुनंदन राम त्या श्रेष्ठ रथापासून खालीं उतरले; आणि अश्रूंनीं आच्छादित झालेली सीता त्यांनीं अवलोकन केली ८. तदनंतर जिच्या सर्वांगावर मळ वाढला आहे, जिची वेणी मोकळी सुटली आहे, जिचें वस्त्र कृष्णवर्ण झालें आहे, जी शोकानें कृश झाली आहे व जी यानामध्यें बसली आहे अशा त्या सर्वांग-सुंदरी सीतेला अवलोकन केल्यानंतर ९ परपुरुषाच्या स्पर्शाची शंका घेऊन राम तिला ह्मणाले "हे सीते, तुझी आतां मुक्तता झाली आहे; आतां तूं हवी तिकडे जा. मला जें कर्तव्य होतें तें मीं केलें १०. हे कल्याणि, मी तुझा पति असतांना राक्षसाच्या घरामध्येंच कुचमत पडून तुला वार्धक्य येऊं नये एतदर्थ मी ह्या राक्षसाचा वध केला ११; परंतु, धर्मनिर्णय जाणणारा आह्मांसारिखा, कांहीं जरी प्रसंग आला तरी, दुसऱ्याच्या हस्तगत झालेली स्त्री एक क्षणभर तरी आपल्या जवळ कशी ठेवील ? १२. सारांश, हे मैथिलि, तूं सद्वृत्त अथवा दुर्वृत्त कशीही जरी असलीस तरी श्वानानें उष्टावलेल्या हवीप्रमाणें उपभोगाकरितां तुझा स्वीकार करणें आज मला योग्य दिसत नाहीं" १३. हें हृदयाला घरें पाडणारें भाषण श्रवण करून ती बाला सीता देवी दुःखित झाली आणि तोडून टाकिलेल्या केळीप्रमाणें एकाएकीं भूमीवर पडली १४; आणि रामाची भेट झाल्या-बरोबर हर्षानें जी तिच्या मुखावर टवटवी आली होती तीही आरशावरील निःश्वासाप्रमाणें एका क्षणांत नाहींशी झाली १५. तें रामाचें भाषण श्रवण केल्यावर सर्व वानर लक्ष्मणासह-वर्तमान मृतवत् निश्चेष्ट झाले असतां १६ रामानें केलेलें हें भाषण सीतेला सहन न

प्रत्ययाय च । राघवस्य मतं ज्ञात्वा लक्ष्मणोपि तदैव हि १८ महाकाष्ठचयं कृत्वा ज्वालयित्वा हुताशनम् । रामपार्श्वमुपागम्य तस्थौ तूष्णीमरिंदमः १९ ततः सीता परिक्रम्य राघवं भक्तिसंयुता । पश्यतां सर्वलोकानां देवराक्षसयोषिताम् २० प्रणम्य दैवतेभ्यश्च दैवतेभ्यश्च मैथिली । बद्धाञ्जलिपुटा चेदमुवाचाग्निसमीपगा २१ यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात् । तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः २२ एवमुक्त्वा तु सा सीता परिक्रम्य हुताशनम् । विवेश ज्वलनं दीप्तं निर्भयेन हृदा सती २३ ततो देवो विशुद्धात्मा विमानेन चतुर्मुखः । पद्मयोनिर्जगत्स्रष्टा दर्शयामास राघवम् २४ शक्रश्चाग्निश्च वायुश्च यमो वरुण एव च । यक्षाधिपश्च भगवांस्तथा सप्तर्षयोमलाः २५ राजा दशरथश्चैव दिव्यभास्वरमूर्तिमान् । विमानेन महार्हेण हंसयुक्तेन भास्वता २६ ततोन्तरिक्षं तत्सर्वं देवगन्धर्वसंकुलम् । शुशुभे तारकाचित्रं शरदीव नभस्तलम् २७ तत उत्थाय वैदेही तेषां मध्ये यशस्विनी । उवाच वाक्यं

झाल्यामुळें ती लक्ष्मणाला ह्मणाली " माझ्याकारितां सत्वर अग्नि प्रज्वलित करा १७. कारण, माझ्या शुद्धतेविषयीं लोकांची व रामाची खात्री होणें अवश्य आहे." सीतेनें ह्याप्रमाणें सांगितलें असतां तें रामालाही अभिमत आहे असें समजून लक्ष्मणानेंही १८ काष्ठांची एक मोठी रास करून अग्नि प्रदीप्त केला; आणि तो शत्रुदमन लक्ष्मण रामाकडे येऊन स्वस्थ उभा राहिला १९. तदनंतर सीतेनें भक्तिपूर्वक सर्व लोकांसमक्ष आणि देव, राक्षस व स्त्रिया ह्यांसमक्ष रामाला प्रदक्षिणा केली २०; आणि अग्नीचे समीप गेल्यावर देवतांना प्रणाम करून व हात जोडून ती मैथिली ह्मणाली २१ " जर माझें हृदय रामापासून आजपर्यंत कधीं दुसरीकडे गेलें नसेल आणि जात नसेल तर हा लोकसाक्षी अग्नि सर्व प्रकारें माझें रक्षण करो " २२. असें ह्मणून त्या सीतेनें अग्नीला प्रदक्षिणा घातली; आणि मनामध्यें यत्किंचितही भीति न बाळगितां ती साध्वी त्या प्रदीप्त अग्नीमध्यें प्रविष्ट झाली २३. शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेल्या जगत्स्रष्ट्या ब्रह्मदेवानें विमानांत बसून येऊन रामाला दर्शन दिलें २४. इंद्र, अग्नि, वायु, यम, वरुण, यक्षाधिपति भगवान् कुबेर व त्याचप्रमाणें निष्कलंक सप्तर्षि तेथें आले २५; आणि हंस जोडिलेल्या महामूल्यवान् व प्रकाशमान विमानामध्यें बसून दिव्य व उज्ज्वल रूप धारण केलेला राजा दशरथही तेथें आला २६. सारांश, त्या वेळीं तो सर्व अंतरिक्षप्रदेश देवगंधर्वांनीं गजबजून गेला आणि शरदृतूमध्यें नक्षत्रांनीं चित्रित झालेल्या नभोमंडळाप्रमाणें शोभूं लागला २७. असो.

कल्याणी रामं पृथुलवक्षसम् २८ राजपुत्र न ते दोषं करोमि विदिता हि ते। गतिः स्त्रीणां नराणां च शृणु चेदं वचो मम २९ अन्तश्चरति भूतानां मातरिश्वा सदागतिः। स मे विमुञ्चतु प्राणान्यदि पापं चराम्यहम् ३० अग्निरापस्तथाकाशं पृथिवी वायुरेव च। विमुञ्चन्तु मम प्राणान्यदि पापं चराम्यहम् ३१ यथाहं त्वदृते वीर नान्यं स्वप्नेऽप्यचिन्तयम्। तथा मे देवनिर्दिष्टस्त्वमेव हि पतिर्भव ३२ ततोऽन्तरिक्षे वागासीत्सुभगा लोकसाक्षिणी। पुण्या संहर्षणी तेषां वानराणां महात्मनाम् ३३ वायुरुवाच॥ भो भो राघव सत्यं वै वायुरस्मि सदागतिः। अपापा मैथिली राजन्संगच्छ सह भार्यया ३४ अग्निरुवाच॥ अहमन्तःशरीरस्थो भूतानां रघुनन्दन। सुसूक्ष्ममपि काकुत्स्थ मैथिली नापराध्यति ३५ वरुण उवाच॥ रसा वै मत्प्रसूता हि भूतदेहेषु राघव। अहं वै त्वां प्रब्रवीमि मैथिली प्रतिगृह्यताम् ३६ ब्रह्मोवाच॥ पुत्र नैतदिहाश्चर्यं त्वयि राजर्षिधर्मणि। साधो सद्वृत्त काकुत्स्थ शृणु चेदं वचो मम ३७ शत्रुरेष त्वया वीर

तदनंतर यशस्विनी कल्याणी सीता अग्नींतून उठली आणि त्या देवादिकांमध्यें बसलेल्या व विशाल वक्षस्थलानें युक्त असलेल्या त्या रामाला ह्मणाली २८ "हे राजपुत्रा, मीं तुझा कांहींएक अपराध केलेला नाहीं. स्त्रियांची व पुरुषांची गति तुला विदित आहे. तथापि, हें माझें भाषण आपण श्रवण करावें २९. मीं जर कांहीं पाप केलें असेल तर हा जो सर्वदां गमनशील असलेला वायु भूतांच्या हृदयांमध्यें संचार करीत आहे तो माझा प्राण घेवो ३०. मी जर पाप करीत असेन तर अग्नि, उदक, आकाश, पृथ्वी आणि वायु हीं पंचमहाभूतें माझे प्राण हरण करोत ३१. हे वीरा, ज्याअर्थीं स्वप्नांतहीं तुझ्याशिवाय अन्य पुरुष माझ्या मनामध्यें आलेला नाहीं त्याअर्थीं तूंच देवानीं सांगितल्यावर माझा पति हो" ३२. तदनंतर त्या महात्म्या वानरांना आनंद देणारी आणि जगताला ऐकूं येणारी अशी उत्कृष्ट आकाशवाणी होऊं लागली ३३. वायु ह्मणतोः—हे राघवा, मी नेहमीं संचार करणारा वायु तुला सत्य सांगत आहें. हे राजा, मैथिली निष्पाप आहे. ह्यास्तव, आपल्या त्या भार्येचा तूं स्वीकार कर ३४. अग्नि ह्मणतोः—हे रघुनंदना, मी प्राण्यांच्या शरीरामध्यें वास्तव्य करीत असतों. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, मैथिलीचा अगदीं सूक्ष्म सुद्धां अपराध नाहीं ३५. वरुण ह्मणतोः—हे राघवा, प्राण्यांच्या देहांमध्यें रसांची उत्पत्ति माझ्यापासून होत असते. तस्मात्, मैथिलीचा तूं स्वीकार कर असें मी तुला सांगत आहें ३६. ब्रह्मदेव ह्मणतो— हे पुत्रा, राजर्षिधर्मानें वागणाऱ्या तुझे ठिकाणीं अशा प्रसंगीं हें

देवगन्धर्वभोगिनाम् । यक्षाणां दानवानां च महर्षीणां च पातितः ३८ अवध्यः सर्वभूतानां मत्प्रमादात्पुराभवत् । कस्माच्चित्कारणात्पापः कंचित्कालमुपेक्षितः ३९ वधार्थमात्मनस्तेन हृता सीता दुरात्मना । नलकूबरशापेन रक्षा चास्याः कृता मया ४० यदि ह्यकामामासेवेत्स्त्रियमन्यामपि ध्रुवम् । शतधास्य फलेन्मूर्धा इत्युक्तः सोऽभवत्पुरा ४१ नात्र शङ्का त्वया कार्या प्रतीच्छेमां महाद्युते । कृतं त्वया महत्कार्यं देवानाममरप्रभ ४२ दशरथ उवाच ॥ प्रीतोऽस्मि वत्स भद्रं ते पिता दशरथोऽस्मि ते । अनुजानामि राज्यं च प्रशाधि पुरुषोत्तम ४३ राम उवाच ॥ अभिवादये त्वां राजेन्द्र यदि त्वं जनको मम । गमिष्यामि पुरीं रम्यामयोध्यां शासनात्तव ४४ मार्कण्डेय उवाच ॥ तमुवाच पिता भूयः प्रहृष्टो भरतर्षभ । गच्छायोध्यां प्रशाधीति रामं रक्तान्तलोचनम् ॥ संपूर्णानीह वर्षाणि चतुर्दश महाद्युते ४५ ततो देवान्नमस्कृत्य

आश्चर्य नव्हे. हे साधो, हे सदाचारसंपन्न काकुत्स्था, माझे हें भाषण तू श्रवण कर ३७. हे वीरा, देव, गंधर्व, उरग, यक्ष, दानव आणि महर्षि ह्यांच्या ह्या शत्रूचा तूं निःपात केलास ३८. माझ्या प्रसादामुळें पूर्वी हा सर्व भूतांना अवध्य झालेला होता; आणि काही कारणाकरिता मीं ह्या पाप्याची कांहीं वेळपर्यंत उपेक्षाही केली ३९. स्वतःच्या वधाकरिता त्या दुरात्म्यानें सीता हरण करून नेली असतांना नलकूबराच्या शापानें मीं हिचें रक्षण केलें होतें ४०. कारण, "परस्त्रीची इच्छा नसतांना रावण जर तिचा उपभोग घेईल तर त्याच्या मस्तकाचे शेंकडों तुकडे होतील" असा नलकूबराचा शाप पूर्वी त्या रावणाला झालेला आहे ४१. तस्मात्, हे महातेजस्वी रामा, ह्याविषयीं काहींएक शंका मनामध्यें न आणितां तूं हिचा स्वीकार कर. हे देवतुल्यतेजस्वी रामा, तूं देवाचें मोठेंच कार्य केलें आहेस ४२. दशरथ ह्मणाला:—हे वत्सा, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तुझें कल्याण असो; मी तुझा पिता दशरथ आहें आणि तुला आज्ञा करीत आहें. ह्यास्तव, हे पुरुषोत्तमा, तूं राज्य कर ४३. राम ह्मणतो:—हे राजाधिराज, तूं जर माझा पिता असशील तर मी तुला अभिवंदन करितों. आपल्या आज्ञेप्रमाणें मी रम्य अयोध्यानगरीला जाईन ४४. मार्कंडेय सांगतात:— हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ह्यानंतर पिता दशरथ जास्तच संतुष्ट झाला आणि ज्याच्या नेत्रांचे प्रांत आरक्तवर्ण आहेत अशा त्या रामाला ह्मणाला "तूं अयोध्येमध्यें जाऊन राज्य कर. हे महातेजस्वी रामा, ह्या अरण्यामध्यें तुझीं चवदा वर्षे संपूर्ण झालीं" ४५. तदनंतर सुहृदांनीं अभिनंदन केलें असतां रामानें

सुहृद्भिरभिनन्दितः । महेन्द्र इव पौलोम्या भार्यया स समेयिवान् ४६
ततो वरं ददौ तस्मै ह्यविन्ध्याय परन्तपः । त्रिजटां चार्थमानाभ्यां योज-
यामास राक्षसीम् ४७ तमुवाच ततो ब्रह्मा देवैः शक्रपुरोगमैः । कौस-
ल्यामातरिष्टांस्ते वरानद्य ददानि कान् ४८ वव्रे रामः स्थितिं धर्मे शत्रु-
भिश्चापराजयम् । राक्षसैर्निहतानां च वानराणां समुद्भवम् ४९ ततस्ते
ब्रह्मणा प्रोक्ते तथेति वचने तदा । समुत्तस्थुर्महाराज वानरा लब्धचेतसः ५०
सीता चापि महाभागा वरं हनुमते ददौ । रामकीर्त्या समं पुत्र जीवितं ते
भविष्यति ५१ दिव्यास्त्वामुपभोगाश्च मत्प्रसादकृताः सदा । उपस्थास्यन्ति
हनुमन्निति स्म हरिलोचन ५२ ततस्ते प्रेक्षमाणानां तेषामक्लिष्टकर्मणाम् ।
अन्तर्धानं ययुर्देवाः सर्वे शक्रपुरोगमाः ५३ दृष्ट्वा रामं तु जानक्या संगतं
शक्रसारथिः । उवाच परमप्रीतः सुहृन्मध्य इदं वचः ५४ देवगन्धर्वय-
क्षाणां मानुषासुरभोगिनाम् । अपनीतं त्वया दुःखमिदं सत्यपराक्रम ५५
सदेवासुरगन्धर्वा यक्षराक्षसपन्नगाः । कथयिष्यन्ति लोकास्त्वां यावद्भू-
मिर्धरिष्यति ५६ इत्येवमुक्त्वानुज्ञाप्य रामं शस्त्रभृतां वरम् । संपूज्यापा-

देवांना नमस्कार केला; आणि इंद्राणीचा स्वीकार करणाऱ्या इंद्राप्रमाणें त्यानें आपल्या भार्येचा स्वीकार केला ४६ तदनंतर शत्रुतापन रामानें त्या अविंध्याला वर दिलें; आणि त्रिजटा राक्षसीचाही आदर करून त्यानें तिला कांहीं द्रव्य समर्पण केलें ४७. तेव्हां ब्रह्मदेव इंद्रप्रभृति देवांसहवर्तमान रामाला ह्मणाला " हे कौसल्यानंदना, आज तुझ्या मनाप्रमाणें कोणते वर मी तुला द्यावे तें सांग ४८". ह्यानंतर, धर्मामध्यें निष्ठा, शत्रूपासून पराभव न पावणें आणि राक्षसांपासून वध पावलल्या वानरांचें पुनरुज्जीवन इतके वर रामानें मागितले ४९; आणि " ठीक आहे " असें ब्रह्मदेवानें ह्मणतांक्षणीं, हे महाराज युधिष्ठिरा, वानर जिवंत होऊन उठले ५०. तदनंतर महाभाग्यवती सीतेनेंही हनुमानाला वर दिला कीं, " हे पुत्रा, जोंपर्यंत रामाची कीर्ति आहे तोंपर्यंत तुला आयुष्य प्राप्त होईल ५१. आणि माझ्या प्रसादामुळें उपभोग्य अशा दिव्य वस्तु, हे पिंगाक्षा हनुमान, तुला नेहमीं प्राप्त होतील " ५२. इतकें झाल्यानंतर ते महापराक्रमी वानर पहात असतांनाच इंद्रप्रभृति सर्वही देव अंतर्धान पावले ५३; आणि राम जानकीला भेटल्याचें पाहून इंद्रसारथि मातलि अत्यंत संतुष्ट झाला आणि सुहृदांमध्यें त्याला ह्मणाला ५४ " हे सत्यपराक्रमी रामा, देव, गंधर्व, यक्ष, मनुष्य, असुर आणि उरग ह्यांचें हें दुःख तूं नाहींसें केलें आहेस ५५. जोंपर्यंत पृथ्वी कायम राहील तोंपर्यंत देव, दैत्य, गंधर्व, यक्ष,

क्रमत्तेन रथेनादित्यवर्चसा ५७ ततः सीतां पुरस्कृत्य रामः सौमित्रिणा सह । सुग्रीवप्रमुखैश्चैव सहितः सर्ववानरैः ५८ विधाय रक्षां लङ्कायां विभीषणपुरस्कृतः । संततार पुनस्तेन सेतुना मकरालयम् ५९ पुष्पकेण विमानेन खेचरेण विराजता । कामगेन यथा मुख्यैरमात्यैः संवृतो वशी ६० ततस्तीरे समुद्रस्य यत्र शिश्ये स पार्थिवः । तत्रैवोवास धर्मात्मा सहितः सर्ववानरैः ६१ अथैनान्राघवः काले समानीयाभ्यपूज्य च । विसर्जयामास तदा रत्नैः संतोष्य सर्वशः ६२ गतेषु वानरेन्द्रेषु गोपुच्छर्क्षेषु तेषु च । सुग्रीवसहितो रामः किष्किन्धां पुनरागमत् ६३ विभीषणेनानुगतः सुग्रीवसहितस्तदा । पुष्पकेण विमानेन वैदेह्या दर्शयन्वनम् ६४ किष्किन्धां तु समासाद्य रामः प्रहरतां वरः । अङ्गदं कृतकर्माणं यौवराज्येऽभ्यषेचयत् ६५ ततस्तैरेव सहितो रामः सौमित्रिणा सह । यथागतेन मार्गेण प्रययौ स्वपुरं प्रति ६६ अयोध्यां स समासाद्य पुरीं राष्ट्रपतिस्ततः ।

राक्षस आणि पन्नग हे लोक तुझी कीर्ति गात रहातील ५६". असें सांगून शस्त्र धारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ रामाची त्यानें अनुज्ञा घेतली आणि त्याचें पूजन करून तो त्या सूर्यतुल्य तेजस्वी रथानेंच परत निघून गेला ५७. तदनंतर लंकेमध्यें बंदोबस्त करून आणि बिभीषणाला व सीतेला पुढें घालून लक्ष्मणासहवर्तमान रामानें सुग्रीवप्रभृति सर्व वानर बरोबर घेतले आणि पुनरपि त्याच सेतूच्या योगानें तो राम समुद्र तरून गेला ५८. ५९. परंतु, स्वतः मात्र मुख्य मुख्य अमात्य बरोबर घेऊन तो मनोनिग्रही राम आकाशमार्गानें यथेष्ट संचार करणाऱ्या उज्ज्वल पुष्पकविमानामध्यें बसून समुद्राच्या परतीराला गेला ६०. तदनंतर पूर्वी ज्या ठिकाणीं समुद्रतीरावर मुक्काम केला होता त्याच ठिकाणीं जाऊन सर्व वानरांसहवर्तमान तो धर्मात्मा रामराजा उतरला ६१. नंतर समय पाहून वानरांना रामानें जवळ बोलावून आणिलें; आणि त्यांचें पूजन करून व रत्नांच्या योगानें त्या सर्वांना संतुष्ट करून त्यानें जाण्याची अनुज्ञा दिली ६२; व ह्याप्रमाणें ते गोलांगूल, ऋक्ष वगैरे सर्व मुख्य मुख्य वानर गेल्यानंतर सुग्रीवासहवर्तमान राम किष्किंधानगरीमध्यें आला ६३. त्या वेळीं सुग्रीवासहवर्तमान पुष्पकविमानामध्यें आरूढ होऊन सीतेला वन दर्शवीत दर्शवीत चाललेल्या त्या रामाच्या मागोमाग बिभीषण येत होता ६४. तदनंतर किष्किंधेला गेल्यावर योद्ध्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या रामानें पराक्रम गाजविलेल्या अंगदाला यौवराज्याचा अभिषेक केला ६५; आणि नंतर त्या सुग्रीवप्रभृतींनाच बरोबर घेऊन लक्ष्मणासहवर्तमान राम आल्या मार्गानेंच आपल्या नगराकडे निघाला ६६. तदनंतर

भरताय हनूमन्तं दूतं प्रास्थापयत्तदा ६७ लक्षयित्वेङ्गितं सर्वं प्रियं तस्मै
निवेद्य वै । वायुपुत्रे पुनः प्राप्ते नन्दिग्राममुपागमत् ६८ स तत्र मलदि-
ग्धाङ्गं भरतं चीरवाससम् । अग्रतः पादुके कृत्वा ददर्शासीनमासने ६९
संगतो भरतेनाथ शत्रुघ्नेन च वीर्यवान् । राघवः सह सौमित्रिर्मुमुदे भर-
तर्षभ ७० ततो भरतशत्रुघ्नौ समेतौ गुरुणा तदा । वैदेह्या दर्शनेनोभौ
प्रहर्षं समवापतुः ७१ तस्मै तद्भरतो राज्यमागतायातिसत्कृतम् । न्यासं
निर्यातयामास युक्तः परमया मुदा ७२ ततस्तं वैष्णवे शूरं नक्षत्रेऽभिमते-
ऽहनि । वसिष्ठो वामदेवश्च सहितावभ्यषिञ्चताम् ७३ सोऽभिषिक्तः कपि-
श्रेष्ठं सुग्रीवं ससुहृज्जनम् । विभीषणं च पौलस्त्यमन्वजानाद्गृहान्प्रति ७४
अभ्यर्च्य विविधैर्भोगैः प्रीतियुक्तौ मुदा युतौ । समाधायेतिकर्तव्यं दुःखेन
विससर्ज ह ७५ पुष्पकं च विमानं तत्पूजयित्वा स राघवः । प्रादाद्वैश्र-
वणायैव प्रीत्या स रघुनन्दनः ७६ ततो देवर्षिसहितः सरितं गोमतीमनु ।

अयोध्या नगरीच्या सनिध आल्यावर राष्ट्राधिपति रामाने भरताकडे हनुमान् दूताला पाठ-
वून दिलें ६७; आणि भरताची सर्व हालचाल अवलोकन केल्यावर त्याला प्रिय वार्ता
निवेदन करून वायुपुत्र हनुमान् परत आल्यानंतर राम नंदिग्रामाला गेला ६८; तों
भरताचें शरीर मळानें भरलेलें आहे; त्यानें वल्कलें परिधान केलेलीं आहेत आणि
आपल्या पादुका सिंहासनावर स्थापून तो आसनावर बसला आहे असें त्याच्या दृष्टीं
पडलें ६९. तदनंतर भरत व शत्रुघ्न ह्यांची भेट झाल्यावर, हे भरतवंशजश्रेष्ठा धर्म-
राजा, लक्ष्मणासहवर्तमान त्या वीर्यवान् रामाला आनंद झाला ७०; व ह्याप्रमाणें
ज्येष्ठ भ्रात्याची भेट होऊन वैदेहीचें दर्शन झालें असतां त्या उभयतां भरतशत्रुघ्ना-
नाही आनंद झाला ७१ इतकें झाल्यानंतर भरताला पराकाष्ठेचा आनंद झाला आणि
मोठ्या काळजीनें सांभाळिलेली ती राज्यरूप ठेव त्यानें त्या परत आलेल्या रामाच्या स्वाधीन
करून टाकिली ७२ तदनंतर ज्योतिःशास्त्राला संमत असलेली तीथ आणि श्रवणनक्षत्र पाहून
वसिष्ठ व वामदेव ह्या उभयतांनी त्या शूर रामाला अभिषेक केला ७३ व राज्याभिषेक
झाल्यानंतर त्या रामानें सुहृज्जनांसहवर्तमान वानरश्रेष्ठ सुग्रीव आणि पुलस्त्यपुत्र बिभीषण
ह्यांना आपआपल्या घरीं जाण्याविषयीं आज्ञा दिली ७४. सारांश, नानाप्रकारच्या
भोग्य वस्तूंनी त्या प्रेमयुक्त व आनंदित सुग्रीवबिभीषणांचा त्यानें सत्कार केला आणि
काय करावयाचें तें सांगितल्यावर मोठ्या कष्टानें त्यांना जाण्याची त्यानें अनुज्ञा
दिली ७५ त्या रघुनंदन रघुवंशज रामानें त्या पुष्पकविमानाचें पूजन करून तें आनं-
दानें कुबेरालाच देऊन टाकिलें. ७६ आणि देवर्षींसहवर्तमान त्यानें गोमती नदीच्या

दशाश्वमेधानाजह्ने जारूथ्यान्स निरर्गलान् ७७ [११११३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि रामाभिषेके एकनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९१ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ एवमेतन्महाबाहो रामेणामिततेजसा । प्राप्तं व्यसनमत्युग्रं वनवासकृतं पुरा १ मा शुचः पुरुषव्याघ्र क्षत्रियोसि परन्तप । बाहुवीर्याश्रिते मार्गे वर्तसे दीप्तनिर्णये २ न हि ते वृजिनं किंचिद्वर्तते परमण्वपि । अस्मिन्मार्गे निषीदेयुः सेन्द्रापि ससुरासुराः ३ संहत्य निहतो वृत्रो मरुद्भिर्वज्रपाणिना । नमुचिश्चैव दुर्धर्षो दीर्घजिह्वा च राक्षसी ४ सहायवति सर्वार्थाः संतिष्ठन्तीह सर्वशः । किं नु तस्याजितं संख्ये यस्य भ्राता धनञ्जयः ५ अयं च बलिनां श्रेष्ठो भीमो भीमपराक्रमः । युवानौ च महेष्वासौ वीरौ माद्रवतीसुतौ ६ एभिः सहायैः कस्मात्त्वं विषीदसि परन्तप । य इमे वज्रिणः सेनां जयेयुः समरुद्गणाम् ७ त्वमप्येभिर्महेष्वासैः सहायैर्देवरूपिभिः । विजेष्यसि रणे

तटाकीं अन्नार्थी लोकांकरितां दरवाजे मोकळे ठेवून प्रशंसनीय असे दहा अश्वमेध केले ७७. ह्याप्रमाणे महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वांपैकीं रामाच्या राज्याभिषेकाविषयीं दोनशें एक्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९१ ॥

मार्कंडेय सांगतातः— हे महापराक्रमी धर्मराजा, ह्याप्रमाणें महातेजस्वी रामाला वनवासामुळें अति भयंकर दुःख प्राप्त झालें आहे १; तस्मात्, हे पुरुषश्रेष्ठा, तूं शोक करूं नको. हे शत्रुतापना, तूं क्षत्रिय आहेस आणि ज्याचें फल निःसंशय येणार अशा मार्गाचें आपल्या बाहुबलानें अवलंबन करून तूं राहिला आहेस २. तुझे ठिकाणीं अणुरेणू इतकें अति सूक्ष्म सुद्धां पातक नाहीं. तूं ज्या मार्गानें वर्तन करीत आहेस त्या मार्गानें वागण्याची इंद्रासहवर्तमान देवांची अथवा दैत्यांची प्राज्ञा नाहीं ३. अरे, वज्रपाणि इंद्रानें मरुद्गणांची मदत घेऊन वृत्रासुर, अजिंक्य नमूची आणि दीर्घजिह्वा राक्षसी ह्यांचा वध केला ४. सारांश, ज्याला इतरांचें साहाय्य आहे त्याचे सर्व मनोरथ येथें सिद्धीस जातात. अरे, भयंकर पराक्रम करणारा बलवानांमध्यें श्रेष्ठ भीमसेन आणि हे महाधनुर्धारी व वीर तरुण माद्रीपुत्र ज्याचे भ्राते आहेत त्याला युद्धामध्यें अजिंक्य असें काय बरें आहे? ५, ६. हे शत्रुतापना, हे तुझे साहाय्यकर्ते असतांना तूं कशाकरितां खेद करीत आहेस? अरे, मरुद्गणांसहवर्तमान इंद्रसेनेचाही हे पराभव करितील ७. सारांश, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ह्या देवरूपी महाधनुर्धारी साहाय्यकर्त्या भ्रात्यांच्या योगानें तूं संग्रा-

सर्वानमित्रान्भरतर्षभ ८ इतश्च त्वमिमां पश्य सैन्धवेन दुरात्मना । बलिनावीर्यमत्तेन हृतामेभिर्महात्मभिः ९ आनीतां द्रौपदीं कृष्णां कृत्वा कर्म सुदुष्करम् । जयद्रथं च राजानं विजितं वशमागतम् १० असहायेन रामेण वैदेही पुनराहृता । हत्वा संख्ये दशग्रीवं राक्षसं भीमविक्रमम् ११ यस्य शाखामृगा मित्राण्यृक्षाः कालमुखास्तथा । जात्यन्तरगता राजन्नेतद्बुद्ध्यानुचिन्तय १२ तस्मात्त्वं कुरुश्रेष्ठ मा शुचो भरतर्षभ । त्वद्विधा हि महात्मानो न शोचन्ति परन्तप १३ वैशम्पायन उवाच ॥ एवमाश्वासितो राजा मार्कण्डेयेन धीमता । त्यक्त्वा दुःखमदीनात्मा पुनरेवेनमब्रवीत् १४ [११९४५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि रामोपाख्यानपर्वणि युधिष्ठिराश्वासने द्विनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९२ ॥ समाप्तं च रामोपाख्यानपर्व ॥

॥ अथ पतिव्रतामाहात्म्यपर्व ॥ युधिष्ठिर उवाच ॥ नात्मानमनुशोचामि नेमान्भ्रातॄन्महामुने । हरणं चापि राज्यस्य यथेमां द्रुपदा-

---

सामर्थ्यें सर्व शत्रूंचा पराभव करिशील ८. फार कशाला, वीर्यानें मत्त झालेल्या, बलाढ्य व दुरात्म्या सिंधुराज जयद्रथानेंही द्रौपदी हरण करून नेली असतां ह्या महात्म्यांनीं परत आणिली, तीच तूं पहा (ह्मणजे तुझी खात्री होईल) ९. अरे, मोठें दुर्घट कर्म करून ह्यांनीं द्रुपदकन्या कृष्णा परत आणिली आणि जयद्रथराजाला जिंकून आपल्या ताब्यांत आणिलें ह्याचा तूं विचार कर १०. रामानें अशा प्रकारचें कोणाचें साहाय्य नसतांना भयंकरपराक्रमी रावणराक्षसाचा संग्रामामध्यें वध करून सीता परत आणिली ११. हे राजा, ज्यांची जातही भिन्न आहे असे कृष्णमुखवानर व अस्वलें हेच त्याचे मित्र होते, ह्याचा तूं बुद्धिपूर्वक विचार कर १२. तस्मात्, हे कुरुवंशजश्रेष्ठा भरतोत्तमा, तूं खेद करूं नको. हे शत्रुतापना, तुझ्यासारिखे महात्मे खेद करीत बसत नसतात १३. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें विवेकी मार्कंडेय मुनींनीं धर्मराजाचें सांत्वन केलें असतां दुःखाचा त्याग करून तो महाशय धर्मराज पुनरपि त्यांना कांहीं विचारूं लागला १४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील रामोपाख्यानपर्वांपैकीं युधिष्ठिरसांत्वनाविषयीं दोनशें ब्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९२ ॥ ह्याठिकाणीं रामोपाख्यानपर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें पतिव्रतामाहात्म्यपर्वाला आरंभ झाला. युधिष्ठिर ह्मणतोः—हे महामुने, मला ह्या द्रुपदकन्येसंबंधानें जितकें वाईट वाटत आहे तितकें स्वतःकरितां

मजाम् १ द्यूते दुरात्मभिः क्लिष्टाः कृष्णया तारिता वयम् । जयद्रथेन च पुनर्वनाच्चापि हृता बलात् २ अस्ति सीमन्तिनी काचिद्दृष्टपूर्वापि वा श्रुता । पतिव्रता महाभागा यथेयं द्रुपदात्मजा ३ मार्कण्डेय उवाच ॥ शृणु राजन्कुलस्त्रीणां महाभाग्यं युधिष्ठिर । सर्वमेनद्यथा प्राप्तं साविञ्या राजकन्यया ४ आसीन्मद्रेषु धर्मात्मा राजा परमधार्मिकः । ब्रह्मण्यश्च महात्मा च सत्यसन्धो जितेन्द्रियः ५ यज्वा दानपतिर्दक्षः पौरजानपद- प्रियः । पार्थिवोश्वपतिर्नाम सर्वभूतहिते रतः ६ क्षमावाननपत्यश्च सत्य- वाग्विजितेन्द्रियः । अतिक्रान्तेन वयसा संतापमुपजग्मिवान् ७ अपत्यो- त्पादनार्थं च तीव्रं नियममास्थितः । काले परिमिताहारो ब्रह्मचारी जितेन्द्रियः ८ हुत्वा शतसहस्रं स साविञ्या राजसत्तम । षष्ठे षष्ठे तदा काले बभूव मितभोजनः ९ एतेन नियमेनासीद्वर्षाण्यष्टादशैव तु । पूर्णे त्वष्टादशे वर्षे सावित्री तुष्टिमभ्यगात् १० रूपिणी तु तदा राज- न्दर्शयामास तं नृपम् ११ अग्निहोत्रात्समुत्थाय हर्षेण महतान्विता । उवाच

आणि ह्या भ्रात्यांबद्दलही वाईट वाटत नाहीं १. दुरात्म्या कौरवांनीं द्यूतामध्यें आह्मांला क्लेश दिले असतां ह्या द्रौपदीनें आह्मांला तारिलें आहे आणि पुनरपि जयद्रथानेही दडेली करून हिला वनांतून हरण करून नेलें आहे २. तस्मात्, ह्या द्रुपदकन्येप्रमाणें महाभाग्यवती पतिव्रता स्त्री आजपर्यंत आपल्या कोठें पहाण्यांत अथवा ऐकण्यांत तरी आली आहे काय ? ३. मार्कंडेय सांगतातः—हे युधिष्ठिरराजा, कुलस्त्रियांचें माहात्म्य तूं श्रवण कर. अरे, राजकन्या सावित्रीला हें सर्व प्राप्त झालें आहे ४. मद्रदेशामध्यें एक धर्मात्मा राजा होऊन गेला; तो परम धार्मिक होता; ब्राह्मणावि- षयीं त्या महात्म्याची पूज्यबुद्धि होती; तो सत्यप्रतिज्ञ होता; त्यानें इंद्रियदमन केलें होतें ५; यज्ञयागही त्याच्या हातून झाले होते; तो दानशूर व दक्ष असून नगरांतील व देशांतील लोकांना प्रिय होता; अश्वपति ह्या नांवानें तो प्रसिद्ध होता व प्राणिमा- त्राच्या हिताविषयीं तो तत्पर होता ६. परंतु, क्षमाशील, सत्यवचनी व जितेंद्रिय असा जरी तो होता तरी निपुत्रिक असल्यामुळें वृद्धापकाळ झाल्यावर तो फारच काळजी करूं लागला ७. तदनंतर अपत्यप्राप्तीकरितां त्यानें तीव्र तपश्चर्येला आरंभ केला. तो ब्रह्मचारी व जितेंद्रिय राहून नियमित वेळीं परिमित आहार करीत असे ८. हे नृप- श्रेष्ठा युधिष्ठिरा, सावित्रीमंत्रानें त्यानें एकलक्ष हवन केलें आणि तीन तीन दिवसांनीं तो एकवेळ मित आहार करून राहूं लागला ९. असा नियम सुरूं असतांना त्याचीं अठरा वर्षें गेलीं व अठरावें वर्ष संपूर्ण झाल्यानंतर सावित्री त्याच्यावर प्रसन्न झाली १० आणि, हे

चैनं वरदा वचनं पार्थिवं तदा १२ सावित्र्युवाच ॥ ब्रह्मचर्येण शुद्धेन दमेन नियमेन च । सर्वात्मना च भक्त्या च तुष्टास्मि तव पार्थिव १३ वरं वृणीष्वाश्वपते मद्रराज यदीप्सितम् । न प्रमादश्च धर्मेषु कर्तव्यस्ते कथंचन १४ अश्वपतिरुवाच ॥ अपत्यार्थः समारम्भः कृतो धर्मेप्सया मया । पुत्रा मे बहवो देवि भवेयुः कुलभावनाः १५ तुष्टासि यदि मे देवि वरमेतं वृणोम्यहम् । सन्तानं परमो धर्म इत्याहुर्मां द्विजातयः १६ सावित्र्युवाच ॥ पूर्वमेव मया राजन्नभिप्रायमिमं तव । ज्ञात्वा पुत्रार्थमुक्तो वै भगवांस्ते पितामहः १७ प्रसादाच्चैव तस्मात्ते स्वयंभुविहिताद्भुवि । कन्या तेजस्विनी सौम्य क्षिप्रमेव भविष्यति १८ उत्तरं च न ते किंचिद्व्याहर्तव्यं कथंचन । पितामहनिसर्गेण तुष्टा ह्येतद्ब्रवीमि ते १९ मार्कण्डेय उवाच ॥ स तथेति प्रतिज्ञाय सावित्र्या वचनं नृपः । प्रसादयामास पुनः क्षिप्रमेतद्भविष्यति २० अन्तर्हितायां सावित्र्यां जगाम स्वपुरं नृपः । स्वराज्ये चासवद्वीरः प्रजा धर्मेण पालयन् २१ कस्मिं-

राजा, तिनें त्या राजाला प्रत्यक्ष दर्शन दिलें ११. सारांश, होमकुंडापासून निघालेली ती सावित्री अतिशय हर्षयुक्त झाली आणि वर देण्यास उद्युक्त होऊन त्या राजाला ह्मणाली १२ " हे राजा, शुद्ध ब्रह्मचर्य, इंद्रियदमन, नियम आणि मनःपूर्वक भक्ति ह्या तुझ्या गुणांनीं मी तुझ्यावर संतुष्ट झालें आहें १३. तस्मात्, हे अश्वपते मद्रराजा, मनांत योजिला असशील तो वर तूं मागून घे. धर्मामध्यें मात्र तूं कसाही प्रसंग आला तरी हलगरज करूं नको " १४. अश्वपति ह्मणतो:— अपत्याकरितां धर्मबुद्धीनें मीं हें अनुष्ठान केलें आहे. तस्मात्, हे देवि, मला कुलाचा उद्धार करणारे पुष्कळ पुत्र प्राप्त व्हाव १५. सारांश, हे देवि, तू जर संतुष्ट झाली असशील तर हा वर मी मागत आहें. कारण, संतान हाच श्रेष्ठ धर्म आहे असें मला द्विजांनीं सांगितलें आहे १६. सावित्री ह्मणते:—हे राजा, मी हा तुझा अभिप्राय पूर्वींच जाणून भगवान् ब्रह्मदेवाला तुला पुत्र होण्याविषयीं विनंति केली होती १७; आणि ब्रह्मदेवाच्या प्रसादामुळेंच, हे विनयसंपन्न राजा, तुला आतां सत्वरच एक तेजस्विनी कन्या होईल १८. मी हें सांगत आहें ह्यावर तूं कांहींएक उत्तर करिता उपयोगीं नाहीं. कारण, ब्रह्मदेवाची आज्ञा झाल्यामुळें संतुष्ट होऊन मीं हें तुला सांगितलें आहे १९. मार्कंडेय सांगतात:—ह्यावर " ठीक आहे " असें ह्मणून त्या अश्वपति राजानें सावित्रीचें ह्मणणें मान्य केलें आणि तपश्चर्येचें हें फळ आपणाला सत्वरच प्राप्त व्हावें ह्मणून पुनरपि त्यानें तिची प्रार्थना केली २०. तदनंतर सावित्री अंतर्धान पावल्यावर राजा आपल्या

श्चित्तु गते काले स राजा नियतव्रतः । ज्येष्ठायां धर्मचारिण्यां महिष्यां
गर्भमादधे २२ राजपुत्र्यास्तु गर्भः स मानव्या भरतर्षभ । व्यवर्धत तदा
शुक्ले तारापतिरिवाम्बरे २३ प्राप्ते काले तु सुषुवे कन्यां राजीवलोचनाम्।
क्रियाश्च तस्या मुदितश्चक्रे च नृपसत्तमः २४ सावित्र्या प्रीतया दत्ता
सावित्र्या हुतया ह्यपि । सावित्रीत्येव नामास्याश्चक्रुर्विप्रास्तथा पिता २५
सा विग्रहवतीव श्रीर्व्यवर्धत नृपात्मजा । कालेन चापि सा कन्या यौव-
नस्था बभूव ह २६ तां सुमध्यां पृथुश्रोणीं प्रतिमां काञ्चनीमिव । प्राप्तेयं
देवकन्येति दृष्ट्वा संमेनिरे जनाः २७ तां तु पद्मपलाशाक्षीं ज्वलन्तीमिव
तेजसा । न कश्चिद्वरयामास तेजसा प्रतिवारितः २८ अथोपोष्य शिरः-
स्नाता देवतामभिगम्य सा । हुत्वाग्निं विधिवद्विप्रान्वाचयामास पर्वणि २९
ततः सुमनसः शेषाः प्रतिगृह्य महात्मनः । पितुः समीपमगमद्देवी श्रीरिव

नगराला गला आणि धर्माने प्रजेचें परिपालन करीत करीत तो वीर आपल्या राज्यामध्यें वास्तव्य करूं लागला २१. ह्या गोष्टीला कांहीं काल लोटल्यावर तो राजा नियमपूर्वक व्रतानें चालत असतांना त्याची ज्येष्ठ धर्मपत्नी जी पट्टाभिषिक्त स्त्री तिचे ठिकाणीं गर्भ राहिला २२. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, मनुष्य योनीमध्ये उत्पन्न झालेल्या त्या राजकन्येचा तो गर्भ शुक्लपक्षामध्ये आकाशांत वृद्धिंगत होणाऱ्या चंद्राप्रमाणें उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊं लागला २३. शेवटीं प्रसूतिकाल प्राप्त झाल्यावर कमलासारिखे जिचे नेत्र आहेत अशी कन्या त्या राजपत्नीला झाली व त्या नृपश्रेष्ठानें आनंदपूर्वक तिचे सर्व संस्कारही केले २४; आणि सावित्रीच्या उद्देशानें हवन केल्याकारणानें सावित्री प्रसन्न झाल्यामुळे ज्याअर्थीं ती कन्या प्राप्त झाली होती त्याअर्थीं पित्यानें व ब्राह्मणांनी सावित्री हेंच तिचें नांव ठेविलें २५ पुढें प्रत्यक्ष लक्ष्मीच की काय अशी ती राजकन्या कालगतीनें मोठी होऊं लागली आणि यौवनावस्थेलाही जाऊन पोंचली २६. सूक्ष्म मध्यभाग आणि विशाल श्रोणिप्रदेश ह्यानीं युक्त असलेली ती कन्या सुवर्णाची केलेली पुतळीच कीं काय अशी दिसत असल्यामुळें ही देवकन्याच प्राप्त झाली आहे असें लोक समजूं लागले २७. कमलपत्राप्रमाणें विशाल नेत्रांनीं युक्त असून तेजानें देदीप्यमान असलेल्या त्या कन्येला कोणीही वरीना. कारण, जो तो तिच्या तेजानेंच दिपून जात असल्यामुळें तिला वरण्याविषयीं कोणीही धजत नसे २८. असें होतां होतां एकदां कांहीं पर्व आलें असतां त्या कन्येनें उपोषित राहून मस्तकावरून स्नान केलें आणि इष्ट देवतेचें ध्यान करून आणि ब्राह्मणांकडून यथाविधि हवन करवून तिनें त्यांचे

रूपिणी ३० साभिवाद्य पितुः पादौ शेषाः पूर्वं निवेद्य च । कृताञ्जलि-
र्वरारोहा नृपतेः पार्श्वमास्थिता ३१ यौवनस्थां तु तां दृष्ट्वा स्वां सुतां
देवरूपिणीम् । अयाच्यमानां च वरैर्नृपतिर्दुःखितोऽभवत् ३२ राजोवाच॥
पुत्रि प्रदानकालस्ते न च कश्चिद्वृणोति मां । स्वयमन्विच्छ भर्तारं गुणैः
सदृशमात्मनः ३३ प्रार्थितः पुरुषो यश्च स निवेद्यस्त्वया मम । विमृ-
श्याहं प्रदास्यामि वरय त्वं यथेप्सितम् ३४ श्रुतं हि धर्मशास्त्रेषु पठ्य-
मानं द्विजातिभिः । तथा त्वमपि कल्याणि गदतो मे वचः शृणु ३५
अप्रदाता पिता वाच्यो वाच्यश्चानुपयन्पतिः । मृते भर्तरि पुत्रश्च वाच्यो
मातुररक्षिता ३६ इदं मे वचनं श्रुत्वा भर्तुरन्वेषणे त्वर । देवतानां यथा
वाच्यो न भवेयं तथा कुरु ३७ मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्त्वा दुहितरं
तथा वृद्धांश्च मन्त्रिणः । व्यादिदेशानुयात्रं च गम्यतामित्यचोदयत् ३८

आशीर्वादही घेतले २९. तदनंतर इष्टदेवतेचा प्रसाद म्हणून कांहीं पुष्पमाला तिनें हातांत घेतल्या आणि प्रत्यक्ष देवी लक्ष्मीच कीं काय अशी ती कन्या पित्याचे समीप गेली ३०. तदनंतर पितृचरणीं अभिवंदन करून प्रथम तिनें प्रसाद म्हणून आणिलेलीं तीं पुष्पें त्याला अर्पण केलीं आणि हात जोडून ती सुंदरी राजाच्या बाजूला उभी राहिली ३१. तेव्हां देवासारिखें जिचें रूप आहे अशी ती आपली कन्या यौवनावस्थेला जाऊन पोंचली आहे असें अवलोकन करून आणि वरांची मागणी येत नाहीं हें लक्ष्यांत आणून राजाच्या मनाला चुटपुट लागली ३२. राजा म्हणाला " हे कन्ये, तुझें दान करण्याचा समय प्राप्त झाला आहे; परंतु, माझ्याकडे येऊन तुझी कोणीही मागणी करीत नाहीं. तस्मात्, तूं आतां स्वतःच आपल्यासारिखा गुणवान् भर्ता शोधून काढ ३३. तूं जो पुरुष मनामध्यें आणशील तो मला सांग; म्हणजे मी विचार करून तुला देण्याचें ठरवीन. तूं आपल्या इच्छेप्रमाणें शोधून काढ ३४. हे कल्याणि, धर्मशास्त्रांतील एक वचन ब्राह्मण पठण करीत असतात तें मीं ऐकिललें आहे आणि तें तूंही माझ्यापासून श्रवण कर; मी तुला सांगतों ३५. वेळेवर कन्येचें दान न करणारा पिता दोषांस पात्र होतो. (ऋतुस्नात स्त्री झाल्यावर) समागम न करणारा पति दोषी होतो, आणि भर्ता मेल्यानंतर मातेचें रक्षण न करणारा पुत्र निंदेसपात्र होतो ३६. हे माझें भाषण श्रवण करून भर्ता शोधून काढण्याची तूं त्वरा कर, आणि मी देवतांच्या दोषास पात्र होणार नाहीं अशा रीतीनें वाग " ३७. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें कन्येला सांगितल्यानंतर त्या राजानें प्रयाणाची तयारी करण्याविषयीं वृद्ध मंत्र्यांना आज्ञा दिली आणि जा म्हणून सांगितलें ३८.

साभिवाद्य पितुः पादौ व्रीडितेव तपस्विनी । पितुर्वचनमाज्ञाय निर्जगामाविचारितम् ३९ सा हैमं रथमास्थाय स्थविरैः सचिवैर्वृता । तपोवनानि रम्याणि राजर्षीणां जगाम ह ४० मान्यानां तत्र वृद्धानां कृत्वा पादाभिवन्दनम् । वनानि क्रमशस्तात सर्वाण्येवाभ्यगच्छत ४१ एवं तीर्थेषु सर्वेषु धनोत्सर्गं नृपात्मजा । कुर्वती द्विजमुख्यानां तं तं देशं जगाम ह ४२ [११९८७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि पतिव्रतामाहात्म्यपर्वणि सावित्र्युपाख्याने त्रिनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९३ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ अथ मद्राधिपो राजा नारदेन समागतः । उपविष्टः सभामध्ये कथायोगेन भारत १ ततोऽभिगम्य तीर्थानि सर्वाण्येवाश्रमांस्तथा । आजगाम पितुर्वेश्म सावित्री सह मन्त्रिभिः २ नारदेन सहासीनं सा दृष्ट्वा पितरं शुभा । उभयोरेव शिरसा चक्रे पादाभिवादनम् ३ नारद उवाच ॥ क्व गताभूत्सुतेयं ते कुतश्चैवागता नृप । किमर्थं युवतीं भर्त्रे न चैनां संप्रयच्छसि ४ अश्वपतिरुवाच । कार्येण खल्वनें-

---

तदनंतर पित्याचें पादाभिवंदन करून आणि त्याची आज्ञा लक्ष्यांत आणून लज्जित झाल्यासारिखी दिसत असलेली ती सुशील कन्या आढवेढे न घेतां त्याच्याबरोबर गेली ३९. सुवर्णरथावर ती आरूढ झाली आणि वृद्ध मन्त्र्यांबरोबर ती राजर्षींच्या रम्य तपोवनामध्यें गेली ४०. ठिकठिकाणीं ती मान्य वृद्धाचें पादाभिवंदन करूं लागली आणि अशा रीतीनें, बा युधिष्ठिरा, ती सर्व तपोवनामध्यें गेली ४१. सारांश, ह्याप्रमाणें प्रत्येक तीर्थाचे ठिकाणीं द्विजश्रेष्ठांना द्रव्यदान करीत करीत ती राजकन्या अनेक देश हिंडली ४२ ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वापैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें त्र्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९३ ॥

मार्कंडेय सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तदनंतर मद्राधिपति अश्वपति राजा सभेमध्यें नारदमुनीसहवर्तमान गोष्टी सांगत बसला असतांना १ मंत्र्यांसहवर्तमान सावित्री सर्व तीर्थें आणि सर्व आश्रम हिंडून पित्याच्या घरीं आली २; व नारदमुनींसहवर्तमान पिता बसला आहे असें पाहून त्या कल्याणीनें उभयतांचेंही मस्तकानें पादाभिवंदन केलें ३. नारद प्रश्न करितातः—हे राजा, ही तुझी कन्या कोठें गेली होती ? आतां कोठून आली आहे ? आणि ही यौवनावस्थेमध्यें आली असतांनाही तूं ही भर्त्याला कां देऊन टाकीत नाहींस ? ४. अश्वपति ह्मणतोः—हे देवर्षे, ह्याच

नैव प्रेषितायैव चागता । एतस्याः शृणु देवर्षे भर्तारं योनया वृतः ५ मार्कण्डेय उवाच ॥ सा ब्रूहि विस्तरेणेति पित्रा संचोदिता शुभा । तदैव तस्य वचनं प्रतिगृह्येदमब्रवीत् ६ सावित्र्युवाच ॥ आसीच्छाल्वेषु धर्मात्मा क्षत्रियः पृथिवीपतिः । द्युमत्सेन इति ख्यातः पश्चाचान्धो बभूव ह ७ विनष्टचक्षुषस्तस्य बालपुत्रस्य धीमतः । सामीप्येन हृतं राज्यं छिद्रेऽस्मिन्पूर्ववैरिणा ८ स बालवत्सया सार्धं भार्यया प्रस्थितो वनम् । महारण्यं गतश्चापि तपस्तेपे महाव्रतः ९ तस्य पुत्रः पुरे जातः संवृद्धश्च तपोवने । सत्यवाननुरूपो मे भर्तेति मनसा वृतः १० नारद उवाच॥ अहो बत महत्पापं सावित्र्या नृपते कृतम् । अजानन्त्या यदनया गुणवान्सत्यवान्वृतः ११ सत्यं वदत्यस्य पिता सत्यं माता प्रभाषते । तथास्य ब्राह्मणाश्चक्रुर्नामैतत्सत्यवानिति १२ बालस्याश्वाः प्रियाश्चास्य करोत्यश्वांश्च मृण्मयान् । चित्रेऽपि विलिखत्यश्वांश्चित्राश्व इति चोच्यते १३ राजोवाच ॥ अपीदानीं स तेजस्वी बुद्धिमान्वा नृपात्मजः । क्षमावानपि वा शूरः

कार्याकरितां मीं तिला पाठविली होती ती आजच परत आली आहे. आतां, हिनें जो भर्ता वरिला आहे तो आपण हिच्याच तोंडानें श्रवण करा ५. मार्कंडेय सांगतातः— तदनंतर " सविस्तर सांग " ह्मणून पित्यानें तिला आज्ञा केली असतां त्याच्या त्या वचनाला लगेंच मान देऊन ती कल्याणी सावित्री ह्मणाली ६ " शाल्वदेशामध्यें द्युमत्सेन ह्मणून एक प्रख्यात धर्मात्मा क्षत्रिय राजा होता व तो नंतर अंध झाला ७. त्याचे डोळे गेले तेव्हां त्याचा पुत्रही लहान होता आणि अशा स्थितीमध्यें तो विवेकी द्युमत्सेनराजा असतांना समीपच असलेल्या एका पूर्वीच्या वैऱ्यानें ही संधि पाहून त्याचें राज्य हरण केलें ८. तेव्हां जिचें मूल लहान आहे अशा भार्येसहवर्तमान तो वनांत निघाला आणि महारण्यामध्यें जाऊन तो मोठा व्रतस्थ द्युमत्सेन तपश्चर्या करूं लागला ९. त्याचा नगरामध्यें झालेला व तपोवनामध्यें वाढलेला एक सत्यवान् ह्मणून पुत्र आहे; तो मी योग्य समजून आपल्या मनानें भर्ता वरिला आहे " १०. नारद ह्मणतातः—हे राजा, माहिती नसल्यामुळें सावित्रीनें गुणवान् सत्यवानाला वरिलें आहे हा हिच्या हातून मोठा अनर्थच झाला आहे ११. ह्याचे मातापितर सत्य भाषण करीत असल्यामुळें ब्राह्मणांनींही सत्यवान् असेंच हें ह्याचें नांव ठेविलें आहे १२. बालपणीं ह्याला अश्व प्रिय असत; हा मृत्तिकेचे अश्व करीत असे आणि चित्रेंही अश्वांचीं काढीत असे; ह्मणून ह्याला ' चित्राश्व ' असेंही ह्मणतात १३. राजा प्रश्न करितोः— सांप्रत तो राजकुमार सत्यवान् तेजस्वी, बुद्धिमान्, क्षमाशील, शूर आणि पितृवत्सल

सत्यवान्पितृवत्सलः १४ नारद उवाच ॥ विवस्वानिव तेजस्वी बृहस्पतिसमो मतौ । महेन्द्र इव वीरश्च वसुधेव क्षमान्वितः १५ अश्वपतिरुवाच॥ अपि राजात्मजो दाता ब्रह्मण्यश्चापि सत्यवान् । रूपवानप्युदारो वाप्यथवा प्रियदर्शनः १६ नारद उवाच ॥ सांकृते रन्तिदेवस्य स्वशक्त्या दानतः समः । ब्रह्मण्यः सत्यवादी च शिबिरौशीनरो यथा १७ ययातिरिव चोदारः सोमवत्प्रियदर्शनः । रूपेणान्यतमोश्विभ्यां द्युमत्सेनसुतो बली १८ स दान्तः स मृदुः शूरः ससत्यः संयतेन्द्रियः । स मैत्रः सोनसूयश्च स ह्रीमान्द्युतिमांश्च सः १९ नित्यशश्चार्जवं तस्मिन्स्थितिस्तस्यैव च ध्रुवा । संक्षेपतस्तपोवृद्धैः शीलवृद्धैश्च कथ्यते २० अश्वपतिरुवाच ॥ गुणैरुपेतं सर्वैस्तं भगवन्प्रब्रवीषि मे । दोषानप्यस्य मे ब्रूहि यदि सन्तीह केचन २१ नारद उवाच ॥ एक एवास्य दोषो हि गुणानाक्रम्य तिष्ठति । स च दोषः प्रयत्नेन न शक्यमतिवर्तितुम् २२ एको दोषोस्ति नान्योस्य सोद्यप्रभृति सत्यवान् । संवत्सरेण क्षीणायुर्देहन्यासं करिष्यति २३ राजोवाच॥

आहेना ? १४ नारद सांगतातः—हा सूर्याप्रमाणें तेजस्वी आहे, बुद्धीमध्यें बृहस्पतीसारखा आहे, इंद्रासारखा सामर्थ्यवान् आहे आणि पृथ्वीप्रमाणें क्षमाशील आहे १५. अश्वपति प्रश्न करितोः—तो राजकुमार सत्यवान् दाता, ब्राह्मणांना मान देणारा, रूपवान्, उदार आणि आल्हादकारक मुद्रेनें युक्त असा आहे काय? १६. नारद सांगतातः—यथाशक्ति दान करण्यामध्यें तो संकृतिपुत्र रंतिदेवाची बरोबरी करणारा आहे आणि उशीनरपुत्र शिबिराजाप्रमाणें तो सत्यवादी व ब्राह्मणभक्त आहे १७. ययातिराजाप्रमाणें तो उदार आहे, चंद्राप्रमाणें त्याची मुद्रा आल्हादकारक आहे आणि तो द्युमत्सेनपुत्र सत्यवान् रूपानें जसा कांहीं अश्विनीकुमारांपैकींच एक आहे १८. तो मनोनिग्रही आहे, सौम्य आहे, शूर आहे, सत्यनिष्ठ आहे, जितेंद्रिय आहे, सर्वांवर प्रेम करणारा आहे, निर्मत्सर आहे, विनयशील आहे आणि तेजस्वी आहे १९. त्याचे ठिकाणीं सरळपणा नेहमींच असतो आणि कांहीं प्रसंग आला तरी निश्चित आचरणही त्याचेंच असतें. सारांश, मोठे मोठे तपस्वी आणि मोठे मोठे सदाचारसंपन्न लोकही त्याची प्रशंसा करीत असतात २०. अश्वपति म्हणतोः—हे भगवन्, तो सत्यवान् सर्वगुणसंपन्न आहे असें आपण मला सांगत आहां; परंतु, ह्याचे ठिकाणीं कांहीं दोषही जर असतील तर तेही आपण मला सांगा २१. नारद सांगतातः—सगळ्या गुणांवर पाणी ओतणारा असा एक दोष ह्याचे ठिकाणीं आहे आणि प्रयत्नानें देखील त्याचें उल्लंघन करणें शक्य नाहीं २२. ह्याचे ठिकाणीं एकच

एहि सावित्रि गच्छस्व अन्यं वरय शोभने । तस्य दोषो महानेको गुणा-
नाक्रम्य च स्थितः २४ यथा मे भगवानाह नारदो देवसत्कृतः । संव-
त्सरेण सोल्पायुर्देहन्यासं करिष्यति २५ सावित्र्युवाच ॥ सकृदंशो
निपतति सकृत्कन्या प्रदीयते । सकृदाह ददानीति त्रीण्येतानि सकृत्स-
कृत् २६ दीर्घायुरथवाल्पायुः सगुणो निर्गुणोपि वा । सकृद्वृतो मया भर्ता
न द्वितीयं वृणोम्यहम् २७ मनसा निश्चयं कृत्वा ततो वाचाभिधीयते ।
क्रियते कर्मणा पश्चात्प्रमाणं मे मनस्ततः २८ नारद उवाच ॥ स्थिरा
बुद्धिर्नरश्रेष्ठ सावित्र्या दुहितुस्तव । नैषा वारयितुं शक्या धर्मादस्मात्कथं-
चन २९ नान्यस्मिन्पुरुषे सन्ति ये सत्यवति वै गुणाः । प्रदानमेव
तस्मान्मे रोचते दुहितुस्तव ३० राजोवाच ॥ अविचाल्यमेतदुक्तं तथ्यं
च भवता वचः । करिष्याम्येतदेवं च गुरुर्हि भगवान्मम ३१ नारद उवाच॥
अविघ्नमस्तु सावित्र्याः प्रदाने दुहितुस्तव । साधयिष्याम्यहं तावत्सर्वेषां
भद्रमस्तु वः ३२ मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्त्वा समुत्पत्य नारदस्त्रिदिवं

दोष आहे. दुसरा नाहीं. सत्यवान् आजपासून एका वर्षानें आयुष्य सपल्यामुळें देह-त्याग करील २३. राजा ह्मणतो:—हे कल्याणि सावित्रि, इकडे ये, आणि पुनरपि प्रयाण करून दुसरा वर शोधून काढ. गुणांचे कांहीं एक चालू न देणारा असा मोठा दोष ह्याचे ठिकाणीं आहे २४. कारण, देवानाही मान्य असलेल्या भगवान् नारदमुनींनीं एका वर्षानें तो अल्पायु सत्यवान् देहत्याग करील असें मला सांगितलें आहे २५. सावित्री ह्मणाली, दायविभाग एकदांच होत असतो; कन्येचें दान एकदांच करीत असतात आणि 'देतो' असेंही एकदांच ह्मणत असतात. सारांश, ह्या तिन्ही गोष्टी एक एक वेळच व्हावयाच्या असतात २६. तस्मात्, मीं जो एकवां भर्ता वरिला तो दीर्घायु असो, अल्पायु असो, गुणी असो अथवा निर्गुण असो; मी दुसरा वरणार नाहीं २७. मनामध्यें निश्चय करून मग वाणीनें उच्चार होत असतो व नंतर कर्म घडत असतें. तस्मात्, मन हेंच मला प्रमाण आहे २८. नारद ह्मणतात:—हे पुरुष-श्रेष्ठा, तुझी कन्या जी सावित्री तिचा निश्चय पक्का झालेला आहे. ह्या धर्मापासून कांहीं केलें तरी तिचें निवारण होणें शक्य नाहीं २९. सत्यवानाचे ठिकाणीं जे गुण आहेत ते दुसऱ्या पुरुषाचे ठिकाणीं नाहींत. तस्मात्, त्यालाच तुझ्या कन्येचें दान व्हावें हें मला रुचत आहे ३०. अश्वपतिराजा ह्मणतो:—आपण भगवानानीं हें केलेलें भाषण सत्य असून अनुल्लंघनीय आहे. मी हेंच करीन. कारण, आपण भगवान् माझे गुरू आहां ३१. नारद ह्मणतात:—तुझी कन्या जी सावित्री तिचे दानामध्यें विघ्न न येवो.

गतः। राजापि दुहितुः सज्जं वैवाहिकमकारयत् ३३[११२२०]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि पतिव्रतामाहात्म्यपर्वणि सावित्र्युपाख्याने चतुर्नवत्यधिकद्विशततमोऽध्यायः॥२९४॥

मार्कण्डेय उवाच ॥ अथ कन्याप्रदाने स तमेवार्थं विचिन्तयन् । समानिन्ये च तत्सर्वं भाण्डं वैवाहिकं नृपः १ ततो वृद्धान्द्विजान्सर्वानृत्विजः सपुरोहितान् । समाहूय दिने पुण्ये प्रययौ सह कन्यया २ मेध्यारण्यं स गत्वा च द्युमत्सेनाश्रमं नृपः । पद्भ्यामेव द्विजैः सार्धं राजर्षिं तमुपागमत् ३ तत्रापश्यन्महाभागं शालवृक्षमुपाश्रितम् । कौश्यां बृस्यां समासीनं चक्षुर्हीनं नृपं तदा ४ स राजा तस्य राजर्षेः कृत्वा पूजां यथार्हतः । वाचा सुनियतो भूत्वा चकारात्मनिवेदनम् ५ तस्यार्घ्यमासनं चैव गां चावेद्य स धर्मवित् । किमागमनमित्येवं राजा राजानमब्रवीत् ६ तस्य सर्वमभिप्रायमितिकर्तव्यतां च ताम् । सत्यवन्तं समुद्दिश्य सर्वमेव न्यवेदयत् ७ अश्वपतिरुवाच ॥ सावित्री नाम राजर्षे कन्येयं मम शोभना । तां

आतां मी जातों. तुमचें सर्वांचें कल्याण असो ३२. मार्कंडेय सांगतातः—याप्रमाणें सांगितल्यानंतर नारद तेथून उठून स्वर्गाला चालते झाले आणि राजानेंही कन्येच्या विवाहसमारंभाची तयारी केली ३३. ह्याप्रमाणें महर्षि व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वांपैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें चौऱ्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९४ ॥

मार्कंडेय सांगतातः—तदनंतर कन्यादानासंबधानें नारदमुनींनीं सांगितलेल्या गोष्टीचें चिंतन करीत करीत अश्वपति राजानें विवाहाचें सर्व साहित्य जुळविलें १. तदनंतर वृद्ध द्विज आणि पुरोहितांसहवर्तमान सर्वही ऋत्विज यांना बोलावून आणून मंगलकारक दिवसावर तो कन्येसहवर्तमान बाहेर पडला २. तदनंतर पवित्र वनामध्यें द्युमत्सेनाच्या आश्रमासमीप गेल्यावर तो द्विजांसहवर्तमान पायांनींच त्या राजर्षीसमीप गेला ३; तों शालवृक्षासमीप दर्भासनावर तो महाभाग्यवान् अंध राजा बसला आहे असें त्यानें अवलोकन केलें ४. तेव्हां त्या अश्वपतिराजानें त्या द्युमत्सेनराजर्षीची योग्यतेप्रमाणें पूजा केली आणि अतिशय आदरयुक्त होऊन त्यानें 'मी अश्वपति आहें' म्हणून त्याला कळविलें ५. इतकें झाल्यानंतर अर्घ्य, आसन आणि गाय हीं प्रथमतः अर्पण केल्यावर त्या धर्मवेत्त्या द्युमत्सेनराजानें 'कशाकरितां आगमन झालें?' असें अश्वपतिराजाला विचारिलें असतां ६ त्या अश्वपतिराजानें आपला सर्व अभिप्राय आणि सत्यवानासंबधानें आपली ती इतिकर्तव्यता हें सर्व त्याला निवेदन केलें ७.

स्वधर्मेण धर्मज्ञ स्नुषार्थे त्वं गृहाण मे ८ द्युमत्सेन उवाच ॥ च्युताः स्म राज्याद्वनवासमाश्रितादश्चराम धर्मं नियतास्तपस्विनः । कथं त्वनर्हा वनवासमाश्रमे निवत्स्यते क्लेशमिमं सुता तव ९ अश्वपतिरुवाच ॥ सुखं च दुःखं च भवाभवात्मकं यदा विजानाति सुताहमेव च । न मद्विधे युज्यति वाक्यमीदृशं विनिश्चयेनाभिगतोस्मि ते नृप १० आशां नार्हसि मे हन्तुं सौहृदात्प्रणतस्य च । अभितश्चागतं प्रेम्णा प्रत्याख्यातुं न मार्हसि ११ अनुरूपो हि युक्तश्च त्वं ममाहं तवापि च । स्नुषां प्रतीच्छ मे कन्यां भार्यां सत्यवतस्ततः १२ द्युमत्सेन उवाच ॥ पूर्वमेवाभिलषितः संबन्धो मे त्वया सह । भ्रष्टराज्यस्त्वहमिति तत एतद्विचारितम् १३ अभिप्रायस्त्वयं योमे पूर्वमेवाभिकाङ्क्षितः । स निर्वर्ततु मेद्यैव काङ्क्षितो ह्यसि मेतिथिः १४ ततः सर्वान्समानाय्य द्विजानाश्रमवासिनः । यथाविधि समुद्वाहं कारयामासतुर्नृपौ १५ दत्त्वा सोश्वपतिः कन्यां यथार्हं सपरिच्छदम् ।

अश्वपति ह्मणतोः—हे राजर्षे, सावित्री नांवाची ही माझी सुंदरी कन्या आहे; ह्यास्तव, हे धर्मज्ञ, स्नुषेकरितां आपण त्या माझ्या कन्येचा स्वीकार स्वधर्मानें करावा ८ द्युमत्सेन ह्मणतोः—आह्मी राज्यापासून भ्रष्ट होऊन वनामध्यें वास्तव्य करीत आहों आणि तपस्वी होऊन व व्रतस्थ राहून येथें धर्माचरण करीत आहोंत. तेव्हां वनवासाला पात्र नसलेली तुझी कन्या आश्रमामध्यें असे क्लेश सहन करून कशी बरें राहील ? ९ अश्वपति ह्मणतोः—सुख आणि दुःख ह्यांच्यामागें उत्पत्ति व विनाश हीं लागलेलींच आहेत हें मी जाणीत आहें आणि माझ्या कन्येलाही विदित आहे. तस्मात्, माझ्यासारख्याशीं असल्या भाषणाचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. हे राजा, मी निश्चय करून आपणांकडे आलों आहें १०. प्रेमानें नम्र होऊन ज्याअर्थी मी आलों आहें त्याअर्थी आपण माझ्या आशेचा भंग करूं नका. सारांश, केवल प्रेमानेंच आलेल्या माझी प्रार्थना अमान्य करणें आपणांला योग्य नाहीं ११. आपण मला अनुरूप आहांत आणि मीही आपल्याशीं संबंध करण्यास योग्य आहें. तस्मात्, माझी कन्या सत्यवानाची भार्या आणि आपली स्नुषा ह्या नात्यानें आपण स्वीकारा १२. द्युमत्सेन ह्मणतोः—आपल्याशीं शरीरसंबंध व्हावा अशी माझी पूर्वीपासूनच इच्छा आहे; परंतु, मी राज्यभ्रष्ट झालों असल्यामुळें हा आपणांला विचार कळविणें मला भाग पडलें १३. तथापि, ज्याअर्थी आपण माझे प्रिय अतिथि आहां त्याअर्थी पूर्वींच मनामध्यें योजिलेला हा माझा उद्देश आजच्या आजच शेवटास जाऊं द्या १४. इतकें झाल्यानंतर आश्रमामध्यें वास्तव्य करणाऱ्या सर्व द्विजांना बोलावून आणून त्या

ययौ स्वमेव भवनं युक्तः परमया मुदा १६ सत्यवानपि तां भार्यां
लब्ध्वा सर्वगुणान्विताम् । मुमुदे सा च तं लब्ध्वा भर्तारं मनसेप्सितम् १७
गते पितरि सर्वाणि संन्यस्याभरणानि सा । जगृहे वल्कलान्येव वस्त्रं
काषायमेव च १८ परिचारैर्गुणैश्चैव प्रश्रयेण दमेन च । सर्वकामक्रि-
याभिश्च सर्वेषां तुष्टिमादधे १९ श्वश्रूं शरीरसत्कारैः सर्वैराच्छादनादिभिः ।
श्वशुरं देवसत्कारैर्वाचः संयमनेन च २० तथैव प्रियवादेन नैपुणेन शमेन
च । रहश्चैवोपचारेण भर्तारं पर्यतोषयत् २१ एवं तत्राश्रमे तेषां तदा
निवसतां सताम् । कालस्तपस्यतां कश्चिदपाक्रामत भारत २२ सावित्र्या
ग्लायमानायास्तिष्ठन्त्यास्तु दिवानिशम् । नारदेन यदुक्तं तद्वाक्यं मनसि
वर्तते २३ [११२४३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्या-
मारण्यके पर्वणि सावित्र्युपाख्याने पञ्चनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः॥२९५॥
मार्कण्डेय उवाच ॥ ततः काले बहुतिथे व्यतिक्रान्ते कदाचन । प्राप्तः

उभयता राजानीं यथाविधि विवाह करविला १५ आणि ह्याप्रमाणें योग्यतेनुरूप सरंजाम देऊन अश्वपति राजानें सत्यवानाला आपल्या कन्येचें दान केल्यावर तो पराकाष्ठेचा आनंदित होऊन आपल्या घरीं चालता झाला १६. इकडे ती सर्वगुणसंपन्न भार्या प्राप्त झाल्यामुळें सत्यवानालाही हर्ष झाला आणि मनाप्रमाणें पति मिळाला ह्मणून त्या सावित्रीलाही आनंद झाला १७. असो. पिता गेल्यानंतर त्या सावित्रीनें सर्व भूषणें काढून ठेविलीं आणि काषायवस्त्र व वल्कलेंच धारण केलीं १८. तदनंतर शुश्रूषा, गुण, विनय, इंद्रियदमन आणि सर्वांच्या इच्छेप्रमाणें आचरण ह्याच्या योगानें तिनें सर्वांना संतुष्ट केलें १९. वस्त्रप्रावरण वगैरे सर्व शरीरसंबंधीं सत्कारानीं तिनें सासूला संतुष्ट ठेविलें; देवपूजेसंबंधीं सत्कार आणि सहनशीलता ह्यांच्या योगानें तिनें सासऱ्याला प्रसन्न राखिलें २०; आणि त्याचप्रमाणें प्रिय भाषण, निपुणता, मनोनिग्रह आणि एकांतांतील शुश्रूषा ह्याच्या योगानें तिनें भर्त्यालाही आनंदित राखिलें २१. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें ते सज्जन तपश्चर्या करीत आश्रमामध्यें वास्तव्य करीत असतांना कांहीं काल लोटला २२; आणि नारदमुनींनीं केलेलें तें भाषण रात्रंदिवस मनामध्यें घोळत असल्यामुळें सावित्री उत्तरोत्तर जास्त जास्तच एकसारखी म्लानवदन होऊन राहिली २३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वापैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें पंचाण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९५ ॥

मार्कंडेय सांगतातः—असे होतां होतां बरेच दिवस लोटल्यानंतर, हे युधिष्ठिर राजा,

स कालो मर्तव्यं यत्र सत्यवता नृप १ गणयन्त्याश्च साविञ्या दिवसे दिवसे गते । यद्वाक्यं नारदेनोक्तं वर्तते हृदि नित्यशः २ चतुर्थेऽहनि मर्तव्यमिति संचिन्त्य भाविनी । व्रतं त्रिरात्रमुद्दिश्य दिवारात्रं स्थिताभवत् ३ तं श्रुत्वा नियमं तस्या भृशं दुःखान्वितो नृपः । उत्थाय वाक्यं सावित्रीमब्रवीत्परिसान्त्वयन् ४ द्युमत्सेन उवाच ॥ अतितीव्रोऽयमारम्भस्त्वयारब्धो नृपात्मजे । तिसृणां वसतीनां हि स्थानं परमदुश्चरम् ५ सावित्र्युवाच ॥ न कार्यस्तात संतापः पारयिष्याम्यहं व्रतम् । व्यवसायकृतं हीदं व्यवसायश्च कारणम् ६ द्युमत्सेन उवाच ॥ व्रतं भिन्धीति वक्तुं त्वां नास्मि शक्तः कथंचन । पारयस्वेति वचनं युक्तमस्मद्विधो वदेत् ७ मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्त्वा द्युमत्सेनो विरराम महामनाः । तिष्ठन्ती चैव सावित्री काष्ठभूतेव लक्ष्यते ८ श्वोभूते भर्तृमरणे साविञ्या भरतर्षभ । दुःखान्वितायास्तिष्ठन्त्याः सा रात्रिर्व्यत्यवर्तत ९ अद्य तद्दिवसं चेति हुत्वा दीप्तं हुताशनम् । युगमात्रोदिते सूर्ये कृत्वा पौर्वाह्णिकीः

सत्यवानाच्या मृत्यूचा समय प्राप्त झाला १. नारदमुनींनीं केलेलें भाषण सावित्रीच्या हृदयामध्यें नेहमीं घोळत राहिलेलें होतें आणि जसा जसा एक एक दिवस निघून जाई तशी तशी अवशिष्ट राहिलेल्या दिवसांची गणना ती करून ठेवी २. असें होतां होतां आजपासून चवथ्या दिवशीं मृत्यु येणार असें जेव्हां तिला कळून आलें तेव्हां ती साध्वी त्रिरात्रव्रत करण्याच्या उद्देशानें भोजन न करितां रात्रंदिवस व्रतस्थ राहिली ३. तेव्हां तिचा तो नेम ऐकून राजाला वाईट वाटलें; व आपल्या आसनावरून उठून सांत्वन करीत तो सावित्रीला ह्मणाला ४ ' हे राजकन्ये, तूं हें अति कठिण व्रत आरंभिलें आहेस. कारण, तीन दिवसपर्यंत अन्नग्रहण न करणें फारच दुर्घट आहे ' ५. सावित्री ह्मणते ' आपणाला त्याची इतकी काळजी नको. हे महाराज, मी हें व्रत शेंवटाला नेईन, मनाचा निश्चय करून मीं हें आरंभिलें आहे आणि निश्चय हें सिद्धीचें कारण आहे ' ६. द्युमत्सेन ह्मणतोः—' व्रत मोड' असें तुला सांगण्यास मी मुळींच समर्थ नाहीं. 'तें शेंवटास ने' असें योग्य भाषणच आमच्यासारखा गृहस्थ करील ७. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें सावित्रीशीं बोलून तो महाशय द्युमत्सेन तसाच स्तब्ध राहिला; आणि अन्नपाण्यावाचून तशीच उभी असलेली सावित्री जशी कांहीं लांकडाच्या बाहुलीप्रमाणेंच दिसूं लागली ८. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, असें होतां होतां भर्त्याचें मरण उद्यांवर येऊन ठेपलें असतां दुःखित होऊन व्रतस्थ राहिलेल्या सावित्रीची तीही रात्र निघून गेली ९. तेव्हां, आज तो दिवस असें मनांत

क्रियाः १० ततः सर्वान्द्विजान्वृद्धाञ्श्वश्रूं श्वशुरमेव च । अभिवाद्यानुपूर्व्येण प्राञ्जलिर्नियता स्थिता ११ अवैधव्याशिषस्ते तु सावित्र्यर्थं हिताः शुभाः । ऊचुस्तपस्विनः सर्वे तपोवननिवासिनः १२ एवमस्त्विति सावित्री ध्यानयोगपरायणा । मनसा ता गिरः सर्वाः प्रत्यगृह्णात्तपस्विनाम् १३ तं कालं तं मुहूर्तं च प्रतीक्षन्ती नृपात्मजा । यथोक्तं नारदवचश्चिन्तयन्ती सुदुःखिता १४ ततस्तु श्वश्रूश्वशुरावूचतुस्तां नृपात्मजाम् । एकान्तमास्थितां वाक्यं प्रीत्या भरतसत्तम १५ श्वशुरावूचतुः ॥ व्रतं यथोपदिष्टं तु तथा तत्पारितं त्वया । आहारकालः संप्राप्तः क्रियतां यदनन्तरम् १६ सावित्र्युवाच ॥ अस्तंगते मयादित्ये भोक्तव्यं कृतकामया । एष मे हृदि संकल्पः समयश्च कृतो मया १७ मार्कण्डेय उवाच ॥ एवं संभाषमाणायाः सावित्र्या भोजनं प्रति । स्कन्धे परशुमादाय सत्यवान्प्रस्थितो वनम् १८ सावित्री त्वाह भर्तारं नैकस्त्वं गन्तुमर्हसि । सह त्वया गमिष्यामि न हि त्वां हातुमु-

---

आणून सावित्रीनें सकाळची कामें उरकलीं; व चार हात सूर्य आकाशामध्यें आल्यावर तिनें प्रदीप्त अग्नीमध्यें हवन केलें १०. तदनतर सर्व वृद्ध ब्राह्मण, सासू व सासरा यांना क्रमानें अभिवंदन करून ती सावित्री नम्रपणानें हात जोडून उभी राहिली असतां ११ तपोवनामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या सर्वही तपस्व्यांनीं सावित्रीला अनुलक्षून मंगलदायक आणि हितावह असे अवैधव्यविषयक आशीर्वाद दिले १२. तेव्हां ईश्वरध्यान आणि व्रत ह्यांविषयीं तत्पर असलेल्या त्या सावित्रीनें ' तथास्तु ' असें मनामध्यें ह्मणून तपस्व्यांच्या त्या सर्वही आशीर्वादांचा मनापासून स्वीकार केला १३; आणि नारदमुनींच्या भाषणाचें चिंतन करीत असलेली व ह्मणूनच अत्यंत दुःखित झालेली ती राजकन्या सावित्री त्या कालाची व त्या मुहूर्ताची वाट पहात बसली १४. तदनंतर हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, एकीकडे असलेल्या त्या राजकन्येला सासू व सासरा हे उभयतां प्रेमानें ह्मणाले १५ ' मनांत योजिल्याप्रमाणें तें व्रत तू शेवटास नेलें आहेस. तेव्हां आतां पारण्याचा समय प्राप्त झाला आहे. ह्यास्तव, भोजन करून मग तुला काय करावयाचें असेल तें कर' १६. सावित्री ह्मणते:— मनोरथ सिद्धीस गेल्यानंतर सूर्यास्त झाल्यावर मला भोजन करावयाचें आहे; हा माझ्या मनामध्यें संकल्प झाला आहे; आणि सूर्यास्तानंतरच भोजन करण्याचा काल मीं योजिला आहे १७. मार्कंडेय सांगतात:—ह्याप्रमाणें भोजनासंबंधानें सावित्रीचें भाषण चाललें असतांना खांद्यावर कुऱ्हाड टाकून सत्यवान् वनामध्यें निघाला १८. तेव्हां सावित्री म्हणाली

त्सह १९ सत्यवानुवाच ॥ वनं न गतपूर्वं ते दुःखः पन्थाश्च भाविनि । व्रतोपवासक्षामा च कथं पद्भ्यां गमिष्यसि २० सावित्र्युवाच ॥ उपवासान्न मे ग्लानिर्नास्ति चापि परिश्रमः । गमने च कृतोत्साहां प्रतिषेद्धुं न मार्हसि २१ सत्यवानुवाच ॥ यदि ते गमनोत्साहः करिष्यामि तव प्रियम् । मम त्वामन्त्रय गुरून् मां दोषः स्पृशेदयम् २२ मार्कण्डेय उवाच ॥ साभिवाद्याब्रवीच्छ्वश्रूं श्वशुरं च महाव्रता । अयं गच्छति मे भर्ता फलाहारो महावनम् २३ इच्छेयमभ्यनुज्ञाता आर्यया श्वशुरेण ह । अनेन सह निर्गन्तुं न मेद्य विरहः क्षमः २४ गुर्वग्निहोत्रार्थकृते प्रस्थितश्च सुतस्तव । न निवार्यो निवार्यः स्यादन्यथा प्रस्थितो वनम् २५ संवत्सरः किंचिदूनो न निष्क्रान्ताहमाश्रमात् । वनं कुसुमितं द्रष्टुं परं कौतूहलं हि मे २६ द्युमत्सेन उवाच ॥ यतःप्रभृति सावित्री पित्रा दत्ता स्नुषा

ह्मणाली " आपण एकटे जाऊं नका; मी आपल्याबरोबर येईन; आपल्याला सोडून येथें राहण्याची माझी इच्छा नाहीं " १९. सत्यवान् ह्मणतो:— हे स्त्रिये, तू पूर्वी कधीं वनामध्यें गेलेली नाहींस; मार्गही बिकट आहे आणि व्रत व उपवास ह्यांनीं तू अगदीं थकून गेली आहेस. ह्यास्तव, तूं पायांनीं वनात येण्यास कशी समर्थ होशील? २०. सावित्री ह्मणते:— उपवासामुळें मला ग्लानि आलेली नाहीं व वनांत जाण्यानें मला श्रमही होणार नाहींत. आपल्याबरोबर येण्याविषयी मला इच्छा झाली आहे. तस्मात्, आपण मला नाहीं ह्मणूं नका २१. सत्यवान् ह्मणतो:— वनांत जाण्याचें जर तुझ्या मनात असेल तर मीही तुझी इच्छा परिपूर्ण करीन परंतु, (वनामध्यें तुला घेऊन गेल्याचा) हा दोष माझ्याकडे न यावा एतदर्थ तू माझ्या वडील मातापितरांना विचार २२. मार्कंडेय सांगतात:— तदनंतर ती महापतिव्रता सावित्री सासूसासऱ्यांना नमस्कार करून ह्मणाली ' हा माझा भर्ता फलें आणण्याकरितां महावनामध्यें जात आहे २३; व आपल्या उभयतांच्या अनुज्ञेनें ह्याच्याबरोबर वनांत जाण्याचा माझा विचार आहे. आज मला वियोग सहन होणें शक्य नाहीं २४. गुरु आणि अग्निहोत्र ह्यांकरितां आपला पुत्र वनामध्यें निघाला आहे. ह्यास्तव, त्याला ' जाऊं नको ' असें ह्मणतां येणार नाहीं. दुसऱ्या कांहीं कामाकरितां तो वनांत जाण्यास निघाला असता तर तसें ह्मणतां आलें असतें २५. शिवाय, जवळ जवळ आज एक वर्ष झालें तरी आश्रमांतून मी बाहेरही पडलें नाहीं. प्रफुल्लित झालेलें वन अवलोकन करण्याची मला फारच उत्कंठा झाली आहे २६. द्युमत्सेन ह्मणाला:— स्नुषा ह्मणून सावित्रीला पित्यानें माझ्या स्वाधीन केल्यापासून आजपर्यंत हिनें कधीं उत्कंठेनें प्रार्थना केल्याचें

मम । नानयाभ्यर्थनायुक्तमुक्तपूर्वं स्मराम्यहम् २७ तदेषा लभतां कामं यथाभिलषितं वधूः । अप्रमादश्च कर्तव्यः पुत्रि सत्यवतः पथि २८ मार्कण्डेय उवाच ॥ उभाभ्यामभ्यनुज्ञाता सा जगाम यशस्विनी । सह भर्त्रा हसन्तीव हृदयेन विदूयता २९ सा वनानि विचित्राणि रमणीयानि सर्वशः । मयूरगणजुष्टानि ददर्श विपुलेक्षणा ३० नदीः पुण्यवहाश्चैव पुष्पितांश्च नगोत्तमान् । सत्यवानाह पश्येति सावित्रीं मधुरं वचः ३१ निरीक्षमाणा भर्तारं सर्वावस्थमनिन्दिता । मृतमेव हि भर्तारं काले मुनिवचः स्मरन् ३२ अनुव्रजन्ती भर्तारं जगाम मृदुगामिनी । द्विधेव हृदयं कृत्वा तं च कालमवेक्षती ३३ [११२७६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि पतिव्रतामाहात्म्यपर्वणि सावित्र्युपाख्याने षण्णवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९६ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ अथ भार्यासहायः स फलान्यादाय वीर्यवान् । कठिनं पूरयामास ततः काष्ठान्यपाटयत् १ तस्य पाटयतः काष्ठं

मला स्मरत नाहीं २७. तस्मात्, ह्या स्नुषेचा मनोरथ इच्छेप्रमाणें सिद्धीस जाणें योग्य आहे. परंतु, हे मुली, मार्गामध्यें सत्यवानाकडे तूं दुर्लक्ष्य करूं नको २८. मार्कंडेय ह्मणतातः—ह्याप्रमाणें उभयतांनीं अनुज्ञा दिली असतां मनामध्यें जरी दुःख होत होतें तरी ती यशस्विनी सावित्री जशी कांहीं हंसत हंसतच भर्त्यासहवर्तमान आश्रमांतून गेली २९. तदनंतर सर्वप्रकारें रम्य, अद्भुत आणि मोरांच्या कळपांनीं युक्त अशीं वनें त्या विशालनयना सावित्रीनें अवलोकन केलीं ३०. जातां जातां 'पवित्र जलाच्या प्रवाहानें युक्त असलेल्या नद्या आणि प्रफुल्लित झालेले उत्कृष्ट वृक्ष अवलोकन कर' ह्मणून सत्यवान् सावित्रीशीं मधुर भाषण करूं लागला ३१. जिला कोठेंही नांव ठेवण्यास जागा नाहीं अशी ती सावित्री सर्वप्रकारें भर्त्याकडे दृष्टि देऊन चालली होती; आणि त्या वेळीं नारदमुनींनीं केलेलें तें भाषण एकसारखें मनांत येऊं लागल्यामुळें ती आपला भर्ता मृत झाल्याचेंच समजत होती ३२. सारांश, जिची गति मंद आहे अशी ती भर्त्याच्या मागोमाग जात असलेली सावित्री त्या कालाची प्रतीक्षा करीत असल्यामुळें आणि भर्त्याकडेही एकसारखें लक्ष्य ठेवीत असल्यामुळें जसें कांहीं आपलें हृदय द्विधा करूनच चालली ३३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वापैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें शहाण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९६ ॥

मार्कंडेय सांगतातः—तदनंतर भार्येसहवर्तमान त्या वीर्यवान् सत्यवानानें फळें गोळा

स्वेदो वै समजायत । व्यायामेन च तेनास्य जज्ञे शिरसि वेदना २
सोऽभिगम्य प्रियां भार्यामुवाच श्रमपीडितः । सत्यवानुवाच ॥ व्यायामेन
ममानेन जाता शिरसि वेदना ३ अङ्गानि चैव सावित्रि हृदयं दूयतीव
च । अस्वस्थमिव चात्मानं लक्षये मितभाषिणि ४ शूलैरिव शिरो विद्ध-
मिदं संलक्षयाम्यहम् । तत्स्वप्तुमिच्छे कल्याणि न स्थातुं शक्तिरस्ति मे ५
सा समासाद्य सावित्री भर्तारमुपगम्य च । उत्सङ्गेऽस्य शिरः कृत्वा
निषसाद महीतले ६ ततः सा नारदवचो विमृशन्ती तपस्विनी । तं
मुहूर्तं क्षणं वेलां दिवसं च युयोज ह ७ मुहूर्तादेव चापश्यत्पुरुषं रक्त-
वाससम् । बद्धमौलिं वपुष्मन्तमादित्यसमतेजसम् ८ श्यामावदातं रक्ताक्षं
पाशहस्तं भयावहम् । स्थितं सत्यवतः पार्श्वे निरीक्षन्तं तमेव च ९ तं
दृष्ट्वा सहसोत्थाय भर्तुर्न्यस्य शनैः शिरः । कृताञ्जलिरुवाचार्ता हृदयेन
प्रवेपती १० सावित्र्युवाच ॥ दैवतं त्वाभिजानामि वपुरेतद्ध्यमानुषम् ।

करून टोपली भरली; आणि नतर तो लांकडें तोडूं लागला १. तेव्हां लांकूड तोडतां
तोडतां त्याला घाम आला व त्या श्रमामुळें त्याच्या मस्तकामध्यें वेदना उत्पन्न झाली २.
तेव्हां श्रमानें जर्जर झालेला तो सत्यवान् प्रिय भार्येसमीप येऊन तिला ह्मणाला ' ह्या
श्रमामुळें माझ्या मस्तकामध्यें वेदना उत्पन्न झाली आहे ३; हे सावित्रि, माझें अंग
ठणकूं लागलें आहे; हृदयामध्येंही दुखूं लागलें आहे; आणि, हे मितभाषिणि, मला
मुळीं चैन पडत नाहीं ४. माझें मस्तकामध्यें शूल भोंसकल्याप्रमाणें मला दुःख
होत आहे. तस्मात्, हे कल्याणि, मला पडावेंसें वाटतें; बसण्याची मला शक्ति
नाहीं' ५. भर्त्याचें हें भाषण ऐकतांक्षणीं सावित्री धैर्य धरून पतीजवळ गेली आणि
त्याचें मस्तक मांडीवर ठेवून भूमीवर बसली ६. तदनंतर नारदमुनींच्या भाषणाचा ती
तपस्विनी विचार करूं लागली असतां तो मुहूर्त, तो क्षण, ती वेळ आणि तो दिवस हें सर्व
जुळलें असें तिला वाटलें ७. तों एका मुहूर्तामध्येंच आरक्त वस्त्रें परिधान केलेला, मस्तकीं
मुकुट घातलेला आणि उत्कृष्ट देह धारण केलेला सूर्यासारिखा तेजस्वी पुरुष तिच्या दृष्टीं
पडला ८. उत्कृष्ट श्यामवर्ण व आरक्तवर्ण नेत्र ह्यांनीं युक्त असलेला तो भयंकर पुरुष हाता-
मध्यें पाश घेऊन सत्यवानाकडेच पहात पहात त्याच्याजवळ उभा राहिला ९. तेव्हां
त्याला अवलोकन करितांक्षणीं भर्त्याचें मस्तक मांडीवरून हळूच खालीं ठेवून ती एका-
एकीं उठली; आणि दुःखाकुल होऊन अंतःकरणामध्यें थरथर कापत असलेली ती सावित्री
हात जोडून त्याला ह्मणाली १० " मी आपणांला देव समजत आहें. कारण, हें
शरीर अमानुष आहे. तस्मात्, हे देवाधिदेव, आपण कोण आणि आपला उद्देश काय.

कामया ब्रूहि देवेश कस्त्वं किं च चिकीर्षसि ११ यम उवाच ॥ पति-
व्रतासि सावित्रि तथैव च तपोन्विता । अतस्त्वामभिभाषामि विद्धि मां
त्वं शुभे यमम् १२ अयं ते सत्यवान्भर्ता क्षीणायुः पार्थिवात्मजः ।
नेष्यामि तमहं बद्ध्वा विद्ध्येतन्मे चिकीर्षितम् १३ सावित्र्युवाच ॥ श्रूयते
भगवन्दूतास्तवागच्छन्ति मानवान् । नेतुं किल भवान्कस्मादागतोसि
स्वयं प्रभो १४ मार्कण्डेय उवाच ॥ इत्युक्तः पितृराजस्तां भगवान्स्व-
चिकीर्षितम् । यथावत्सर्वमाख्यातुं तत्प्रियार्थं प्रचक्रमे १५ अयं च धर्म-
संयुक्तो रूपवान्गुणसागरः । नार्हो मत्पुरुषैर्नेतुमतोस्मि स्वयमागतः १६
ततः सत्यवतः कायात्पाशबद्धं वशंगतम् । अङ्गुष्ठमात्रं पुरुषं निश्चकर्ष यमो
बलात् १७ ततः समुद्धृतप्राणं गतश्वासं हतप्रभम् । निर्विचेष्टं शरीरं तद्बभू-
वाप्रियदर्शनम् १८ यमस्तु तं ततो बद्ध्वा प्रयातो दक्षिणामुखः । सावित्री
चैव दुःखार्ता यममेवान्वगच्छत । नियमव्रतसंसिद्धा महाभागा पतिव्रता १९
यम उवाच ॥ निवर्त गच्छ सावित्रि कुरुष्वास्यौर्ध्वदेहिकम् । कृतं भर्तुस्त्व-

---

आहे हें आपण मला मनापासून सांगा " ११. यमधर्म ह्मणतातः—हे सावित्रि, तूं पतिव्रता आहेस आणि तपस्विनी आहेस; ह्मणून मी तुझ्याशीं भाषण करीत आहें. हे कल्याणि, मी यम आहें असें तूं समज १२. ह्या तुझ्या भर्त्या राजपुत्र सत्यवानाचें आयुष्य संपलें आहे; आणि ह्मणून मी ह्याला बांधून नेणार आहें. हा माझा अभिप्राय तू जाण १३. सावित्री ह्मणतेः—हे भगवन्, मानवांना नेण्याकरितां आपले दूत येत असतात असें माझ्या एकण्यांत आहे. मग, हे प्रभो, ह्याला नेण्याकारितां स्वतःच कां आपलें येणे झालें हें आपण खरोखर मला सांगा १४. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें सावित्रीनें विचारिलें असतां भगवान् पितृराज यमधर्म तिची इच्छा परिपूर्ण करण्याकरितां तिनें विचारिल्याप्रमाणें आपला सर्व अभिप्राय इत्थंभूत कथन करूं लागले १५. (ते ह्मणाले) हा रूपवान् , सत्यवान् धर्मनिष्ठ व गुणनिधि असल्यामुळें माझ्या सेवकांनीं ह्याला नेणें योग्य नाहीं; ह्मणून मी स्वतःच ह्याला नेण्याकरितां आलों आहें १६. तदनंतर पाशबद्ध झाल्यामुळें तावडींत सांपडलेला अंगुष्ठमात्र पुरुष सत्यवानाच्या देहापासून यमानें आपल्या सामर्थ्यानें बाहेर ओढिला १७. तेव्हां प्राण हरण करून नेल्यामुळें श्वासरहित, तेजोहीन चलनवलनशून्य आणि दिसण्यांतही अप्रिय असं तें शरीर झालें १८. तदनंतर त्या अंगुष्ठमात्र पुरुषाला बांधून घेऊन यम दक्षिणाभिमुख चालते झाले असतां दुःखाकुल झालेली सावित्रीही त्यांच्या मागोमाग गेली. कारण, ती महाभाग्यवती सावित्री पतिव्रता होती; आणि नियम व व्रत

यानृण्यं यावद्गम्यं गतं त्वया २० सावित्र्युवाच ॥ यत्र मे नीयते भर्ता स्वयं
वा यत्र गच्छति । मया च तत्र गन्तव्यमेष धर्मः सनातनः २१ तपसा
गुरुभक्त्या च भर्तुः स्नेहाद्व्रतेन च । तव चैव प्रसादेन न मे प्रतिहता
गतिः २२ प्राहुः साप्तपदं मैत्रं बुधास्तत्त्वार्थदर्शिनः । मित्रतां च पुरस्कृत्य
किंचिद्वक्ष्यामि तच्छृणु २३ नानात्मवन्तस्तु वने चरन्ति धर्मं च वासं च
परिश्रमं च । विज्ञानतो धर्ममुदाहरन्ति तस्मात्सन्तो धर्ममाहुः प्रधानम् २४
एकस्य धर्मेण सतां मतेन सर्वे स्म तं मार्गमनुप्रपन्नाः । मा वै द्वितीयं
मा तृतीयं च वाञ्छे तस्मात्सन्तो धर्ममाहुः प्रधानम् २५ यम उवाच ॥
निवर्त तुष्टोस्मि तवानया गिरा स्वराक्षरव्यञ्जनहेतुयुक्तया । वरं
वृणीष्वेह विनास्य जीवितं ददानि ते सर्वमनिन्दिते वरम् २६
सावित्र्युवाच ॥ च्युतः स्वराज्याद्वनवासमाश्रितो विनष्टचक्षुः श्वशुरो

ह्यांच्या योगानें तिला सिद्धि प्राप्त झाली होती १९. यमधर्म ह्मणतातः—हे सावित्रि, परत फीर, जा; ह्याचा और्ध्वदेहिक संस्कार कर. शक्य तितकें अनुगमन तुझ्या हातून झालें असल्यामुळें तूं आतां भर्त्याच्या ऋणांतून मुक्त झाली आहेस २०. सावित्री ह्मणतेः—जिकडे माझ्या भर्त्याला कोणी घेऊन जाऊं लागेल; अथवा जिकडे तो स्वतः जाऊं लागेल तिकडे मीं जावयाचें हा सनातन धर्म आहे २१. तप, गुरुभक्ति, भर्त्याविषयीं माझे ठिकाणीं वसत असलेलें प्रेम, आचरिलेलें व्रत आणि आपला प्रसाद ह्यांच्या योगानें माझी गति कुंठित झाली नाहीं २२. तात्विक अर्थ जाणणारे ज्ञानवान् पुरुष, सात पावलें बरोबर चालण्यानें मैत्री संपादन होते असें ह्मणत असतात. तस्मात्, आपणांमध्यें उत्पन्न झालेल्या मित्रत्वाच्या नात्यानें मी कांहीं सांगत आहें तें श्रवण करा २३. अजितेंद्रिय पुरुष यज्ञादिरूप धर्म, वानप्रस्थाश्रम, ब्रह्मचर्य आणि संन्यास ह्यांपैकीं कांहींच करीत नाहींत; परंतु, धर्म हेंच आत्मज्ञानाचें साधन ह्मणून ह्मणत असतात; आणि ह्मणूनच सज्जन धर्मच श्रेष्ठ समजतात २४. सज्जनांना संमत अशा धर्माच्याच योगानें सर्व त्या ज्ञानमार्गाला गेले आहेत. ह्यास्तव, स्ववर्णाश्रमधर्मच सज्जन श्रेष्ठ समजत असतात; आणि ह्याकरितांच धर्माकडे दुर्लक्ष्य करून पुरुषानें अर्थाची आणि कामाची इच्छा धरू नये २५. यमधर्म ह्मणतातः—परत फीर; योग्य उच्चार, स्वर, व्यंजनें आणि युक्ति ह्यांनीं भरलेल्या ह्या तुझ्या भाषणानें मी संतुष्ट झालों आहें. तस्मात्, हे निर्दोष सावित्रि, तूं वर माग; ह्याच्या जीवितावांचून मी सर्व कांहीं देईन २६. सावित्री ह्मणतेः—माझा श्वशुर अंध होऊन स्वराज्यापासून भ्रष्ट झाला आहे आणि वनवासाचें

ममाश्रमे । स लब्धचक्षुर्बलवान्भवेन्नृपस्तव प्रसादाज्ज्वलनार्कसंनिभः २७ यम उवाच ॥ ददानि तेहं तमनिन्दिते वरं यथा त्वयोक्तं भविता च तत्तथा । तवाध्वना ग्लानिमिवोपलक्षये निवर्त गच्छस्व न ते श्रमो भवेत् २८ सावित्र्युवाच ॥ श्रमः कुतो भर्तृसमीपतो हि मे यतो हि भर्ता मम सा गतिर्ध्रुवा । यतः पतिं नेष्यसि तत्र मे गतिः सुरेश भूयश्च वचो निबोध मे २९ सतां सकृत्संगतमीप्सितं परं ततः परं मित्रमिति प्रचक्षते । न चाफलं सत्पुरुषेण संगतं ततः सतां संनिवसेत्समागमे ३० यम उवाच॥ मनोनुकूलं बुधबुद्धिवर्धनं त्वया यदुक्तं वचनं हिताश्रयम् । विना पुनः सत्यवतोस्य जीवितं वरं द्वितीयं वरयस्व भामिनि ३१ सावित्र्युवाच ॥ हृतं पुरा मे श्वशुरस्य धीमतः स्वमेव राज्यं लभतां स पार्थिवः । जह्यात्स्वधर्मान्न च मे गुरुर्यथा द्वितीयमेतद्वरयामि ते वरम् ३२ यम उवाच॥ स्वमेव राज्यं प्रतिपत्स्यतेचिरान्न च स्वधर्मात्परिहास्यते नृपः । कृतेन

अवलंबन करून आश्रमामध्यें राहिला आहे. त्याला आपल्या प्रसादामुळें दृष्टि व सामर्थ्य प्राप्त व्हावें आणि अग्नि व सूर्य ह्यांप्रमाणें ता तेजस्वी व्हावा २७ यमधर्म ह्मणतात:—हे निष्पाप सावित्रि, मी तुला वर देतों; हें तुझ्या ह्मणण्याप्रमाणें होईल. आतां प्रवासामुळें तुला ग्लानि आल्यासारखी दिसत आहे. ह्यास्तव, तूं परत फीर आणि जा; ह्मणजे तुला श्रम होणार नाहींत २८. सावित्री ह्मणते:—भर्त्याचे समीप असतांना मला श्रम कोठून होणार ? जी भर्त्याची वाट ती माझी वाट हें ठरलेलेंच आहे. ह्यास्तव, जिकडे आपण माझ्या पतीला घेऊन जात आहां तिकडे माझें गमन होणारच. असो. हे सुरेश्वर, माझें आणखीही एक ह्मणणें आपण ऐका २९. सज्जनांचा एकदां तरी समागम व्हावा अशी लोकांची फार इच्छा असते. कारण, ज्याच्याशीं सज्जनाचा समागम झाला आहे तो पुरुष समागमानतर त्याचा मित्र होतो असें ह्मणत असतात; आणि सत्पुरुषाचा समागम कधींही निष्फल होत नाहीं. ह्यास्तव, सज्जनांचा समागम करून राहावें ३०. यमधर्म ह्मणतात:—सयुक्तिक, मनाला आल्हादकारक आणि ज्ञानवानांचीही बुद्धि विकसित करणारें असें ज्याअर्थी तू भाषण केलें आहेस त्याअर्थी सत्यवानाच्या जीवितावांचून, हे साध्वि, तूं दुसराही वर माग ३१. सावित्री ह्मणते:— माझ्या विवेकी श्वशुराचें जें राज्य पूर्वी दुसऱ्यानें हरण केलें आहे तें त्यांचेंच राज्य त्या राजाला प्राप्त व्हावें; आणि तो माझा श्वशुर स्वधर्मापासून च्युत होऊं नये असा मी आपल्यापाशीं दुसरा वर मागत आहें ३२. यमधर्म ह्मणतात:— द्युमत्सेन राजाला स्वतःचें राज्य लवकरच प्राप्त होईल; आणि स्वधर्मापासून तो कधीं

कामेन मया नृपात्मजे निवर्त गच्छस्व न ते श्रमो भवेत् ३३ सावि-
त्र्युवाच ॥ प्रजास्त्वयैता नियमेन संयता नियम्य चैता नयसे निकामया।
ततो यमत्वं तव देव विश्रुतं निबोध चेमां गिरमीरितां मया ३४ अद्रोहः
सर्वभूतेषु कर्मणा मनसा गिरा । अनुग्रहश्च दानं च सतां धर्मः सना-
तनः ३५ एवंप्रायश्च लोकोयं मनुष्याशक्तिपेशलाः । सन्तस्त्वेवाप्यमि-
त्रेषु दयां प्राप्तेषु कुर्वते ३६ यम उवाच ॥ पिपासितस्येव भवेद्यथा पय-
स्तथा त्वया वाक्यमिदं समीरितम् । विना पुनः सत्यवतोस्य जीवितं
वरं वृणीष्वेह शुभे यदिच्छसि ३७ सावित्र्युवाच ॥ ममानपत्यः पृथि-
वीपतिः पिता भवेत्पितुः पुत्रशतं तथौरसम् । कुलस्य संतानकरं च यद्भ-
वेत्तृतीयमेतद्वरयामि ते वरम् ३८ यम उवाच ॥ कुलस्य संतानकरं
सुवर्चसं शतं सुतानां पितुरस्तु ते शुभे । कृतेन कामेन नराधिपात्मजे
निवर्त दूरं हि पथस्त्वमागता ३९ सावित्र्युवाच ॥ न दूरमेतन्मम भर्तृ-
सन्निधौ मनो हि मे दूरतरं प्रधावति । अथ व्रजन्नेव गिरं समुद्यतां

च्युतही होणार नाहीं. हे राजकन्ये, हा तुझा मनोरथ सिद्धीस गेला आहे; ह्यास्तव, तूं आतां परत फीर आणि जा; ह्मणजे तुला श्रम होणार नाहींत ३३. सावित्री ह्मणतेः— ह्या प्रजा आपण स्वकर्मफलानें बद्ध केल्या आहेत; ह्यांचें नियमन करून ह्यांना सत्कर्माचें फलही आपणच देत असतां; आणि ह्मणूनच, 'हे देव ' आपलें यमत्व विख्यात आहे. तस्मात्, हें मी करीत असलेलें भाषण आपण ऐका ३४. कोणत्याही प्राण्याचा कायेनें, वाचेनें अगर मनानें द्रोह न करणें, सर्वांवर दया करणें आणि आपणांला मिळेल तें सर्वांना विभागून देणें हा सज्जनांचा सनातन धर्म आहे ३५. हे लोक तर प्रायः ह्या (मर्त्यां) प्रमाणें अल्पायु आहेत आणि मनुष्यें प्रायः माझ्यासारखीं सामर्थ्य-रहितच आहेत. परंतु, संत मात्र शत्रूही शरण आले असतां त्यावर दया करीत असतात ३६. यमधर्म ह्मणतातः— तृषिताला ज्याप्रमाणें उदक आनंददायक होतें त्याप्रमाणें तूं केलेलें हें भाषण मला आनंददायक झालेलें आहे. तस्मात्, हे शुभे, तुझी इच्छा असेल तर ह्या सत्यवानाच्या जीवितावांचून तूं आणखीही एक वर मागून घे ३७. सावित्री ह्मणतेः—माझा पृथ्वीपति पिता निपुत्रिक आहे; त्याला कुलपरंपरा कायम ठेवणारे शंभर औरस पुत्र व्हावेत हा मी तिसरा वर आपणांपाशीं मागत आहें ३८. यमधर्म ह्मणतातः—हे शुभे, कुलपरंपरा कायम ठेवणारे असे तुझ्या पित्याला शंभर महातेजस्वी पुत्र होतील. हे राजकन्ये, हाही तुझा मनोरथ आतां पूर्ण झाला आहे. ह्यास्तव, तूं आतां परत फीर. तूं बराच दूर मार्ग चालून आली आहेस ३९. सावित्री

मयोच्यमानां शृणु भूय एव च ४० विवस्वतस्त्वं तनयः प्रतापवांस्ततो हि
वैवस्वत उच्यसे बुधैः । समेन धर्मेण चरन्ति ताः प्रजास्ततस्तवेहेश्वर
धर्मराजता ४१ आत्मन्यपि न विश्वासस्तथा भवति सत्सु यः । तस्मा-
त्सत्सु विशेषेण सर्वः प्रणयमिच्छति ४२ सौहृदात्सर्वभूतानां विश्वासो
नाम जायते । तस्मात्सत्सु विशेषेण विश्वासं कुरुते जनः ४३ यम उवाच॥
उदाहृतं ते वचनं यदङ्गने शुभे न तादृक्त्वदृते श्रुतं मया । अनेन तुष्टोस्मि
विनास्य जीवितं वरं चतुर्थं वरयस्व गच्छ च ४४ सावित्र्युवाच ॥ ममा-
त्मजं सत्यवतस्तथौरसं भवेदुभाभ्यामिह यत्कुलोद्वहम् । शतं सुतानां बल-
वीर्यशालिना मिदं चतुर्थं वरयामि ते वरम् ४५ यम उवाच ॥ शतं सुतानां
बलवीर्यशालिनां भविष्यति प्रीतिकरं तवाबले । परिश्रमस्ते न भवेन्नृपात्मजे
निवर्त दूरं हि पथस्त्वमागता ४६ सावित्र्युवाच ॥ सतां सदा शाश्वत-

ह्मणते:—हें मला दूर नाहीं. भर्त्याचे सन्निधच माझें मन आहे; आणि तें प्रसंग पड-ल्यास ह्याहींपेक्षा सत्वर गमन करण्यास मला प्रोत्साहन देत आहे. तस्मात्, आतां जातां आपण मीं मनांत योजिलेलें हें आणखीही एक भाषण ऐकून घ्या ४०. आपण विवस्वानाचे प्रतापी पुत्र आहांत; ह्मणून आपणांला ज्ञानी पुरुष वैवस्वत असें ह्मणत असतात; आणि पक्षपातरहित अशा आपल्या धर्मबुद्धीनें त्या प्रजा वागविल्या जात असल्यामुळें, हे ईश्वर, धर्मराज हें नांव आपणांला प्राप्त झालें आहे ४१. मनुष्याचा सज्जनांचे ठिकाणीं जसा विश्वास असतो तसा स्वतःचे ठिकाणींही नसतो; आणि ह्मणूनच कोणीही झाला तरी विशेषेंकरून तो (स्वकार्यसिद्ध्यर्थ) सज्जनांचीच प्रार्थना करण्याचें मनामध्यें आणीत असतो ४२. सर्व प्राण्यांमध्यें पर-स्पर प्रेम उत्पन्न झाल्यामुळेंच परस्परांविषयीं विश्वास उत्पन्न होत असतो; आणि ह्मणूनच सर्व प्राण्यांवर प्रेम करणाऱ्या सज्जनांचे ठिकाणीं लोक विशेषतः विश्वास ठेवीत असतात ४३. यमधर्म ह्मणतात:—हे कल्याणि स्त्रिये, तूं जें भाषण केलेंस तसें भाषण तुझ्यावांचून मीं कोणाचेंही ऐकिलें नाहीं. ह्या तुझ्या भाषणानें मी संतुष्ट झालों आहें. तस्मात्, ह्याच्या जीवितावांचून तूं एक चवथा वर मागून घे आणि जा ४४. सावित्री ह्मणते:—माता आणि पिता अशा दोन्ही बाजूंनीं कुलाचा उद्धार करणारे, बलाढ्य आणि वीर्यवान् असे शंभर औरस पुत्र सत्यवानापासून मला प्राप्त व्हावेत; हा मी चवथा वर आपणांपाशीं मागत आहें ४५. यमधर्म ह्मणतात:—हे अबले, बलवान्, वीर्यवान् आणि तुला आनंद देणारे असे शंभर पुत्र तुला प्राप्त होतील. हे राजकन्ये, तुला परिश्रम होऊं नयेत; ह्याकरितां, तूं

धर्मवृत्तिः सन्तो न सीदन्ति न च व्यथन्ति। सतां सद्भिर्नाफलः संगमोऽस्ति सद्भ्यो भयं नानुवर्तन्ति सन्तः ४७ सन्तो हि सत्येन नयन्ति सूर्यं सन्तो भूमिं तपसा धारयन्ति। सन्तो गतिर्भूतभव्यस्य राजन्सतां मध्ये नावसीदन्ति सन्तः ४८ आर्यजुष्टमिदं वृत्तमिति विज्ञाय शाश्वतम्। सन्तः परार्थं कुर्वाणा नावेक्षन्ति परस्परम् ४९ न च प्रसादः सत्पुरुषेषु मोघो न चाप्यर्थो नश्यति नापि मानः। यस्मादेतन्नियतं सत्सु नित्यं तस्मात्सन्तो रक्षितारो भवन्ति ५० यम उवाच॥ यथा यथा भाषसि धर्मसंहितं मनोनुकूलं सुपदं महार्थवत्। तथा तथा मे त्वयि भक्तिरुत्तमा वरं वृणीष्वाप्रतिमं पतिव्रते ५१ सावित्र्युवाच॥ न तेऽपवर्गः सुकृताद्विना कृतस्तथा यथान्येषु वरेषु मानद। वरं वृणे जीवतु सत्यवानयं यथा मृता

आतां परत फीर. तूं आतां ह्या मार्गाचा बराच दूर भाग चालून आली आहेस ४६. सावित्री ह्मणते:—सज्जनांचें शाश्वत धर्माचरण सर्वदां कायम असतें. ते कधीं (प्रतिज्ञेपासून) च्युत होत नाहींत; आणि (दिलेलें वचन शेवटास नेण्याविषयीं) त्यांना कधीं अवघडही वाटत नाहीं. सज्जनांचा सज्जनांशीं समागम झाला असतां तो कधीं निष्फल होत नाहीं; आणि सज्जन कधीं सज्जनांना भय उत्पन्न करीत नाहींत ४७. हे धर्मराज, सज्जन सत्याच्याच योगानें सूर्य कायम ठेवीत असतात; सज्जन तपश्चर्येच्या योगानें पृथ्वीचें रक्षण करीत असतात; मागें गेलेल्या व पुढें येणाऱ्या लोकांना सतांचाच आधार आहे; आणि ह्मणूनच ह्या सतांमध्यें सज्जन आले असतां ते कधींही निराश होत नाहींत ४८. परोपकार करणें हें साधूचें अंगीं बाणलेलें नेहमींचें कर्तव्यच आहे असें समजून परोपकार करणारे संत उलट प्रत्युपकार होण्याची कधींही वाट पहात नसतात ४९. सत्पुरुषांची कृपा कधींही व्यर्थ होत नाहीं. सत्पुरुषाचे ठिकाणीं द्रव्य कधींही निरर्थक होत नाहीं आणि सत्पुरुषांचा संमान कधीही फुकट जात नाहीं. सारांश, ज्याअर्थीं सज्जनांचे ठिकाणीं हे कायमच असतें त्याअर्थीं संतच नेहमी रक्षक होत असतात ५०. यमधर्म ह्मणतात:—धर्माला अनुसरून, माझ्या मनालाही अनुकूल आणि उत्कृष्ट पदें व गंभीर अर्थ ह्यांनीं युक्त असलेलें भाषण तूं जसें जसें करीत आहेस तसा तसा तुझ्याविषयीं माझ्या मनाचा कल उत्तम उत्तम होत आहे. तस्मात्, हे पतिव्रते, (ज्याला कोठेंही तोड नाहीं असा) अप्रतिम वर तूं आतां मागून घे ५१. सावित्री ह्मणते:—हे मान्य, हा जो आपण अप्रतिम वर मला देऊं केला आहे तो कांहीं पक्का निश्चय केल्यावांचून आपण देऊं केला नाहीं. ज्याप्रमाणें इतर वर आपण देतांना विचार केला होता त्याप्रमाणें पुरता विचार करूनच आपण हा अप्रतिम

एवमहं पतिं विना ५२ न कामये भर्तृविनाकृता सुखं न कामये भर्तृविनाकृता दिवम् । न कामये भर्तृविनाकृता श्रियं न भर्तृहीना व्यवसामि जीवितुम् ५३ वरातिसर्गः शतपुत्रता मम त्वयैव दत्तो ह्रियते च मे पतिः । वरं वृणे जीवतु सत्यवानयं तवैव सत्यं वचनं भविष्यति ५४ मार्कण्डेय उवाच ॥ तथेत्युक्त्वा तु तं पाशं मुक्त्वा वैवस्वतो यमः। धर्मराजः प्रहृष्टात्मा सावित्रीमिदमब्रवीत् ५५ एष भद्रे मया मुक्तो भर्ता ते कुलनन्दिनि । अरोगस्तव नेयश्च सिद्धार्थः स भविष्यति ५६ चतुर्वर्षशतायुश्च त्वया सार्धमवाप्स्यति । इष्ट्वा यज्ञैश्च धर्मेण ख्यातिं लोके गमिष्यति ५७ त्वयि पुत्रशतं चैव सत्यवाञ्जनयिष्यति । ते चापि सर्वे राजानः क्षत्रियाः पुत्रपौत्रिणः ५८ ख्यातास्त्वन्नामधेयाश्च भविष्यन्तीह शाश्वताः । पितुश्च ते पुत्रशतं भविता तव मातरि ५९ मालव्यां मालवा नाम शाश्वताः पुत्रपौत्रिणः । भ्रातरस्ते भविष्यन्ति क्षत्रियास्त्रिदशोपमाः ६० एवं तस्यै वरं दत्त्वा धर्मराजः प्रतापवान् । निवर्तयित्वा

वर मला देण्यास उद्युक्त झाला आहां. तस्मात्, हा सत्यवान् जिवंत होवो एवढाच मी आतां आपणांपाशीं वर मागत आहें. कारण, पतीवाचून मी मेल्यासारिखीच आहें ५२. भर्त्याचा वियोग होऊन सुखाची इच्छा मला नाहीं. पतीची ताडातोड व्हावयाची असेल तर मला स्वर्गाचीही वाछा नाहीं. पतिविरहित रहावयाचें असेल तर ऐश्वर्यही मला नको आणि पतीशिवाय जिवंत राहण्याचाही माझा मनोदय नाहीं ५३. शंभर पुत्र होतील ह्मणून आपणच मला वर दिला आहे आणि माझा पतिही आपणच हरण करून नेतां. ह्मास्तव, हा सत्यवान् जिवत होवो ह्मणून मी वर मागत आहें. कारण, असें झालें असता आपलेंच वचन सत्य होईल ५४. मार्कंडेय सांगतातः—ह्मावर 'ठीक आहे' असें ह्मणून वैवस्वत यमानें तो पाश सोडून दिला आणि मनामध्यें प्रसन्न होऊन तो धर्मराज यम सावित्रीला ह्मणाला ५५ 'हे कल्याणि, हा तुझा भर्ता मी सोडून दिला आहे. हे कुलनन्दिनि, रोगरहित असा हा आपला भर्ता घेऊन जा; ह्मणजे मी तुला दिलेला तो वर सिद्धीस जाईल ५६. तुझ्यासहवर्तमान ह्याला चारशें वर्षे आयुष्य प्राप्त होईल; आणि यज्ञयाग करून तो जगतामध्यें धर्मानें प्रसिद्धीला येईल ५७. सत्यवान् तुझे ठिकाणीं शंभर पुत्र उत्पन्न करील; आणि ते सर्वही क्षत्रिय पुत्रपौत्रवान् व राजे होऊन ५८ तुझ्याच नांवानें प्रसिद्धीला येतील; व इहलोकीं संतानरूपानें ते अक्षय्य राहतील. तुझी माता जी मालवी तिचे ठिकाणीं तुझ्या पित्यापासून मालव ह्मणून शंभर पुत्र होतील; आणि तेही तुझे देवतुल्य

सावित्रीं स्वमेव भवनं ययौ ६१ सावित्र्यपि यमे याते भर्तारं प्रतिलभ्य च । जगाम तत्र यत्रास्या भर्तुः शावं कलेवरम् ६२ सा भूमौ प्रेक्ष्य भर्तारमुपसृत्योपगृह्य च । उत्सङ्गे शिर आरोप्य भूमावुपविवेश ह ६३ संज्ञां च स पुनर्लब्ध्वा सावित्रीमभ्यभाषत । प्रोष्यागत इव प्रेम्णा पुनः पुनरुदीक्ष्य वै ६४ सत्यवानुवाच ॥ सुचिरं बत सुप्तोस्मि किमर्थं नावबोधितः । क्व चासौ पुरुषः श्यामो योसौ मां मंचकर्ष ह ६५ सावित्र्युवाच ॥ सुचिरं त्वं प्रसुप्तोसि ममाङ्के पुरुषर्षभ । गतः स भगवान्देवः प्रजासंयमनो यमः ६६ विश्रान्तोसि महाभाग विनिद्रश्च नृपात्मज । यदि शक्यं समुत्तिष्ठ विगाढां पश्य शर्वरीम् ६७ मार्कण्डेय उवाच ॥ उपलभ्य ततः संज्ञां सुखसुप्त इवोत्थितः । दिशः सर्वा वनान्तांश्च निरीक्ष्योवाच सत्यवान् ६८ फलाहारोस्मि निष्क्रान्तस्त्वया सह सुमध्यमे । ततः पाटयतः काष्ठं शिरसो मे रुजाभवत् ६९ शिरोभितापसंतप्तः स्थातुं चिरम-

---

क्षत्रिय भ्राते पुत्रपौत्रवान् होऊन (संतानरूपानें) अक्षय्य कायम राहतील' ५९, ६०. ह्याप्रमाणें त्या सावित्रीला वर दिल्यानंतर प्रतापी धर्मराज यम तिला परत पाठवून स्वस्थानींच निघून गेले ६१. ह्याप्रमाणें यमधर्म निघून गेल्यानंतर सावित्रीही ज्या ठिकाणीं भर्त्याचा तो मृत देह पडला होता त्या ठिकाणीं भर्त्याला घेऊन आली ६२. तेथें आल्यावर भर्त्याचें शरीर तिनें भूमीवर अवलोकन केलें; आणि लिंगदेहासह असलेल्या त्या जीवाला घेऊन ती त्याच्याजवळ गेली; व नंतर पूर्वीप्रमाणें भर्त्याचें मस्तक आपल्या मांडीवर उचलून घेऊन ती भूमीवर बसली ६३. तों इतक्यांत पुनरपि तो भर्ता जिवंत होऊन प्रवासांतून आल्याप्रमाणें वारंवार प्रेमानें सावित्रीकडे पाहूं लागला आणि तिच्याशीं भाषण करूं लागला ६४. सत्यवान् ह्मणतो:— अरे, मला फार वेळ झोंप लागली. तूं मला जागें कां केलें नाहींस? ज्यानें मला ओढून नेलें तो श्यामवर्ण पुरुष कोठें आहे ? ६५. सावित्री ह्मणते:— हे पुरुषश्रेष्ठ, आपण फार वेळ माझ्या मांडीवर निजला आहां. प्रजेचें संयमन करणारा तो भगवान् देव यमधर्म गेला ६६. हे महाभाग्यवान् राजपुत्र, आपणांला जरा विश्रांति मिळाली आहे; आणि आपण झोंपेंतून सावध झाला आहां. आतां ही रात्र पडलेली पहा; आणि शक्य असेल तर उठा ६७. मार्कंडेय सांगतात:— जिवंत झाल्यानंतर तो सत्यवान् गाढ झोंप लागलेल्या मनुष्याप्रमाणें उठला आणि सर्व दिशांकडे व वनप्रदेशांकडे दृष्टि फेंकून ह्मणाला ६८ ' हे सुंदरि, फळें आणण्याकरितां मी तुझ्यासहवर्तमान आश्रमांतून बाहेर निघालों; आणि नंतर लांकूड तोडता तोडतां

शक्नुवन् । तवोत्सङ्गे प्रसुप्तोस्मि इति सर्वं स्मरे शुभे ७० त्वयोपगूढस्य च मे निद्रयापहृतं मनः । ततोपश्यं तमो घोरं पुरुषं च महौजसम् ७१ तद्यदि त्वं विजानासि किं तद्ब्रूहि सुमध्यमे । स्वप्नो मे यदि वा दृष्टो यदि वा सत्यमेव तत् ७२ तमुवाचाथ सावित्री रजनी व्यवगाहते । श्वस्ते सर्वं यथावृत्तमाख्यास्यामि नृपात्मज ७३ उत्तिष्ठोत्तिष्ठ भद्रं ते पितरौ पश्य सुव्रत । विगाढा रजनी चेयं निवृत्तश्च दिवाकरः ७४ नक्तंचराश्चरन्त्येते हृष्टाः क्रूराभिभाषिणः । श्रूयन्ते पर्णशब्दाश्च मृगाणां चरतां वने ७५ एता घोरं शिवा नादान्दिशं दक्षिणपश्चिमाम् । आस्थाय विरुवन्त्युग्राः कम्पयन्त्यो मनो मम ७६ सत्यवानुवाच॥ वनं प्रतिभयाकारं घनेन तमसा वृतम् । न विज्ञास्यसि पन्थानं गन्तुं चैव न शक्ष्यसि ७७ सावित्र्युवाच॥ अस्मिन्नद्य वने दग्धे शुष्कवृक्षस्थितो ज्वलन् । वायुना धम्यमानोत्र दृश्यतेग्निः क्वचित्क्वचित् ७८ ततोग्निमानयित्वेह ज्वालयिष्यामि सर्वतः । काष्ठानीमानि सन्तीह जहि

माझें मस्तक दुखूं लागलें ६९. मस्तकांतील वेदनेनें व्याकुल झाल्यामुळें जेव्हां मला फार वेळ बसवना तव्हां मी तुझ्या अंकावर निद्रिस्त झालों; हें सर्व, हे कल्याणि, मला स्मरत आहे ७०. तूं माझें मस्तक मांडीवर घेतल्यानंतर माझें अंतःकरण निद्रेनें अगदीं घेरून गेलें; आणि लगेंच घोर अंधकार व एक महाबलाढ्य पुरुष हे मीं अवलोकन केले ७१. तस्मात्, हे सुंदरि, तुला जर विदित असेल तर तें काय हें मला सांग; ह्मणजे मला तें स्वप्न पडलें किंवा तें खरेंच होतें (हें कळून येईल)' ७२. ह्यानंतर सावित्री त्याला ह्मणाली ' राजपुत्र, आतां रात्र पडत चालली; उद्यीक मी आपणांला सर्व इत्थंभूत वर्तमान कथन करीन ७३. आपलें देव बरें करो. उठा उठा आणि आपल्या मातापितरांना भेटा. सूर्य अस्ताचलाला जाऊन ही आतां रात्र पडली आहे ७४; क्रूर भाषण करणारे हे निशाचर आनंदित होऊन संचार करूं लागले आहेत; आणि वनामध्यें श्वापदें हिंडूं लागल्यामुळें पानांचे आवाज ऐकूं येऊं लागले आहेत ७५. ह्या उग्र कोल्ह्या नैर्ऋति दिशेला उभ्या राहून घोर नाद करीत आहेत; आणि ह्यामुळें माझ्या मनाला कंप उत्पन्न करीत आहेत ' ७६. सत्यवान् ह्मणालाः— गाढ अंधकारानें व्याप्त झालेलें हें वन मूर्तिमंत भयच बनलें आहे. ह्यामुळें आतां तुला मार्गाची ओळख राहणार नाहीं व जातांही येणार नाहीं ७७. सावित्री ह्मणतेः— ह्या दग्ध झालेल्या वनामध्यें एका शुष्क वृक्षावर अग्नि आज जळत आहे; आणि वायूनें कोठें कोठें ठिणग्या उडत असलेल्या दृष्टीं पडत आहेत ७८. तेव्हां तेथून येथें अग्नि आणून मी सर्व वाटभर तो प्रज्वलित ठेवीन. हीं काष्ठें येथेंच आहेत. आपण काळजी करूं

संतापमात्मनः ७९ यदि नोत्सहमे गन्तुं सरुजं त्वां हि लक्षये । न च ज्ञास्यसि पन्थानं तमसा संवृते वने ८० श्वःप्रभाते वने दृश्ये यास्यावो-नुमते तव । वसावेह क्षपामेकां रुचितं यदि तेनघ ८१ सत्यवानुवाच ॥ शिरोरुजा निवृत्ता मे स्वस्थान्यङ्गानि लक्षये । मातापितृभ्यामिच्छामि सङ्गमं त्वत्प्रसादजम् ८२ न कदाचिद्विकाले हि गतपूर्वो मयाश्रमः । अना-गतायां संध्यायां माता मे प्ररुणद्धि माम् ८३ दिवापि मयि निष्क्रान्ते संतप्येते गुरू मम । विचिनोति हि मां तातः सहैवाश्रमवासिभिः ८४ मात्रा पित्रा च सुभृशं दुःखिताभ्यामहं पुरा । उपालब्धश्च बहुशश्चिरेणा-गच्छसीति हि ८५ का त्ववस्था तयोरद्य मदर्थमिति चिन्तये । तयोरदृश्ये मयि च महद्दुःखं भविष्यति ८६ पुरा मामूचतुश्चैव रात्रावस्रायमाणकौ । भृशं सुदुःखितौ वृद्धौ बहुशः प्रीतिसंयुतौ८७ त्वया हीनौ न जीवाव मुहूर्त-मपि पुत्रक । यावद्धरिष्यसे पुत्र तावन्नौ जीवितं ध्रुवम् ८८ वृद्धयोरन्धयो-र्दृष्टिस्त्वयि वंशः प्रतिष्ठितः । त्वयि पिण्डश्च कीर्तिश्च संतानं चावयोरिति८९

नको ७९. तथापि, आपणांला बरें नाहीं असें मला दिसत आहे. तेव्हां अशा स्थितीमध्यें अंधकारानें वन व्याप्त झालें असल्यामुळें तुह्मांला वाट सांपडणार नाहीं. तस्मात्, ह्या वेळीं घरीं जाण्याचा जर आपला मानस नसेल तर ८० उद्यां सकाळीं वन दिसूं लागलें ह्मणजे तुमच्या मताप्रमाणें आपण जाऊं. हे निष्पाप, आपणांला रुचत असेल तर एक रात्र आपण येथेंच वास्तव्य करूं ८१. सत्यवान् ह्मणतोः—माझें कपाळ दुखणें राहिलें असून देहही स्वस्थ आहे. ह्यास्तव, ह्या तुझ्या कृपेनें आतां मातापितरांना भेटण्याची माझी इच्छा आहे ८२. मी वेळ टळून गेल्यानंतर पूर्वी कधींही आश्रमाला गेलों नाहीं. संध्याकाळ झाली कीं नाहीं तोंच माता मला बाहेर जाऊं देत नसे ८३. दिवसां मी बाहेर गेलों तरी माझ्या आईबापांना काळजी लागत असते; आणि आश्रमवासी लोक बरोबर घेऊन पिता मला शोधीत असतो ८४. दुःखित झालेले मातापितर ' उशीरा येतोस ' ह्मणून पूर्वी पुष्कळ वेळां मला अतिशयच रागें भरले आहेत ८५. तेव्हां माझ्याकरितां आज त्यांची काय अवस्था झाली असेल ही मला काळजी वाटत आहे. मी दृष्टीआड असल्यामुळें त्यांना मोठेंच दुःख होईल ८६. एकादे वेळेस जर मला जाण्यास रात्र झाली तर माझ्यावर अत्यंत प्रेम करणारे ते वृद्ध मातापितर अत्यंत दुःखित होऊन अश्रु ढाळीत ढाळीत मला ह्मणतात ८७ ' हे पुत्रा, तुझ्यावांचून आह्मी एक क्षणभरही जिवंत राहणार नाहीं. हे पुत्रा, जोंपर्यंत तूं खुशाल आहेस तोंपर्यंतच आमच्या जीविताची शाश्वति आहे ८८.

माता वृद्धा पिता वृद्धस्तयोर्यष्टिरहं किल । तौ रात्रौ मामपश्यन्तौ काम-
वस्थां गमिष्यतः ९० निद्रायाश्चाभ्यसूयामि यस्या हेतोः पिता मम ।
माता च संशयं प्राप्ता मत्कृतेनपकारिणी ९१ अहं च संशयं प्राप्तः
कृच्छ्रामापदमास्थितः । मातापितृभ्यां हि विना नाहं जीवितुमुत्सहे ९२
व्यक्तमाकुलया बुद्ध्या प्रज्ञाचक्षुः पिता मम । एकैकमस्यां वेलायां
पृच्छत्याश्रमवासिनम् ९३ नात्मानमनुशोचामि यथाहं पितरं शुभे । भर्तारं
चाप्यनुगतां मातरं परिदुर्बलम् ९४ मत्कृतेन हि तावद्य संतापं परमेष्यतः।
जीवन्तावनुजीवामि भर्तव्यौ तौ मयेति ह ९५ तयोः प्रियं मे कर्तव्य-
मिति जानामि चाप्यहम् । मार्कण्डेय उवाच ॥ एवमुक्त्वा स धर्मात्मा
गुरुभक्तो गुरुप्रियः९६ उच्छ्रित्य बाहू दुःखार्तः सुस्वरं प्ररुरोद ह । ततो-
ऽब्रवीत्तथा दृष्ट्वा भर्तारं शोककर्शितम् ९७ प्रमृज्याश्रूणि नेत्राभ्यां सावित्री
धर्मचारिणी । यदि मेऽस्ति तपस्तप्तं यदि दत्तं हुतं यदि ९८ श्वश्रूश्वशु-

---

आह्मां वृद्ध अंधांची दृष्टि तूच असून आमच्या वंशाचा आधार काय तो तूंच आहेस; आणि आमचा पिंड, कीर्ति व संतानपरंपरा हीं तुझ्यावरच अवलंबून आहेत ' ८९. माता व पिता हे उभयतां वृद्ध असून खरोखर मी त्यांची काठी आहें. तेव्हां अशी स्थिति असतांना रात्रीं जर मी त्यांच्या दृष्टीं पडलों नाहीं तर त्यांची काय बरें अवस्था होईल ?९०. ह्या निद्रेचा मला फारच राग आला आहे. कारण, हिच्यामुळें कधीही अपकार न करणारी माझी माता आणि पिता ह्यांना माझ्याकरितां दुःख झालें आहे ९१; आणि मीही संकटांत येऊन मोठ्या विपत्तीमध्यें सांपडलों आहें. मातापितरांवांचून प्राण धारण करण्याचीही माझी इच्छा नाहीं ९२. माझा अंध पिता ह्यावेळीं मन गोंधळून गेल्यामुळें आश्रमामध्यें वास्तव्य करणाऱ्या प्रत्येकाला निःसंशय माझ्यासंबंधानें प्रश्न करीत असेल ९३. हे कल्याणि, अतिशयच अशक्त झालेल्या भर्त्याच्या मतानें वागणाऱ्या मातेकरितां आणि पित्याकरितां जसें मला वाईट वाटत आहे तसें स्वतः-करितां वाटत नाहीं ९४. माझ्याकरितां आज त्यांना पराकाष्ठेचें दुःख होईल. त्यांच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत त्यांचें पोषण करणें आपलें कर्तव्य आहे असें समजूनच मी जिवंत राहिलों आहें ९५. त्यांच्या मनाप्रमाणें वागणें माझें कर्तव्य आहे एवढें मला समजतें. मार्कंडेय सांगतातः—ह्याप्रमाणें बोलून तो धर्मात्मा, पितृभक्त व पितृप्रिय सत्यवान् ९६ दुःखाकुल झाल्यामुळें हात वर करून मोठ्या मोठ्यानें रडूं लागला. तेव्हां शोकाकुल झालेल्या भर्त्याला अवलोकन करून व त्याच्या नेत्रांतून येऊं लागलेले अश्रु पुसून त्याची भार्या सावित्री ह्मणाली ' मीं जर तप केलें असेल, दान दिलें असेल

रभर्तॄणां मम पुण्यास्तु शर्वरी । न स्मराम्युक्तपूर्वं वै स्वैरेष्वप्यनृतां
गिरम् ९९ तेन सत्येन तावद्य ध्रियेतां श्वशुरौ मम । सत्यवानुवाच ॥
कामये दर्शनं पित्रोर्याहि सावित्रि मा चिरम् १०० पुरा मातुः पितुर्वापि
यदि पश्यामि विप्रियम् । न जीविष्ये वरारोहे सत्येनात्मानमालभे १
यदि धर्मे च ते बुद्धिर्मां चेज्जीवन्तमिच्छसि । मम प्रियं वा कर्तव्यं गच्छा-
वाश्रममन्तिकात् २ मार्कण्डेय उवाच ॥ सावित्री तत उत्थाय
केशान्संयम्य भामिनी । पतिमुत्थापयामास बाहुभ्यां परिगृह्य वै ३
उत्थाय सत्यवांश्चापि प्रमृज्याङ्गानि पाणिना । सर्वा दिशः समालोक्य
कठिने दृष्टिमादधे ४ तमुवाचाथ सावित्री श्वः फलानि हरिष्यसि ।
योगक्षेमार्थमेतं ते नेष्यामि परशुं त्वहम् ५ कृत्वा कठिनभारं सा वृक्ष-
शाखावलम्बिनम् । गृहीत्वा परशुं भर्तुः सकाशे पुनरागमत् ६ वामे
स्कन्धे तु वामोरूर्भर्तुर्बाहुं निवेश्य च । दक्षिणेन परिष्वज्य जगाम गज-
गामिनी ७ सत्यवानुवाच ॥ अभ्यासगमनाद्भीरु पन्थानो विदिता मम ।

आणि हवन केलें असेल तर ९७,९८ माझी सासू, सासरा आणि भर्ता ह्यांना ही रात्र सुखावह होवो. विनोदांमध्येंही आजपर्यंत कधीं अनृत भाषण केल्याचें मला स्मरत नाहीं ९९. ह्यास्तव, त्या माझ्या सत्यानें ते उभयतां सासू व सासरा आज जिवंत राहोत. सत्यवान् ह्मणतोः—हे सावित्रि, मातापितरांच्या भेटीची मला उत्कंठा लागली आहे. आतां विलंब लावितां उपयोगीं नाहीं १००. हे सुंदरि, मातेवर अथवा पित्यावर कधीं अनर्थ होण्याचें जर माझ्या आढळण्यांत आलें तर मी जिवंत रहाणार नाहीं हें मी तुला छातीला हात लावून सत्य सांगत आहें १. धर्माकडे जर तुझें मन असेल, मी जिवंत राहण्याची जर तुला इच्छा असेल आणि माझ्या सांगण्याप्रमाणें जर तुला वागावयाचें असेल तर आपण आश्रमाकडेच जाऊं २. मार्कंडेय सांगतातः—तदनंतर साध्वी सावित्रीनें उठून आपले केंस बांधिले आणि हात धरून तिनें पतीला उठविलें ३. नंतर सत्यवानानेंही उठून हातानें आपलें अंग झाडून काढिलें; आणि चोहोंकडे दृष्टि फेंकिल्यावर फळांच्या टोपलीकडे तो पाहूं लागला ४. तेव्हां सावित्री त्याला ह्मणाली ‘ आपण हीं फळें उद्यां घेऊन यावींत. योगक्षेम चालण्याकरितां मी ही आपली कुऱ्हाड मात्र बरोबर घेऊन जाईन ’ ५. असें त्याला सांगितल्यानंतर त्या सावित्रीनें ती फळाची टोपली एका झाडाच्या फांदीला अडकवून ठेविली; आणि कुऱ्हाड घेऊन ती पुनरपि पतीजवळ आली ६. आपल्या डाव्या खांद्यावर भर्त्याचा हात ठेवून आणि आपल्या उजव्या हातानें त्याला कवटाळून धरून ती गजगामिनी सुंदरी चालली ७.

वृक्षान्तरालोकितया ज्योत्स्नया चापि लक्षये ८ आगतौ स्वः पथा येन फलान्यवचितानि च । यथागतं शुभे गच्छ पन्थानं मा विचारय ९ पलाशखण्डे चैतस्मिन्पन्था व्यावर्तते द्विधा । तस्योत्तरेण यः पन्थास्तेन गच्छ त्वरस्व च ११० स्वस्थोस्मि बलवानस्मि दिदृक्षुः पितरावुभौ । ब्रुवन्नेव त्वरायुक्तः संप्रायादाश्रमं प्रति १११ [११३८७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि पतिव्रतामाहात्म्यपर्वणि सावित्र्युपाख्याने सप्तनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९७ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ एतस्मिन्नेव काले तु द्युमत्सेनो महाबलः । लब्धचक्षुः प्रसन्नायां दृष्ट्यां सर्वं ददर्श ह १ स सर्वानाश्रमान्गत्वा शैब्यया सह भार्यया । पुत्रहेतोः परामार्ति जगाम भरतर्षभ २ तावाश्रमान्नदीश्चैव वनानि च सरांसि च । तस्यां निशि विचिन्वन्तौ दम्पती परिजग्मतुः ३ श्रुत्वा शब्दं तु यं कंचिदुन्मुखौ सुतशङ्कया । सावित्रीसहितोऽभ्येति सत्यवानित्यभाषताम् ४ भिन्नैश्च परुषैः पादैः सव्रणैः शोणितोक्षितैः । कुश-

---

सत्यवान् ह्मणतो:—हे विनयशील सावित्रि, जाण्यायेण्याचा रापता असल्यामुळे मार्ग माझ्या ओळखीचे झाले आहेत; आणि वृक्षांमधून पडलेल्या चादण्यामुळें मला ते दिसतही आहेत ८. ज्या मार्गानें येऊन आपण फळें गोळा केलीं त्याच मार्गाला आपण आलों आहोंत. आतां, हे कल्याणि, विचार करीत न बसतां आल्या मार्गानें चल ९. पलाशवृक्षाच्या ह्या पाळकापाशी दोन रस्ते फुटतात; ह्यास्तव, वृक्षसमुदायाच्या उत्तरेकडून जो मार्ग आहे त्या मार्गानें सत्वर चल ११०. मी स्वस्थ आहें; लवकर चालण्याचें मला सामर्थ्य आहे आणि उभयता मातापितराच्या दर्शनाची मला उत्कंठा लागून राहिली आहे. असें ह्मणत ह्मणतच तो सत्यवान् सत्वर आश्रमाला गेला १११. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वांपैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें सत्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥२९७॥

मार्कंडेय सांगतात:—सत्यवान् ज्यावेळीं तिकडे जिवंत झाला त्याचवेळीं महाबलाढ्य द्युमत्सेनाला नेत्र आले आणि दृष्टि निर्मल झाली असतां तो सर्व कांहीं अवलोकन करूं लागला १. आपल्या शिबिकुलोत्पन्न भार्येसहवर्तमान, हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, पुत्राकरितां तो सर्व आश्रम हिंडून फारच दुःखित झाला २. सारांश, आश्रम, नद्या, वनें व सरोवरें धुंडाळीत धुंडाळीत त्या रात्रीं ते स्त्रीपुरुष हिंडूं लागले ३. कसलाही नरी शब्द त्यांच्या कानीं पडला तरी आपला पुत्र आला असेल असें वाटून ते उभयतां मुखें वर करून पाहूं लागले आणि " सावित्रीसहवर्तमान

कण्टकविद्धाङ्गावुन्मत्ताविव धावतः ५ ततोभिसृत्य तैर्विप्रैः सर्वैराश्रमवासिभिः । परिवार्यसमाश्वास्य तावानीतौ स्वमाश्रमम् ६ तत्र भार्यासहायः स वृतो वृद्धैस्तपोधनैः । आश्वासितोपि चित्रार्थैः पूर्वराज्ञां कथाश्रयैः ७ ततस्तौ पुनराश्वस्तौ वृद्धौ पुत्रदिदृक्षया । बाल्यवृत्तानि पुत्रस्य स्मरन्तौ भृशदुःखितौ ८ पुनरुक्त्वा च करुणां वाचं तौ शोककर्षितौ । हा पुत्र हा साध्वि वधूः क्वासि क्वासीत्यरोदताम् ९ ब्राह्मणः सत्यवाक्तेषामुवाचेदं तयोर्वचः १० सुवर्चा उवाच ॥ यथास्य भार्या सावित्री तपसा च दमेन च । आचारेण च संयुक्ता तथा जीवति सत्यवान् ११ गौतम उवाच ॥ वेदाः साङ्गा मयाधीतास्तपो मे संचितं महत् । कौमारब्रह्मचर्यं च गुरवोग्निश्च तोषिताः १२ समाहितेन चीर्णानि सर्वाण्येव व्रतानि मे । वायुभक्षोपवासश्च कृतो मे विधिवत्सदा १३ अनेन तपसा वेद्मि सर्वं परचिकीर्षितम् । सत्यमेतन्निबोधध्वं ध्रियते

सत्यवान् येत आहे " असें बोलूं लागले ४. उन्मत्त पुरुषाप्रमाणें ते धांवूं लागले असतां दर्भांनीं व कांट्यांनीं त्यांचीं शरीरें विद्ध झालीं आणि वृद्धपणामुळें खरखरीत व भेगा पडलेल्या त्यांच्या पायांनाही ठेंचा लागून ते रक्तबंबाळ झाले ५. तदनंतर सर्व आश्रमवासी विप्र त्यांच्याजवळ गेले आणि त्यांच्या भोंवतालीं उभे राहून व त्यांना आश्वासन देऊन ते त्यांना आश्रमामध्यें घेऊन आले ६. भार्येसहवर्तमान आश्रमामध्यें आलेल्या त्या द्युमत्सेनासभोंवतीं वृद्ध तपस्वी बसले आणि अद्भुत अर्थ ज्यांमध्यें आहे अशा पुरातन राजांच्या कथा सांगून त्याला त्यांनीं धैर्य दिलें ७. परंतु, ह्याप्रमाणें त्या वृद्ध मातापितरांना जरी त्यांनीं धीर दिला तरी पुत्राला पाहण्याची उत्कंठा लागल्यामुळें त्यांना अतिशय दुःख झालें व पुत्राच्या बालपणाच्या गोष्टींचें त्यांना स्मरण होऊं लागलें ८. नंतर पुनरपि दीन भाषण करून ते शोकाकुल झालेले मातापितर " हे पुत्रा, हे साध्वि स्नुषे, कोठें आहेस, कोठें आहेस " ह्मणून रडूं लागले ९. तेव्हां त्या जुळलेल्या ब्राह्मणांमध्यें असलेला सत्यवचनी ब्राह्मण त्यांच्याशीं बोलूं लागला १०. सुवर्चा ह्मणाला:— ज्याअर्थी त्याची भार्या सावित्री तपस्विनी, जितेंद्रिय आणि आचारसंपन्न आहे त्याअर्थी सत्यवान् जिवत आहे ११. गौतम ह्मणतात:— मीं सांग वेदाध्ययन केलें आहे; मोठ्या तपाचा संचय केला आहे; कौमारब्रह्मचर्य स्वीकारून गुरु व अग्नि ह्यांना तुष्ट केलें आहे १२; लक्ष्यपूर्वक सर्वही व्रतें मीं आचारिलीं आहेत आणि वायुभक्षण करून मीं यथाविधि उपवास केला आहे १३. ह्या तपामुळें मला दुसऱ्याचा सर्व अभिप्राय समजत असतो आणि ह्मणूनच सत्यवान् खुशाल

सत्यवानिति १४ शिष्य उवाच ॥ उपाध्यायस्य मे वक्त्राद्यथा वाक्यं विनिःसृतम् । नैव जातु भवेन्मिथ्या तथा जीवति सत्यवान् १५ ऋषय ऊचुः ॥ यथास्य भार्या सावित्री सर्वैरेव सुलक्षणैः । अवैधव्यकरैर्युक्ता तथा जीवति सत्यवान् १६ भारद्वाज उवाच ॥ यथास्य भार्या सावित्री तपसा च दमेन च । आचारेण च संयुक्ता तथा जीवति सत्यवान् १७ दाल्भ्य उवाच ॥ यथा दृष्टिः प्रवृत्ता ते सावित्र्याश्च यथा व्रतम् । गताहारम-कृत्वा च तथा जीवति सत्यवान् १८ आपस्तम्ब उवाच ॥ यथा वदन्ति शान्तायां दिशि वै मृगपक्षिणः । पार्थिवी च प्रवृत्तिस्ते तथा जीवति सत्यवान् १९ धौम्य उवाच ॥ सर्वैर्गुणैरुपेतस्ते यथा पुत्रो जनप्रियः । दीर्घायुर्लक्षणोपेतस्तथा जीवति सत्यवान् २० मार्कण्डेय उवाच ॥ एवमा-श्वासितस्तैस्तु सत्यवाग्भिस्तपस्विभिः । तांस्तान्विगणयन्सर्वांस्ततः स्थिर इवाभवत् २० ततो मुहूर्तात्सावित्री भर्त्रा सत्यवता सह । आजगामाश्रमं रात्रौ प्रहृष्टा प्रविवेश ह २२ ब्राह्मणा ऊचुः ॥ पुत्रेण संगतं त्वां तु चक्षुष्मन्तं निरीक्ष्य च । सर्वे वयं वै पृच्छामो वृद्धिं वै पृथिवीपते २३ समागमेन पुत्रस्य

आहे हें तुह्मी सत्य समजा १४. शिष्य ह्मणतोः—गुरुजींच्या मुखांतून निघालेलें वाक्य कधींही असत्य होणार नाहीं. तस्मात्, सत्यवान् जिवंत आहे १५. ऋषि ह्मणतातः—ज्याअर्थी वैधव्यनाशक अशा सर्व सुलक्षणांनीं सावित्री युक्त आहे त्याअर्थी सत्यवान् जिवंत आहे १६. भारद्वाजमुनि ह्मणालेः—ज्याअर्थी त्याची भार्या सावित्री तप, इंद्रियदमन आणि सदा-चार यांनीं युक्त आहे त्याअर्थी सत्यवान् जिवन आहे १७. दाल्भ्यमुनि ह्मणालेः— सावित्रीनें आचरिलेलें व्रत, भोजन केल्यावांचून तिचें जाणें आणि आपणांला आलेली दृष्टि ह्यांचा विचार केला असतां सत्यवान् जिवत असलाच पाहिजे १८. आपस्तंबमुनि ह्मणालेः—प्रसन्न दिशांचे ठिकाणीं हे पशुपक्षी शब्द करीत आहेत; आणि ज्याअर्थी राजाला योग्य अशी तुझ्या मनाची प्रवृत्ति आहे त्याअर्थी सत्यवान् जिवंत आहे १९. धौम्य ह्मणालेः—सर्वगुणसंपन्न, जनप्रिय व दीर्घायुःसूचक लक्षणांनीं युक्त असा ज्याअर्थी तुझा पुत्र सत्यवान् आहे त्याअर्थी तो जिवंत आहे २०. मार्कंडेय सांगतातः—याप्र-माणें त्या सत्यवचनी तपस्व्यानीं त्याला धीर दिला असतां तो द्युमत्सेन त्या सर्वांना मान देऊन स्वस्थ बसल्यासारखा झाला २१. तदनंतर एका मुहूर्तानें भर्त्या सत्यवानासह सावित्री आनंदानें रात्रीं आश्रमामध्यें प्रविष्ट झाली २२. ब्राह्मण ह्मणालेः—हे भूपते, तुला नेत्रयुक्त आणि पुत्रयुक्त अवलोकन करून आह्मी सर्व तुला अभ्युदयविषयक प्रश्न करीत आहों २३. पुत्राचा समागम, सावित्रीचें

सावित्र्या दर्शनेन च । चक्षुषश्चात्मनो लाभात्त्रिभिर्दिष्ट्या विवर्धसे २४ सर्वैरस्माभिरुक्तं यत्तथा तन्नात्र संशयः । भूयो भूयः समृद्धिस्ते क्षिप्रमेव भविष्यति २५ ततोऽग्निं तत्र संज्वाल्य द्विजास्ते सर्व एव हि । उपास्थाञ्चक्रिरे पार्थ द्युमत्सेनं महीपतिम् २६ शैब्या च सत्यवांश्चैव सावित्री चैकतः स्थिता । सर्वैस्तैरभ्यनुज्ञाता विशोका समुपाविशत् २७ ततो राज्ञा सहासीनाः सर्वे ते वनवासिनः । जातकौतूहलाः पार्थ पप्रच्छुर्नृपतेः सुतम् २८ ऋषय ऊचुः ॥ प्रागेव नागतं कस्मात्सभार्येण त्वया विभो । विरात्रे चागतं कस्मात्कोऽनुबन्धस्तवाभवत् २९ संतापितः पिता माता वयं चैव नृपात्मज । कस्मादिति न जानीमस्तत्सर्वं वक्तुमर्हसि ३० सत्यवानुवाच ॥ पित्राहमभ्यनुज्ञातः सावित्रीसहितो गतः । अथ मेऽभूच्छिरोदुःखं वने काष्ठानि भिन्दतः ३१ सुप्तश्चाहं वेदनया चिरमित्युपलक्षये । तावत्कालं न च मया सुप्तपूर्वं कदाचन ३२ सर्वेषामेव भवतां संतापो

दर्शन आणि तुला स्वतःला झालेला दृष्टीचा लाभ ह्या तिन्ही गोष्टी सुदैवानें आज घडून आल्या असल्यामुळें तुझें भाग्यच उदयाला आलेलें आहे २४. आम्हीं सर्वांनीं जें सांगितलें तें तसें होणारच; ह्याविषयीं संशय नाहीं. सारांश, सत्वरच तुझा अधिक अधिक भाग्योदय होत जाईल २५. तदनंतर, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, ते सर्वही द्विज अग्नि प्रज्वलित करून भूपति द्युमत्सेनासमीप बसले २६. मातेसन्निध जाऊन सत्यवान् बसला आणि सावित्री एका बाजूला उभी राहिली व त्या सर्वांनीं अनुज्ञा दिल्यावर ती दुःखनिर्मुक्त झालेली सावित्री खालीं बसली २७. तदनंतर, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, ते सर्व वनवासी तपस्वी द्युमत्सेन राजासहवर्तमान बसले असतां वनामध्यें झालेला वृत्तांत ऐकण्याविषयीं ते उत्सुक झाले आणि राजपुत्र सत्यवानाला विचारूं लागले २८. ऋषि ह्मणाले:—हे प्रभो सत्यवाना, भार्येसहवर्तमान तूं ह्याच्या आधींच कां आला नाहींस? तुला येण्याला अपरात्र कां झाली ? लवकर येण्याला तुला कसला प्रतिबंध झाला होता ? २९. हे राजपुत्रा, पित्याला, मातेला आणि आह्मांला तूं कशाकरितां काळजींत घातलें होतेंस ? हें आह्मांला समजत नाहीं. ह्यास्तव, तें सर्व तूं कथन कर ३०. सत्यवान् ह्मणतो:— पित्याची अनुज्ञा घेऊन सावित्रीसहवर्तमान मी वनामध्यें गेलों आणि काष्ठें तोडूं लागलों तों माझ्या मस्तकामध्यें वेदना उत्पन्न झाली ३१ आणि त्या वेदनेमुळेंच फार वेळ झोंप लागली असें मला वाटतें. इतका वेळपर्यंत पूर्वी मला कधींही झोंप लागली नव्हती ३२. असो. तुह्मां सर्वांना काळजी लागूं नये असें मी मनामध्यें आणिलें आणि अपरात्रीं निघून आलों. ह्याशिवाय

मा भवेदिति । अतो विरात्रागमनं नान्यदस्तीह कारणम् ३३ गौतम उवाच ॥ अकस्माच्चक्षुषः प्राप्तिर्द्युमत्सेनस्य ते पितुः । नास्य त्वं कारणं वेत्सि सावित्री वक्तुमर्हति ३४ श्रोतुमिच्छामि सावित्रि त्वं हि वेत्थ परावरम् । त्वां हि जानामि सावित्रि सावित्रीमिव तेजसा ३५ त्वमत्र हेतुं जानीषे तस्मात्सत्यं निरुच्यताम् । रहस्यं यदि ते नास्ति किंचिदत्र वदस्व नः ३६ सावित्र्युवाच ॥ एवमेतद्यथा वेत्थ संकल्पो नान्यथा हि वः । न हि किंचिद्रहस्यं मे श्रूयतां तथ्यमेव यत् ३७ मृत्युर्मे पत्युराख्यातो नारदेन महात्मना । स चाद्य दिवसः प्राप्तस्ततो नैनं जहाम्यहम् ३८ सुप्तं चैनं यमः साक्षादुपागच्छत्सकिंकरः । स एनमनयद्बद्ध्वा दिशं पितृनिषेविताम् ३९ अस्तौषं तमहं देवं सत्येन वचसा विभुम् । पञ्च वै तेन मे दत्ता वराः शृणुत तान्मम ४० चक्षुषी च स्वराज्यं च द्वौ वरौ श्वशुरस्य मे । लब्धं पितुः पुत्रशतं पुत्राणां चात्मनः शतम् ४१ चतुर्वर्षशतायुर्मे

अपरात्रीं येण्याचें दुसरें कांहीं कारण नाहीं ३३. गौतम म्हणतातः—तुझ्या पित्या द्युमत्सेनाला एकाएकीं दृष्टि प्राप्त झाली आहे ह्याचें कारण तुला विदित नाहीं. परंतु, सावित्री सांगेल ३४. हे सावित्रि, सूक्ष्म आणि स्थूल असें सर्व कांहीं तुला माहीत आहे आणि म्हणूनच (द्युमत्सेनाला एकाएकीं दृष्टि प्राप्त झाल्याचें कारण तुझ्या मुखांतून) श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. हे सावित्रि, तेजानें तूं सावित्रीप्रमाणें असल्याचें मी समजत आहें ३५ ह्या अद्भुत प्रकाराचें कारण तुला विदित आहे. तस्मात्, तूं काय तें सत्य सांग. सारांश, तुला जर कांहीं गोप्य नसेल तर ह्यासंबंधानें तूं कांहीं-तरी आम्हांला सांग ३६. सावित्री म्हणतेः—आपण ज्याप्रमाणें समजत आहां त्याप्र-माणें हें असेंच आहे. आपली कल्पना अन्यथा नाहीं. मला कांहींएक गोप्य ठेवाव-याचें नाहीं. ह्यास्तव, सत्य तेंच आपण श्रवण करा. ३७. महात्म्या नारदमुनींनीं माझ्या पतीचा मृत्यु सांगितला होता आणि आज तो दिवस प्राप्त झाला होता. ह्यामुळें मी ह्या पतीला सोडून राहिलें नाहीं ३८. हे निद्रिस्त झाल्यावर साक्षात् यमधर्म दूतांसहवर्तमान तेथें आले; आणि ह्यांना बांधून ते दक्षिण दिशेस घेऊन गेले ३९. तेव्हां मी त्या प्रभु देवाला सत्यवचनानें संतुष्ट केलें असतां त्यानें मला पांच वर दिले ते आपण माझ्यापासून श्रवण करा ४०. स्वराज्यप्राप्ति आणि नेत्रलाभ. हे दोन वर श्वशुरासंबंधाचे होते. पित्याला शंभर पुत्र प्राप्त होणें आणि स्वतःला शंभर पुत्र प्राप्त होणें ह्यासंबंधानें दोन वर मिळाले ४१; आणि चारशें वर्षें आयुर्दायासहवर्तमान भर्ता सत्यवान् पांचव्या

भर्ता लब्धश्च सत्यवान् । भर्तुर्हि जीवितार्थं तु मया चीर्णं त्विदं व्रतम् ४२
एतत्सर्वं मयाख्यातं कारणं विस्तरेण वः । यथावृत्तं सुखोदर्कमिदं दुःखं
महन्मम ४३ ऋषय ऊचुः ॥ निमज्जमानं व्यसनैरभिद्रुतं कुलं नरेन्द्रस्य
तमोमये ह्रदे । त्वया सुशीलव्रतपुण्यया कुलं समुद्धृतं साध्वि पुनः कुली-
नया ४४ मार्कण्डेय उवाच ॥ तथा प्रशस्य ह्यभिपूज्य चैव वरस्त्रियं
तामृषयः समागताः । नरेन्द्रमामन्त्र्य सपुत्रमञ्जसा शिवेन जग्मुर्मुदिताः
स्वमालयम् ४५ [११४३२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां
वैयासिक्यामारण्यके पर्वणि पतिव्रतामाहात्म्यपर्वणि सावित्र्युपाख्याने-
ऽष्टनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९८ ॥

मार्कण्डेय उवाच ॥ तस्यां रात्र्यां व्यतीतायामुदिते सूर्यमण्डले ।
कृतपौर्वाह्णिकाः सर्वे समेयुस्ते तपोधनाः १ तदेव सर्वं सावित्र्या महा-
भाग्यं महर्षयः । द्युमत्सेनाय नातृप्यन्कथयन्तः पुनःपुनः २ ततः प्रकृतयः
सर्वाः शाल्वेभ्योऽभ्यागता नृप । आचख्युर्निहतं चैव स्वेनामात्येन तं
द्विषम् ३ तं मन्त्रिणा हतं श्रुत्वा ससहायं सबान्धवम् । न्यवेदयन्यथावृत्तं

वरानें मला प्राप्त झाला. भर्त्याच्या जीविताकरितां मीं हें त्रिरात्रीचें व्रत केलें ४२. हें सर्व कारण मीं आपणांला सविस्तर सांगितलें आणि हें माझें मोठें दुःख परिणामीं सुखावह कसें झालें तेंही मीं आपणांला निवेदन केलें आहे ४३. ऋषि ह्मणाले:— हे साध्वि, संकटांनीं ग्रस्त झालेलें हे द्युमत्सेनराजाचें कुल तमोमय डबक्यांत बुडत असतांना तूं ह्याचा पुनरपि उद्धार केला आहेस. कारण, तूं महापातिव्रता, पुण्यशील आणि कुलीन आहेस ४४. मार्कंडेय सांगतात:— तेथें जुळलेल्या त्या ऋषींनीं ह्याप्रमाणें त्या श्रेष्ठ स्त्रीची प्रशसा करून तिचा सत्कार केला आणि पुत्रासहवर्तमान राजाचा निरोप घेऊन ते आनंदानें खुशाल आपआपल्या घरीं गेले ४५. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वांपैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें अठ्ठ्याण्णवावा अध्याय समाप्त झाला ॥ २९८ ॥

मार्कंडेय सांगतात:— ती रात्र जाऊन सूर्यमंडल उदयाचलावर आलें असतां पूर्वाण्हसंबंधीं कृत्यें आटोपून ते सर्वही तपोधन तेथें जुळले १. नंतर ते महर्षि सावित्रीचें तें माहात्म्य द्युमत्सेनाला फिरून फिरून सांगू लागले; तथापि त्यांची तृप्ति झाली नाहीं २. तदनंतर, हे धर्मराजा, शाल्वदेशाहून द्युमत्सेनाचे पूर्वींचे सर्व अमात्य त्याच्याकडे आले व एका अमात्याच्या हातून राज्यापहार केलेल्या शत्रूचा वध झाल्याचें त्यांनीं त्याला निवेदन केलें ३. मंत्र्यानें त्या शत्रूचा बांधव आणि साहाय्यकर्ते ह्यांसहवर्तमान वध केला, असें

विद्रुतं च द्विषद्बलम् ४ ऐकमत्यं च सर्वस्य जनस्याथ नृपं प्रति ।
सचक्षुर्वाप्यचक्षुर्वा स नो राजा भवत्विति ५ अनेन निश्चयेनेह
वयं प्रस्थापिता नृप । प्राप्तानीमानि यानानि चतुरङ्गं च ते बलम् ६
प्रयाहि राजन्भद्रं ते घुष्टस्ते नगरे जयः । अध्यास्व चिररात्राय
पितृपैतामहं पदम् ७ चक्षुष्मन्तं च तं दृष्ट्वा राजानं वपुषान्वितम् ।
मूर्ध्ना निपतिताः सर्वे विस्मयोत्फुल्ललोचनाः ८ ततोभिवाद्य तान्वृद्धा-
न्द्विजानाश्रमवासिनः। तैश्चाभिपूजितः सर्वैः प्रययौ नगरं प्रति ९ शैब्या
च सह सावित्र्या स्वास्तीर्णेन सुवर्चसा । नरयुक्तेन यानेन प्रययौ सेनया
वृतः १० ततोभिषिषिचुः प्रीत्या द्युमत्सेनं पुरोहिताः । पुत्रं चास्य महा-
त्मानं यौवराज्येभ्यषेचयन् ११ ततः कालेन महता सावित्र्याः कीर्ति-
वर्धनम् । तद्वै पुत्रशतं जज्ञे शूराणामनिवर्तिनाम् १२ भ्रातॄणां सोदराणां
च तथैवास्याभवच्छतम् । मद्राधिपस्याश्वपतेर्मालव्यां सुमहद्बलम् १३

द्युमत्सेनराजाच्या कानावर घातल्यानंतर युद्धामध्यें कसा काय प्रकार घडला आणि शत्रूचें सैन्य कसें पळून गेलें हेंही त्यांनीं त्याला निवेदन केलें ४. नंतर "द्युमत्सेन डोळस असो, अगर अंधळा असो; तोच आमचा राजा होईल" असा सर्व प्रजेचा एक विचार झाला असल्याचेंही निवेदन करून ते त्याला ह्मणाले ५ " हे राजा, प्रजेचा असाच निश्चय झाल्यामुळें आह्मांला आपल्याकडे पाठविलें आहे आणि चतुरंग सैन्यासहवर्तमान हीं आपलीं वाहनेंही येथें आलीं आहेत ६. तस्मात्, हे राजा, तुझें कल्याण असो. राजधानीमध्यें तुझा जय झाल्याविषयीं दवंडी पिटली आहे. ह्यास्तव, आतां वाड-वडिलांपासून चालत आलेल्या राज्यावर आपण चिरकाल आरूढ व्हा " ७. तदनंतर शरीरकांति आणि दृष्टि ह्यांनीं युक्त झालेल्या राजाला अवलोकन केल्यावर त्या सर्वही अमात्यांनीं त्याच्या पायांवर मस्तक ठेविलें आणि विस्मयानें त्यांचीं नेत्रकमलें प्रफु-ल्लित झालीं ८. तदनंतर आश्रमामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या वृद्ध द्विजांना द्युमत्सेन-राजानें अभिवंदन केलें आणि त्या सर्वांनीं सत्कार केल्यानंतर तो आपल्या राजधानीला निघाला ९; व अतिशय देदीप्यमान आणि उत्कृष्ट आस्तरण घातलेल्या पालखींत बसून सेना बरोबर असतांना भार्या आणि स्नुषा सावित्री ह्यांसहवर्तमान तो आपल्या राज-धानीला गेला १०. तदनंतर पुरोहितांनीं प्रेमपूर्वक त्याला राज्याभिषेक केला आणि त्याच्या महात्म्या पुत्राला त्यांनीं यौवराज्यावर स्थापिलें ११. पुढें बराच काल लोट-ल्यावर कीर्ति वृद्धिंगत करणारे आणि संग्रामामध्यें कधींही परावृत्त न होणारे असे ते शंभर पुत्र सावित्रीला झाले १२. त्याचप्रमाणें मद्राधिपति अश्वपति राजापासून

एवमात्मा पिता माता श्वश्रूः श्वशुर एव च। भर्तुः कुलं च साविक्र्या सर्वं कृच्छ्रात्समुद्धृतम् १४ तथैवैषा हि कल्याणी द्रौपदी शीलसंमता। तारयिष्यति वः सर्वान्सावित्रीव कुलाङ्गना १५ वैशम्पायन उवाच ॥ एवं स पाण्डवस्तेन अनुनीतो महात्मना। विशोको विज्वरो राजन्काम्यके न्यवसत्तदा १६ यश्चेदं शृणुयाद्भक्त्या सावित्र्याख्यानमुत्तमम्। स सुखी सर्वसिद्धार्थो न दुःखं प्राप्नुयान्नरः १७ [११४४९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि पतिव्रतामाहात्म्यपर्वणि सावित्र्युपाख्याने नवनवत्यधिकद्विशततमोऽध्यायः ॥ २९९ ॥

॥ समाप्तं चेदं पतिव्रतामाहात्म्यपर्व ॥

अथ कुण्डलाहरणपर्व॥ जनमेजय उवाच ॥ यत्तत्तदा महद्ब्रह्मँल्लोमशो वाक्यमब्रवीत्। इन्द्रस्य वचनादेव पाण्डुपुत्रं युधिष्ठिरम् १ यच्चापि ते भयं तीव्रं न च कीर्तयसे क्वचित्। तच्चाप्यपहरिष्यामि धनञ्जय इतो गते २ किं नु तज्जपतां श्रेष्ठ कर्णं प्रति महद्भयम्। आसीन्न च स धर्मात्मा कथयामास कस्यचित् ३ वैशम्पायन उवाच ॥ अयं ते राजशार्दूल

मालवीचे ठिकाणीं तिला अति बलाढ्य शंभर भ्राते झाले १३ असो. ह्याप्रमाणें सावित्रीनें आपला आत्मा, पिता, माता, श्वशुर, सासू व भर्त्याचें कुल ह्या सर्वांचा संकटापासून उद्धार केला १४; व सावित्रीप्रमाणेंच ही कल्याणी, सुशील व कुलस्त्री द्रौपदी तुम्हां सर्वांचा उद्धार करील १५ वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, ह्याप्रमाणें त्या महात्म्या मार्कंडेय मुनीनीं पांडुपुत्र धर्मराजाचें सांत्वन केलें असतां तो दुःखरहित व निश्चिंत होऊन काम्यकवनामध्यें वास्तव्य करूं लागला १६. असो. सावित्रीचें हें उत्कृष्ट आख्यान जो पुरुष भक्तीनें श्रवण करील तो सुखी होईल; त्याचे सर्व मनोरथ परिपूर्ण होतील; आणि त्याला दुःख प्राप्त होणार नाहीं १७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील पतिव्रतामाहात्म्यपर्वांपैकीं सावित्रीच्या उपाख्यानाविषयीं दोनशें नव्याण्णवावा अध्याय समाप्त झाला॥ २९९ ॥ ह्या ठिकाणी पतिव्रतामाहात्म्यपर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें कुंडलाहरणपर्वाला आरंभ होत आहे. जनमेजय प्रश्न करितोः— हे ब्रह्मन्. इंद्राच्या सांगण्यावरून पांडुपुत्र युधिष्ठिराकडे लोमशमहर्षि आले व "तूं जें आपलें मोठें भय कोठेंही सांगत नाहींस तेंही मी तुझें, धनंजय येथून गेल्यावर, दूर करीन" असें महत्त्वाचें भाषण त्याच्याशीं त्यांनीं केलें १, २. परंतु, जपकर्त्यांमध्यें श्रेष्ठ अशा कर्णासंबंधानें कोणतें मोठें भय त्या धर्मात्म्या युधिष्ठिराला प्राप्त झालें असून त्यानें

कथयामि कथामिमाम् । पृच्छतो भरतश्रेष्ठ शुश्रूषस्व गिरं मम ४
द्वादशे समतिक्रान्ते वर्षे प्राप्ते त्रयोदशे । पाण्डूनां हितकृच्छक्रः कर्णं
भिक्षितुमुद्यतः ५ अभिप्रायमथो ज्ञात्वा महेन्द्रस्य विभावसुः । कुण्ड-
लार्थे महाराज सूर्यः कर्णमुपागतः ६ महार्हे शयने वीरं स्पर्ध्यास्तरण-
संवृते । शयानमतिविश्वस्तं ब्रह्मण्यं सत्यवादिनम् ७ स्वप्नान्ते निशि
राजेन्द्र दर्शयामास रश्मिवान् । कृपया परयाविष्टः पुत्रस्नेहाच्च भारत ८
ब्राह्मणो वेदविद्भूत्वा सूर्यो योगर्धिरूपवान् । हितार्थमब्रवीत्कर्णं सान्त्व-
पूर्वमिदं वचः ९ कर्ण मद्वचनं तात शृणु सत्यभृतां वर । ब्रुवतोद्य महा-
बाहो सौहृदात्परमं हितम् १० उपायास्यति शक्रस्त्वां पाण्डवानां हिते-
प्सया । ब्राह्मणच्छद्मना कर्ण कुण्डलोपजिहीर्षया ११ विदितं तेन शीलं
ते सर्वस्य जगतस्तथा । यथा त्वं भिक्षितः सद्भिर्ददास्येव न याचसे १२
त्वं हि तात ददास्येव ब्राह्मणेभ्यः प्रयाचितम् । वित्तं यच्चान्यदप्याहुर्न

कोणाला कथन केलें नाहीं ? ३. वैशंपायन सांगतातः— हे राजाधिराज जनमेजया, ज्याअर्थी तूं विचारीतच आहेस त्याअर्थी ही कथा मी तुला कथन करितों. हे भरतवंशजश्रेष्ठा, तूं माझें भाषण श्रवण कर ४. पांडवांच्या वनवासाचें बारावें वर्ष संपून तेरावें सुरू झालें असतां त्यांचा हितकर्ता इंद्र कर्णाची याचना करण्याविषयीं उद्युक्त झाला ५. तेव्हां इंद्राचा अभिप्राय जाणून, हे महाराजा जनमेजया, विशिष्ट प्रभारूप धनानें युक्त असलेला सूर्य (कवच) कुंडलांकरितां कर्णाकडे आला ६. तेव्हां उत्कृष्ट आस्तरण ज्याच्यावर घातलें आहे अशा मोठ्या मूल्यवान् मंचकावर तो ब्राह्मणभक्त, सत्यवादी व वीर कर्ण अगदीं निश्चिंत पडला होता ७. अशा वेळीं, हे भरतकुलोत्पन्ना राजाधिराज जनमेजया, पुत्रस्नेहामुळें अतिशय दयार्द्र होऊन आलेल्या सूर्यानें रात्रीं स्वप्नामध्यें कर्णाला दर्शन दिलें ८. योगसामर्थ्यामुळें यथेष्ट रूप धारण करणाऱ्या सूर्यानें वेदवेत्त्या ब्राह्मणाचें रूप धारण केलें आणि कर्णाच्या हिताकरितां सांत्वनपूर्वक तो त्याला ह्मणाला ९ " बा सत्यनिष्ठांमध्यें श्रेष्ठ व महापराक्रमी कर्णा, प्रेमामुळें मी तुला हा मोठा हिताचा उपदेश करीत आहें तो तूं श्रवण कर १०. हे कर्णा, पांडवांचें हित व्हावें ह्या उद्देशानें तुझीं (कवच) कुंडलें हरण करण्याकरितां इंद्र ब्राह्मणवेषानें तुझ्याकडे येईल ११. सर्व जगताचाच स्वभाव ज्याप्रमाणें त्याला विदित असतो त्याप्रमाणें " सज्जनांनीं याचना केली असतां तूं त्यांना देतोसच; परंतु, कोणापाशींही याचना करीत नाहींस " हा तुझा स्वभावही त्याला विदित आहे १२. बा कर्णा, मागितलेलें वित्त अथवा दुसरेंही जें कांहीं ब्राह्मण मागतील

प्रत्याख्यामि कस्यचित् १३ त्वां तु चैवंविधं ज्ञात्वा स्वयं वै पाकशासनः । आगन्ता कुण्डलार्थाय कवचं चैव भिक्षितुम् १४ तस्मै प्रयाचमानाय न देयं कुण्डले त्वया । अनुनयः परं शक्त्या श्रेय एतद्धि ते परम् १५ कुण्डलार्थे ब्रुवंस्तात कारणैर्बहुभिस्त्वया । अन्यैर्बहुविधैर्वित्तैः संनिवार्यः पुनःपुनः १६ रत्नैः स्त्रीभिस्तथा गोभिर्धनैर्बहुविधैरपि । निदर्शनैश्च बहुभिः कुण्डलेप्सुः पुरन्दरः १७ यदि दास्यसि कर्ण त्वं सहजे कुण्डले शुभे । आयुषः प्रक्षयं गत्वा मृत्योर्वशमुपैष्यसि १८ कवचेन समायुक्तः कुण्डलाभ्यां च मानद । अवध्यस्त्वं रणेऽरीणामिति विद्धि वचो मम १९ अमृतादुत्थितं ह्येतदुभयं रत्नसंभवम् । तस्माद्रक्ष्यं त्वया कर्ण जीवितं चेत्प्रियं तव २० कर्ण उवाच ॥ को मामेवं भवान्प्राह दर्शयन्सौहृदं परम् । कामया भगवन्ब्रूहि को भवान्द्विजवेषधृक् २१ ब्राह्मण उवाच ॥ अहं तात सहस्रांशुः सौहृदात्त्वां निदर्शये । कुरुष्वैतद्वचो मे त्वमेतच्छ्रेयः परं हि ते २२ कर्ण उवाच ॥ श्रेय एव ममात्यन्तं

तें तू त्यांना देतच असतांस; कोणालाही नाहीं ह्मणत नाहींस १३. ह्याप्रमाणें तूं आहेसच हें जाणून स्वतः इंद्र कवचकुंडलें मागण्याकरितां येणार आहे १४. तो मागूं लागला असतां तू त्याला कवचकुंडलें देऊं नकोस. आपल्या सामर्थ्याची पराकाष्ठा करून तूं त्याचें दुसऱ्या रीतीनें सांत्वन कर ह्यातच तुझें मोठें कल्याण आहे १५. बा कर्णा, इंद्र कवचकुंडलें मागूं लागला असतां अनेक कारणें सांगून व नानाप्रकारचीं धनें देऊन तू त्याला परत पाठीव १६. सारांश, कवचकुंडलांची इच्छा धरणाऱ्या इंद्राला नानाप्रकारच्या सबबी सांगून रत्नें, स्त्रिया, गाई आणि अनेकप्रकारचीं धनें देऊन तूं त्याची बोळवण कर १७. हे कर्णा, देहासहवर्तमान प्राप्त झालेलीं हीं शुभ कवचकुंडलें जर तू देशील तर आयुष्याचा क्षय होऊन तू मृत्यूच्या तावडीत सापडशील १८. परंतु, हे मान्य, जोंपर्यंत तूं कवचकुंडलांसहवर्तमान आहेस तोंपर्यंत संग्रामामध्यें शत्रूंना अवध्य आहेस हें माझें ह्मणणें तूं एकून ठेव १९. हीं दोन्हीही रत्नमय असून अमृतापासून उत्पन्न झालेलीं आहेत. तस्मात्, हे कर्णा, जीवित जर तुला प्रिय असेल तर कवचकुंडलांचें रक्षण तुला केलें पाहिजे २०. कर्ण ह्मणतो:—पराकाष्ठेचें प्रेम दर्शविणारे आपण कोण ह्याप्रमाणें माझ्याशीं भाषण करीत आहां ? हे भगवन्, ब्राह्मणाचा वेष धारण केलेले आपण कोण हें मला मनापासून सांगा २१. ब्राह्मण ह्मणतो:—बा कर्णा, मी सूर्य आहें आणि प्रेमामुळें (ह्या रूपानें) तुला दर्शन दिलें आहे. ह्या माझ्या सांगण्याप्रमाणें तू वाग. हें तुझ्या फारच हिताचें आहे २२. कर्ण ह्मणतो:—

यस्य मे गोपतिः प्रभुः । प्रवक्ताद्य हितान्वेषी शृणु चेदं वचो मम २३
प्रसादये त्वां वरदं प्रणयाच्च ब्रवीम्यहम् । न निवार्यो व्रतादस्मादहं यद्यस्मि
ते प्रियः २४ व्रतं वै मम लोकोयं वेत्ति कृत्स्नं विभावसो । यथाहं द्विज-
मुख्येभ्यो दद्यां प्राणानपि ध्रुवम् २५ यद्यागच्छति मां शक्रो ब्राह्मणच्छ-
द्मनावृतः । हितार्थं पाण्डुपुत्राणां खचरोत्तम भिक्षितुम् २६ दास्यामि
विबुधश्रेष्ठ कुण्डले वर्म चोत्तमम् । न मे कीर्तिः प्रणश्येत त्रिषु लोकेषु
विश्रुता २७ मद्विधस्यायशस्यं हि न युक्तं प्राणरक्षणम् । युक्तं हि यशसा
युक्तं मरणं लोकसंमतम् २८ सोहमिन्द्राय दास्यामि कुण्डले सह वर्मणा।
यदि मां बलवृत्रघ्नो भिक्षार्थमुपयास्यति २९ हितार्थं पाण्डुपुत्राणां कुण्डले
मे प्रयाचितुम् । तन्मे कीर्तिकरं लोके तस्याकीर्तिर्भविष्यति ३० वृणोमि
कीर्तिं लोके हि जीवितेनापि भानुमन् । कीर्तिमानश्नुते स्वर्गं हीनकीर्तिस्तु
नश्यति ३१ कीर्तिर्हि पुरुषं लोके संजीवयति मातृवत् । अकीर्ति-

ज्याअर्थीं आपण प्रभु सूर्य माझ्या हिताची इच्छा धरून आज मला उपदेश
करीत आहां त्याअर्थीं माझें पराकाष्ठेचें कल्याणच आहे. परंतु, माझें हें ह्मणणें आपण
ऐकून घ्या २३. वर देण्याला उद्युक्त असलेल्या आपणांला मी हात जोडीत आहें;
आणि " माझें जर प्रिय कर्तव्य असेल तर ह्या व्रतापासून आपण मला निवृत्त
करू नये " एवढेंच मला आपणांला विनयानें सांगावयाचें आहे २४.
हे सूर्य, द्विजश्रेष्ठांना मी निःसंशय प्राण देखील देईन. हें
माझें व्रत पूर्णपणें ह्या जगताला विदित आहे २५. हे ग्रहश्रेष्ठ, पांडवांच्या
हिताकरितां ब्राह्मणवेष धारण करून इंद्र जर माझ्याकडे याचना करण्याकरितां
येईल तर २६, हे सुरश्रेष्ठ, कुंडलें आणि अनुपम कवच मी त्याला अर्पण करीन.
त्रैलोक्यामध्यें प्रख्यात असलेली माझी कीर्ति नाहींशी होतां उपयोगीं नाहीं २७.
अपकीर्ति होऊन प्राणरक्षण होणें माझ्यासारख्याला उचित नाहीं. कीर्तियुक्त असें
लोकसंमत मरणच उचित आहे २८. तस्मात्, (प्राणापेक्षां कीर्तीची पर्वा जास्त
बाळगणारा) तो इंद्र जर माझ्याकडे आला तर कवचासहवर्तमान कुंडलें मी इंद्राला
अर्पण करीन २९. बल आणि वृत्र ह्यांचा वध करणारा इंद्र पांडवांचें हित व्हावें ह्या
उद्देशानें जर माझ्याकडे कवचकुंडलें मागण्याकरितां येईल तर तें माझी कीर्ति जग-
तामध्यें वृद्धिंगत होण्याला आणि त्याची अपकीर्ति होण्याला कारण होईल ३०. हे
सूर्य, प्राणसुद्धां खर्ची घालून जगतामध्यें कीर्ति संपादन करणेंच मला रुचत आहे.
कारण, कीर्तिमान् पुरुषाला स्वर्ग प्राप्त होत असून अपकीर्ति झालेल्या पुरुषाचा नाश होतो.

जीवितं हन्ति जीवितोपि शरीरिणः ३२ अयं पुराणः श्लोको हि स्वयं गीतो विभावसो । धात्रा लोकेश्वर यथा कीर्तिरायुर्नरस्य ह ३३ पुरुषस्य परे लोके कीर्तिरेव परायणम् । इह लोके विशुद्धा च कीर्तिरायुर्विवर्धनी ३४ सोहं शरीरजे दत्त्वा कीर्तिं प्राप्स्यामि शाश्वतीम् । दत्त्वा च विधिवद्दानं ब्राह्मणेभ्यो यथाविधि ३५ हुत्वा शरीरं संग्रामे कृत्वा कर्म सुदुष्करम् । विजित्य च परानाजौ यशः प्राप्स्यामि केवलम् ३६ भीतानामभयं दत्त्वा संग्रामे जीवितार्थिनाम् । वृद्धान्बालान्द्विजार्तांश्च मोक्षयित्वा महाभयात् ३७ प्राप्स्यामि परमं लोके यशः स्वर्ग्यमनुत्तमम् । जीवितेनापि मे रक्ष्या कीर्तिस्तद्विद्धि मे व्रतम् ३८ सोहं दत्त्वा मघवते भिक्षामेतामनुत्तमाम् । ब्राह्मणच्छद्मिने देव लोके गन्ता परां गतिम् ३९ [११४८८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि सूर्यकर्णसंवादे त्रिशततमोध्यायः ॥ ३०० ॥

सूर्य उवाच ॥ माहितं कर्ण कार्षीस्त्वमात्मनः सुहृदां तथा । पुत्राणामथ

असतो ३१. जगतामध्यें मातेप्रमाणें कीर्ति पुरुषाला जिवंत राखीत असते; आणि अपकीर्ति जिवंत प्राण्याचेही जीविताचा नाश करीत असते ३२. हे सूर्य, हे जगदीश्वर, " परलोकीं कीर्तिच पुरुषाचा मुख्य आधार असून इहलोकीं शुद्ध कीर्तिच त्याचें आयुष्य वृद्धिंगत करणारी आहे " असा एक प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें ह्मटलेला पुरातन श्लोक प्रसिद्ध आहे ३३,३४. तस्मात्, शरीरासहवर्तमान उत्पन्न झालेलीं हीं कवचकुंडलें देऊन मी अक्षय्य कीर्ति संपादन करीन. सारांश, ब्राह्मणांना यथाविधि दान देऊन, यथाविधि ३५ संग्रामामध्यें शरीराचें हवन करून, अत्यंत दुर्घट पराक्रम करून आणि संग्रामामध्यें शत्रूंना जिंकून मी केवल यशच प्राप्त करून घेईन ३६. जीविताची याचना करणाऱ्या भयभीत झालेल्या पुरुषांना संग्रामामध्यें अभय देऊन आणि बाल, वृद्ध व द्विज ह्यांना मोठ्या संकटांतून सोडवून ३७ इहलोकीं मी स्वर्गप्रापक अशी मोठी अनुपम कीर्ति संपादन करीन. जीविताचा त्याग करूनही कीर्ति मला रक्षणीय आहे हें माझें मत आपण समजून ठेवा ३८. सारांश, हे देव, ब्राह्मणाचें रूप धारण करणाऱ्या इंद्राला ही अनुपम भिक्षा देऊन मी परलोकीं उत्कृष्ट गति संपादन करीन ३९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वांपैकीं सूर्य आणि कर्ण ह्यांच्या संवादाविषयीं तीनशेंवा अध्याय समाप्त झाला ॥ ३०० ॥

भार्याणामथो मातुरथो पितुः १ शरीरस्याविरोधेन प्राणिनां प्राणभृद्वर । इष्यते यशसः प्राप्तिः कीर्तिश्च त्रिदिवे स्थिरा २ यस्त्वं प्राणविरोधेन कीर्तिमिच्छसि शाश्वतीम् । सा ते प्राणान्समादाय गमिष्यति न संशयः ३ जीवतां कुरुते कार्यं पिता माता सुतास्तथा । ये चान्ये बान्धवाः केचिल्लोकेस्मिन्पुरुषर्षभ ४ राजानश्च नरव्याघ्र पौरुषेण निबोध तत् । कीर्तिश्च जीवतः साध्वी पुरुषस्य महाद्युते ५ मृतस्य कीर्त्या किं कार्यं भस्मीभूतस्य देहिनः । मृतः कीर्तिं न जानीते जीवन्कीर्तिं समश्नुते ६ मृतस्य कीर्तिर्मर्त्यस्य यथा माला गतायुषः । अहं तु त्वां ब्रवीम्येतद्भक्तोसीति हितेप्सया ७ भक्तिमन्तो हि मे रक्ष्या इत्येतेनापि हेतुना । भक्तोयं परया भक्त्या मामित्येव महाभुज ८ ममापि भक्तिरुत्पन्ना स त्वं कुरु वचो मम । अस्ति चात्र परं किंचिदध्यात्मं देवनिर्मितम् । अतश्च त्वां ब्रवीम्येतत्क्रियतामविशङ्कया ९ देवगुह्यं त्वया ज्ञातुं न शक्यं पुरुष-

---

सूर्य ह्मणतोः—हे कर्णा, सुहृद्, पुत्र, भार्या, माता, पिता आणि स्वतः ह्यांचें अहित तूं करूं नको १. हे बलवानांमध्यें श्रेष्ठ, शरीराला धक्का न लागतां इहलोकीं यशाची प्राप्ति आणि स्वर्गामध्यें स्थिर कीर्ति प्राण्यांना हवी असते २. परंतु, तूं जर प्राणांवर गदा आणून अक्षय्य कीर्तीची इच्छा करीत आहेस तर ती तुझी कीर्ति प्राणांना घेऊन नाहींशी होईल ह्यांत संशय नाहीं ३. हे पुरुषश्रेष्ठा, पुत्रादिक जिवंत असतील तरच पिता, माता, पुत्र आणि ह्या जगतामध्यें असलेले इतरही बांधव ह्यांना सुख प्राप्त करून घेतां येत असतें ४. हे पुरुषश्रेष्ठा, राजेही स्वपराक्रमानें जिवंत राहूनच कीर्तिमान् होत असतात हें तूं समजून ठेव. हे महातेजस्वी कर्णा, पुरुषाची कीर्ति तो जिवंत असेल तरच श्रेयस्कर होत असते ५. मरणानंतर भस्मीभूत झालेल्या प्राण्याला कीर्तीचा काय उपयोग आहे ? मृत पुरुष कीर्ति जाणीत नाहीं. जिवंत असतांनाच पुरुष कीर्ति प्राप्त करून घेत असतो ६. प्रेताला घातलेली माला जशी निरुपयोगी होते तशी कीर्ति मृत पुरुषाला व्यर्थ होते. तूं माझा भक्त आहेस असें समजून तुझें हित करणाऱ्या इच्छेनें मीही तुला सांगत आहें ७; आणि भक्तांचें रक्षण करणें माझें कर्तव्य आहे हाच हें तुला सांगण्यांत हेतु आहे. हे महापराक्रमी कर्णा, हा भक्त माझी पराकाष्ठेची भक्ति करीत आहे असें अवलोकनांत आल्यामुळें ८ माझ्या ठिकाणींही तुझ्याविषयीं भक्ति उत्पन्न झाली आहे. तस्मात्, तूं माझ्या ह्मणण्याप्रमाणें वाग. देवकृत असा कांहीं फारच गुप्त प्रकार ह्यामध्यें आहे आणि ह्मणूनच कांहीं शंका मनांत न आणितां तूं माझ्या सांगण्याप्रमाणें वाग असें मी तुला सांगत आहें ९. हे पुरुषश्रेष्ठा,

र्षभ । तस्मान्नाख्यामि ते गुह्यं काले वेत्स्यति तद्भवान् १० पुनरुक्तं च
वक्ष्यामि त्वं राधेय निबोध तत् । मा स्मैते कुण्डले दद्या भिक्षिते वज्र-
पाणिना ११ शोभसे कुण्डलाभ्यां च रुचिराभ्यां महाद्युते । विशाख-
योर्मध्यगतः शशीव विमले दिवि १२ कीर्तिश्च जीवतः साध्वी पुरुष-
स्येति विद्धि तत् । प्रत्याख्येयस्त्वया तात कुण्डलार्थे सुरेश्वरः १३ शक्या
बहुविधैर्वाक्यैः कुण्डलेप्सा त्वयानघ । विहन्तुं देवराजस्य हेतुयुक्तैः पुनः
पुनः १४ हेतुमदुपपन्नार्थैर्माधुर्यकृतभूषणैः । पुरन्दरस्य कर्ण त्वं बुद्धिमे-
तामपानुद १५ त्वं हि नित्यं नरव्याघ्र स्पर्धसे सव्यसाचिना । सव्यसाची
त्वया चेह युधि शूरः समेष्यति १६ न तु त्वामर्जुनः शक्तः कुण्डलाभ्यां
समन्वितम् । विजेतुं युधि यद्यस्य स्वयमिन्द्रः सखा भवेत् १७ तस्मान्न
देये शक्राय त्वयैते कुण्डले शुभे । सङ्ग्रामे यदि निर्जेतुं कर्ण कामयसे-
र्जुनम् १८ [११५०६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैया-
सिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि सूर्यकर्णसंवादे एकोत्तर-
त्रिशततमोऽध्यायः ॥ ३०१ ॥

देवगुह्य सांप्रत तुला समजणें योग्य नाहीं आणि ह्मणूनच मी तुला तें कथन करीत
नाहीं. योग्य समयीं तें (आपोआपच) तुला विदित होईल १०. हे राधेय कर्णा, एकदां
सांगितलेलेंच मी तुला फिरून सांगत आहें तें तू लक्ष्यांत ठेव. वज्रपाणि इंद्रानें हीं कुडलें
मागितलीं असतां तू त्याला देऊं नको ११. हे महातेजस्वी कर्णा , विशाखानक्षत्राच्या
दोन तान्यांमध्यें असलेला चद्र ज्याप्रमाणें निर्मल आकाशांत शोभेल त्याप्रमाणें तूं मनोहर
कुडलांनीं शोभत आहेस १२. बा कर्णा, पुरुष जिवंत राहील तरच त्याला कीर्ति
श्रेयस्कर होईल हें तू समजून ठेव आणि कुडलाकरिता देवराज इंद्र आला असतां
तूं त्याला नाहीं ह्मणून सांग १३. हे निष्पापा कर्णा, देवराज इंद्राची कुंडलांविषयीं
असलेली इच्छा नानाप्रकारच्या सयुक्तिक भाषणांनीं नाहींशी करणें तुला शक्य
आहे १४. ह्यास्तव, हे कर्णा, माधुर्यरूप भूषणें व सयुक्तिक अर्थ यांनीं युक्त अस-
लेल्या भाषणांनीं तूं ही इंद्राची इच्छा निवृत्त कर १५. हे पुरुषश्रेष्ठा, तूं सव्यसाची
अर्जुनाशीं नेहमीं स्पर्धा करीत असतोस; आणि ह्या(पुढें होणाऱ्या) संग्रामामध्यें अर्जुन
तुझ्याशीं युद्ध करण्याकरिता येणारही आहे १६. परंतु, प्रत्यक्ष इंद्र जरी अर्जुनाचा
साथीदार असला तरी जोंपर्यंत तू कुंडलांनीं युक्त आहेस तोंपर्यंत संग्रामामध्यें तुला
जिंकण्यास अर्जुन समर्थ होणार नाहीं १७. तस्मात्, संग्रामामध्यें अर्जुनाला जिंक-
ण्याची जर तुझी इच्छा असेल तर हीं शुभ कुडलें तूं इंद्राला देऊं नको १८. ह्याप्रमाणें

कर्ण उवाच ॥ भगवन्तमहं भक्तो यथा मां वेत्थ गोपते । तथा परमतिग्मांशो नास्त्यदेयं कथंचन १ न मे दारा न मे पुत्रा न चात्मा सुहृदो न च । तथेष्टा वै सदा भक्त्या यथा त्वं गोपते मम २ इष्टानां च महात्मानो भक्तानां च न संशयः । कुर्वन्ति भक्तिमिष्टां च जानीषे त्वं च भास्कर ३ इष्टो भक्तश्च मे कर्णो न चान्यद्दैवतं दिवि । जानीत इति वै कृत्वा भगवानाह मद्धितम् ४ भूयश्च शिरसा याचे प्रसाद्य च पुनः पुनः । इति ब्रवीमि तिग्मांशो त्वं तु मे क्षन्तुमर्हसि ५ बिभेमि न तथा मृत्योर्यथा बिभ्येऽनृतादहम् । विशेषेण द्विजातीनां सर्वेषां सर्वदा सताम् ६ प्रदाने जीवितस्यापि न मेऽत्रास्ति विचारणा । यच्च मामात्थ देव त्वं पाण्डवं फाल्गुनं प्रति ७ व्येतु संतापजं दुःखं तव भास्कर मानसम् । अर्जुनं प्रति मां चैव विजेष्यामि रणेऽर्जुनम् ८ तवापि विदितं देव ममाप्यस्त्रबलं महत् । जामदग्न्यादुपात्तं यत्तथा द्रोणान्महात्मनः ९ इदं त्वमनुजानीहि

महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वापैकीं सूर्य आणि कर्ण ह्यांच्या संवादाविषयीं तीनशें पहिला अध्याय समाप्त झाला ॥ ३०१ ॥

कर्ण ह्मणतो:—हे सूर्य, मी भगवानांचा भक्त आहें हें ज्याप्रमाणें आपण जाणीत आहां त्याचप्रमाणें, हे अतितीक्ष्णकिरणसपन्न, मला देण्यास अशक्य अशी कोणतीही वस्तु नाहीं हेंही आपण समजून ठवा १. हे गोपते, आपण ज्याप्रमाणें मला मनापासून सर्वदा प्रिय आहांत त्याप्रमाणें भार्या, पुत्र, मित्र अथवा आत्माही मला प्रिय नाहीं २. हे भास्कर, प्रिय भक्तांची अनुकूल भक्ति महात्मे निःसंशय करीत असतात हें आपणांला विदितच आहे ३; आणि " कर्ण माझा प्रिय भक्त आहे; माझ्याशिवाय स्वर्गामध्यें दुसरें कोणतेंही दैवत तो जाणीत नाहीं " असें मनामध्ये आणूनच भगवानांनीं मला हिताचा उपदेश केला आहे ४. परंतु, मस्तकानें प्रणाम करून व वारवार प्रार्थना करून मी जें हें बोलत आहे त्याची आपण मला क्षमा करावी ५. अनृताचें जसें मला भय वाटतें तसें मृत्यूचें भय वाटत नाहीं. विशेषेंकरून कोणीही सत्पात्र ब्राह्मण केव्हां जरी आला तरी ६ जीविताचेंही त्याला दान देण्यास मला कधींही शंका वाटणार नाहीं. हे देवा, पांडुपुत्र अर्जुनासंबंधानें आपण मला सांगितलें आहे ७; परंतु, हे भास्कर, अर्जुनाच्या व माझ्यासंबंधानें काळजी वाटून आपण मनामध्यें दुःख करूं नका. संग्रामामध्यें मी अर्जुनाला जिंकीन ८. हे देव, जमदग्निपुत्र परशुरामापासून आणि त्याचप्रमाणें महात्म्या द्रोणापासून मलाही मोठें अस्त्रबल प्राप्त झालें आहे हें आपणांला सुद्धां विदितच आहे ९. तस्मात्, हे सुरश्रेष्ठ, हें व्रत चालविण्याची आपण

सुरश्रेष्ठ व्रतं मम । भिक्षते वज्रिणे दद्यामपि जीवितमात्मनः १० सूर्य उवाच ॥ यदि तात ददास्येते वज्रिणे कुण्डले शुभे । त्वमप्येनमथो ब्रूया विजयार्थं महाबलम् ११ नियमेन प्रदद्यां ते कुण्डले वै शतक्रतो । अवध्यो ह्यसि भूतानां कुण्डलाभ्यां समन्वितः १२ अर्जुनेन विनाशं हि तव दानवसूदनः । प्रार्थयानो रणे वत्स कुण्डले ते जिहीर्षति १३ स त्वमप्येनमाराध्य सूनृताभिः पुनः पुनः । अभ्यर्थयेथा देवेशममोघार्थी पुरन्दरम् १४ अमोघां देहि मे शक्तिममित्रविनिबर्हिणीम् । दास्यामि ते सहस्राक्ष कुण्डले वर्म चोत्तमम् १५ इत्येव नियमेन त्वं दद्याः शक्राय कुण्डले । तया त्वं कर्ण सङ्ग्रामे हनिष्यसि रणे रिपून् १६ नाहत्वा हि महाबाहो शत्रूनेति करं पुनः । सा शक्तिर्देवराजस्य शतशोथ सहस्रशः १७ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा सहस्रांशुः सहसान्तरधीयत । ततः सूर्याय जप्यान्ते कर्णः स्वप्नं न्यवेदयत् १८ यथा दृष्टं यथा तत्त्वं यथोक्तमुभयोर्निशि । तत्सर्वमानुपूर्व्येण शशंसास्मै वृषस्तदा १९ तच्छ्रुत्वा

मला अनुज्ञा द्या. इंद्र भिक्षा मागू लागला असतां मी आपलें जीवितही त्याला देईन १०. सूर्य ह्मणतोः—बा कर्णा, हीं शुभ कुंडलें जर तूं इंद्राला देणारच असलास तर " हे इंद्रा, कांहीं अटीवर मी तुला हीं कुंडलें देईन " असें ह्मणून तूंही (शत्रूला) जिंकण्याकरितां इंद्रापासून एक मोठी शक्ति मागून घे. अरे, जोंपर्यंत तूं कुंडलांनीं युक्त आहेस तोंपर्यंत कोणत्याही प्राण्याच्या हातून तुझा वध होणें शक्य नाहीं ११,१२. दैत्यनाशक इंद्र अर्जुनाच्या हातून संग्राममध्यें तुझा वध व्हावा ह्या उद्देशानें , हे वत्सा, तुझीं कुंडलें हरण करण्याची इच्छा करीत आहे १३. तस्मात् , तूंही वारंवार मधुर भाषणानीं ह्या देवराज इंद्राला प्रसन्न करून घे आणि अमोघ शक्ति प्राप्त करून घेण्याविषयीं त्याची प्रार्थना कर १४. " हे सहस्रनयना इंद्रा, मला एक शत्रुघातक अमोघ शक्ति तूं दे; ह्मणजे कुंडलें व व अनुपम कवच मी तुला देईन " १५. ह्याच अटीवर तूं इंद्राला कुंडलें दे; ह्मणजे, हे कर्णा, त्या शक्तीच्या योगानें तूं संग्राममध्यें शत्रूचा वध करिशील १६ हे महापराक्रमी कर्णा, देवराजाची ती शक्ति शेंकडों हजारों शत्रु जरी पुढें असले तरी त्यांचा वध करून पुनरपि हातामध्यें परत येत असते १७. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें कर्णाला सांगून सूर्य एकदम गुप्त झाला व तदनंतर जप संपल्यावर कर्णानें तें स्वप्न सूर्याला निवेदन केलें १८. साराश, उभयतांमध्यें रात्रीं स्वप्नांत जो प्रकार झालपाचें दृष्टीं पडलें होतें तो इत्थंभूत प्रकार क्रमाक्रमानें त्या सूर्याला कर्णानें निवेदन

भगवान्देवो भानुः स्वर्भानुसूदनः । उवाच तं तथेत्येव कर्णं सूर्यः स्मयन्निव २० ततस्तत्त्वमिति ज्ञात्वा राधेयः परवीरहा। शक्तिमेवाभिकाङ्क्षन्वै वासवं प्रत्यपालयत् २१ [११५२७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि सूर्यकर्णसंवादे द्व्यधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०२ ॥

जनमेजय उवाच ॥ किं तद्गुह्यं न चाख्यातं कर्णायेहोष्णरश्मिना । कीदृशे कुण्डले ते च कवचं चैव कीदृशम् १ कुतश्च कवचं तस्य कुण्डले चैव सत्तम । एतदिच्छाम्यहं श्रोतुं तन्मे ब्रूहि तपोधन २ वैशम्पायन उवाच ॥ अयं राजन्ब्रवीम्येनत्तस्य गुह्यं विभावसोः । यादृशे कुण्डले ते च कवचं चैव यादृशम् ३ कुन्तिभोजं पुरा राजन्ब्राह्मणः पर्युपस्थितः। तिग्मतेजा महाप्रांशुः श्मश्रुदण्डजटाधरः ४ दर्शनीयोनवद्याङ्गस्तेजसा प्रज्वलन्निव । मधुपिङ्गो मधुरवाक्तपःस्वाध्यायभूषणः ५ स राजानं कुन्तिभोजमब्रवीत्सुमहातपाः । भिक्षामिच्छामि वै भोक्तुं तव गेहे

केला १९. तेव्हां राहूचें दमन करणारा तो भगवान् सूर्यदेव तें ऐकून घेऊन "असेंच आहे" म्हणून हंसत हंसत कर्णाला म्हणाला असतां २० स्वप्न पडलेलें खरेंच आहे असें समजून शत्रुपक्षीयवीरनाशक राधेय कर्ण अमोघ शक्तीचीच आशा धरून इंद्राची मार्गप्रतीक्षा करीत बसला २१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतातर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वापैकीं सूर्य आणि कर्ण ह्यांच्या संवादाविषयीं तीनशें दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३०२॥

जनमेजय प्रश्न करितोः—सूर्यानें जें कर्णाला सांगितलें नाहीं असें तें गुह्य काय होतें ? त्याचीं तीं कुंडलें कसलीशीं होतीं ? कवच कशा प्रकारचें होतें ? १ आणि त्याला तीं कवचकुंडलें कोठून प्राप्त झालीं होतीं ? हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. तस्मात्, हे सज्जनश्रेष्ठ तपोधन, तें आपण मला कथन करा २. वैशंपायन सांगतातः—हे राजा, हा मी तें त्या सूर्याचें गुह्य तुला सांगतों; आणि तीं कुंडलें कशीं होतीं व कवच कशा प्रकारचें होतें हेंही मी तुला निवेदन करितों ३. हे राजा, पूर्वी एक ब्राह्मण कुंतिभोजाकडे आला. त्याचें तेज प्रखर होतें; तो फारच उंच होता; त्यानें दाढी व जटा राखिल्या होत्या आणि हातामध्यें दंडही धारण केला होता ४. त्याचप्रमाणें तेजानें जसा कांहीं जळत असलेला तो ब्राह्मण पहाण्यासारखा होता; त्याच्या शरीराला कोठेंही नांव ठेवण्यास जागा नव्हती; त्याचा वर्ण मधासारखा पिंगट होता; वाणी मधुर होती आणि तपश्चर्या व वेदाध्ययन हींच त्याचीं भूषणें होतीं ५.

विमत्सर ६ न मे व्यलीकं कर्तव्यं त्वया वा तव चानुगैः । एवं वत्स्यामि ते गेहे यदि ते रोचतेनघ ७ यथाकामं च गच्छेयमागच्छेयं तथैव च । शय्यासने च मे राजन्नापराध्येत कश्चन ८ तमब्रवीत्कुन्तिभोजः प्रीतियुक्तमिदं वचः । एवमस्तु परं चेति पुनश्चैनमथाब्रवीत् ९ मम कन्या महाप्राज्ञ पृथा नाम यशस्विनी । शीलवृत्तान्विता साध्वी नियता चैव भाविनी १० उपस्थास्यति सा त्वां वै पूजयानवमन्य च । तस्याश्च शीलवृत्तेन तुष्टिं समुपयास्यसि ११ एवमुक्त्वा तु तं विप्रमभिपूज्य यथाविधि । उवाच कन्यामभ्येत्य पृथां पृथुललोचनाम् १२ अयं वत्से महाभागो ब्राह्मणो वस्तुमिच्छति । मम गेहे मया चास्य तथेत्येवं प्रतिश्रुतम् १३ त्वयि वत्से पराश्वस्य ब्राह्मणस्याभिराधनम् । तन्मे वाक्यमिथ्या त्वं कर्तुमर्हसि कर्हिचित् १४ अयं तपस्वी भगवान्स्वाध्यायनियतो द्विजः । यद्यद्ब्रूयान्महातेजास्तत्तद्देयममत्सरात् १५ ब्राह्मणा हि परं तेजो ब्राह्मणा हि परं तपः । ब्राह्मणानां नमस्कारैः सूर्यो दिवि

तो फारच महातपस्वी ब्राह्मण कुंतिभोजराजाला ह्मणाला " हे निर्मत्सर राजा, तुझ्या घरीं भिक्षा सेवन करून राहण्याची माझी इच्छा आहे ६. हे निष्पापा, तूं अथवा तुझ्या अनुयायांनीं माझें मन दुखवितां उपयोगीं नाहीं; हें जर तुला रुचत असेल तर तुझ्या घरीं राहण्याची माझी इच्छा आहे ७. मी मनास वाटेल तेव्हां जात जाईन आणि इच्छेस वाटेल तेव्हां परत येत जाईन. हे राजा, निजण्याबसण्यासंबंधानें कोणीही माझ्या मर्जीविरुद्ध वागतां उपयोगीं नाहीं" ८. ह्यानंतर कुंतिभोजराजा "ठीक आहे" असें त्याला आनंदानें ह्मणाला आणि पुनरपिही तो त्याला ह्मणाला ९ "हे महाप्राज्ञ, माझी पृथानामक एक यशस्विनी कन्या आहे. ती सुशील, सदाचरणी, साध्वी, मनोनिग्रही व सद्गुणी आहे १०. ती अनादर न होऊं देतां आपल्या शुश्रूषेमध्यें तत्पर राहील; व तिच्या सुशील वर्तनानें आपणही संतुष्ट व्हाल" ११. ह्याप्रमाणें सांगून त्या कुंतिभोजराजानें त्या ब्राह्मणाचें यथाविधि पूजन केलें; आणि विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या आपल्या पृथानामक कन्येकडे येऊन तो ह्मणाला १२ "हे वत्से, ह्या महाभाग्यवान् ब्राह्मणाच्या मनांतून आपल्या घरीं रहावयाचें आहे; आणि मींही 'ठीक आहे' ह्मणून त्याला सांगितलें १३. परंतु, हे वत्से, ब्राह्मणाचें आराधन तुझ्या हातून होईल असा तुझ्यावर विश्वास ठेवून त्या ब्राह्मणाला दिलेलें तें माझें वचन तूं खरें कर १४. सारांश, वेदाध्ययनाविषयीं तत्पर असलेला हा भगवान्, महातेजस्वी व तपस्वी द्विज जें जें ह्मणेल तें तें तूं निर्मत्सर बुद्धीनें त्याला देत जा १५. कारण, ब्राह्मण हे मोठें तेज असून ब्राह्मण हें

विराजते १६ अमानयन्हि मानार्हान्वातापिश्च महासुरः । निहतो ब्रह्म-
दण्डेन तालजङ्घस्तथैव च १७ सोयं वत्से महाभार आहितस्त्वयि
सांप्रतम् । त्वं सदा नियता कुर्या ब्राह्मणस्याभिराधनम् १८ जानामि
प्रणिधानं ते बाल्यात्प्रभृति नन्दिनि । ब्राह्मणेष्विह सर्वेषु गुरुबन्धुषु चैव
ह १९ तथा प्रेष्येषु सर्वेषु मित्रसंबन्धिमातृषु । मयि चैव यथावत्त्वं सर्व-
मावृत्य वर्तसे २० न ह्यतुष्टो जनोस्तीह पुरे चान्तःपुरे च ते । सम्यग्वृ-
त्त्यानवद्याङ्गि तव भृत्यजनेष्वपि २१ संदेष्टव्यां तु मन्ये त्वां द्विजातिं
कोपनं प्रति । पृथे बालेति कृत्वा वै सुता चासि ममेति च २२ वृष्णीनां
च कुले जाता शूरस्य दयिता सुता । दत्ता प्रीतिमता मह्यं पित्रा बाला
पुरा स्वयम् २३ वसुदेवस्य भगिनी सुतानां प्रवरा मम । अग्र्यमग्रे प्रति-
ज्ञाय तेनासि दुहिता मम २४ तादृशे हि कुले जाता कुले चैव विवर्धिता ।
सुखात्सुखमनुप्राप्ता ह्रदाद्ध्रदमिवागता २५ दौष्कुलेया विशेषेण कथंचि-

---

मोठें तप आहे; आणि ब्राह्मणाच्याच नमस्कारांमुळें सूर्य आकाशामध्यें प्रकाशत आहे १६.
मान्य ब्राह्मणांचा अवमान करणारा महादैत्य वातापि आणि तालजंघ हे ब्रह्मदंडानेंच वध
पावले १७. हे वत्से, सांप्रत मीं हें मोठें जोखमीचें काम तुझ्यावर सोंपविलें आहे.
तस्मात्, तूं नहमीं सावध राहून ब्राह्मणाचें आराधन करीत जा १८. हे नन्दिनि,
लहानपणापासून सर्व ब्राह्मणांकडे आणि वडील माणसांकडे तुझें लक्ष असल्याचें मी
जाणीत आहें १९. त्याचप्रमाणें सर्व सेवक, मित्र, आप्त, माता आणि मी ह्या सर्वां-
कडे तूं योग्य रीतीनें लक्ष्य देऊनच वागत असतेस २०. हे सुंदरि, तुझ्या चांगल्या
वागणुकीमुळें ह्या नगरामध्यें, अंतःपुरांत आणि सेवकलोकांतही तुझ्याविषयीं कोणी
असंतुष्ट नाहीं २१. हे पृथे, तूं लहान आहेस आणि माझी कन्या आहेस; हा विचार
मनांत आणून क्रोधी ब्राह्मणाविषयीं काम सांगणें तुलाच योग्य आहे असें मला
वाटतें २२. वृष्णिसंज्ञक यादवांच्या कुलामध्यें उत्पन्न झालेली तूं शूराची प्रिय कन्या
आहेस; व माझ्यावर प्रेम करणाऱ्या तुझ्या पित्यानें आपण होऊन तुला बालपणीं पूर्वी
माझ्या स्वाधीन केलें आहे २३. तूं वसुदेवाची भगिनी असून माझ्या कन्यांमध्यें श्रेष्ठ
आहेस. जें पहिलें अपत्य होईल तें तुला देईन अशी शूरानें प्रथम प्रतिज्ञा केल्यानंतर
तुला माझ्या स्वाधीन केलें असल्यामुळें तूं माझी कन्या झाली आहेस २४. तशा
प्रकारच्या यादवकुलामध्यें उत्पन्न झालेली असून तूं ह्या कुलामध्यें वाढली आहेस;
आणि म्हणूनच सुखांतून सुखांत आल्याप्रमाणें अथवा सरोवरांतून सरोवरांत आल्या-
प्रमाणें तुझी स्थिति झाली आहे २५. हे कल्याणि, कुलहीन तरुण स्त्रिया विशेषतः

त्यग्रहं गताः । बालभावाद्विकुर्वन्ति प्रायशः प्रमदाः शुभे २६ पृथे राजकुले जन्म रूपं चापि तवाद्भुतम् । तेन तेनासि संपन्ना समुपेता च भाविनी २७ सा त्वं दर्पं परित्यज्य दम्भं मानं च भाविनि । आराध्य वरदं विप्रं श्रेयसा योक्ष्यसे पृथे २८ एवं प्राप्स्यसि कल्याणि कल्याणमनघे ध्रुवम् । कोपिते च द्विजश्रेष्ठे कृत्स्नं दह्येत मे कुलम् २९ [११५५६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि पृथोपदेशे त्र्यधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०३ ॥

कुन्त्युवाच ॥ ब्राह्मणं यन्त्रिता राजन्नुपस्थास्यामि पूजया ॥ यथाप्रतिज्ञं राजेन्द्र न च मिथ्या ब्रवीम्यहम् १ एष चैव स्वभावो मे पूजयेयं द्विजानिति । तव चैव प्रियं कार्यं श्रेयश्च परमं मम २ यद्येवैष्यति सायाह्ने यदि प्रातरथो निशि । यद्यर्धरात्रे भगवान्न मे कोपं करिष्यति ३ लाभो ममैष राजेन्द्र यद्वै पूजयती द्विजान् । आदेशे तव तिष्ठन्ती हितं कुर्यां नरोत्तम ४ विस्रब्धो भव राजेन्द्र न व्यलीकं द्विजोत्तमः ।

कांहीं कारणामुळें योग्यतेस चढल्या असतां मूर्खपणामुळें दुष्टपणा करीत असतात २६. परंतु, हे पृथे, तुझा जन्मही राजकुलांत झाला असून तुझें रूपही अद्भुत आहे; आणि ह्मणूनच तूं कुलसंपन्न व रूपसंपन्न अशी चांगली आशा उत्पन्न करण्यासारखी मुलगी आहेस २७. ह्यास्तव, हे सुंदरि पृथे, गर्व, दांभिकपणा आणि अभिमान सोडून देऊन तूं ह्या वरप्रद ब्राह्मणाचें आराधन कर; ह्मणजे तुझें कल्याण होईल २८. हे कल्याणि, हे निष्पापे, ह्याप्रमाणें तूं वागलीस ह्मणजे निःसंशय तुझें कल्याण होईल. परंतु, त्या द्विजश्रेष्ठाला कोप आल्यास माझें सर्व कुल दग्ध होऊन जाईल २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वांपैकीं कुंतीला केलेल्या उपदेशाविषयीं तीनशें तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३०३ ॥

कुंती ह्मणते:—हे राजा, हे राजेंद्रा, स्वतः अगदीं नियमबद्ध राहून मी आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें ब्राह्मणाची शुश्रूषा करीन. मी असत्य भाषण करीत नाहीं १. द्विजांचें पूजन करून आपल्या सांगण्याप्रमाणें वागावें हा माझा स्वभावच आहे; आणि ह्यांतच माझें पराकाष्ठेचें हित आहे २. तो भगवान् द्विज सायंकाळीं, प्रातःकाळीं, रात्रीं आणि मध्यरात्रीं जरी आला तरी माझ्यावर रागावणार नाहीं ३. हे राजाधिराज, हे पुरुषश्रेष्ठा, आपल्या आज्ञेप्रमाणें वागून द्विजशुश्रूषा हातून घडणार असल्यामुळें आपलें हित करितां येईल हा एक मला लाभच आहे ४.

वसन्प्राप्स्यति ते गेहे सत्यमेतद्ब्रवीमि ते ५ यत्प्रियं च द्विजस्यास्य हितं चैव तवानघ । यतिष्यामि तथा राजन्व्येतु ते मानसो ज्वरः ६ ब्राह्मणा हि महाभागाः पूजिताः पृथिवीपते । तारणाय समर्थाः स्युर्विपरीते वधाय च ७ साहमेतद्विजानन्ती तोषयिष्ये द्विजोत्तमम् । न मत्कृते व्यथां राजन्प्राप्स्यसि द्विजसत्तमात् ८ अपराधेपि राजेन्द्र राज्ञामश्रेयसे द्विजाः । भवन्ति च्यवनो यद्वत्सुकन्यायाः कृते पुरा ९ नियमेन परेणाहमुपस्थास्ये द्विजोत्तमम् । यथा त्वया नरेन्द्रेदं भाषितं ब्राह्मणं प्रति १० एवं ब्रुवन्तीं बहुशः परिष्वज्य समर्थ्य च । इति चेति च कर्तव्यं राजा सर्वमथादिशत् ११ राजोवाच ॥ एवमेतत्त्वया भद्रे कर्तव्यमविशङ्कया । मद्धितार्थं तथात्मार्थं कुलार्थं चाप्यनिन्दिते १२ एवमुक्त्वा तु तां कन्यां कुन्तिभोजो महायशाः । पृथां परिददौ तस्मै द्विजाय द्विजवत्सलः १३ इयं ब्रह्मन्मम सुता बाला सुखविवर्धिता । अपराध्येत यत्किंचिन्न कार्यं हृदि तत्त्वया १४

हे राजाधिराज, आपण स्वस्थ असा. आपल्या घरामध्यें जोंपर्यंत तो द्विजश्रेष्ठ वास्तव्य करीत आहे तोंपर्यंत त्याचें काहीं एक बिघडावयाचें नाहीं, हें मी आपणांला सत्य सांगून ठेवितें ५. हे निष्पाप राजा, ह्या द्विजाला प्रिय आणि आपणांला हितावह असेंच आचरण ठेवण्याचा मी प्रयत्न करीन. आपणांला मनामध्यें काळजी बाळगण्याचें कारण नाहीं ६. हे भूपते, महाभाग्यवान् ब्राह्मणांचा सत्कार झाला असतां ते उद्धार करण्यास आणि अनादर झाला असतां नाश करण्यासही समर्थ असतात ७; हें मला ठाऊक आहे. ह्यास्तव मी त्या द्विजश्रेष्ठाला संतुष्ट करीन. हे राजा, आपणांला माझ्याकरितां त्या द्विजश्रेष्ठापासून दुःख होणार नाहीं ८. हे राजेंद्रा, ज्याप्रमाणें पूर्वी च्यवनमुनि सुकन्येकरितां राजाच्या नाशाला कारण झाले त्याचप्रमाणें अपराध झाला असतां द्विज राजांच्या अकल्याणाला कारण होतात ९. तस्मात्, हे नरेंद्र, ब्राह्मणाला आपण ज्याप्रमाणें वचन दिलें आहे त्याप्रमाणें मी मोठ्या तत्परतेनें त्या द्विजश्रेष्ठाची शुश्रूषा करीन १०. ह्याप्रमाणें ती बोलत असतांना कुंतिभोजराजानें तिला वारंवार कवटाळिलें आणि तिच्या ह्मणण्याला अनुमोदन देऊन "हें असें करावयाचें; हें तसें करावयाचें;" ह्मणून त्यानें सर्व तिला सांगून टाकिलें ११. राजा ह्मणतोः- हे कल्याणि, हे अनिंदिते, तूं मनामध्यें किंतु न आणितां अगदीं ह्याप्रमाणेंच माझ्या हिताकरितां, स्वतःकरितां आणि कुलाकरितां ब्राह्मणाचें आराधन कर १२. ह्याप्रमाणें त्या कन्येला सांगितल्यानंतर द्विजवत्सल महाकीर्तिमान् कुंतिभोजराजानें कुंती त्या ब्राह्मणाच्या स्वाधीन केली १३; (आणि तो ह्मणाला) "हे ब्रह्मन्, ही माझी

द्विजातयो महाभागा वृद्धबालतपस्विषु । भवन्त्यक्रोधनाः प्रायो ह्यपराद्धेषु नित्यदा १५ सुमहत्यपराधेऽपि क्षान्तिः कार्या द्विजातिभिः । यथाशक्ति यथोत्साहं पूजा ग्राह्या द्विजोत्तम १६ तथेति ब्राह्मणेनोक्ते स राजा प्रीतमानसः । हंसचन्द्रांशुसंकाशं गृहमस्मै न्यवेदयत् १७ तत्राग्निशरणे क्लृप्तमासनं तस्य भानुमत् । आहारादि च सर्वं तत्तथैव प्रत्यवेदयत् १८ निक्षिप्य राजपुत्री तु तन्द्रीं मानं तथैव च । आतस्थे परमं यत्नं ब्राह्मणस्याभिराधने १९ तत्र सा ब्राह्मणं गत्वा पृथा शौचपरा सती । विधिवत्परिचारार्हं देववत्पर्यतोषयत् २० [११५७६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि पृथाद्विजचर्यायां चतुरधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ सा तु कन्या महाराज ब्राह्मणं संशितव्रतम् । तोषयामास शुद्धेन मनसा संशितव्रता १ प्रातरेष्याम्यथेत्युक्त्वा कदाचिद्द्विज-

---

अल्पवयी कन्या सुखामध्यें वाढली आहे; ह्यास्तव, हिच्या हातून जर कांहीं आपला अपराध झाला तर आपण तो मनामध्यें आणू नये १४. कारण, महात्मे ब्राह्मण वृद्ध, बाल व अनाथ ह्यांनीं अपराध केला असतांही प्राय: कधीं क्रुद्ध होत नाहींत १५. एखाद्याच्या हातून फारच मोठा जरी अपराध झाला तरी ब्राह्मणांनीं क्षमाच केली पाहिजे; आणि, हे द्विजश्रेष्ठ, अल्पस्वल्प उत्साहानें कोणीं यथाशक्ति आदर केल्यास तो ब्राह्मणांनीं मानून घेतला पाहिजे " १६. ह्यानंतर " ठीक आहे " असें त्या ब्राह्मणानें ह्मटल्यावर त्या राजाचें मन प्रसन्न झालें आणि हंसाप्रमाणें अथवा चंद्रकिरणांप्रमाणें शुभ्र कांतीनें युक्त असलेलें गृह त्यानें त्या ब्राह्मणाला वास्तव्य करण्याकरितां दाखवून दिलें १७. त्या गृहामध्यें होमशालेंत त्या ब्राह्मणाकरितां एक उज्ज्वल आसन तयार केलें असून आहार वगैरेची सर्व व्यवस्थाही त्या गृहांतच केलेली होती; आणि त्याप्रमाणें त्या राजानें त्याला तें सर्व सांगूनही टाकिलें १८. पित्यानें सांगितल्यानंतर राजकन्या कुंतीनें आपला मान व आळस एका बाजूला ठेविला आणि ब्राह्मणाच्या आराधनाविषयीं ती फारच परिश्रम घेऊं लागली १९. सारांश, सोंवळ्याओंवळ्याविषयीं फारच तत्पर असलेली ती सुशील कुंती त्या घरामध्यें गेली; आणि शुश्रूषेला योग्य असलेल्या त्या ब्राह्मणाची देवाप्रमाणें यथाविधि शुश्रूषा करून तिनें त्याला संतुष्ट केलें २०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वापैकीं कुंतीच्या द्विजशुश्रूषेविषयीं तीनशें चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ३०४ ॥

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजयमहाराजा, निर्मल तपश्चर्येनें युक्त असलेल्या

सत्तमः । तत आयाति राजेन्द्र सायं रात्रावथो पुनः २ तं च सर्वासु वेलासु
भक्ष्यभोज्यप्रतिश्रयैः । पूजयामास सा कन्या वर्धमानैस्तु सर्वदा ३ अन्ना-
दिसमुदाचारःशय्यासनकृतस्तथा । दिवसे दिवसे तस्य वर्धते न तु हीयते ४
निर्भर्त्सनापवादैश्च तथैवाप्रियया गिरा । ब्राह्मणस्य पृथा राजन्न चका-
राप्रियं तदा ५ व्यस्ते काले पुनश्चैति न चैति बहुशो द्विजः । सुदुर्लभ-
मपि ह्यन्नं दीयतामिति सोऽब्रवीत् ६ कृतमेव च तत्सर्वं यथा तस्मै न्यवे-
दयत् । शिष्यवत्पुत्रवच्चैव स्वसृवच्च सुसंयता ७ यथोपजोषं राजेन्द्र
द्विजातिप्रवरस्य सा । प्रीतिमुत्पादयामास कन्यारत्नमनिन्दिता ८ तस्यास्तु
शीलवृत्तेन तुतोष द्विजसत्तमः । अवधानेन भूयोऽस्याः परं यत्नमथाकरोत् ९
तां प्रभाते च सायं च पिता पप्रच्छ भारत । अपि तुष्यति ते पुत्रि
ब्राह्मणः परिचर्यया १० तं सा परममित्येव प्रत्युवाच यशस्विनी । ततः
प्रीतिमवापाऽग्र्यां कुन्तिभोजो महामनाः ११ ततः संवत्सरे पूर्णे यदासौ

त्या ब्राह्मणाला कडकडीत आचरणानें वागणाऱ्या कुंतीनें शुद्ध मनानें संतुष्ट केलें १. हे राजाधिराज, सकाळीं येईन असें सांगून सायंकाळीं घरांतून बाहेर गेलेला तो द्विजश्रेष्ठ रात्रींच पुनरपि परत येत असे २. कोणतीही जरी वेळ असली तरी उत्तरोत्तर वृद्धिंगत होत चाललेल्या भक्ष्य व भोज्य पदार्थांनीं आणि आसनांनीं ती कन्या कुंती नेहमीं त्याची शुश्रूषा करीत असे ३. अन्नादि उपचार आणि शय्या, आसन वगैरेंची व्यवस्था हीं त्या ब्राह्मणाची दिवसेंदिवस कमी न होतां वाढतच होती ४. ब्राह्मणानें जरी निर्भर्त्सना केली, जरी नांवें ठेविलीं आणि शिवीगाळ केली तरी, हे राजा, ती त्याचें मन दुखवीत नसे ५. येण्याची वेळ निघून गेल्यावरही तो येत असे; पुष्कळ वेळां येतही नसे आणि अत्यंत दुर्लभ असेंही अन्न तो मागत असे ६. परंतु, " तयारी आहे " असें सांगून कुंती त्याला सर्व कांहीं अर्पण करीत असे. त्याच्या शुश्रूषेविषयीं अतिशयच दक्ष राहून ती कुंती प्रसंगाला अनुसरून शिष्याप्रमाणें, पुत्राप्रमाणें अथवा बहिणीप्रमाणें त्याच्याशीं आपलें वर्तन ठेवीत असे ७. सारांश, हे राजाधिराज, निंदेस यत्किंचितही पात्र नसलेल्या त्या श्रेष्ठ कन्येनें त्या ब्राह्मणाच्या मनाप्रमाणें वागून त्याची प्रीति संपादन केली ८. तिच्या सुशील वर्तनानें तो द्विजश्रेष्ठ संतुष्ट झाला; आणि तिच्या कल्याणाचा विचार तो, दक्षतापूर्वक, मनामध्यें आणूं लागला ९. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, " हे मुली, तुझ्या शुश्रूषेनें ब्राह्मण संतुष्ट होत असतोना " असें सकाळ संध्याकाळ पिता तिला विचारीत असे १०; आणि, " तो अतिशय संतुष्ट होत असतो ".अशी ती यशस्विनी त्याला सांगत असे; व तें ऐकून

जपतां वरः। नापश्यद्दुःष्कृतं किंचित्पृथायाः सौहृदे रतः १२ ततः प्रीत-मना भूत्वा स एनां ब्राह्मणोब्रवीत्। प्रीतोस्मि परमं भद्रे परिचारेण ते शुभे १३ वरान्वृणीष्व कल्याणि दुरापान्मानुषैरिह। यैस्त्वं सीमन्तिनीः सर्वा यशसाभिभविष्यसि १४ कुन्त्युवाच॥ कृतानि मम सर्वाणि यस्या मे वेदवित्तम। त्वं प्रसन्नः पिता चैव कृतं विप्र वरैर्मम १५ ब्राह्मण उवाच॥ यदि नेच्छसि मत्तस्त्वं वरं भद्रे शुचिस्मिते। इमं मन्त्रं गृहाण त्वमाह्वानाय दिवौकसाम् १६ यं यं देवं त्वमेतेन मन्त्रेणावाहयिष्यसि। तेन तेन वशे भद्रे स्थातव्यं ते भविष्यति १७ अकामो वा सकामो वा स समेष्यति ते वशे। विबुधो मन्त्रसंशान्तो भवेद्भृत्य इवानतः १८ वैशम्पायन उवाच॥ न शशाक द्वितीयं सा प्रत्याख्यातुमनिन्दिता। तं वै द्विजातिप्रवरं तदा शापभयान्नृप १९ ततस्तामनवद्याङ्गीं ग्राहयामास स द्विजः। मन्त्रग्रामं तदा राजन्नथर्वशिरसि श्रुतम् २० तं प्रदाय तु राजेन्द्र

महाशय कुंतिभोजराजाला पराकाष्ठेचा आनंद होत असे ११. तदनंतर संवत्सर संपूर्ण झाल्यावरही तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या ब्राह्मणाला जेव्हां कुंतीचें कांहीं-एक विरुद्ध वर्तन दिसलें नाहीं तेव्हां तो तिच्याविषयीं एकसारखी सप्रेमबुद्धि धारण करूं लागला १२; आणि मनामध्यें संतुष्ट होऊन तो ब्राह्मण तिला ह्मणाला "हे शुभे, हे कल्याणि, मी तुझ्या शुश्रूषेनें अतिशय प्रसन्न झालों आहें १३ ह्यास्तव, हे कल्याणि, मनुष्यांना इह-लोकीं दुर्लभ असे वर तू मागून घे; ह्मणजे त्या वरांच्या योगानें सर्व सौभाग्यवती स्त्रियांना तूं कीर्तीमध्यें मागें टाकशील" १४. कुंती ह्मणते:—हे वेदवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, आपण व पिता हे उभयतां ज्याअर्थीं माझ्यावर प्रसन्न झालां आहां त्याअर्थीं माझे सर्व मनोरथ परिपूर्ण झालेच आहेत. ह्यास्तव, हे विप्र, मला वरांचें कारण नाहीं १५. ब्राह्मण ह्मणतो:—हे सुहास्यवदने कल्याणि, तुला जर माझ्यापासून वर मागून घेण्याची इच्छा नसेल तर देवांच्या आह्वानाकरितां तूं हा मंत्र ग्रहण कर १६. हे कल्याणि, ह्या मंत्रानें ज्या ज्या देवाला तूं आव्हान करशील तो तो तुला वश होऊन राहील १७. सारांश, देव निष्काम असो अथवा सकाम असो; मंत्रानें भारून गेल्या-वर दासाप्रमाणें तो तुझ्यापुढें नम्र होईल आणि अधीन होऊन राहील १८. वैशंपायन सांगतात:—हे जनमेजयराजा, निंद्य यत्किंचितही पात्र नसलेली ती कन्या त्या द्विज-श्रेष्ठाला पुनरपि नाकारण्यास समर्थ झाली नाहीं १९. ह्यामुळें, हे राजा, निर्दोष अव-यवांनीं युक्त असलेल्या त्या कन्येला अथर्वशिरउपनिषदामध्यें प्रसिद्ध असलेल्या मंत्रस-मुदायाचा त्या ब्राह्मणानें उपदेश केला २०; आणि, त्या मंत्रसमुदायाचा उपदेश

कुन्तिभोजमुवाच ह । उषितोऽस्मि सुखं राजन्कन्यया परितोषितः २१ तव गेहेषु विहितः सदा सुप्रतिपूजितः । साधयिष्यामहे तावदित्युक्त्वान्तरधीयत २२ स तु राजा द्विजं दृष्ट्वा तत्रैवान्तर्हितं तदा । बभूव विस्मयाविष्टः पृथां च समपूजयत् २३ [११५९९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि पृथाया मन्त्रप्राप्तौ पञ्चाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ गते तस्मिन्द्विजश्रेष्ठे कस्मिंश्चित्कारणान्तरे । चिन्तयामास सा कन्या मन्त्रग्रामबलाबलम् १ अयं वै कीदृशस्तेन मम दत्तो महात्मना । मन्त्रग्रामो बलं तस्य ज्ञास्ये नातिचिरादिति २ एवं संचिन्तयन्ती सा ददर्शर्तुं यदृच्छया । व्रीडिता साभवद्बाला कन्याभावे रजस्वला ३ ततो हर्म्यतलस्था सा महार्हशयनोचिता । प्राच्यां दिशि समुद्यन्तं ददर्शादित्यमण्डलम् ४ तत्र बद्धमनोदृष्टिरभवत्सा सुमध्यमा । न चातप्यत रूपेण भानोः सन्ध्यागतस्य सा ५ तस्या दृष्टिरभूद्दिव्या

केल्यावर, हे राजाधिराज, तो त्या कुंतिभोजाला ह्मणाला " हे राजा, मी तुझ्या गृहामध्यें सुखानें राहिलों व तुझ्या कन्येनें मला संतुष्ट केलें २१. तुझ्या गृहामध्यें माझा सर्वदां चांगला आदरसत्कार झाला असल्यामुळें मी फारच तृप्त झालों आहें. तस्मात्, आतां मी जातों. " असें ह्मणून तो ब्राह्मण तेथेंच अंतर्धान पावला २२. ह्याप्रमाणें जागच्या जागींच द्विज अंतर्धान पावल्याचें अवलोकन करून तो कुंतिभोजराजा विस्मयचकित झाला आणि कुंतीची प्रशंसा करूं लागला २३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वापैकीं कुंतीच्या मंत्रप्राप्तीविषयीं तीनशें पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ३०५ ॥

वैशंपायन सांगतातः—कांहीं कारणाकरितां तो द्विजश्रेष्ठ तेथून गेल्यानंतर मंत्रसमुदायाचें बलाबल पहाण्याचा विचार त्या कन्येच्या मनामध्यें आला १. " त्या महात्म्यानें हा कशा प्रकारचा मंत्रसमुदाय दिला आहे, त्याचें सामर्थ्य आपण लवकरच समजून घेतलें पाहिजे " २. ह्याप्रमाणें ती मनामध्यें विचार करूं लागली असतां एकाएकीं ऋतु प्राप्त झाल्याचें तिनें अवलोकन केलें आणि अवलोकन करितांक्षणीं ती बाला कुंती कन्यावस्थेंत असतांनाच रजस्वला झाली असल्यामुळें लज्जित झाली ३. तदनंतर मोठ्या मूल्यवान् शय्येवर शयन करणारी ती कुंती वाड्याचे गच्चीवर उभी असतांना पूर्वदिशेस उदय पावत असलेलें सूर्यमंडल तिनें अवलोकन केलें ४. त्या सूर्यमंडलाकडे त्या सुंदरीचें मन व दृष्टि हीं अगदीं लागून राहिलीं आणि

सापश्यद्दिव्यदर्शनम् । आमुक्तकवचं देवं कुण्डलाभ्यां विभूषितम् ६ तस्याः
कौतूहलं त्वासीन्मन्त्रं प्रति नराधिप । आह्वानमकरोत्साथ तस्य देवस्य
भाविनी ७ प्राणानुपस्पृश्य तदा ह्याजुहाव दिवाकरम् । आजगाम ततो
राजंस्त्वरमाणो दिवाकरः ८ मधुपिङ्गो महाबाहुः कम्बुग्रीवो हसन्निव ।
अङ्गदी बद्धमुकुटो दिशः प्रज्वालयन्निव ९ योगात्कृत्वा द्विधात्मानमाजगाम
तताप च । आबभाषे ततः कुन्तीं साम्ना परमवल्गुना १० आगतोस्मि
वशं भद्रे तव मन्त्रबलात्कृतः । किं करोमि वशो राज्ञि ब्रूहि कर्ता
तदस्मि ते ११ कुन्त्युवाच ॥ गम्यतां भगवंस्तत्र यत एवागतो ह्यसि ।
कौतूहलात्समाहूतः प्रसीद भगवन्निति १२ सूर्य उवाच ॥ गमिष्येहं
यथा मा त्वं ब्रवीषि तनुमध्यमे । न तु देवं समाहूय न्याय्यं प्रेषयितुं
वृथा १३ तवाभिसंधिः सुभगे सूर्यात्पुत्रो भवेदिति । वीर्येणाप्रतिमो

संधिकालामध्येंच असलेल्या त्या सूर्याच्या रूपानें तिला तापही झाला नाहीं ५ पहातां पहातां तिला दिव्यदृष्टि एकदम प्राप्त झाली आणि त्या मंडलामध्यें दिव्य मुद्रा व कवच धारण करून कुंडलांनीं विभूषित झालेला देव तिनें अवलोकन केला ६. हे प्रजाधिपते जनमेजया, सूर्याला अवलोकन केल्याबरोबर त्या ब्राह्मणानें दिलेल्या मंत्राचें सामर्थ्य पहाण्याविषयीं तिला उत्सुकता उत्पन्न झाली व त्या सुंदरीनें त्या देवाचें आह्वान केलें ७. सारांश, आचमन करून व नेत्रादि इंद्रियांना उदकाचा स्पर्श करून तिनें सूर्याचें आह्वान केलें असतां, हे जनमेजयराजा, तो सूर्य सत्वर तेथें आला ८. मधाप्रमाणें पिंगटवर्ण, आजानुबाहु, शंखासारिखा तीन रेषांनीं युक्त असलेला कंठ, बाहुभूषणें आणि मस्तकीं बांधलेला मुकुट ह्यांनीं युक्त असलेला तो सूर्य दिशा उज्ज्वल करीत करीत आणि हंसत हंसत तेथें आला ९. योगसामर्थ्यानें त्यानें आपल्या आत्म्याचे दोन भाग केले असल्यामुळें एका रूपाने तो तेथें आला आणि दुसऱ्या रूपानें तसाच आकाशामध्यें प्रकाशत राहिला. असो. आल्यानंतर फारच मोहक व सौम्य शब्दांनीं तो कुंतीला ह्मणाला १० "हे कल्याणि, तुझ्या मंत्रसामर्थ्यानें आकर्षिल्यामुळें मी तुझ्या अधीन होऊन येथें आलों आहें. हे राजकन्ये, मी तुझ्या अधीन आहें. ह्यास्तव, तुझी काय इच्छा असेल ती परिपूर्ण करण्यास मी सिद्ध आहें" ११. कुंती ह्मणतेः— हे भगवन् आपण जिकडून आलां तिकडे परत जा. मंत्रसामर्थ्य अवलोकन करण्याची उत्सुकता प्राप्त झाल्यामुळें मीं आपणाला आह्वान केलें होतें. ह्यास्तव, हे भगवन्, आतां मजवर कृपा (करून आपण परत जाण्याचें) करा १२. सूर्य ह्मणतोः—हे कृशोदरि, तुझ्या सांगण्याप्रमाणें मी परत जाईन; परंतु, देवाला आह्वान करून

लोके कवची कुण्डलीति च १४ सा त्वमात्मप्रदानं वै कुरुष्व गजगा-
मिनि । उत्पत्स्यति हि पुत्रस्ते यथासंकल्पमङ्गने १५ अथ गच्छाम्यहं
भद्रे त्वया सङ्गम्य सुस्मिते । यदि त्वं वचनं नाद्य करिष्यसि मम
प्रियम् १६ शापिष्ये त्वामहं क्रुद्धो ब्राह्मणं पितरं च ते । त्वत्कृते तांश्च
धक्ष्यामि सर्वानपि न संशयः १७ पितरं चैव ते मूढं यो न वेत्ति तवान-
यम् १८ तस्य च ब्राह्मणस्याद्य योसौ मन्त्रमदात्तव । शीलवृत्तमविज्ञाय
धास्यामि विनयं परम् १९ एते हि विबुधाः सर्वे पुरन्दरमुखा दिवि ।
त्वया प्रलब्धं पश्यन्ति स्मयन्त इव भाविनि २० पश्य चैनान्सुरगणा-
न्दिव्यं चक्षुरिदं हि ते । पूर्वमेव मया दत्तं दृष्टवत्यसि येन माम् २१ वैश-
म्पायन उवाच ॥ ततोपश्यत्त्रिदशान्राजपुत्री सर्वानेव स्वेषु धिष्ण्येषु
खस्थान् । प्रभावन्तं भानुमन्तं महान्तं यथादित्यं रोचमानांस्तथैव २२
सा तान्दृष्ट्वा व्रीडमानेव बाला सूर्यं देवी वचनं प्राह भीता । गच्छ त्वं वै
गोपते स्वं विमानं कन्याभावाद्दुःख एवापचारः २३ पिता माता गुरवश्चैव

कांहींएक उपयोग करून न घेतां त्याला परत पाठविणें योग्य नाहीं १३. हे महाभाग्यवति
कन्ये, वीर्यानें जगतामध्यें अप्रतिम व कवचकुंडलें धारण केलेला असा पुत्र सूर्यापासून
असावा अशी तुझी इच्छा होती १४. ह्यास्तव, हे गजगामिनि, तूं माझ्या स्वाधीन हो. ह्मणजे
हे स्त्रिये, तुला मनाप्रमाणें पुत्र प्राप्त होईल १५. हे कल्याणि, हे सुहास्यवदने, तुझ्याशीं
समागम करून मी परत जाईन. तूं जर आज माझ्या सांगण्याप्रमाणें माझें प्रिय न कर-
शील तर १६ मी क्रुद्ध होऊन तुला, त्या दुर्वास ब्राह्मणाला व तुझ्या पित्यालाही शाप देईन
आणि तुझ्याकरितां त्या शापाच्या योगानें मी सर्वांना व तुझा मूर्खपणा न जाणणाऱ्या
तुझ्या पित्याला दग्ध करून टाकीन ह्यांत संशय नाहीं १७, १८ तुझें शील व वर्तन
ह्यांचा विचार न करितां ज्या ब्राह्मणानें तुला मंत्र दिला त्याला तर मी मोठीच
शिक्षा करीन १९. हे सुंदरि, हे इंद्रप्रभृति सर्व देव तूं फशी पाडिलेल्या माझ्याकडे
हंसत हंसत स्वर्गांतून पहात आहेत २०. ह्या देवगणांना तूं अवलोकन कर. तुला
ही दिव्यदृष्टि मीं पूर्वींच दिलेली आहे आणि ह्या दृष्टीमुळेंच तुला माझें दर्शन झालें
आहे २१. वैशंपायन सांगतातः— तदनंतर आपआपल्या विमानांत बसलेल्या सर्वही
देवांना तिनें अवलोकन केलें. ते देव तेजस्वी व कांतिमान् अशा प्रचंड सूर्याप्रमाणेंच झळकत
होते २२. त्या देवांना अवलोकन करून किंचित् लाजूं लागलेली ती बाला राजकन्या भय-
भीत होऊन सूर्याला ह्मणाली "हे गोपते, तूं आपल्या विमानामध्यें परत जा. मी (अल्प-
वयी) कन्याच असल्यामुळें माझ्या हातून हा भयंकर अपराध घडला आहे २३. पिता

येन्य देहस्यास्य प्रभवन्ति प्रदाने। नाहं धर्मं लोपयिष्यामि लोके स्त्रीणां वृत्तं पूज्यते देहरक्षा २४ मया मन्त्रबलं ज्ञातुमाहूतस्त्वं विभावसो । बाल्य-द्बालेति तत्कृत्वा क्षन्तुमर्हसि मे विभो २५ सूर्य उवाच ॥ बालेतिकृत्वा तनयं तवाहं ददानि नान्या तनयं लभेत । आत्मप्रदानं कुरु कुन्ति कन्ये शान्तिस्तवैवं हि भवेच्च भीरु २६ न चापि गन्तुं युक्तं हि मया मिथ्या-कृतेन वै । असमेत्य त्वया भीरु मन्त्राहूतेन भाविनि । २७ गमिष्याम्यन-वद्याङ्गि लोके समवहास्यताम् । सर्वेषां विबुधानां च वक्तव्यः स्यां तथा शुभे २८ सा त्वं मया समागच्छ पुत्रं लप्स्यसि मादृशम् । विशिष्टा सर्वलोकेषु भविष्यसि न संशयः २९ [११६२८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि सूर्याह्वाने षडधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ सा तु कन्या बहुविधं ब्रुवन्ती मधुरं वचः । अनु-नेतुं सहस्रांशुं न शशाक मनस्विनी १ न शशाक यदा बाला प्रत्याख्यातुं ।

माता आणि इतरही वडील असलेलीं माणसें ह्या माझ्या देहाचें दान करण्यास मुखत्यार आहेत. तस्मात्, मी धर्मलोप करणार नाहीं; देहरक्षण करणें हें जें स्त्रियांचें वर्तन त्याची जगतामध्ये प्रशंसा होत असते २४. हे सूर्य, मीं मंत्रसामर्थ्य जाणण्याक-रितां पोरपणामुळें तुझें आह्वान केलें. तस्मात्, मूल आहे असें समजून, हे प्रभो, आपण माझ्या अपराधाची क्षमा करा " २५ सूर्य ह्मणताः—तूं अल्पवयी आहेस असें समजू-नच मी तुला पुत्र देणार आहें इतर स्त्रीला माझ्यापासून पुत्र प्राप्त होणार नाहीं. यास्तव, हे कुंति, तूं माझ्या स्वाधीन हो. ह्मणजे, हे विनयशील कन्ये, तुझा घात होणार नाहीं २६. हे विनयशील सुंदरि, ज्याअर्थी तूं माझें मंत्रानें आह्वान केलें आहेस त्याअर्थी तुझ्याशीं समागम न झाल्यामुळें आगमन व्यर्थ होऊन मी परत जाणें योग्य नाहीं २७. कारण, असें जर झालें तर, हे सुंदरि, जगतामध्ये मी उपहासाला पात्र होईन आणि, हे कल्याणि, सर्व देवही मला दोष लावू लागतील २८. तस्मात्, तूं माझ्याशीं समागम कर ह्मणजे माझ्यासारिखा पुत्रही तुला प्राप्त होईल आणि सर्वलो-कांमध्यें तूं अधिक होशील यांत संशय नाहीं २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वांपैकीं सूर्याच्या आह्वाना-विषयीं तीनशें सहावा अध्याय समाप्त झाला ॥३०६॥

वैशंपायन सांगतातः—ती अविचारी कन्या नानाप्रकारांनीं मधुर भाषण करूं लागली; परंतु, सूर्याचें मन वळविण्यास ती समर्थ झाली नाहीं १. हे राजा, सूर्याला

तमोनुदम् । भीता शापात्ततो राजन्दध्यौ दीर्घमथान्तरम् २ अनागसः पितुः शापो ब्राह्मणस्य तथैव च । मन्निमित्तः कथं नस्यात्क्रुद्धादस्माद्विभावसोः ३ बालेनापि सता मोहाद्भृशं सापह्नवान्यपि । नात्यासादयितव्यानि तेजांसि च तपांसि च ४ साहमद्य भृशं भीता गृहीता च करे भृशम् । कथं त्वकार्यं कुर्यां वै प्रदानं ह्यात्मनः स्वयम् ५ वैशम्पायन उवाच ॥ सा वै शापपरित्रस्ता बहु चिन्तयती हृदा । मोहेनाभिपरीताङ्गी स्मयमाना पुनःपुनः ६ तं देवमब्रवीद्भीता बन्धूनां राजसत्तम । व्रीडाविह्वलया वाचा शापत्रस्ता विशाम्पते ७ कुन्त्युवाच ॥ पिता मे ध्रियते देव माता चान्ये च बान्धवाः । न तेषु ध्रियमाणेषु विधिलोपो भवेदयम् ८ त्वया तु सङ्गमो देव यदि स्याद्विधिवर्जितः । मन्निमित्तं कुलस्यास्य लोके कीर्तिर्नशेत्ततः ९ अथवा धर्ममेतं त्वं मन्यसे तपतां वर । ऋते प्रदानाद्बन्धुभ्यस्तव कामं करोम्यहम् १० आत्मप्रदानं दुर्धर्ष

नाकारणें जेव्हां तिच्या हातून शक्य होईना तेव्हां शापाला भ्यालेली ती कन्या बराच वेळ आपल्याशीं विचार करूं लागली २. (ती ह्मणाली) " माझ्याकरितां ह्या क्रुद्ध झालेल्या सूर्यापासून निरपराधी पित्याला आणि त्याचप्रमाणें त्या ब्राह्मणाला काय केलें असतां शाप होणार नाहीं ? ३. बालक सज्जन जरी झाला तरी तो अतिशय मोहाच्या तावडींत सांपडत असल्यामुळें सूर्यासारिख्या तेजोनिधीशीं आणि दुर्वासासारिख्या तपोनिधीशीं, ते जरी दयाळू असले तरी, अतिप्रसंग करितां उपयोगीं नाहीं ४. तस्मात्, वारंवार हात धरिला गेल्यामुळें फारच भेदरून गेलेली मी स्वतः आपलें दान हें अकार्य करण्यास आज कशी प्रवृत्त होऊं ? " ५. वैशंपायन सांगतात:—शापाला भिऊन गेल्यामुळें कांहीएक सुचनाशी झालेली ती कन्या मनामध्यें अनेक प्रकारांनीं चिंतन करू लागली आणि वारंवार हास्य करूं लागली ६. नंतर हे नृपश्रेष्ठा प्रजाधिपते जनमेजया, बांधवांना भ्यालेली आणि शापभयानेंही घाबरून गेलेली ती कन्या लज्जेमुळें सर्व शब्द उमटत नाहींत अशा रीतीनें त्या देवाला ह्मणाली ७ " हे देव, माझा पिता, माता आणि इतर बांधव जिवंत आहेत; तस्मात्, ते जिवंत असतांना हें धर्माचें उल्लंघन माझ्या हातून होऊं नये ८. हे देव, धर्माला सोडून जर आपल्याशीं माझा समागम झाला तर माझ्याकरितां जगतामध्यें ह्या कुलाची कीर्ति नाहींशी होईल ९. तस्मात्, हे प्रकाशवानांमध्यें श्रेष्ठ, हा धर्मच आहे असें आपणांला जर वाटत असेल तर बांधवांनीं दान करण्याची अपेक्षा न करितां मी आपलें प्रिय करीन १०. परंतु, हे अनुल्लंघनीय सूर्य, मी जरी आपल्या स्वाधीन

तव कृत्वा सती त्वहम् । त्वयि धर्मो यशश्चैव कीर्तिरायुश्च देहिनाम् ११ सूर्य उवाच ॥ न ते पिता न ते माता गुरवो वा शुचिस्मिते । प्रभवन्ति वरारोहे भद्रं ते शृणु मे वचः १२ सर्वान्कामयते यस्मात्कमेर्धातोश्च भाविनि । तस्मात्कन्येह सुश्रोणि स्वतन्त्रा वरवर्णिनि १३ नाधर्मश्चरितः कश्चित्त्वया भवति भाविनि । अधर्मं कुत एवाहं चरेयं लोककाम्यया १४ अनावृताः स्त्रियः सर्वा नराश्च वरवर्णिनि । स्वभाव एष लोकानां विकारोऽन्य इति स्मृतः १५ सा मया सह सङ्गम्य पुनः कन्या भविष्यसि । पुत्रश्च ते महाबाहुर्भविष्यति महायशाः १६ कुन्त्युवाच ॥ यदि पुत्रो मम भवेत्त्वत्तः सर्वतमोनुद । कुण्डली कवची शूरो महाबाहुर्महाबलः १७ सूर्य उवाच॥भविष्यति महाबाहुः कुण्डली दिव्यवर्मभृत् । उभयं चामृतमयं तस्य भद्रे भविष्यति १८ कुन्त्युवाच ॥ यद्येतदमृतादस्ति कुण्डले वर्म चोत्तमम्। मम पुत्रस्य यं वै त्वं मत्त उत्पादयिष्यसि१९ अस्तु मे सङ्गमो देव यथोक्तं भगवंस्त्वया।त्वद्वीर्यरूपसत्त्वौजा धर्मयुक्तो भवेत्स च २० सूर्य उवाच ॥

झालें तरी माझी शुद्धि कायम राहिली पाहिजे. प्राण्याचें आयुष्य, धर्म, यश आणि कीर्ति हीं सर्व तुझ्यावरच अवलंबून आहेत "११. सूर्य ह्मणतोः—हे सुहास्यवदने, पिता, माता आणि गुरु ह्यांपैकीं कोणाचीही तुझ्यावर मालकी नाहीं. हे सुंदरि, तुझें कल्याण असो. तूं माझें बोलणें ऐकून घ १२. सर्वांची कामना जी धरिते ती कन्या, अशा व्युत्पत्तीनें ज्या-अर्थी कमि धातूपासून कन्या हा शब्द निघालेला आहे त्याअर्थी, हे उत्कृष्ट स्त्रिये, हे सुश्रोणि, कन्या स्वतंत्र आहे १३. हे सुंदरि, माझ्याशीं समागम करण्यांत तुझ्या हातून कांहींएक अधर्म होणार नाहीं. लोकांचें हित करण्याची जर मला इच्छा आहे तर अधर्म मला कोठून घडणार ? १४. हे सुंदरि, सर्व स्त्रिया व पुरुष अनियन्त्रित असणें हीच लोकांची स्वाभाविक स्थिति होय. विवाहसंबंध वगैरे हा सर्व विकार होता १५. तूं माझ्याशीं समागम केल्यानंतरही पुनरपि (शुद्ध) कन्याच होशील आणि तुला महापराक्रमी व महाकीर्तिमान् पुत्र होईल १६. कुंती ह्मणतेः—हे सर्वांधकारनाशक, आपणांपासून जर मला पुत्र प्राप्त व्हावयाचा असेल तर तो शूर, महापराक्रमी, महाबलाढ्य आणि कवचकुंडलें धारण केलेला असा प्राप्त व्हावा १७. सूर्य ह्मणतोः—हे कल्याणि, महापराक्रमी व दिव्य कवच आणि कुंडलें धारण केलेला असा तुला पुत्र होईल आणि कवच व कुंडलें हीं त्याचीं दोन्हींही अमृतमय होतील १८. कुंती ह्मणतेः— माझे ठिकाणीं आपण जो पुत्र उत्पन्न कराल त्याला उत्कृष्ट कवच आणि कुंडलें हीं जर अमृतमय प्राप्त व्हावयाचीं असतील तर १९, हे भगवन्, आपल्याशीं माझा समागम

अदित्या कुण्डले राज्ञि दत्ते मे मत्तकाशिनि । तस्य दास्यामि वै भीरु वर्म चैवेदमुत्तमम् २१ कुन्त्युवाच ॥ परमं भगवन्नेवं मङ्गमिष्ये त्वया सह । यदि पुत्रो भवेदेवं यथा वदसि गोपते २२ वैशम्पायन उवाच ॥ तथेत्युक्त्वा तु तां कुन्तीमाविवेश विहङ्गमः । स्वर्भानुशत्रुर्योगात्मा नाभ्यां पस्पर्श चैव ताम् २३ ततः सा विह्वलेवासीत्कन्या सूर्यस्य तेजसा । पपात चाथ सा देवी शयने मूढचेतना २४ सूर्य उवाच ॥ साधयिष्यामि सुश्रोणि पुत्रं वै जनयिष्यसि । सर्वशस्त्रभृतां श्रेष्ठं कन्या चैव भविष्यसि २५ वैशम्पायन उवाच ॥ ततः सा व्रीडिता बाला तदा सूर्यमथाब्रवीत् । एवमस्त्विति राजेन्द्र प्रस्थितं भूरिवर्चसम् २६ इति स्मोक्ता कुन्तिराजात्मजा सा विवस्वन्तं याचमाना सलज्जा । तस्मिन्पुण्ये शयनीये पपात मोहाविष्टा भज्यमाना लतेव २७ तिग्मांशुस्तां तेजसा मोहयित्वा योगेनाविश्यात्मसंस्थां चकार । न

होवो. हे देव, आपल्यापासून माझे ठिकाणीं उत्पन्न होणारा तो पुत्र धर्मनिष्ठ असून आपणांसारिखा वीर्यवान्, रूपवान्, धैर्यवान् आणि बलवान् होवो २०. सूर्य ह्मणतो:— हे सुंदरि राजकन्ये, अदितीनें जीं कुंडलें मला दिलीं आहेत तीं मी ह्याला देईन आणि हे भीरु, हें उत्कृष्ट कवचही त्याला देईन २१. कुंती ह्मणते:—हे गोपते, उत्तम आहे. हे भगवन्, आपल्या ह्मणण्याप्रमाणें जर पुत्र होणें असेल तर मी आपल्याशीं समागम करीन २२. वैशंपायन सांगतात:— ह्यानंतर 'ठीक आहे' असें ह्मणून सूर्यानें कुंतीशीं समागम केला ह्मणजे त्या योगात्म्या सूर्यानें तिला फक्त नाभीचे ठिकाणीं स्पर्श मात्र केला २३. तदनंतर सूर्याच्या तेजानें ती कन्या अगदीं विह्वल झाली आणि बेशुद्ध होऊन ती राजपुत्री शय्येवर पडली २४. (नाभीला स्पर्श केल्यानंतर) सूर्य ह्मणाला:— हे सुंदरि, मी आतां जातों. सर्व शस्त्रधारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असा पुत्र तुला होईल आणि तूं पुनरपि कन्याच होशील २५. वैशंपायन सांगतात:— हे राजाधिराज जनमेजया, ह्याप्रमाणें सूर्यानें सांगितल्या-नंतर लज्जित झालेली ती बाला चालूं लागलेल्या त्या महातेजस्वी सूर्याला 'तथास्तु' असें ह्मणाली २६. सारांश, सूर्याची प्रार्थना करीत असलेल्या त्या कुंतिभोजराजाच्या कन्येला सूर्यानें कवच कुंडलांनीं युक्त आणि वीर्यादि गुणांनीं संपन्न असा पुत्र होईल ह्मणून सांगितलें असतां ती लज्जित झाली आणि वायूनें मोडून जाणाऱ्या लतेप्रमाणें ही मोहित झाल्यामुळें ती त्या पवित्र शय्येवर पडली २७. तदनंतर तिला आपल्या तेजानें मोहित केल्यावर योगसामर्थ्यानें तिच्या शरीरामध्यें प्रवेश करून त्या सूर्यानें तिला मुळींच दूषित न करितां आपल्या अधीन करून घेतलें आणि नंतर ती

चैवैनां दूषयामास भानुः संज्ञां लेभे भूय एवाथ बाला २८ [११६५६]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि सूर्यकुन्तीसमागमे सप्ताधिकत्रिशततमोऽध्यायः॥३०७॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो गर्भः समभवत्पृथायाः पृथिवीपते । शुक्ले दशोत्तरे पक्षे तारापतिरिवाम्बरे १ सा बान्धवभयाद्बाला गर्भं तं विनिगूहती । धारयामास सुश्रोणी न चैनां बुबुधे जनः २ न हि तां वेद नार्यन्या काचिद्धात्रेयिकामृते । कन्यापुरगतां बालां निपुणां परिरक्षणे ३ ततः कालेन सा गर्भं सुषुवे वरवर्णिनी । कन्यैव तस्य देवस्य प्रसादादमरप्रभम् ४ तथैवाबद्धकवचं कनकोज्ज्वलकुण्डलम् । हर्यक्षं वृषभस्कन्धं यथास्य पितरं तथा ५ जातमात्रं च तं गर्भं धात्र्या संमन्त्र्य भाविनी । मञ्जूषायां समाधाय स्वास्तीर्णायां समन्ततः ६ मधूच्छिष्टस्थितायां सा सुखायां रुदती तथा । श्लक्ष्णायां सुपिधानायामश्वनद्यामवासृजत् ७ जानती चाप्यकर्तव्यं कन्याया गर्भधारणम् । पुत्रस्नेहेन सा राजन्करुणं

बाला पुनरपि शुद्धीवर आली २८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वापैकीं सूर्य आणि कुंती ह्यांच्या समागमाविषयीं तीनशें सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ३०७ ॥

वैशंपायन सांगतातः—हे पृथ्वीपते, अकराव्या शुक्लपक्षामध्यें (ह्मणजे माघ शुक्लप्रतिपदेचे दिवशीं) आकाशांत ज्याप्रमाणें नक्षत्राधिपति चंद्रमा उदयास येतो त्याप्रमाणें पृथेचे ठिकाणीं गर्भ उत्पन्न झाला १. बांधवांच्या भीतीमुळें गर्भ गुप्त ठेवण्याची इच्छा धरणाऱ्या त्या सुंदरी कुंतीनें तो गर्भ धारण केला असतां ती गर्भिणी ह्मणून कोणाच्याही समजण्यांत आलें नाहीं २. गर्भ गुप्त ठेवण्याविषयीं निपुण अशी ती बाला अंतःपुरामध्यें असतांना दाईवांचून दुसऱ्या कोणत्याही स्त्रीला ती गर्भिणी असल्याचें समजलें नाहीं ३. तदनंतर ती कन्याच असतांना (ह्मणजे ऋतुमती झाल्यावांचूनच) त्या देवाच्या प्रसादामुळें त्या सुंदरीला कांहीं काळ लोटल्यावर देवासारखा कांतिमान् पुत्र झाला ४. आपल्या पित्याप्रमाणेंच त्याला कवच होतें, सुवर्णाचीं उज्वल कुंडलें त्याच्या कानांमध्यें होतीं आणि त्याचे नेत्र सिंहासासारिखे असून स्कंद वृषभासारखे होते ५. गर्भ उपजल्याबरोबर त्या सुंदरी कुंतीनें दाईचा विचार घेऊन रडत रडत त्याला एका पेटीमध्यें ठेविलें. त्या पेटीमध्यें सर्व बाजूंनीं वस्त्र लाविलेलें होतें; मेणानें ती चोपडलेली होती; झांकणही तिचें चांगलें घट्ट होतें आणि ती गुळगुळीत असल्यामुळें सुखावह होती. अशा प्रकारच्या पेटींत तो गर्भ घालून तिनें अश्वनदीमध्यें सोडून

पर्यदेवयत् ८ समुत्सृजन्ती मञ्जूषामश्वनद्यां तदा जले । उवाच रुदती
कुन्ती यानि वाक्यानि तच्छृणु ९ स्वस्ति ते चान्तरिक्षेभ्यः पार्थिवेभ्यश्च
पुत्रक । दिव्येभ्यश्चैव भूतेभ्यस्तथा तोयचराश्च ये १० शिवास्ते सन्तु
पन्थानो मा च ते परिपन्थिनः।आगताश्च तथा पुत्र भवन्त्वद्रोहचेतसः ११
पातु त्वां वरुणो राजा सलिले सलिलेश्वरः । अन्तरिक्षेन्तरिक्षस्थः पवनः
सर्वगस्तथा १२ पिता त्वां पातु सर्वत्र तपनस्तपतां वरः । येन दत्तोसि
मे पुत्र दिव्येन विधिना किल १३ आदित्या वसवो रुद्राः साध्या विश्वे
च देवताः । मरुतश्च महेन्द्रेण दिशश्च सदिगीश्वराः १४ रक्षन्तु त्वां सुराः
सर्वे समेषु विषमेषु च । वेत्स्यामि त्वां विदेशेपि कवचेनाभिसूचितम् १५
धन्यस्ते पुत्र जनको देवो भानुर्विभावसुः । यस्त्वां द्रक्ष्यति दिव्येन
चक्षुषा वाहिनीगतम् १६ धन्या सा प्रमदा या त्वां पुत्रत्वे कल्पयिष्यति ।
यस्यास्त्वं तृषितः पुत्र स्तनं पास्यसि देवज १७ को नु स्वप्नस्तया दृष्टो
या त्वामादित्यवर्चसम् । दिव्यवर्मसमायुक्तं दिव्यकुण्डलभूषितम् १८

दिला ६. ७. हे राजा, कन्यावस्थेमध्यें गर्भधारण अयोग्य आहे असें जरी ती कुंती समजत होती तरी, पुत्रप्रेमामुळें ती दीन वाणीनें शोक करूं लागली ८. अश्वनदीच्या जलप्रवाहामध्यें पेटी सोडतांना कुंती रडत रडत काय ह्मणाली तें ऐक ९. "हे पुत्रा, पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग आणि उदक ह्यांचे ठिकाणीं रहाणाऱ्या प्राण्यांपासून तुझें रक्षण होवो १०. तुला मार्ग सुखकर होवोत; तुला कोणीही शत्रु नसोत; आणि त्याचप्रमाणें काहीं शत्रु उत्पन्न झाले असल्यास तुझ्याविषयीं त्यांचें मन द्रोहरहित होवो ११. उदकामध्यें जलाधिपति वरुणराजा तुझें रक्षण करो; आणि त्याचप्रमाणें अंतरिक्षामध्यें तूं असतांना अंतरिक्षांत असलेला सर्वगामी वायु तुझें परिपालन करो १२. हे पुत्रा, खरोखर दिव्य विधीनें ज्यानें मला तूं पुत्र अर्पण केला तो प्रकाशवानांमध्ये श्रेष्ठ असलेला तुझा पिता सूर्य सर्व ठिकाणीं तुझें रक्षण करो १३. आदित्य, वसु, रुद्र, साध्य, विश्वेदेव, इंद्रासहवर्तमान मरुद्गण, दिग्पालांसहवर्तमान दिशा १४ आणि इतरही सर्व देव सम आणि विषम प्रदेशांमध्यें तुझें रक्षण करोत. तूं विदेशी जरी गेलास तरी कवचानें तुझी ओळख पटणार असल्यामुळें मी तुला ओळखीन १५. हे पुत्रा, सैन्यामध्यें जो तुला दिव्य दृष्टीनें अवलोकन करील तो तुझा प्रभारूप धनानें युक्त असलेला पिता सूर्य देव धन्य आहे १६. हे देवापासून उत्पन्न झालेल्या पुत्रा, जी तरुण स्त्री तुला पुत्र मानील आणि तृषाक्रांत झाल्यावर जिचें तूं स्तनपान करिशील ती धन्य आहे १७. सूर्यासारिखें तेज, दिव्य कवच, कमलपत्रांसारिखे विशाल

पद्मायतविशालाक्षं पद्मताम्रदलोज्ज्वलम् । सुललाटं सुकेशान्तं पुत्रत्वे कल्पयिष्यति १९ धन्या द्रक्ष्यन्ति पुत्र त्वां भूमौ संसर्पमाणकम् । अव्यक्तकलवाक्यानि वदन्तं रेणुगुण्ठितम् २० धन्या द्रक्ष्यन्ति पुत्र त्वां पुनर्यौवनगोचरम् । हिमवद्वनसंभूतं सिंहं केसरिणं यथा २१ एवं बहुविधं राजन्विलप्य करुणं पृथा । अवासृजत मञ्जूषामश्वनद्यां तदा जले २२ रुदती पुत्रशोकार्ता निशीथे कमलेक्षणा । धात्र्या सह पृथा राजन्पुत्रदर्शनलालसा २३ विसर्जयित्वा मञ्जूषां संबोधनभयात्पितुः । विवेश राजभवनं पुनः शोकातुरा ततः २४ मञ्जूषा त्वश्वनद्याः सा ययौ चर्मण्वतीं नदीम् । चर्मण्वत्याश्च यमुनां ततो गङ्गां जगाम ह २५ गङ्गायाः सूतविषयं चम्पामनुययौ पुरीम् । स मञ्जूषागतो गर्भस्तरङ्गैरुह्यमानकः २६ अमृतादुत्थितं दिव्यं तनुवर्म सकुण्डलम् । धारयामास तं गर्भं दैवं च विधिनिर्मितम् २७ [११६८३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि कर्णपरित्यागेऽष्टाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०८ ॥

नेत्र, आरक्तवर्ण कमलाच्या पाकळ्यांप्रमाणें उज्ज्वल कांति, उत्कृष्ट ललाट आणि मनोहर केश ह्यांनीं युक्त व दिव्य कुंडलांनीं भूषित अशा तुला जी स्त्री पुत्र मानील तिला काय बरें स्वप्न पडलें असेल ? १८, १९. हे पुत्रा, भूमीवर, रांगतांना धुळीनें अंग भरलें असतांना आणि अस्पष्ट व मधुर शब्द उच्चारीत असतांना जे तुला अवलोकन करतील त्यांची धन्य आहे २०. हिमालयपर्वतावरील वनामध्यें उत्पन्न झालेल्या आणि आयाळानें युक्त असलेल्या सिंहाप्रमाणें यौवनावस्थेमध्यें आलेल्या तुला जे अवलोकन करितील ते धन्य आहेत" २१. ह्याप्रमाणें नानाप्रकारानीं दीन वाणीनें विलाप करून, हे जनमेजयराजा, कुंतीनें ती पेटी अश्वनदींत जलप्रवाहामध्यें सोडिली २२. सारांश, पुत्राला पहाण्याची लालसा उत्पन्न झाल्यामुळें पुत्रशोकानें व्याकुल झालेली आणि दायीसहवर्तमान असलेली ती कमलनयना कुंती पित्याला समजेल ह्या भीतीनें मध्यरात्रीं रडत रडत ती पेटी नदीमध्यें सोडून देऊन शोक करीत करीत पुनरपि राजवाड्यामध्यें प्रविष्ट झाली २३, २४. अश्वनदीमध्यें सोडिलेली ती पेटी चर्मण्वतीनदीमध्यें गेली; चर्मण्वतींतून यमुनेमध्यें गेली आणि नंतर यमुनेंतून वाहत वाहत गंगेमध्यें गेली २५. गंगेच्या लाटांनीं हिकडे तिकडे हेलकावे खात असलेला तो पेटींतील गर्भ वहात वहात अंगदेशामध्यें चंपानगरीला जाऊन पोंचला २६. ईश्वराचा अनुग्रह ज्याच्यावर झालेला होता असा तो गर्भ आणि अमृतापासून उत्पन्न झालेलें तें शरीरसंबद्ध दिव्य कवच

वैशम्पायन उवाच ॥ एतस्मिन्नेव काले तु धृतराष्ट्रस्य वै सखा । सूतो-
धिरथ इत्येव सदारो जाह्नवीं ययौ १ तस्य भार्याभवद्राजन्रूपेणासदृशी
भुवि । राधा नाम महाभागा न सा पुत्रमविन्दत २ अपत्यार्थे परं यत्न-
मकरोच्च विशेषतः । सा ददर्शाथ मञ्जूषामुह्यमानां यदृच्छया ३ दत्तर-
क्षाप्रतिसरामन्वालम्भनशोभनाम् । ऊर्मीतरङ्गैर्जाह्नव्याः समानीतामुपह्व-
रम् ४ सा तु कौतूहलात्प्राप्तां ग्राहयामास भाविनी । ततो निवेदयामास
सूतस्याधिरथस्य वै ५ स तामुद्धृत्य मञ्जूषामुत्सार्य जलमन्तिकात्। यन्त्रै-
रुद्घाटयामास सोपश्यत्तत्र बालकम् ६ तरुणादित्यसंकाशं हेमवर्मधरं
तथा । मृष्टकुण्डलयुक्तेन वदनेन विराजता ७ स सूतो भार्यया सार्धं
विस्मयोत्फुल्ललोचनः । अङ्कमारोप्य तं बालं भार्यां वचनमब्रवीत् ८ इद-
मत्यद्भुतं भीरु यतो जातोस्मि भाविनि । दृष्टवान्देवगर्भोयं मन्येस्माकमु-

---

व कुंडलें ह्या सर्वांचें दैवानें रक्षण केलें २७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथा-
त्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वापैकीं कर्णपरित्यागाविषयीं तीनशें,
आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ३०८ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याच वेळीं अधिरथ ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला धृतरा-
ष्ट्राचा सखा व सारथि आपल्या भार्येसहवर्तमान गंगेवर गेला १. हे राजा, त्याची भार्या
रूपानें पृथ्वीमध्यें अनुपम होती. राधा हें तिचें नांव होतें; परंतु, ती महाभाग्यवती
निपुत्रिक होती २. अपत्याकरितां तिनें पराकाष्ठेचा विशेष यत्न केला (परंतु, त्याचा
कांहींएक उपयोग झाला नाहीं). असो. ती गंगेवर आली असतां सहज वाहत येत
असलेली ती पेटी तिच्या दृष्टीं पडली ३. रक्षणाकरितां दूर्वा, कंकण वगैरेंनीं युक्त अस-
लेले सर तिच्या भोंवतालीं गंडाळलेले होते; कुंकवाचे पंजे तिच्यावर काढून ती सुशो-
भित केलेली होती आणि गंगेच्या लाटांनीं ती तीराजवळ आणिलेली होती ४. असो.
तीराजवळ आलेली ती पेटी त्या सुंदरी राधेनें, आंत काय असावें हें पहाण्याची उत्कंठा
उत्पन्न झाल्यामुळें, घेतली आणि आपला भर्ता जो अधिरथसारथि त्याच्या स्वाधीन
केली ५. तेव्हां उदकांतून ती पेटी वर काढिल्यावर किल्या वगैरे साधनांनीं त्यानें
ती उघडिली; तों त्या पेटीमध्यें बालक त्याच्या दृष्टीं पडला ६. बालसूर्याप्रमाणें त्याची
प्रभा होती; सुवर्णवर्ण कवच त्यानें धारण केलें होतें; आणि उज्ज्वल कुंडलांनीं युक्त
असलेलें त्याचें मुख झळकत होतें ७. ह्याप्रमाणें असलेला तो
बालक अवलोकन केल्यानंतर भार्येसहवर्तमान त्या सारथ्याचे नेत्र विस्मयानें प्रफुल्लित
झाले आणि त्या बालकाला मांडीवर घेऊन तो भार्येला म्हणाला ८ " हे भीरु,

पागतः ९ अनपत्यस्य पुत्रोयं देवैर्दत्तो ध्रुवं मम । इत्युक्त्वा तं ददौ पुत्रं राधायै स महीपते १० प्रतिजग्राह तं राधा विधिवद्दिव्यरूपिणम् । पुत्रं कमलगर्भाभं देवगर्भं श्रिया वृतम् ११ पुपोष चैनं विधिवद्ववृधे स च वीर्यवान् । ततःप्रभृति चाप्यन्य प्राभवन्नौरसाः सुताः १२ वसुवर्मधरं दृष्ट्वा तं बालं हेमकुण्डलम् । नामास्य वसुषेणेति ततश्चक्रुर्द्विजातयः १३ एवं स सूतपुत्रत्वं जगामामितविक्रमः । वसुषेण इति ख्यातो वृष इत्येव च प्रभुः १४ सूतस्य ववृधेऽङ्गेषु श्रेष्ठः पुत्रः स वीर्यवान् । चारेण विदितश्चासीत्पृथया दिव्यवर्मभृत् १५ सूतस्त्वाधिरथः पुत्रं विवृद्धं समयेन तम् । दृष्ट्वा प्रस्थापयामास पुरं वारणसाह्वयम् १६ तत्रोपसदनं चक्रे द्रोणस्येष्वस्त्रकर्मणि । सख्यं दुर्योधनेनैवमगमत्स च वीर्यवान् १७ द्रोणात्कृपाच्च रामाच्च सोऽस्त्रग्रामं चतुर्विधम् । लब्ध्वा लोकेऽभवत्ख्यातः परमेष्वासतां गतः १८ सन्धाय धार्तराष्ट्रेण पार्थानां विप्रिये रतः । योद्धुमाशंसते नित्यं

जन्मल्यापासून आज तागाईत असा अति अद्भुत प्रकार माझ्या पहाण्यांत कधीं आला नव्हता. हे सुंदरि, मला वाटतें हा देवगर्भच आपणांकडे आला आहे ९. मज निपुत्रिकाला निःसंशय देवांनीं हा पुत्र दिला आहे ". असें बोलून, हे भूपते, जनमेजयराजा, त्यानें तो पुत्र राधेच्या स्वाधीन केला १०; व राधेनेंही त्या दिव्य देह धारण करणाऱ्या पुत्राचा रीतीप्रमाणें स्वीकार केला. तो देवगर्भ कांतीनें युक्त असून कमळाच्या गाभ्याप्रमाणें त्याचें तेज होतें ११. तदनंतर योग्य रीतीनें राधेनें त्याचें पोषण केलें; तो वीर्यवान् पुत्रही लहानाचा मोठा होऊं लागला आणि तेव्हांपासून राधेला दुसरे औरस पुत्रही होऊं लागले १२. सुवर्ण कवच आणि सुवर्ण कुंडलें धारण करणाऱ्या त्या बालाला अवलोकन करून द्विजांनीं वसुषेण असें त्याचें नांव ठेविलें १३. ह्याप्रमाणें तो अपरिमितपराक्रमी समर्थ कुंतीपुत्र सूतनंदन झाला आणि वसुषेण व वृष ह्या नांवांनीं प्रसिद्ध झाला १४. अधिरथसारथ्याचा तो वीर्यवान् व श्रेष्ठ पुत्र अंगदेशामध्यें वाढला; आणि दिव्य कवच धारण करणारा तो पुत्र हेराच्या द्वारानें कुंतीलाही विदित झाला १५. पुढें आपला पुत्र मोठा झाला असें पाहून त्या अधिरथसूतानें योग्य कालीं त्याला हास्तिनपुरनगराला पाठवून दिलें १६. त्या ठिकाणीं तो वीर्यवान् पुत्र बाण व अस्त्रें ह्यांचे प्रयोग शिकण्याकरितां द्रोणाचार्यांचा शिष्य झाला आणि दुर्योधनाशीं त्याचें सख्य झालें १७. द्रोण, कृप आणि परशुराम ह्यांपासून चारी प्रकारचीं अस्त्रें प्राप्त होऊन तो महाधनुर्धारी बनला व जगतामध्यें प्रसिद्ध झाला १८. धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाची बाजू धरून कुंतीपुत्र पांडवांचें मन दुखविण्याविषयीं

फाल्गुनेन महात्मना १९ सदा हि तस्य स्पर्धासीदर्जुनेन विशाम्पते ।
अर्जुनस्य च कर्णेन यतो दृष्टो बभूव सः २० एतद्गुह्यं महाराज सूर्यस्या-
सीन्न संशयः । यः सूर्यसंभवः कर्णः कुन्त्यां सूतकुले तथा २१ तं तु
कुण्डलिनं दृष्ट्वा वर्मणा च समन्वितम् । अवध्यं समरे मत्वा पर्यतप्य-
द्युधिष्ठिरः २२ यदा च कर्णो राजेन्द्र भानुमन्तं दिवाकरम् । स्तौति
मध्यंदिने प्राप्ते प्राञ्जलिः सलिलांस्थितः २३ तत्रैनमुपतिष्ठन्ति
ब्राह्मणा धनहेतुना । नादेयं तस्य तत्काले किंचिदस्ति द्विजातिषु २४
तमिन्द्रो ब्राह्मणो भूत्वा भिक्षां देहीत्युपस्थितः । स्वागतं चेति राधेय-
स्तमथ प्रत्यभाषत २५ [११७०८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां
संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि राधाकर्ण-
प्राप्तौ नवाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३०९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ देवराजमनुप्राप्तं ब्राह्मणच्छद्मना वृतम् । दृष्ट्वा
स्वागतमित्याह न बुबोधास्य मानसम् १ हिरण्यकण्ठीः प्रमदा ग्रामान्वा

तो अमर्षी तत्पर असे आणि महात्म्या अर्जुनाशीं युद्ध करण्याची नेहमीं इच्छा करीत असे १९. हे प्रजाधिपते जनमेजयराजा, अर्जुनाशीं त्याची नेहमीं स्पर्धा असे; आणि अर्जुनही कर्णाविषयीं तो दृष्टीं पडल्यापासूनच मत्सर करीत असे २०. हे महाराजा, कुंतीचे ठिकाणीं सूर्यापासून उत्पन्न झालेला कर्ण सूतकुलामध्यें गेला हें गुह्य सूर्याला विदित होतें ह्यांत संशयच नाहीं २१. असो. कवचकुंडलांनीं युक्त असलेल्या त्या कर्णाला अवलोकन करून व समरांगणामध्यें तो अवध्य आहे असें समजून युधिष्ठिर काळजी करूं लागला २२. हे राजाधिराज जनमेजया, दोन प्रहर दिवस आला ह्मणजे उदकामध्यें हात जोडून उभा राहून कर्ण जेव्हां किरणांनीं युक्त असलेल्या सूर्याचें स्तवन करण्यास आरंभ करीत असे तेव्हां २३ धनाच्या इच्छेनें ब्राह्मण त्याच्याकडे येत असत आणि त्यावेळीं त्या कर्णापासून ब्राह्मणांना कोणतीही वस्तु न मिळणारी नसे २४. असें होतां होतां इंद्र ब्राह्मणाचें रूप धारण करून "भिक्षां देहि" ह्मणून त्याचे पुढें उभा राहिला असतां "स्वागत असो" ह्मणून त्या राधापुत्र कर्णानेंही त्याला सांगितलें २५. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वांपैकीं राधेला कर्ण प्राप्त झाल्याविषयीं तीनशेंनववा अध्याय समाप्त झाला ॥ ३०९ ॥

वैशंपायन सांगतात:—ब्राह्मणवेष धारण केलेला देवराज इंद्र प्राप्त झाल्याचें अवलोकन करितांक्षणीं कर्णानें त्याचें स्वागत केलें; परंतु, इंद्राचा अभिप्राय त्याच्या लक्ष्यांत आला नाहीं १. ह्यामुळें "कंठामध्यें सुवर्णाचे अलंकार धारण केलेल्या

बहुगोकुलान् । किं ददानीति तं विप्रमुवाचाधिरथिस्ततः २ ब्राह्मण उवाच ॥ हिरण्यकण्ठ्यः प्रमदा यच्चान्यत्प्रीतिवर्धनम् । नाहं दत्तमिह-च्छामि तदर्थिभ्यः प्रदीयताम् ३ यदेतत्सहजं वर्म कुण्डले च तवानघ । एतदुत्कृत्य मे देहि यदि सत्यव्रतो भवान् ४ एतदिच्छाम्यहं क्षिप्रं त्वया दत्तं परन्तप । एष मे सर्वलाभानां लाभः परमको मतः ५ कर्ण उवाच॥ अवनिं प्रमदा गाश्च निवापं बहुवार्षिकम् । तत्ते विप्र प्रदास्यामि न तु वर्म सकुण्डलम् ६ वैशम्पायन उवाच ॥ एवं बहुविधैर्वाक्यैर्याच्यमानः स तु द्विजः । कर्णेन भरतश्रेष्ठ नान्यं वरमयाचत ७ सान्त्वितश्च यथा-शक्ति पूजितश्च यथाविधि । न चान्यं स द्विजश्रेष्ठः कामयामास वै वरम् ८ यदा नान्यं प्रवृणुते वरं वै द्विजसत्तमः । तदैनमब्रवीद्भूयो राधेयः प्रहसन्निव ९ सहजं वर्म मे विप्र कुण्डले चामृतोद्भवे । तेनावध्योस्मि लोकेषु ततो नैतज्जहाम्यहम् १० विशालं पृथिवीराज्यं क्षेमं निहतक-ण्टकम् । प्रतिगृह्णीष्व मत्तस्त्वं साधु ब्राह्मणपुङ्गव ११ कुण्डलाभ्यां विमुक्तोहं

तरुण स्त्रिया, अनेक गोकुलांनीं युक्त असलेले ग्राम वगैरेंपैकीं आपणांला मी काय देऊं ? " असें अधिरथपुत्र कर्णानें त्या ब्राह्मणाला विचारिलें असतां. २ ब्राह्मण म्हणालाः—सुवर्णाचे अलंकार धारण केलेल्या तरुणी स्त्रिया आणि मनाला आल्हाद देणारें इतरही द्रव्य तूं दिलेलें घेण्याची माझी इच्छा नाहीं. तें तूं इतर याचकांना दे ३. हे निष्पापा, जर सत्य तुझें व्रत असेल तर हीं तुझीं स्वाभाविक कवचकुंडलें तोडून तूं मला दे ४. हे शत्रुतापना, हें तुझ्यापासून सत्वर प्राप्त व्हावें अशी माझी इच्छा आहे. सर्व लाभांमध्यें हाच लाभ मी श्रेष्ठ समजत आहें ५. कर्ण म्हणतोः—हे विप्र, पृथ्वी, तरुणी स्त्रिया आणि पुष्कळ वर्षे पुरेसें अन्न मी तुला देईन; परंतु, कुंडलांसहवर्तमान कवच देणार नाहीं ६. वैशंपायन सांगतातः— हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या भाषणांनीं कर्ण त्याची प्रार्थना करूं लागला; परंतु, तो दुसरें कांहींच पसंत करीना ७. कर्णानें यथाशक्ति सांत्वन करून यथाविधि त्याचें पूजनही केलें; परंतु, त्या द्विजश्रेष्ठानें दुसरी कोणतीही वस्तु इष्ट असल्याविषयीं आपला अभिप्राय दर्शविला नाहीं ८. ह्याप्रमाणें तो द्विजश्रेष्ठ दुसरें कांहींच जेव्हां पसंत करीना तेव्हां तो राधापुत्र कर्ण हंसत हंसत पुनरपि त्याला म्हणाला ९ " हे विप्र, शरीराबरोबरच उत्पन्न झालेलें हें माझें कवच आणि तशाच प्रकारचीं हीं अमृतापासून उत्पन्न झालेलीं कुंडलें माझ्यापाशीं असल्यामुळें मी त्रैलोक्यामध्यें अवध्य झालों आहें. ह्यास्तव, कुंडलांसहवर्तमान हें कवच मी सोडणार नाहीं १०. हे ब्राह्मणश्रेष्ठ, निष्कंटक

वर्मणा सहजेन च । गमनीयो भविष्यामि शत्रूणां द्विजसत्तम १२
वैशम्पायन उवाच ॥ यदन्यं न वरं वव्रे भगवान्पाकशासनः । ततः प्रहस्य
कर्णस्तं पुनरित्यब्रवीद्वचः १३ विदितो देवदेवेश प्रागेवासि मम प्रभो ।
न तु न्याय्यं मया दातुं तव शक्यं वृथा वरम् १४ त्वं हि देवेश्वरः
साक्षात्त्वया देयो वरो मम । अन्येषां चैव भूतानामीश्वरो ह्यसि भूत-
कृत् १५ यदि दास्यामि ते देव कुण्डले कवचं तथा । वध्यतामुपया-
स्यामि त्वं च शक्रावहास्यताम् १६ तस्माद्विनिमयं कृत्वा कुण्डले वर्म
चोत्तमम् । हरस्व शक्र कामं मे न दद्यामहमन्यथा १७ शक्र उवाच ॥
विदितोहं रवेः पूर्वमायानेव तवान्तिकम् । तेन ते सर्वमाख्यातमेवमेतन्न
संशयः १८ काममस्तु तथा तात तव कर्ण यथेच्छसि । वर्जयित्वा तु
मे वज्रं प्रवृणीष्व यथेच्छसि १९ वैशम्पायन उवाच ॥ ततः कर्णः प्रहृ-
ष्टस्तु उपसङ्गम्य वासवम् । अमोघां शक्तिमभ्येत्य वव्रे संपूर्णमानसः २०
कर्ण उवाच ॥ वर्मणा कुण्डलाभ्यां च शक्तिं मे देहि वासव । अमोघां

व सुखावह असें पृथ्वीचें विशाल राज्य आपण खुशाल माझ्यापासून घ्या ११. हे द्विजश्रेष्ठ, कुंडलें आणि जन्मतःच उत्पन्न झालेलें कवच ह्यांचा मला वियोग झाला असतां मी शत्रूंना वध्य होईन " १२. वैशंपायन सांगतातः—जेव्हां भगवान् इंद्र दुसरी कोणतीही वस्तु मागेना तेव्हां कर्ण हास्य करून पुनरपि त्याला ह्मणाला १३ " हे देवाधिदेवा, मी तुला पूर्वीच समजून चुकलों आहें; परंतु, तूं मागितलेली वस्तु कांहीं मोबदला घेतल्यावाचून माझ्या हातून तुला मिळणें शक्य नाहीं १४. तूं देवांचा व इतरही प्राण्यांचा राजा आहेस आणि प्राण्यांचा उत्पादकही आहेस. ह्यास्तव, तूंही मला मी मागेन ती वस्तु दिली पाहिजे १५. हे इंद्रा, मी जर कवचकुंडलें तुला देईन तर वध्य होईन; आणि, हे देवा, तूंही उपहासास पात्र होशील १६. तस्मात्, हे इंद्रा, साटेलोटें करून तूं हीं कुंडलें आणि हें उत्कृष्ट कवच खुशाल घेऊन जा. कांहीं मोबदला घेतल्यावांचून मी देणार नाहीं " १७. इंद्र ह्मणतोः—मी तुझ्याजवळ येत आहें हें तुला पूर्वी सूर्यापासूनच कळलें असावें. त्यानेंच तुला ह्याप्रमाणें सर्व कथन केलें आहे ह्यांत संशय नाहीं १८. बा कर्णा, खरोखर तुझी जशी इच्छा असेल त्याप्रमाणें कां होईना! माझें वज्र वर्ज्य करून जें इच्छेस येईल तें तूं माग १९. वैशंपायन सांगतातः—तदनंतर कर्ण आनंदित होऊन इंद्रापाशीं गेला आणि आनंदानें ज्याचें मन व्याप्त झालें आहे अशा त्या कर्णानें अमोघ शक्तीला अनुलक्षून त्याच्यापाशीं वर मागितला २०. कर्ण

शत्रुसंघानां घातिनीं पृतनामुखे २१ ततः संचिन्त्य मनसा मुहूर्तमिव वासवः । शक्त्यर्थं पृथिवीपाल कर्णं वाक्यमथाब्रवीत् २२ कुण्डले मे प्रयच्छस्व वर्म चैव शरीरजम् । गृहाण कर्ण शक्तिं त्वमनेन समयेन च २३ अमोघा हन्ति शतशः शत्रून्मम करच्युता । पुनश्च पाणिमभ्येति मम दैत्यान्विनिघ्नतः २४ सेयं तव करप्राप्ता हत्वैकं रिपुमूर्जितम् । गर्जन्तं प्रतपन्तं च मामेवैष्यति सूतज २५ कर्ण उवाच ॥ एकमेवाहमिच्छामि रिपुं हन्तुं महाहवे । गर्जन्तं प्रतपन्तं च यतो मम भयं भवेत् २६ इन्द्र उवाच ॥ एकं हनिष्यसि रिपुं गर्जन्तं बलिनं रणे । त्वं तु यं प्रार्थयस्येकं रक्ष्यते स महात्मना २७ यमाहुर्वेदविद्वांसो वराहमपराजितम् । नारायणमचिन्त्यं च तेन कृष्णेन रक्ष्यते २८ कर्ण उवाच ॥ एवमप्यस्तु भगवन्नेकवीरवधे मम । अमोघां देहि मे शक्तिं यथा हन्यां प्रतापिनम् २९ उत्कृत्य तु प्रदास्यामि कुण्डले कवचं च ते । निकृत्तेषु तु गात्रेषु न मे बीभत्सता भवेत् ३० इन्द्र उवाच ॥ न ते बीभत्सता कर्ण भविष्यति

ह्मणतोः—हे इंद्रा, कवचकुंडलें घेऊन तूं मला सैन्यामध्यें शत्रुसमुदायांचा घात करणारी अमोघ शक्ति दे २१. तदनंतर, हे भूपते जनमेजया, शक्तीसंबंधानें इंद्र मनामध्यें क्षणभर विचार करून कर्णाला ह्मणाला २२ "हे कर्णा, शरीरासहवर्तमान उत्पन्न झालेलें कवच व कुंडलें तूं मला दे आणि ह्या अटीवर तूं माझ्यापासून शक्ति घे २३. मी दैत्यांचा वध करण्यास उद्युक्त झालों असतां ही माझी अमोघ शक्ति माझ्या हातून सुटल्यावर शेंकडो शत्रूंचा वध करून पुनरपि माझ्या हातीं येत असते २४. परंतु, हे सूतपुत्रा, ही तुझ्या हातीं गेल्यावर तुला ताप देणारा आणि गर्जना करणारा असा एक प्रबल शत्रु मारून पुनरपि माझ्याचकडे येईल" २५. कर्ण ह्मणतोः— प्रचंड युद्धामध्यें गर्जना करणाऱ्या आणि ताप देणाऱ्या अशा एकाच शत्रूचा वध करण्याची माझी इच्छा आहे; व त्याच्याचपासून मला भय प्राप्त होण्याचा संभव आहे २६. इंद्र ह्मणतोः—गर्जना करणाऱ्या एका बलाढ्य शत्रूचा तूं संग्रामामध्यें वध करशील; परंतु, तूं ज्या एकाचा वध करण्याची इच्छा करीत आहेस त्याचें एक महात्मा रक्षण करीत आहे २७. ज्याला वेदवेत्ते वराह, अपराजित, नारायण व अचिंत्य असें ह्मणत असतात त्या कृष्णानें त्याचें रक्षण केलें आहे २८. कर्ण ह्मणतोः--हे भगवान्, असें कां होईना! माझ्या एका वीरशत्रूचा वध होण्यापुरतीच तूं मला अमोघ शक्ति दे; ह्मणजे मी त्या प्रतापी शत्रूचा वध करीन २९. मी तुला कवचकुंडलें शरीरापासून कापून देईन; परंतु, गात्रांचे लचके निघून कुरूपता माझे ठिकाणीं येतां उपयोगीं नाहीं ३०.

कथंचन । व्रणश्चैव न गात्रेषु यस्त्वं नानृतमिच्छसि ३१ यादृशास्ते पितु-
र्वर्णस्तेजश्च वदतां वर । तादृशेनैव वर्णेन त्वं कर्ण भविता पुनः ३२
विद्यमानेषु शस्त्रेषु यद्यमोघामसंशये । प्रमत्तो मोक्ष्यसे चापि त्वय्येवैषा
पतिष्यति ३३ कर्ण उवाच ॥ संशयं परमं प्राप्य विमोक्ष्ये वासवीमि-
माम् । यथा मामात्थ शक्र त्वं सत्यमेतद्ब्रवीमि ते ३४ वैशम्पायन उवाच ॥
ततः शक्तिं प्रज्वलितां प्रतिगृह्य विशाम्पते । शस्त्रं गृहीत्वा निशितं सर्व-
गात्राण्यकृन्तत ३५ ततो देवा मानवा दानवाश्च निकृन्तन्तं कर्णमात्मा-
नमेवम् । दृष्ट्वा सर्वे सिंहनादान्प्रणेदुर्न ह्यस्यासीन्मुखजो वै विकारः ३६
ततो दिव्या दुन्दुभयः प्रणेदुः पपातोच्चैः पुष्पवर्षं च दिव्यम् । दृष्ट्वा कर्णं
शस्त्रसंकृत्तगात्रं मुहुश्चापि स्मयमानं नृवीरम् ३७ ततश्छित्त्वा कवचं
दिव्यमङ्गात्तथैवार्द्रं प्रददौ वासवाय । तथोत्कृत्य प्रददौ कुण्डले ते कर्णा-
त्तस्मात्कर्मणा तेन कर्णः ३८ ततः शक्रः प्रहसन्वञ्चयित्वा कर्णं लोके

इंद्र ह्मणतो:—हे कर्णा, ज्याअर्थीं तूं अनृताचें अवलंबन करीत नाहींस त्याअर्थीं तुझ्या गात्रांचे ठिकाणीं जखम राहणार नाहीं व तुला विद्रूपताही प्राप्त होणार नाहीं ३१. हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ कर्णा, ज्याप्रमाणें तुझ्या पित्याचा वर्ण व तेज आहे त्याचप्रमाण तुला वर्ण व तेज पुनरपि प्राप्त होईल ३२; परंतु, शत्रूचा प्रतिकार करण्यास दुसरीं शस्त्रें विद्यमान् असतांना आणि स्वतःचा वध होण्याची भीति प्राप्त झाली नसतांना तू जर ह्या अमोघशक्तीचा प्रयोग करिशील तर ही तुझ्यावरच येऊन पडेल ३३. कर्ण ह्मणतो:—पराकाष्ठेचें मृत्युभय प्राप्त झाल्यावरच, हे इंद्रा, तुझ्या सांगण्याप्रमाणें मी ह्या वासवी शक्तीचा प्रयोग करीन, हें मी तुला सत्य सांगतों ३४. वैशंपायन सांगतात:—तदनंतर, हे प्रजाधिपते जनमेजया, उज्ज्वल शक्तीचा स्वीकार केल्यावर कर्णानें तीक्ष्ण शस्त्र घेऊन सर्व गात्रांपासून कवच कांपून इंद्राला दिलें ३५. तेव्हां कर्ण आपला देह छेदीत आहे असें अवलोकन करून देव, मनुष्यें व दानव हे सर्वही सिंहासारखी गर्जना करूं लागले; तथापि ह्याच्या मुद्रेवर कांहीं एक विकार उत्पन्न झाला नाहीं ३६. त्याचप्रमाणें शस्त्रानें आपलें शरीर छेदून टाकून हंसत असलेल्या त्या वीरपुरुष कर्णाला अवलोकन करितांक्षणीं दिव्य दुंदुभि वाजू लागल्या आणि उंचावरून दिव्य पुष्पांची वृष्टि झाली ३७. सारांश, (वासवी शक्ति घेतल्यानंतर) त्या सूतपुत्रानें शरीरापासून दिव्य कवच तोडून काढून ओलेच्या ओलेंच इंद्राला दिलें आणि त्याचप्रमाणें कान कांपून त्यानें तीं कुंडलेंही त्याला दिलीं व ह्या कृतीमुळें तो कर्ण ह्मणून

यशसा योजयित्वा । कृतं कार्यं पाण्डवानां हि मेने ततः पश्चाद्दिवमेवो-
त्पपात ३९ श्रुत्वा कर्णं मुषितं धार्तराष्ट्रा दीनाः सर्वे भग्नदर्पा इवासन् ।
तां चावस्थां गमितं सूतपुत्रं श्रुत्वा पार्था जहृषुः काननस्थाः ४० जन-
मेजय उवाच ॥ क्वस्था वीराः पाण्डवास्ते बभूवुः कुतश्चैतं श्रुतवन्तः प्रियं
तत् । किं वाकार्षुर्द्वादशेऽब्दे व्यतीते तन्मे सर्वं भगवान्व्याकरोतु ४१ वैश-
म्पायन उवाच ॥ लब्ध्वा कृष्णां सैन्धवं द्रावयित्वा विप्रैः सार्धं काम्य-
काद्राश्रमात्ते । मार्कण्डेयाच्छ्रुतवन्तः पुराणं देवर्षीणां चरितं विस्त-
रेण ४२ [११७५०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैया-
सिक्यामारण्यके पर्वणि कुण्डलाहरणपर्वणि कवचकुण्डलदाने दशाधिक-
त्रिशततमोऽध्यायः ॥ ३१० ॥ समाप्तं चेदं कुण्डलाहरणपर्व ॥

अथारणेयपर्व॥ जनमेजय उवाच ॥ एवं हृतायां भार्यायां प्राप्य क्लेश-
मनुत्तमम् । प्रतिपद्य ततः कृष्णां किमकुर्वत पाण्डवाः १ वैशम्पायन
उवाच ॥ एवं हृतायां कृष्णायां प्राप्य क्लेशमनुत्तमम् । विहाय काम्यकं

प्रसिद्धीस आला ३८. ह्याप्रमाणें कर्णाला फसवून व जगतामध्ये त्याची कीर्ति करून इंद्र पांडवांचें कार्य झालेंच असें समजू लागला आणि हसत हंसत स्वर्गामध्यच निघून गेला ३९. कर्ण कवचकुंडलांना मुकल्याचें ऐकून सर्व धृतराष्ट्रपुत्र अभिमानरहित होऊन दीन आल्यासारखे दिसूं लागले; आणि कर्णाला तशी अवस्था प्राप्त झाल्याचें ऐकतांक्षणीं वनामध्यें असलेल्या कुंतीपुत्रांना हर्ष झाला ४०. जनमेजय ह्मणतो:— ते वीर पांडव तेव्हां कोठें होते ? त्यांनीं ती प्रिय वार्ता कोणापासून श्रवण केली? आणि बारावें वर्ष संपल्यानंतर त्यांनीं काय केलें ? हें मला सर्व भगवानानीं स्पष्ट करून सांगावें ४१. वैशंपायन सांगतात:— सिंधुराज जयद्रथाला काम्यक आश्रमांतून हांकून लावून द्रौपदी प्राप्त करून घेतल्यानंतर मार्कंडेयमुनींपासून त्यांनी ब्राह्मणासहवर्तमान देवर्षींचें पुरातन चरित्र सविस्तर श्रवण केलें ४२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्ष-ग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील कुंडलाहरणपर्वांपैकीं कर्णानें इंद्राला कवच-कुंडलें दिल्याविषयीं तीनशें दहावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१० ॥ ह्या ठिकाणीं कुंडलाहरणपर्व हें संपूर्ण झालें.

येथून पुढें आरणेयपर्वाला आरंभ झाला. जनमेजय प्रश्न करितो:— ह्याप्रमाणें जयद्रथानें भार्येला हरण करून नेलें असतां मोठ्या कष्टानें त्या द्रौपदीला प्राप्त करून घेतल्यानंतर पांडवांनीं काय केलें ?, १. वैशंपायन सांगतात:— ह्याप्रमाणें जयद्रथानें भार्येला हरण करून नेलें असतां मोठ्या कष्टानें तिला परत आणिल्यावर नीवीपासून

राजा सह भ्रातृभिरच्युतः २ पुनर्द्वैतवनं रम्यमाजगाम युधिष्ठिरः । स्वादु-
मूलफलं रम्यं विचित्रबहुपादपम् ३ अनुभुक्तफलाहाराः सर्व एव मिता-
शनाः । न्यवसन्पाण्डवास्तत्र कृष्णया सह भार्यया ४ वसन्द्वैतवने राजा
कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । भीमसेनोऽर्जुनश्चैव माद्रीपुत्रौ च पाण्डवौ ५ ब्राह्म-
णार्थे पराक्रान्ता धर्मात्मानो यतव्रताः । क्लेशमार्च्छन्त विपुलं सुखोदर्कं
परन्तपाः ६ तस्मिन्प्रतिवसन्तस्ते यत्प्रापुः कुरुसत्तमाः । वने क्लेशं सुखोदर्कं
तत्प्रवक्ष्यामि ते शृणु ७ अरणीसहितं मन्थं ब्राह्मणस्य तपस्विनः । मृगस्य
घर्षमाणस्य विषाणे समसज्जत ८ तदादाय गतो राजंस्त्वरमाणो महा-
मृगः । आश्रमान्तरितः शीघ्रं प्लवमानो महाजवः ९ ह्रियमाणं तु तं दृष्ट्वा
स विप्रः कुरुसत्तम । त्वरितोऽभ्यागमत्तत्र अग्निहोत्रपरीप्सया १० अजा-
तशत्रुमासीनं भ्रातृभिः सहितं वने । आगम्य ब्राह्मणस्तूर्णं संतप्तश्चेदमब्र-
वीत् ११ अरणीसहितं मन्थं समासक्तं वनस्पतौ । मृगस्य घर्षमाणस्य
विषाणे समसज्जत १२ तमादाय गतो राजंस्त्वरमाणो महामृगः ।

च्युत न होणारा धर्मराज युधिष्ठिर भ्रात्यांसहवर्तमान काम्यकवनाचा त्याग करून पुनरपि रम्य द्वैतवनामध्यें गेला. त्या रम्य वनामध्यें नानाप्रकारचे वृक्ष विपुल होते आणि मधुर फळें व मुळें होतीं २,३ फळें गोळा करणें हेंच ज्यांचें शील आहे असे ते मिताहारी सर्वही व्रतस्थ पांडव द्रौपदीभार्येसहवर्तमान तेथें राहिले ४. द्वैत-वनामध्यें वास्तव्य करणारा कुंतीपुत्र धर्मराज युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन आणि माद्री-पुत्र नकुलसहदेव ५ हे सर्वही व्रतस्थ, धर्मात्मे आणि ब्राह्मणांकरितां पराक्रम करणारे होते व त्या शत्रुतापन पांडवांनीं परिणामीं सुखावह असे पराकाष्ठेचे क्लेश तेथें सोसले ६. त्या वनामध्यें वास्तव्य करीत असतांना त्या कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांनीं परिणामीं सुखावह असे जे क्लेश सहन केले ते मी तुला सांगतों, तूं श्रवण कर ७. एक मृग झाडाला घासूं लागला असतां एका तपस्वी ब्राह्मणाच्या मंथ्यासहवर्तमान अरणी त्याच्या शिंगामध्यें अडकल्या ८; व, हे राजा, त्या अरणी घेऊन पळालेला तो महामृग त्वरेनें जाऊं लागला असतां मोठ्या वेगानें उड्या टाकूं लागल्यामुळें आश्रमांतून सत्वर दिसेनासा झाला ९. अरणींसहवर्तमान मंथा तो मृग ओढून घेऊन जात आहे असें पाहून, हे कुरुवंशजश्रेष्ठा, तो विप्र अग्निहोत्राच्या रक्षणार्थ भ्रात्यांसह-वर्तमान वनामध्यें बसलेल्या अजातशत्रु युधिष्ठिराकडे सत्वर आला आणि जलदीजलदीनें जवळ येऊन तो संतप्त झालेला ब्राह्मण त्याला म्हणाला १०,११ "अरणींसहवर्त-मान मंथा मी एका वृक्षावर अडकवून ठेविला होता; तों त्या वृक्षाला एक मृग घासूं

आश्रमान्तरितः शीघ्रं प्लवमानो महाजवः १३ तस्य गत्वा पदं राजन्नासाद्य च महामृगम्। अग्निहोत्रं न लुप्येत तदानयत पाण्डवाः १४ ब्राह्मणस्य वचः श्रुत्वा संतप्तोथ युधिष्ठिरः। धनुरादाय कौन्तेयः प्राद्रवद्भ्रातृभिः सह १५ सन्नद्धा धन्विनः सर्वे प्राद्रवन्नरपुङ्गवाः। ब्राह्मणार्थे यतन्तस्ते शीघ्रमन्वगमन्मृगम् १६ कर्णिनालीकनाराचानुत्सृजन्तो महारथाः। नाविध्यन्पाण्डवास्तत्र पश्यन्तो मृगमन्तिकात् १७ तेषां प्रयतमानानां नादृश्यत महामृगः। अपश्यन्तो मृगं श्रान्ता दुःखं प्राप्ता मनस्विनः १८ शीतलच्छायमागम्य न्यग्रोधं गहने वने। क्षुत्पिपासापरीताङ्गाः पाण्डवाः समुपाविशन् १९ तेषां समुपविष्टानां नकुलो दुःखितस्तदा। अब्रवीद्भ्रातरं श्रेष्ठममर्षात्कुरुनन्दनम् २० नास्मिन्कुले जातु ममज्ज धर्मो न चालस्यादर्थलोपो बभूव। अनुत्तराः सर्वभूतेषु भूयः संप्राप्ताः स्मः संशयं किं नु राजन् २१ [११७७१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां

लागला असतां त्याच्या शिंगांत तो अडकला १२. तेव्हां, हे राजा, त्या अरणी घेऊन पळालेला तो महामृग त्वरेनें जाऊं लागला असतां मोठ्या वेगानें उड्या टाकूं लागल्यामुळें आश्रमांतून सत्वर दिसेनासा झाला १३. ह्यास्तव, हे राजा, आणि, हे सर्व पांडवहो, त्या महामृगाच्या मार्गानें जाऊन व त्याला गांठून माझें अग्निहोत्र लुप्त होऊं नये एतदर्थ त्या अरणी तुम्ही घेऊन या" १४. ब्राह्मणाचें हें भाषण श्रवण करून कुंतीपुत्र युधिष्ठिर संतप्त झाला आणि धनुष्य घेऊन भ्रात्यांसहवर्तमान निघाला १५. सर्वही पुरुषश्रेष्ठ पांडव धनुष्य घेऊन तयार झाले व त्याच्या मागोमाग गेले आणि ब्राह्मणाकरिता प्रयत्न करणाऱ्या त्या पांडवांनीं सत्वर मृगालाही गांठिलें १६. मृग आपल्या जवळच आहे असें त्यांना दिसूं लागून ते महारथी पांडव कर्णि, नालीक व नाराच बाण त्याच्यावर सोडूं लागले; परंतु, एकही बाण त्याला लागेना १७. ह्याप्रमाणें ते प्रयत्न करीत असतांना तो महामृग दिसेनासा झाला आणि मृग दिसेनासा झाल्यामुळें निराश झालेले ते विचारी पांडव दुःख करूं लागले १८; आणि क्षुधेनें व तृषेनें व्याकुल झालेले ते पांडव शेवटीं त्या गहन वनामध्यें शीतल छायेनें युक्त असलेल्या एका वटवृक्षासमीप येऊन बसले १९. तेव्हां ह्याप्रमाणें ते बसले असतां नकुल दुःखित झाला आणि रागारागानें आपल्या कुरुनंदन ज्येष्ठ भ्रात्याला म्हणाला २० "ह्या कुलामध्यें धर्मलोप अथवा अर्थलोप आळसामुळें आजपर्यंत कधींही झाला नाहीं. कोणत्याही प्राण्याचें कार्य उपस्थित झालें असतां आम्ही कधींही त्याला दुसरें तिसरें उत्तर न करितां 'ठीक आहे; कार्य होईल' एवढेंच सांगत असतों; परंतु, हे राजा,

संहितायां वैयासिक्यामारण्यकेपर्वण्यारणेयपर्वणि मृगान्वेषण एकादशाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३११ ॥

युधिष्ठिर उवाच ॥ नापदामस्ति मर्यादा न निमित्तं न कारणम् । धर्मस्तु विभजत्यर्थमुभयोः पुण्यपापयोः १ भीम उवाच ॥ प्रातिकाम्यनयत्कृष्णां सभायां प्रेष्यवत्तदा । न मया निहतस्तत्र तेन प्राप्ताः स्म संशयम् २ अर्जुन उवाच ॥ वाचस्तीक्ष्णास्थिभेदिन्यः सूतपुत्रेण भाषिताः। अतितीव्रा मया क्षान्तास्तेन प्राप्ताः स्म संशयम् ३ सहदेव उवाच ॥ शकुनिस्त्वां यदाजैषीदक्षद्यूतेन भारत । स मया न हतस्तत्र तेन प्राप्ताः स्म संशयम् ४ वैशम्पायन उवाच ॥ ततो युधिष्ठिरो राजा नकुलं वाक्यमब्रवीत् । आरुह्य वृक्षं माद्रेय निरीक्षस्व दिशो दश ५ पानीयमन्तिके पश्य वृक्षांश्चाप्युदकाश्रितान् । एते हि भ्रातरः श्रान्तास्तव तात पिपासिताः ६ नकुलस्तु तथेत्युक्त्वा शीघ्रमारुह्य पादपम् । अब्रवीद्भ्रातरं ज्येष्ठमभिवीक्ष्य समन्ततः ७ पश्यामि बहुलान्राजन्वृक्षानुदकसंश्रयान् ।

आह्मी अधिकाधिकच संकटामध्यें पडत चाललों आहोंत हें काय ? २१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरणेयपर्वांपैकीं मृगाचा शोध लावण्याविषयीं तीनशें अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ३११ ॥

युधिष्ठिर ह्मणतोः—संकट अमुक वेळेपर्यंतच असावयाचीं किंवा अमुकच असावयाचीं अशी कांहीं मर्यादा नाहीं; त्याचप्रमाणें तीं सोसलीं असतां त्याचें कांहीं फल प्राप्त होईलच असेंही नाहीं आणि संकट प्राप्त होण्याचें निश्चित कारणही दिसत नाहीं. प्रारब्धरूप जो धर्म तोच पुण्य व पाप ह्या उभयतांचें फल पुरुषाला देत असतो १. भीमसेन ह्मणतोः—प्रातिकामीनें दासीप्रमाणें जेव्हां द्रौपदीला धरून सभेमध्यें आणिलें तेव्हा तेथल्या तेथेंच मीं त्याचा वध केला नाहीं ह्यामुळें आह्मांवर संकट आलें आहे २ अर्जुन ह्मणतोः—सूतपुत्र कर्णानें उच्चारिलेले अतिशय तीव्र व मर्मभेदक शब्द मीं सहन केल्यामुळें आह्मांवर हें संकट गुदरलें आहे ३. सहदेव ह्मणतोः—हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अक्षद्यूतानें जेव्हां शकुनीनें तुझा पराभव केला तेव्हां तेथल्या तेथेंच मीं त्याला मारून टाकिलें नाहीं ह्यामुळें आपणांवर दुःसह प्रसंग आला आहे ४. वैशंपायन सांगतातः—तदनंतर युधिष्ठिरराजा नकुलाला ह्मणाला "हे माद्रीपुत्रा, झाडावर चढून चोहोंकडे दृष्टि फेंक ५ आणि आसपास कोठें उदक अथवा उदकाच्या आश्रयाला असणारे वृक्ष दिसत असतील तर पहा. बा नकुला, हे तुझे असलेले भ्राते तृषाक्रांत झाले आहेत " ६. ह्यावर 'ठीक आहे' असें ह्मणून नकुल

सारसानां च निर्ह्रादमत्रोदकमसंशयम् ८ ततोऽब्रवीत्सत्यधृतिः कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । गच्छ सौम्य ततः शीघ्रं तूर्णं पानीयमानय ९ नकुलस्तु तथेत्युक्त्वा भ्रातुर्ज्येष्ठस्य शासनात् । प्राद्रवद्यत्र पानीयं शीघ्रं चैवान्वपद्यत १० स दृष्ट्वा विमलं तोयं सारसैः परिवारितम् । पातुकामस्ततो वाचमन्तरिक्षात्स शुश्रुवे ११ यक्ष उवाच ॥ मा तात साहसं कार्षीर्मम पूर्वपरिग्रहः । प्रश्नानुक्त्वा तु माद्रेय ततः पिब हरस्व च १२ अनादृत्य तु तद्वाक्यं नकुलः सुपिपासितः । अपिबच्छीतलं तोयं पीत्वा च निपपात ह १३ चिरायमाणे नकुले कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । अब्रवीद्भ्रातरं वीरं सहदेवमरिन्दमम् १४ भ्राता हि चिरयातो नः सहदेव तवाग्रजः । तथैवानय सोदर्यं पानीयं च त्वमानय १५ सहदेवस्तथेत्युक्त्वा तां दिशं प्रत्यपद्यत । ददर्श च हतं भूमौ भ्रातरं नकुलं तदा १६ भ्रातृशोकाभिसंतप्तस्तृषया च प्रपीडितः । अभिदुद्राव पानीयं ततो वागभ्यभाषत १७

सत्वर झाडावर चढला आणि चोहोंकडे दृष्टि फेंकून आपल्या ज्येष्ठ भ्रात्याला ह्मणाला ७ " हे राजा, उदकाच्या आश्रयाला असणारे पुष्कळ वृक्ष माझ्या दृष्टीं पडत असून सारसपक्ष्यांचा ध्वनिही माझ्या कानावर येत आहे. तस्मात्, ह्या ठिकाणीं उदक निःसंशय आहे ८. तदनंतर सत्यनिष्ठ कुंतीपुत्र युधिष्ठिर त्याला ह्मणाला " हे विनयशील नकुला, सत्वर जा आणि भात्यामध्यें पाणी घेऊन ये " ९. ह्यावर नकुल ' ठीक आहे ' असें ह्मणाला आणि ज्येष्ठ भ्रात्याच्या आज्ञेप्रमाणें जिकडे पाणी होतें तिकडे सत्वर चालताच झाला १०. गेल्यानंतर सारसपक्ष्यांनीं परिवेष्टित असें निर्मल उदक अवलोकन करून ते प्राशन करण्याच्या तो बेतांत आला तोंच अंतरिक्षांतून एक वाणी त्याच्या कानीं पडली ११. यक्ष ह्मणतोः—बा माद्रीपुत्रा, साहस करूं नको; प्रथम मीं ह्या उदकाचा स्वीकार केला आहे. ह्यास्तव, माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग तू उदक प्राशन कर आणि हवें तर घेऊनही जा १२. नकुल फारच तृषाक्रांत झाला असल्यामुळें त्या भाषणाला न जुमानतां त्यानें शीतल उदक प्राशन केलें; परंतु, प्राशन करितांक्षणीं लगेच तो मरून पडला १३. नकुलाला उशीर लागला असें पाहून कुंतीपुत्र युधिष्ठिर शत्रूंचें दमन करणाऱ्या आपल्या सहदेवनामक वीर भ्रात्याला ह्मणाला १४ " हे सहदेवा, तुझ्याहून ज्येष्ठ असलेला आमचा भ्राता जाऊन बराच वेळ झाला; ह्यास्तव, आपला सहोदर भ्राता व उदक तूं बरोबर घेऊन ये " १५. ह्यावर ' ठीक आहे ' असें ह्मणून सहदेवही त्या दिशेला गेला तों भूमीवर आपला भ्राता वध पावून पडलेला त्यानें अवलोकन केला १६. तेव्हां,

मा तात साहसं कार्षीर्मम पूर्व परिग्रहः । प्रश्नानुक्त्वा यथाकामं पिबस्व च हरस्व च १८ अनादृत्य तु तद्वाक्यं सहदेवः पिपासितः । अपिबच्छीतलं तोयं पीत्वा च निपपात ह १९ अथाब्रवीत्स विजयं कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । भ्रातरौ ते परिगतौ बीभत्सो शत्रुकर्शन २० तौ चैवानय भद्रं ते पानीयं च त्वमानय । त्वं हि न स्तात सर्वेषां दुःखितानामपाश्रयः २१ एवमुक्तो गुडाकेशः प्रगृह्य सशरं धनुः । आमुक्तखड्गो मेधावी तत्सरः प्रत्यपद्यत २२ ततः पुरुषशार्दूलौ पानीयहरणे गतौ । तौ ददर्श हतौ तत्र भ्रातरौ श्वेतवाहनः २३ प्रसुप्ताविव तौ दृष्ट्वा नरसिंहः सुदुःखितः । धनुरुद्यम्य कौन्तेयो व्यलोकयत तद्वनम् २४ नापश्यत्तत्र किंचित्स भूतमस्मिन्महावने । सव्यसाची ततः श्रान्तः पानीयं सोऽभ्यधावत २५ अभिधावंस्ततो वाक्यमन्तरिक्षात्स शुश्रुवे । किमासीदसि पानीयं नैतच्छक्यं बलात्त्वया २६ कौन्तेय यदि प्रश्नांस्तान्मयोक्तान्प्रतिपत्स्यसे । ततः

भ्रात्याच्या शोकानें संतप्त व तृष्णेनें अतिशय व्याकुल झालेला तो सहदेव उदकाकडे धावला तों इतक्यांत आकाशवाणी झाली कीं १७; " बाबारे, साहस करूं नको. मीं ह्या उदकाचा प्रथम स्वीकार केला आहे. ह्यास्तव, माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग तू हवें तितकें उदक प्राशन कर व हवें तितकं घेऊनही जा" १८. परंतु, तृषा फारच लागली असल्यामुळें त्या भाषणाचा अनादर करून सहदेवानें शीतल उदक प्यायलें आणि पान करितांक्षणीं तो मरून पडला १९. तदनंतर इकडे कुंतीपुत्र युधिष्ठिर अर्जुनाला ह्मणाला " हे शत्रुनाशका अर्जुना, तुझे भ्राते येथून गेले आहेत २०. ह्यास्तव, त्यांना घेऊन ये आणि, तुझें देव बरें करो, तूं पाणीही घेऊन ये. कारण, बा अर्जुना, आह्मां सर्व दुःखितांचा आश्रय तूंच आहेस " २१. ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें अर्जुनाला सांगितलें असतां बाणासहवर्तमान धनुष्य घेऊन व तरवार लटकावून तो विचारी अर्जुन त्या सरोवराकडे चालता झाला २२. तदनंतर पाणी आणण्याकरितां गेलेले ते उभयतां पुरुषश्रेष्ठ भ्राते मरून पडलेले तेथें त्या अर्जुनानें अवलोकन केले २३. निद्रिस्थ झाल्याप्रमाणें दिसत असलेले ते भ्रातें अवलोकन करून कुंतीपुत्र पुरुषश्रेष्ठ अर्जुनाला अतिशय दुःख झालें आणि धनुष्य सज्ज करून तो तें वन पाहूं लागला २४. परंतु, त्या महावनामध्यें कोणीही प्राणी जेव्हां त्याच्या दृष्टीं पडेना तेव्हां श्रांत झालेला तो अर्जुन उदकाकडे धांवला २५. परंतु, धांवतां धांवतां अंतरिक्षांतून अशी वाणी त्याच्या कानांवर आली कीं, " पाण्याजवळ कशाकरितां येत आहेस ? बलानें हें तुला प्राप्त होणें शक्य नाहीं २६. हे कुंतीपुत्रा, त्या माझ्या प्रश्नांचीं उत्तरें जर तूं दिलींस तर तुला

पास्यसि पानीयं हरिष्यसि च भारत २७ वारितस्त्वब्रवीत्पार्थो दृश्यमानो निवारय । यावद्बाणैर्विनिर्भिन्नः पुनर्नैवं वदिष्यसि २८ एवमुक्त्वा ततः पार्थः शरैरस्त्रानुमन्त्रितैः । प्रववर्ष दिशः कृत्स्नाः शब्दवेधं च दर्शयन् २९ कर्णिनालीकनाराचानुत्सृजन्भरतर्षभ । स त्वमोघानिषून्मुक्त्वा तृष्णयाभिप्रपीडितः ३० अनेकैरिषुसंघातैरन्तरिक्षे ववर्ष ह । यक्ष उवाच ॥ किं विघातेन ते पार्थ प्रश्नानुक्त्वा ततः पिब ३१ अनुक्त्वा च पिबन्प्रश्नान्पीत्वैव न भविष्यसि । एवमुक्तस्ततः पार्थः सव्यसाची धनञ्जयः ३२ अवज्ञायैव तां वाचं पीत्वैव निपपात ह । अथाब्रवीद्भीमसेनं कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ३३ नकुलः सहदेवश्च बीभत्सुश्च परन्तप । चिरं गतास्तोयहेतोर्न चागच्छन्ति भारत ३४ तांश्चैवानय भद्रं ते पानीयं च त्वमानय । भीमसेनस्तथेत्युक्त्वा तं देशं प्रत्यपद्यत ३५ यत्र ते पुरुषव्याघ्रा भ्रातरोऽस्य निपातिताः । तान्दृष्ट्वा दुःखितो भीमस्तृषया च प्रपीडितः ३६ अमन्यत

उदकपान करितां येईल; आणि, हे भरतकुलोत्पन्ना, तें घेऊनही तुला जातां येईल" २७. ह्याप्रमाणें प्रतिबंध झाल्यावर अर्जुन त्या यक्षाला उद्देशून ह्मणाला " प्रत्यक्ष दृष्टीं पडून तूं माझें निवारण कर; ह्मणजे बाणांनीं विदीर्ण होऊन गेल्यावर पुनरपि तूं असें भाषण करणार नाहींस " २८. ह्याप्रमाणें बोलल्यानंतर कुंतीपुत्र अर्जुनानें अस्त्रमंत्रांनीं अभिमंत्रित केलेल्या बाणांच्या योगानें शब्दवेधासंबंधीं कौशल दर्शवीत दर्शवीत सर्व दिशेस वर्षाव केला २९; आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा, कर्णि, नालीक आणि नाराच हे बाण तो एकसारिखे टाकूं लागला. ह्याप्रमाणें आपले अमोघ बाण सोडून तृष्णेनें अतिशय पीडित झालेल्या ३० अर्जुनानें अनेक बाणसमुदायांनीं अंतरिक्षामध्यें वृष्टि केली. यक्ष ह्मणतो:—हे कुंतीपुत्रा अर्जुना, ह्या खटपटीचा काय उपयोग ? माझ्या प्रश्नाचीं उत्तरें देऊन मग जलपान कर ३१. प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावांचून जर तूं पाणी पिऊं लागलास तर तें पितांक्षणींच तुझा अंत झाला असें समज. ह्याप्रमाणें यक्षानें सांगितलें असतां डाव्या हातानेंही बाण मारणाऱ्या कुंतीपुत्र धनंजयानें ३२ त्या भाषणाची अवज्ञा करून जलपान केलें आणि तें करितांक्षणींच तो मरून पडला. नंतर इकडे कुंतीपुत्र युधिष्ठिर भीमसेनाला ह्मणाला ३३ " हे भरतकुलोत्पन्ना शत्रुतापना, नकुल, सहदेव आणि अर्जुन उदक आणण्याकरितां बरेच वेळ गेले आहेत आणि अद्यापि परत आले नाहींत ३४. ह्यास्तव; तुझें देव बरें करो, तूं त्यांना घेऊन ये आणि उदकही बरोबर आण. " ह्यावर " ठीक आहे " असें ह्मणून भीमसेन जिकडे त्याचे पुरुषश्रेष्ठ भ्राते मरून पडले होते तिकडे निघून गेला. त्यांना

महाबाहुः कर्म तद्यक्षरक्षसाम् । स चिन्तयामास तदा योद्धव्यं ध्रुवमद्य वै ३७ पास्यामि तावत्पानीयमिति पार्थो वृकोदरः । ततोऽभ्यधावत्पानीयं पिपासुः पुरुषर्षभः ३८ यक्ष उवाच ॥ मा तात साहसं कार्षीर्मम पूर्वपरिग्रहः । प्रश्नानुक्त्वा तु कौन्तेय ततः पिब हरस्व च ३९ एवमुक्तस्तदा भीमो यक्षेणामिततेजसा । अनुक्त्वैव तु तान्प्रश्नान्पीत्वैव निपपात ह ४० ततः कुन्तीसुतो राजा प्रचिन्त्य पुरुषर्षभः । समुत्थाय महाबाहुर्दह्यमानेन चेतसा ४१ व्यपेतजननिर्घोषं प्रविवेश महावनम् । रुरुभिश्च वराहैश्च पक्षिभिश्च निषेवितम् ४२ नीलभास्वरवर्णैश्च पादपैरुपशोभितम् । भ्रमरैरुपगीतं च पक्षिभिश्च महायशाः ४३ स गच्छन्कानने तस्मिन्हेमजालपरिष्कृतम् । ददर्श तत्सरः श्रीमान्विश्वकर्मकृतं यथा ४४ उपेतं नलिनीजालैः सिन्धुवारैः सवेतसैः । केतकैः करवीरैश्च पिप्पलैश्चैव संवृतम् । श्रमार्तस्तदुपागम्य सरो दृष्ट्वाथ विस्मितः ४५ [११८१६]

अवलोकन करून दुःखित झालेला भीमसेन तृषेनेंही व्याकुल झाला ३५,३६; आणि यक्षराक्षसांचें हें कर्म आहे असें समजून तो मनामध्यें ह्मणाला "आज आपणाला निःसंशय युद्ध केलेंच पाहिजे ३७; परंतु, अगोदर पाणी तर पिऊन घेऊं." असा विचार मनामध्यें आणून कुंतीपुत्र पुरुषश्रेष्ठ भीमसेन उदकपान करण्याच्या इच्छेनें तिकडे धांवला ३८. तेव्हां यक्ष ह्मणालाः—बा कुंतीपुत्रा, साहस करूं नकोस. मीं पूर्वीं ह्या उदकाचा स्वीकार केलेला आहे. माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग तूं उदकपान कर आणि घेऊनही जा ३९. ह्याप्रमाणें अतुलतेजस्वी यक्षानें सांगितलें असतां त्या प्रश्नांचीं उत्तरें न देतांच भीमसेनानें उदकपान केलें आणि तें करितांक्षणीं तो मरून पडला ४०. तदनंतर पुरुषश्रेष्ठ कुंतीपुत्र धर्मराजाला काळजी वाटून तो तेथून उठला आणि अंतःकरण संतप्त होत असतांना तो महापराक्रमी युधिष्ठिर ४१ लोकांची गडबड जेथें मुळींच नाहीं अशा महावनामध्यें प्रविष्ट झाला. रुरुसंज्ञक मृग, वराह आणि पक्षी ह्यांनीं त्या वनाचा आश्रय केला होता ४२; नीलवर्ण आणि श्वेतवर्ण वृक्षांनीं त्याला शोभा आलेली होती; आणि भ्रमर व पक्षी त्यांत शब्द करीत होते. ह्या वनांतून जातां जातां सुवर्णवर्ण केसरांनीं भूषित असें विश्वकर्म्यानें निर्माण केलेलेंच कीं काय एक सरोवर त्या महायशस्वी वैभवशाली युधिष्ठिरानें अवलोकन केलें ४३, ४४. सिंधुवार, वेतस, केतकी, करवीर, पिंपळ आणि कमलिनींचे समुदाय ह्यांनीं तें सरोवर गजबजून गेलेलें होतें; व त्या सरोवरासमीप गेल्यावर तें अवलोकन करून श्रमानें व्याकुल झालेला युधिष्ठिर विस्मयचकित झाला ४५. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत शत-

इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्या-
रणेयपर्वणि नकुलादिपतने द्वादशाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३१२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स ददर्श हतान्भ्रातॄँल्लोकपालानिव च्युतान् । युगान्ते समनुप्राप्ते शक्रप्रतिमगौरवान् १ विनिकीर्णधनुर्बाणं दृष्ट्वा निहतमर्जुनम् । भीमसेनं यमौ चैव निर्विचेष्टान्गतायुषः २ स दीर्घमुष्णं निःश्वस्य शोकबाष्पपरिप्लुतः । तान्दृष्ट्वा पतितान्भ्रातॄन्सर्वांश्चिन्तासमन्वितः ३ धर्मपुत्रो महाबाहुर्विललाप सुविस्तरम् । ननु त्वया महाबाहो प्रतिज्ञातं वृकोदर ४ सुयोधनस्य भेत्स्यामि गदया सक्थिनी रणे । व्यर्थं तदद्य मे सर्वं त्वयि वीरे निपातिते ५ महात्मनि महाबाहो कुरूणां कीर्तिवर्धने । मनुष्यसंभवा वाचो विधर्मिण्यः प्रतिश्रुताः ६ भवतां दिव्यवाचस्तु ता भवन्तु कथं मृषा । देवाश्चापि यदावोचन्सूतकं त्वां धनञ्जय ७ सहस्राक्षादनवरः कुन्ति पुत्रस्तवेति वै । उत्तरं पारियात्रं च जगुर्भूतानि सर्वशः ८ विप्रनष्टां श्रियं चैषामाहर्ता पुनरञ्जसा । नास्य जेता रणे,

---

ग्रथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरणेयपर्वापैकीं नकुलादिकाच्या पतनाविषयी तीनशें बारावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१२ ॥

वैशंपायन सांगतात:—प्रलयकाल प्राप्त झाला असतां ज्याप्रमाणें सर्व प्रजा मरून पडलेल्या असतात त्याप्रमाणें स्वर्गापासून च्युत झालेले लोकपालच कीं काय असे ते इंद्रतुल्यपराक्रमी भ्राते वध पावल्याचें त्यानें अवलोकन केलें १. धनुर्बाण अस्ताव्यस्त होऊन मरून पडलेला अर्जुन, भीमसेन आणि नकुलसहदेव असे आपले गतप्राण झालेले भ्राते निश्चेष्ट पडलेले पाहून २ त्यानें दुःखाचा दीर्घ सुस्कारा टाकिला आणि दुःखाश्रूंनीं भरून गेलेला तो धर्मराज मरून पडलेल्या त्या सर्व भ्रात्यांना अवलोकन करून चिंताक्रांत झाला ३. नंतर, तो महापराक्रमी धर्मपुत्र त्यांच्याकरितां फारच विलाप करूं लागला. (तो ह्मणाला) " हे महापराक्रमी भीमसेना, —संग्रामामध्यें गदेच्या आघातानें सुयोधनाच्या मांड्या मी फोडून टाकीन—अशी जी तू प्रतिज्ञा केली होतीस ती आज, कौरवांची कीर्ति वृद्धिंगत करणाऱ्या तुज महात्म्या वीराचा वध झाल्यामुळें, सर्व व्यर्थ झाली आहे. हे महापराक्रमी भीमसेना, मनुष्यांच्या वाचा खोट्या पडत असतात असें ऐकिलेलें आहे ४, ५, ६; परंतु, तुमच्या त्या दिव्य वाणी असत्य कशा होतील ? ' हे कुंति, हा तुझा पुत्र (पराक्रमामध्यें) इंद्रापेक्षां कमी नाहीं ' असें सोहेरामध्येंच, हे धनंजया, तुझ्यासंबंधानें देवांनीं सांगून ठविलें आहे; व त्याचप्रमाणें ' आपलें नष्ट झालेलें वैभव हा पुनरपि सहज परत आणील;

कश्चिद्जेता नैष कस्यचित् ९ सोयं मृत्युवशं यातः कथं जिष्णुर्महाबलः।
अयं ममाशां संहृत्य शेते भूमौ धनञ्जयः १० आश्रित्य यं वयं नाथं
दुःखान्येतानि सेहिम । रणे प्रमत्तौ वीरौ च सदा शत्रुनिबर्हणौ ११
कथं रिपुवशं यातौ कुन्तीपुत्रौ महाबलौ । यौ सर्वास्त्राप्रतिहतौ भीमसे-
नधनञ्जयौ १२ अश्मसारमयं नूनं हृदयं मम दुर्हृदः । यमौ यदेतौ दृष्ट्वाद्य पतितौ
नावदीर्यते १३ शास्त्रज्ञा देशकालज्ञास्तपोयुक्ताः क्रियान्विताः । अकृत्वा
सदृशं कर्म किं शेध्वं पुरुषर्षभाः १४ अविक्षतशरीराश्चाप्यप्रमृष्टशरासनाः।
असंज्ञा भुवि संगम्य किं शेध्वमपराजिताः १५ सानूनिवाद्रेः संसुप्तान्दृष्ट्वा-
भ्रातॄन्महामतिः । सुखं प्रसुप्तान्प्रस्विन्नः खिन्नः कष्टां दशां गतः १६
एवमेवेदमित्युक्त्वा धर्मात्मा स नरेश्वरः । शोकसागरमध्यस्थो दध्यौ
कारणमाकुलः १७ इतिकर्तव्यतां चेति देशकालविभागवित् । नाभिपेदे

संग्रामामध्यें ह्याला जिंकणारा कोणीही नाहीं व हा कोणालाही न जिंकणारा नाहीं ' असें उत्तर पारियात्रावरील सर्व प्राण्यानीं सांगून ठेविलें आहे ७, ८, ९; परंतु, तो हा महाबलाढ्य अर्जुन कसा बरें मृत्यूच्या अधीन झाला ? ज्या नाथाचा आश्रय करून आह्मीं हीं दुःखें सहन केलीं तो हा धनजय माझ्या आशेचा विघात करून भूमीवर शयन करीत आहे. अरे, रणामध्यें बेफाम वागणारे व सर्वदां शत्रूचा वधच करणारे महाबलाढ्य वीर कुंतीपुत्र भीमसेन व धनजय सर्व अस्त्रप्रयोगांमध्ये निष्णात असतांना कसे बरे शत्रूच्या स्वाधीन झाले ? १०, ११, १२. मज दुष्टाचें हृदय खरोखर अस्सल पाषाणाप्रमाणें दृढ आहे. कारण, हे नकुलसहदेव मरून पडलेले अवलोकन केल्यावरही तें विदीर्ण होऊन जात नाहीं १३. हे पुरुषश्रेष्ठहो, तुह्मी शास्त्र व देशकाल जाणणारे, तपस्वी व पराक्रमी असूनही आपणांला योग्य असें कर्म न करितां कां ह्मणून शयन करीत आहां ? १४. हे अजिंक्य पांडवहो, शरीराला क्षत न पाडतां आणि धनुष्याचाही विध्वंस न होतां तुह्मी भूतलाला खिळून कां बरें बेशुद्ध पडलां आहांत ? " १५. गाढ निद्रा लागलेलीं पर्वताचीं शिखरेंच कीं काय असे आपले भ्रात जसे कांहीं गाढ निद्रिस्थ झालेले अवलोकन करून शोचनीय स्थितीला जाऊन पोंचलेल्या धर्मराजाला घाम आला व तो खेद करूं लागला १६. ह्याप्रमाणें भ्रात्याला उद्देशून भाषण केल्यावर शोकसागरांत पडलेला तो व्याकुल धर्मात्मा धर्मराज भ्रात्यांच्या मरणाचें कारण व ह्या संकटांतून पार पडण्याचा उपाय मनामध्यें आणूं लागला; परंतु, कोणत्या ठिकाणीं व कोणत्या वेळीं काय करावें हें समजणारा तो महापराक्रमी व महाबुद्धिमान् धर्मात्मा धर्मपुत्र स्वस्थ मनानें विचार करूं लागला.

महाबाहुर्विचिन्तयानो महामतिः १८ अथ संस्तभ्य धर्मात्मा तदात्मानं तपः- सुतः । एवं विलप्य बहुधा धर्मपुत्रो युधिष्ठिरः १९ बुद्ध्या विचिन्तयामास वीराः केन निपातिताः २० नैषां शस्त्रप्रहारोऽस्ति पदं नेहास्ति कस्यचित् । भूतं महदिदं मन्ये भ्रातरो येन मे हताः २१ एकाग्रं चिन्तयिष्यामि पीत्वा वेत्स्यामि वा जलम् । स्यात्तु दुर्योधनेनेदमुपांशुविहितं छतम् २२ गान्धारराजरचितं सततं जिह्मबुद्धिना । यस्य कार्यमकार्यं वा सममेव भवत्युत २३ कस्तस्य विश्वसेद्वीरो दुष्कृतेरकृतात्मनः । अथवा पुरुषैर्गूढैः प्रयोगोऽयं दुरात्मनः २४ भवेदिति महाबुद्धिर्बहुधा तदचिन्तयत् । तस्यासीन्न विषेणेदमुदकं दूषितं यथा २५ मृतानामपि चैतेषां विकृतं नैव जायते । मुखवर्णाः प्रसन्ना मे भ्रातॄणामित्यचिन्तयत् २६ एकैकशश्चौघबलानिमान्पुरुषसत्तमान् । कोऽन्यः प्रतिसमासेत कालान्तकयमादृते २७ एतेन व्यवसायेन तत्तोयं व्यवगाढवान् । गाहमानश्च तत्तोयमन्तरिक्षात्स

असतांही त्याच्या कांहींएक लक्ष्यांत येईना. तेव्हां, वर सांगितल्याप्रमाणें नानाप्रकारांनीं विलाप केल्यावर तो धर्मपुत्र युधिष्ठिर मनामध्यें ह्मणाला १७,१८,१९ "ह्या वीरांचा वध कोणीं बरें केला असावा ? २०. ह्यांना कोठें शस्त्राचा प्रहार झालेला नाहीं व येथें कोणाचें पाऊलही उमटलेलें दिसत नाहीं. तस्मात्, ज्यानें माझ्या भ्रात्यांचा वध केला आहे तें हें कोणीतरी मोठेंच भूत असलें पाहिजे असें मला वाटतें २१. ह्यास्तव, उदक प्राशन करून स्वस्थ मनानें मला ह्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. अथवा, प्रथमतः उदकाचीच परीक्षा करून पहावी हें बरें. कारण, सुयोधनानें हें कांहीं तरी गुप्तपणें आह्मांला मृत्यु येण्याचें साधन करून ठेविलें असेल २२. अथवा, नेहमीं कुटिल बुद्धि धारण करणाऱ्या गांधारराज शकुनीनेंच हें कांहीं तरी केलें असेल. ज्याला कार्य आणि अकार्य हीं दोन्हीं सारखींच आहेत २३ त्या दुष्कर्मी मूढ पुरुषाचा कोणत्या बरें समंजस पुरुषाला विश्वास येईल. अथवा त्या दुरात्म्याच्या कांहीं गुप्त लोकांनींच हा प्रयोग केलेला २४ असावा." ह्याप्रमाणें त्या महाबुद्धिमान् धर्मराजानें नानाप्रकारांनीं त्यांच्या मृत्यूविषयीं विचार करून पाहिला. "सुयोधनानें विष कालवून हें उदक दूषित केलें आहे असें ह्मणतां येत नाहीं २५. कारण, हे जरी मृत झाले आहेत तरी ह्यांच्या मुखांवर कांहीं विकार दृष्टीं पडत नाहीं. माझ्या भ्रात्यांच्या मुखांवरील कांति निर्मल आहे " असा विचार करून तो आणखीही मनामध्यें ह्मणाला २६ "ह्या पुरुषश्रेष्ठांपैकीं प्रत्येकाचें बल वीरसमुदायाच्या बलाइतकें असतांना कालांतक यमावांचून यांच्याशीं प्रतिपक्षी ह्या नात्यानें युद्ध करण्यास कोण बरें

शुश्रुवे २८ यक्ष उवाच ॥ अहं बकः शैवलमत्स्यभक्षो नीता मया प्रेत-
वशं तवानुजाः । त्वं पञ्चमो भविता राजपुत्र न चेत्प्रश्नान्पृच्छतो व्याक-
रोषि २९ मा तात साहसं कार्षीर्मम पूर्वपरिग्रहः । प्रश्नानुक्त्वा तु
कौन्तेय ततः पिब हरस्व च ३० युधिष्ठिर उवाच ॥ रुद्राणां वा वसूनां
वा मरुतां वा प्रधानभाक् । पृच्छामि को भवान्देवो नैतच्छकुनिना
कृतम् ३१ हिमवान्पारियात्रश्च विन्ध्यो मलय एव च । चत्वारः पर्वताः
केन पातिता भूरितेजसः ३२ अतीव ते महत्कर्म कृतं च बलिनां वर ।
यान्न देवा न गन्धर्वा नासुराश्च न राक्षसाः ३३ विषहेरन्महायुद्धे कृतं ते
तन्महाद्भुतम् । न ते जानामि यत्कार्यं नाभि जानामि काङ्क्षितम् ३४
कौतूहलं महज्जातं साध्वसं चागतं मम । येनास्म्युद्विग्नहृदयः समुत्पन्न-
शिरोज्वरः ३५ पृच्छामि भगवंस्तस्मात्को भवानिह तिष्ठति । यक्ष उवाच ॥
यक्षोहमस्मि भद्रं ते नास्मि पक्षी जलेचरः ३६ मयैते निहताः सर्वे

समर्थ आहे ?" २७. असा विचार मनामध्यें आणून तो त्या उदकामध्यें उतरला; परंतु, उतरतां उतरतांच आकाशांतून पुढील शब्द त्याच्या कानीं पडले २८. यक्ष ह्मणतोः—हे राजपुत्रा, शेंवाळें व मत्स्य ह्यांवर उपजीविका करणारा मी बक आहें व मींच तुझ्या कनिष्ठ भ्रात्यांना गतप्राण केले आहे. मी विचारीत असलेल्या प्रश्नांचीं उत्तरें जर तूं न देशील तर तूंही ह्यापैकींच पांचवा होशील २९. बा कुंतीपुत्रा, साहस करूं नको. मीं प्रथम ह्या उदकाचा स्वीकार केला आहे. प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग तूं पाणी पी आणि घेऊनही जा ३०. युधिष्ठिर ह्मणतोः—रुद्र, वसु अथवा मरुद्गण ह्यांपैकीं कशांतला तूं मुख्य देव आहेस हें आधीं मी तुला विचारीत आहें. कारण, हें पक्ष्याचें कृत्य नव्हे ३१. अरे, हिमालय, पारियात्र, विंध्य आणि मलय ह्या चार पर्वतांप्रमाणें असलेल्या ह्या महातेजस्वी भ्रात्यांचा वध करणारा तूं कोण ? ३२. हे बलवानांमध्यें श्रेष्ठ, तूं अतिशयच मोठें कर्म केलें आहेस. अरे, देव, गंधर्व, असुर अथवा राक्षस ३३ ह्यांना महायुद्धामध्यें ज्यांच्याशीं टिकाव धरवत नाहीं त्याचा वध हें तूं मोठें अद्भुत कृत्य केलें आहेस. तुझा उद्देश काय आहे आणि तुला काय कर्तव्य आहे हें मला समजलें नाहीं ३४. तूं कोण हें समजण्याविषयीं मला मोठी उत्कंठा प्राप्त झाली आहे आणि मोठें भयही उत्पन्न झाल्यामुळें मन उद्विग्न झालें असून मस्तकांमध्येंही तिडीक उठली आहे ३५. ह्यास्तव, हे भगवन्, आपण कोण येथें आहां ? हें मी आपणांला विचारीत आहें. यक्ष ह्मणतोः—तुझें देव बरें करो, मी यक्ष आहें. उदकामध्यें संचार करणारा (बक) पक्षी मी नाहीं ३६. हे तुझे सर्व महाबलाढ्य

भ्रातरस्ते महौजसः । वैशम्पायन उवाच ॥ ततस्तामशिवां श्रुत्वा वाचं स परुषाक्षराम् ३७ यक्षस्य ब्रुवतो राजन्नपक्रम्य तदा स्थितः । विरूपाक्षं महाकायं यक्षं तालसमुच्छ्रयम् ३८ ज्वलनार्कप्रतीकाशमधृष्यं पर्वतोपमम् । वृक्षमाश्रित्य तिष्ठन्तं ददर्श भरतर्षभः ३९ मेघगम्भीरनादेन तर्जयन्तं महास्वनम् । यक्ष उवाच ॥ इमे ते भ्रातरो राजन्वार्यमाणा मयासकृत् ४० बलात्तोयं जिहीर्षन्तस्ततो वै सूदिता मया । न पेयमुदकं राजन्प्राणानिह परीप्सता ४१ पार्थ मा साहसं कार्षीर्मम पूर्वपरिग्रहः । प्रश्नानुक्त्वा तु कौन्तेय ततः पिब हरस्व च ४२ युधिष्ठिर उवाच ॥ न चाहं कामये यक्ष तव पूर्वपरिग्रहम् । कामं नैतत्प्रशंसन्ति सन्तो हि पुरुषाः सदा ४३ यदात्मना स्वमात्मानं प्रशंसेत्पुरुषर्षभ । यथाप्रज्ञं तु ते प्रश्नान्प्रतिवक्ष्यामि पृच्छ माम् ४४ यक्ष उवाच ॥ किं स्विदादित्यमुन्नयति के च तस्याभितश्चराः । कश्चैनमस्तं नयति कस्मिंश्च प्रतितिष्ठति ४५ युधिष्ठिर उवाच ॥ ब्रह्मादित्यमुन्नयति देवास्तस्याभितश्चराः । धर्मश्चास्तं नयति च सत्ये च*

भ्राते मींच मारिले आहेत. वैशंपायन सांगतात:— कठोर शब्दांनीं युक्त असलेली ती अमंगल वाणी श्रवण केल्यावर तो युधिष्ठिर ३७ यक्षाचें बोलणें चाललेंच असतांना उदकापासून दूर जाऊन उभा राहिला; तों भयंकर नेत्र व तालवृक्षासारिखें उंच असें प्रचंड शरीर धारण केलेला यक्ष ३८ त्या भरतवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरानें अवलोकन केला. अग्नि आणि सूर्य ह्यांप्रमाणें त्या पर्वतप्राय यक्षाची कांति होती आणि तो अजिंक्य यक्ष वृक्षाचा आश्रय करून उभा राहिलेला असून ३९ मेघासारिख्या गंभीर स्वरानें मोठी गर्जना करीत करीत दटावीत होता. यक्ष ह्मणतो:—हे राजा, मीं अनेक वेळां त्यांना निषेध केला असतांनाही हे तुझे भ्राते ४० बलात्कारानें उदक घेऊं लागले; ह्मणून मीं ह्यांचा वध केला. कारण, हे राजा, प्राणांची आशा बाळगणाऱ्यानें ह्या उदकाचें सेवन करितां उपयोगीं नाहीं ४१. ह्यास्तव, हे पार्था, तू साहस करूं नको. मीं ह्या उदकाचा प्रथम स्वीकार केला आहे. हे कुंतीपुत्रा, प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग तूं हें उदक सेवन कर व घेऊनही जा ४२. युधिष्ठिर ह्मणतो:— तूं ज्याचा प्रथम स्वीकार केला आहेस त्याची, हे यक्षा, मी इच्छा करींत नाहीं. परंतु, हे पुरुषश्रेष्ठा, आपणच आपली स्वतःची प्रशंसा करणें हें कृत्य मात्र खरोखर सभ्य लोकांना प्रशस्त वाटत नाहीं. असो. आतां तूं मला विचार; मी यथामति तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें देतों ४३, ४४. यक्ष ह्मणतो:—सूर्याचा उदय कोण करितो? त्याचे साहाय्यकर्ते कोण ? त्याला अस्तास कोण नेतो ? आणि त्याला आधार कशाचा असतो ? ४५ युधिष्ठिर

प्रतितिष्ठति ४६ यक्ष उवाच ॥ केन स्विच्छ्रोत्रियो भवति केन स्विद्विन्दते महत् । केनस्विद्द्वितीयवान्भवति राजन्केन च बुद्धिमान् ४७ युधिष्ठिर उवाच ॥ श्रुतेन श्रोत्रियो भवति तपसा विन्दते महत् । धृत्या द्वितीयवान्भवति बुद्धिमान्वृद्धसेवया ४८ यक्ष उवाच ॥ किं ब्राह्मणानां देवत्वं कश्च धर्मः सतामिव । कश्चैषां मानुषो भावः किमेषामसतामिव ४९ युधिष्ठिर उवाच ॥ स्वाध्याय एषां देवत्वं तप एषां सतामिव । मरणं मानुषो भावः परिवादोऽसतामिव ५० यक्ष उवाच ॥ किं क्षत्रियाणां देवत्वं कश्च धर्मः सतामिव । कश्चैषां मानुषो भावः किमेषामसतामिव ५१ युधिष्ठिर उवाच ॥ इष्वस्त्रमेषां देवत्वं यज्ञ एषां सतामिव । भयं वै मानुषो भावः परित्यागोऽसतामिव ५२ यक्ष उवाच ॥ किमेकं यज्ञियं साम किमेकं यज्ञियं यजुः । का चैका वृणुते यज्ञं कां यज्ञो नातिवर्तते ५३ युधिष्ठिर उवाच ॥ प्राणो वै यज्ञियं साम मनो वै यज्ञियं यजुः ।

सांगतो:—ब्रह्मामुळें सूर्य उदयास येतो; देव त्याचे साह्यकर्ते आहेत; धर्म त्याला स्वस्थानीं नेऊन पोचवितो आणि सत्याच्या आधारानें तो राहतो ४६. यक्ष प्रश्न करितो:—श्रोत्रियत्व कशानें प्राप्त होतें ? ब्रह्माची प्राप्ति कशानें होते ? पुरुष सहायवान् कशानें होतो ? आणि बुद्धिमान् कशानें होतो ? ४७. युधिष्ठिर सांगतो:—वेदाध्ययनानें श्रोत्रियत्व येतें; तपश्चर्येनें ब्रह्मप्राप्ति होते; धैर्यानें पुरुष सहायवान् होतो आणि वृद्धसेवेनें बुद्धिमान् होतो ४८. यक्ष प्रश्न करितो:—ब्राह्मणांचें देवत्व कोणतें ? सज्जनांप्रमाणें ह्यांचा धर्म कोणता ? ह्यांचें मनुष्यत्व कोणतें ? आणि दुर्जनांप्रमाणें ह्यांचें आचरण कोणतें ? ४९. युधिष्ठिर सांगतो:—वेदाध्ययन हें ब्राह्मणांचें देवत्व होय; तपश्चर्या हें ह्यांचें सज्जनांप्रमाणें आचरण होय; मरण हें ह्यांचें मनुष्यत्व होय आणि निंदा हें ह्यांचें दुर्जनांप्रमाणें आचरण होय ५०. यक्ष प्रश्न करितो:—क्षत्रियांचें देवत्व कोणतें ? सज्जनांप्रमाणें ह्यांचा धर्म कोणता ? ह्यांचें मनुष्यत्व कोणतें ? आणि दुर्जनांप्रमाणें ह्यांचें आचरण कोणतें ? ५१. युधिष्ठिर सांगतो:—बाण आणि अस्त्रें हें ह्यांचें देवत्व होय; यज्ञ हें ह्यांचें सज्जनांप्रमाणें आचरण होय; भय हें ह्यांचें मनुष्यत्व होय; आणि शरणागतांचा परित्याग हें ह्यांचें दुराचरण होय ५२. यक्ष प्रश्न करितो:—यज्ञसंबंधीं श्रेष्ठ साम कोणतें ? यज्ञसंबंधीं मुख्य यजुर्मंत्र कोणता ? आणि यज्ञाला आधारभूत अशी एक कोण आहे ? व कोणावांचून यज्ञाला राहतां येत नाहीं ? ५३. युधिष्ठिर सांगतो:—प्राण हे मुख्य यज्ञिय साम होय; मन हाच मुख्य यज्ञसंबंधीं यजुर्मंत्र होय; वेद हाच यज्ञाला मुख्य

अनेका वृणुते यज्ञं तां यज्ञो नातिवर्तते ५४ यक्ष उवाच ॥ किं स्विदा-वपतां श्रेष्ठं किं स्विन्निवपतां वरम्। किंस्वित्प्रतिष्ठमानानां किं स्वित्प्र-सवतां वरम् ५५ युधिष्ठिर उवाच ॥ वर्षमावपतां श्रेष्ठं बीजं निवपतां वरम्। गावः प्रतिष्ठमानानां पुत्रः प्रसवतां वरः ५६ यक्ष उवाच ॥ इन्द्रियार्थाननुभवन्बुद्धिमाँल्लोकपूजितः। संमतः सर्वभूतानामुच्छ्व-सन्को न जीवति ५७ युधिष्ठिर उवाच ॥ देवतातिथिभृत्यानां पितॄणा-मात्मनश्च यः। न निर्वपति पञ्चानामुच्छ्वसन्न स जीवति ५८ यक्ष उवाच॥ किंस्विद्गुरुतरं भूमेः किंस्विदुच्चतरं च खात्। किं स्विच्छीघ्रतरं वायोः किंस्विद्बहुतरं तृणात् ५९ युधिष्ठिर उवाच ॥ माता गुरुतरा भूमेः खात्पि-तोच्चतरस्तथा। मनः शीघ्रतरं वाताच्चिन्ता बहुतरी तृणात् ६० यक्ष उवाच ॥ किं स्वित्सुप्तं न निमिषति किं स्विज्जातं न चोपति। कस्य-स्विद्धृदयं नास्ति किं स्विद्वेगेन वर्धते ६१ युधिष्ठिर उवाच ॥ मत्स्यः सुप्तो न निमिषत्यण्डं जातं न चोपति। अश्मनो हृदयं नास्ति नदी वेगेन

आधार होय आणि त्याच्याचवांचून यज्ञ कायम रहात नाहीं ५४. यक्ष प्रश्न करितोः—सर्व प्रकारें देवांना तृप्त करणाऱ्यांमध्यें कोण श्रेष्ठ ? पितरांचें संतर्पण कर-णाऱ्यांमध्यें कोण उत्कृष्ट ? इहलोकीं स्थिरस्थावर इच्छिणाऱ्यांना कोण उत्तम आणि संततीची इच्छा करणाऱ्यांना कोणतें उत्कृष्ट ? ५५. युधिष्ठिर सांगतोः—सर्व प्रकारें देवांची तृप्ति करणाऱ्यांमध्यें पर्जन्यवृष्टि श्रेष्ठ, पितरांचें संतर्पण करणाऱ्यांमध्यें बीजश्रेष्ठ, इहलोकीं स्थिरस्थावर इच्छिणाऱ्यांना गाई हें श्रेष्ठ साधन आणि संततीची इच्छा कर-णाऱ्यांना पुत्र हेंच श्रेष्ठ फल ५६. यक्ष प्रश्न करितोः—शब्दादि विषयांचा अनुभव घेणारा, बुद्धिमान्, लोकमान्य आणि सर्व प्राण्यांना संमत असा कोण बरें पुरुष श्वासोच्छ्वास करीत असूनही मेलेला असतो ? ५७. युधिष्ठिर सांगतोः—देवता, अतिथि, सेवक, पितर आणि आत्मा ह्या पांचाना उद्देशून जो कांहीं अर्पण करीत नाहीं तो श्वासोच्छ्वास करीत असूनही मेलेला असतो ५८. यक्ष प्रश्न करितोः— पृथ्वीपेक्षां जड कोण ? आकाशापेक्षां उंच कोण ? वायूपेक्षां शीघ्रगति कोणाची ? आणि तृणा-पेक्षांही तुच्छ कोण ५९. युधिष्ठिर उत्तर देतोः—माता पृथ्वीपेक्षां जड; पिता आकाशापेक्षां अधिक उंच; मनाची गति वायूपेक्षां शीघ्र आणि चिंता तृणापेक्षांही क्षुल्लक ६०. यक्ष प्रश्न करितोः— झोंप लागली असतांनाही दृष्टि कोणाची लुप्त होत नाहीं ? उत्पन्न झाल्यानंतरही कोण हालचाल करीत नाहीं ? हृदय कोणाला नसतें ? आणि वेगानें काय वाढत जातें ? ६१. युधिष्ठिर सांगतोः— मत्स्य निद्रिस्त असतांनाही

वर्धते ६२ यक्ष उवाच ॥ किं स्वित्प्रवसतो मित्रं किं स्विन्मित्रं गृहे सतः। आतुरस्य च किं मित्रं किं स्विन्मित्रं मरिष्यतः ६३ युधिष्ठिर उवाच ॥ सार्थः प्रवसतो मित्रं भार्या मित्रं गृहे सतः । आतुरस्य भिषङ्मित्रं दानं मित्रं मरिष्यतः ६४ यक्ष उवाच ॥ कोतिथिः सर्वभूतानां किं स्विद्धर्मं सनातनम् । अमृतं किं स्विद्राजेन्द्र किं स्वित्सर्वमिदं जगत् ६५ युधिष्ठिर उवाच ॥ अतिथिः सर्वभूतानामग्निः सोमो गवामृतम् । सनातनोमृतो धर्मो वायुः सर्वमिदं जगत् ६६ यक्ष उवाच ॥ किं स्विदेको विचरते जातः को जायते पुनः । किं स्विद्धिमस्य भैषज्यं किं स्विदावपनं महत् ६७ युधिष्ठिर उवाच ॥ सूर्य एको विचरते चन्द्रमा जायते पुनः। अग्निर्हिमस्य भैषज्यं भूमिरावपनं महत् ६८ यक्ष उवाच ॥ किं स्विदेकपदं धर्म्यं किं स्विदेकपदं यशः। किं स्विदेकपदं स्वर्ग्यं किं स्विदेकपदं सुखम् ६९ युधिष्ठिर उवाच ॥ दाक्ष्यमेकपदं धर्म्यं दानमेकपदं यशः । सत्यमे-
[1]

त्याची दृष्टि लुप्त होत नाहीं; अंड उत्पन्न झालें असूनही हालचाल करीत नाहीं; पाषाणाला हृदय नाहीं आणि नंदी वेगानें वृद्धिंगत होत असते ६२. यक्ष प्रश्न करितो:—प्रवाशाचा मित्र कोण ? सज्जनाला घरीं मित्र कोण? रोग्याचा मित्र कोण ? व मुमूर्षूचा मित्र कोण ? ६३. युधिष्ठिर सांगतो:—व्यापाऱ्यांचा तांडा हा प्रवाशाचा मित्र; सज्जनाला घरीं भार्या हाच मित्र; रोग्याला वैद्य हाच मित्र आणि मुमूर्षूला दान हाच मित्र ६४. यक्ष प्रश्न करितो:—प्राणिमात्रांचा अतिथि कोण? सनातन धर्म कोणता? अमृत कोणतें? आणि, हे राजाधिराज, हें सर्व जगत् कोण ? ६५. युधिष्ठिर सांगतो:- अग्नि हाच सर्व प्राण्यांचा अतिथि; मोक्षधर्म हाच सनातन धर्म होय; गोदुग्ध हेंच अमृत आणि वायु हेंच सर्व जगत् ६६ यक्ष प्रश्न करितो:—एकाकी संचार करणारा कोण ? उत्पन्न झाल्यावरही फिरून फिरून उत्पन्न होणारा कोण ? शैत्याचें औषध काय ? आणि मोठें भांडार कोणतें ? ६७. युधिष्ठिर सांगतो:— सूर्य एकाकी संचार करीत असतो; चंद्रमा फिरून फिरून उत्पन्न होतो; अग्नि हेंच शैत्याचें औषध आणि भूमि हेंच मोठें भांडार ६८. यक्ष प्रश्न करितो:—धर्माचें मुख्य पर्यवसानस्थान कोणतें ? यशाचें मुख्य साधन कोणतें ? स्वर्गप्राप्तीचें मुख्य कारण कोणतें? आणि सुखाचें मुख्य निधान कोणतें? ६९. युधिष्ठिर सांगतो:—दक्षता हेंच धर्माचें मुख्य पर्यवसानस्थान होय; दान हेंच यशःप्राप्तीचें मुख्य

---

१ ज्याचा देहविषयक अध्यास नाहींसा झालेला आहे त्या योग्याला हृदय म्हणजे शोकाचें स्थान नाहीं असें टीकाकार नीलकंठ म्हणतात.

२ टीकाकार नीलकंठपंडितांनी नदी याचा अर्थ चित्तनदी असा केला आहे

कपदं स्वर्ग्यं शीलमेकपदं सुखम् ७० यक्ष उवाच ॥ किं स्विदात्मा मनुष्यस्य किं स्विद्दैवकृतः सखा ॥ उपजीवनं किं स्विदस्य किं स्विदस्य परायणम् ७१ युधिष्ठिर उवाच ॥ पुत्र आत्मा मनुष्यस्य भार्या दैवकृतः सखा। उपजीवनं च पर्जन्यो दानमस्य परायणम् ७२ यक्ष उवाच ॥ धन्यानामुत्तमं किं स्विद्धनानां स्यात्किमुत्तमम् । लाभानामुत्तमं किं स्यात्सुखानां स्यात्किमुत्तमम् ७३ युधिष्ठिर उवाच ॥ धन्यानामुत्तमं दाक्ष्यं धनानामुत्तमं श्रुतम् । लाभानां श्रेय आरोग्यं सुखानां तुष्टिरुत्तमा ७४ यक्ष उवाच ॥ कश्च धर्मः परो लोके कश्च धर्मः सदाफलः । किं नियम्य न शोचन्ति कैश्च सन्धिर्न जीर्यते ७५ युधिष्ठिर उवाच ॥ आनृशंस्यं परो धर्मस्त्रयीधर्मः सदाफलः । मनो यम्य न शोचन्ति सन्धिः सद्भिर्न जीर्यते ७६ यक्ष उवाच ॥ किं नु हित्वा प्रियो भवति किं नु हित्वा न शोचति । किं नु हित्वार्थवान्भवति किं नु हित्वा सुखी भवेत् ७७ युधिष्ठिर उवाच ॥ मानं हित्वा प्रियो भवति क्रोधं हित्वा न शोचति । कामं हित्वार्थवान्भवति

साधन होय; सत्य हेंच स्वर्गप्राप्तीचें मुख्य कारण होय; आणि शील हेंच सुखाचें मुख्य निधान होय ७०. यक्ष प्रश्न करितो:— मनुष्याचा आत्मा कोण ? मनुष्याला दैवानें प्राप्त झालेला सखा कोण ? मनुष्याचें जीवन कशानें होतें ? आणि मनुष्याला मुख्य आधार कोणाचा ? ७१. युधिष्ठिर सांगतो:—पुत्र हा मनुष्याचा आत्मा होय; भार्या हाच दैवानें प्राप्त झालेला सखा होय; पर्जन्य हेंच जीवनाचें साधन होय आणि दान हाच मुख्य आधार होय ७२. यक्ष प्रश्न करितो:— द्रव्यप्राप्तीच्या साधनामध्यें उत्कृष्ट कोणतें ? धनामध्यें उत्तम कोणतें ? लाभामध्यें उत्तम काय ? आणि सुखामध्यें श्रेष्ठ काय ? ७३. युधिष्ठिर ह्मणतो:— दक्षता हें द्रव्य प्राप्तीचें मुख्य साधन होय ; विद्या हें उत्तम धन होय; आरोग्य हा उत्कृष्ट लाभ होय आणि संतोष हेंच उत्तम सुख होय ७४. यक्ष प्रश्न करितो:—जगतामध्यें उत्कृष्ट धर्म कोणता ? नेहमीं फलद्रूप होणारा धर्म कोणता ? संयमन कोणाचें केलें असता दुःख होत नाहीं आणि कोणाशीं केलेला समागम निष्फल होत नाही ? ७५. युधिष्ठिर सांगतो:—आश्रिताचें रक्षण हा उत्कृष्ट धर्म होय; वैदिक धर्म हा अक्षय्य फलप्रद होय; मनाचें संयमन केलें असतां दुःख होत नाहीं आणि सज्जनांशीं केलेला समागम निष्फळ होत नाहीं ७६. यक्ष प्रश्न करितो:—काय सोडिलें असतां मनुष्य प्रिय होतो ? कशाचा त्याग केल्यानें मनुष्याला दुःख करावें लागत नाहीं ? काय वर्ज्य केलें असतां मनुष्य अर्थवान् होतो ? आणि काय सोडिलें असतां मनुष्य सुखी होतो ? ७७. युधिष्ठिर

लोभं हित्वा सुखीभवेत् ७८ यक्ष उवाच ॥ किमर्थं ब्राह्मणे दानं किमर्थं नटनर्तके । किमर्थं चैव भृत्येषु किमर्थं चैव राजसु ७९ युधिष्ठिर उवाच ॥ धर्मार्थं ब्राह्मणे दानं यशोर्थं नटनर्तके । भृत्येषु भरणार्थं वै भयार्थं चैव राजसु ८० यक्ष उवाच॥ केनस्विदावृतो लोकः केनस्विन्न प्रकाशते । केन त्यजति मित्राणि केन स्वर्गं न गच्छति ८१ युधिष्ठिर उवाच॥ अज्ञानेनावृतो लोकस्तमसा न प्रकाशते। लोभात्त्यजति मित्राणि सङ्गात्स्वर्गं न गच्छति ८२ यक्ष उवाच ॥ मृतः कथं स्यात्पुरुषः कथं राष्ट्रं मृतं भवेत् । श्राद्धं मृतं कथं वा स्यात्कथं यज्ञो मृतो भवेत् ८३ युधिष्ठिर उवाच ॥ मृतो दरिद्रः पुरुषो मृतं राष्ट्रमराजकम् । मृतमश्रोत्रियं श्राद्धं मृतो यज्ञस्त्वदक्षिणः ८४ यक्ष उवाच ॥ का दिक्किमुदकं प्रोक्तं किमन्नं किं च वै विषम् । श्राद्धस्य कालमाख्याहि ततः पिब हरस्व च ८५ युधिष्ठिर उवाच ॥ सन्तो दिग्जलमाकाशं गौरन्नं प्रार्थना विषम् ।

सांगतोः—मान सोडिल्यानें मनुष्य प्रिय होतो ; क्रोधाचा त्याग केल्यानें दुःख करावें लागत नाहीं; काम वर्ज्य केल्यानें पुरुष अर्थवान् होतो आणि लोभ सोडिल्यानें मनुष्य सुखी होतो ७८. यक्ष प्रश्न करितोः—ब्राह्मणाला दान दिलें असतां त्याचें फल काय? नट व नर्तक ह्यांना दिलेल्या दानाचें फल काय? सेवकांना कशाकरितां दान द्यावयाचें? आणि राजांना कशाकरितां द्यावयाचें ? ७९. युधिष्ठिर सांगतोः— धर्म हें ब्राह्मणाला दिलेल्या दानाचें फल होय; नट व नर्तक ह्यांना दिलेल्या दानाचें कीर्ति हें फल होय; पोषण हें सेवकांना दिलेल्या दानाचें फल होय आणि अभ्युदय हें राजांना दिलेल्या दानाचें फल होय ८०. यक्ष प्रश्न करितोः—जगत् कशानें व्याप्त झालें आहे ? जगतामध्यें कशामुळें प्रकाश पडत नाहीं ? कशामुळें पुरुष मित्रांचा त्याग करण्यास उद्युक्त होतो आणि कशामुळें पुरुष स्वर्गाला मुकतो ? ८१. युधिष्ठिर सांगतोः—अज्ञानानें जगत् व्याप्त झालें आहे; तमामुळें त्यांत प्रकाश पडत नाहीं; लोभामुळें पुरुष मित्रांचा त्याग करण्यास उद्युक्त होतो आणि शब्दादि विषयांच्या संगामुळें पुरुष स्वर्गाला मुकतो ८२. यक्ष प्रश्न करितोः—पुरुष मृत कसा होतो? राष्ट्र कसें मृत होतें ? श्राद्ध कसें निर्जीव होतें आणि यज्ञ कसा प्राणरहित होतो ? ८३. युधिष्ठिर सांगतोः—दरिद्री हा मृत पुरुष होय; अराजक राष्ट्र मृत होय; वेदाध्ययनरहित ब्राह्मणांचा अभाव असल्यास श्राद्ध मृत होतें आणि यज्ञ दक्षिणारहित असल्यास मृत होतो ८४. यक्ष प्रश्न करितोः—अनुकरणीय मार्ग कोणाचा ? उदक कोणतें ? अन्न कोणतें ? विष कोणतें ? आणि श्रद्धापूर्वक दानाचा काल कोणता ?

श्राद्धस्य ब्राह्मणः कालः कथं वा यक्ष मन्यसे ८६ यक्ष उवाच ॥ तपः किंलक्षणं प्रोक्तं को दमश्च प्रकीर्तितः । क्षमा च का परा प्रोक्ता का च ह्रीः परिकीर्तिता ८७ युधिष्ठिर उवाच ॥ तपः स्वधर्मवर्तित्वं मनसो दमनं दमः । क्षमा द्वन्द्वसहिष्णुत्वं ह्रीरकार्यनिवर्तनम् ८८ यक्ष उवाच ॥ किं ज्ञानं प्रोच्यते राजन्कः शमश्च प्रकीर्तितः । दया च का परा प्रोक्ता किं चार्जवमुदाहृतम् ८९ युधिष्ठिर उवाच ॥ ज्ञानं तत्त्वार्थसंबोधः शमश्चित्तप्रशान्तता । दया सर्वसुखैषित्वमार्जवं समचित्तता ९० यक्ष उवाच ॥ कः शत्रुर्दुर्जयः पुंसां कश्च व्याधिरनन्तकः । कीदृशश्च स्मृतः साधुरसाधुः कीदृशः स्मृतः ९१ युधिष्ठिर उवाच ॥ क्रोधः सुदुर्जयः शत्रुर्लोभो व्याधिरनन्तकः । सर्वभूतहितः साधुरसाधुर्निर्दयः स्मृतः ९२ यक्ष उवाच ॥ को मोहः प्रोच्यते राजन्कश्च मानः प्रकीर्तितः । किमालस्यं च विज्ञेयं कश्च शोकः प्रकीर्तितः ९३ युधिष्ठिर उवाच ॥ मोहो

ह्यांचीं उत्तरें तूं मला दे आणि नंतर उदक प्राशन कर व घेऊनही जा ८५. युधिष्ठिर सांगतोः—संताचा मार्ग अनुकरणीय होय; आकाश हेंच उदकाचें मुख्य स्थान होय; बैल हेंच अन्नाच्या उत्पत्तीचें मुख्य साधन होय; कामना हें विष होय आणि ब्राह्मण हाच श्राद्धपूर्वक दानाचा मुख्य काल होय. मग हे यक्षा, तुझा काय विचार असेल तो खरा ८६. यक्ष प्रश्न करितोः—तप कोणतें ? दम कशाला ह्मणतात ? उत्कृष्ट प्रकारची क्षमा कोणती ? आणि लज्जा कशाला ह्मणतात ? ८७. युधिष्ठिर सांगतोः—स्वधर्मानें वागणें हें तप होय; मनःसंयमन हा दम होय; शीतोष्णादि द्वंद्वसहिष्णुता ही क्षमा होय आणि अकार्यापासून परावृत्त होणें ही लज्जा होय ८८. यक्ष प्रश्न करितोः—हे राजा, ज्ञान कशाला ह्मणतात ? शम कशाला ह्मणतात ? उत्कृष्ट दया कशाला ह्मणतात ? आणि आर्जव कशाला ह्मटलें आहे ? ८९. युधिष्ठिर सांगतोः—आत्मतत्त्वबोध हें ज्ञान होय; चित्ताची शांतता हा शम होय; प्राणिमात्राच्या सुखाची इच्छा धरणें ही दया होय आणि चित्त एकसारखें ठेवणें हें आर्जव होय ९०. यक्ष प्रश्न करितोः—जिंकण्याला कठीण असा मनुष्याचा शत्रु कोण ? अक्षय्य राहणारा रोग कोणता ? साधु कोणाला ह्मणतात ? आणि असाधु कोणाला ह्मटलें आहे ? ९१. युधिष्ठिर सांगतोः—क्रोध हा जिंकण्यास अत्यंत कठीण असा शत्रु होय; लोभ अक्षय राहणारा रोग होय; प्राणिमात्रांचें हित करणारा साधु होय आणि निर्दय पुरुष असाधु होय. ९२. यक्ष प्रश्न करितोः—हे राजा, मोह कशाला ह्मणतात ? मान कशाला ह्मटलें आहे ? आळस कशाला समजावें ?

हि धर्ममूढत्वं मानस्त्वात्माभिमानिता । धर्मनिष्क्रियतालस्यं शोक-
स्त्वज्ञानमुच्यते ९४ यक्ष उवाच ॥ किं स्थैर्यमृषिभिः प्रोक्तं किं
च धैर्यमुदाहृतम् । स्नानं च किं परं प्रोक्तं दानं च किमिहोच्यते ९५
युधिष्ठिर उवाच ॥ स्वधर्मे स्थिरता स्थैर्यं धैर्यमिन्द्रियनिग्रहः । स्नानं
मनोमलत्यागो दानं वै भूतरक्षणम् ९६ यक्ष उवाच ॥ कः पण्डितः
पुमाञ्ज्ञेयो नास्तिकः कश्च उच्यते । को मूर्खः कश्च कामः स्यात्को
मत्सर इति स्मृतः ९७ युधिष्ठिर उवाच ॥ धर्मज्ञः पण्डितो ज्ञेयो
नास्तिको मूर्ख उच्यते । कामः संसारहेतुश्च हृत्तापो मत्सरः स्मृतः ९८
यक्ष उवाच ॥ कोहंकार इति प्रोक्तः कश्च दम्भः प्रकीर्तितः । किं तद्दैवं
परं प्रोक्तं किं तत्पैशून्यमुच्यते ९९ युधिष्ठिर उवाच ॥ महाज्ञानमहं-
कारो दम्भो धर्मो ध्वजोच्छ्रयः । दैवं दानफलं प्रोक्तं पैशून्यं परदू-
षणम् १०० यक्ष उवाच ॥ धर्मश्चार्थश्च कामश्च परस्परविरोधिनः । एषां
नित्यविरुद्धानां कथमेकत्र सङ्गमः १ युधिष्ठिर उवाच ॥ यदा धर्मश्च

आणि शोक कशाला ह्मणावे ? ९३. युधिष्ठिर सांगतोः—धर्मसंबंधीं मूढत्व हा मोह होय; आत्म्याचा अभिमान हा मान होय; धर्माचें अनुष्ठान न करणें हा आळस होय आणि अज्ञान हा शोक होय ९४. यक्ष प्रश्न करितोः—ऋषींनीं स्थैर्य कशाला ह्मटलें आहे ? धैर्य ह्मणून काय सांगितलें आहे ? उत्कृष्ट स्नान कोणतें कथन केलें आहे ? आणि इहलोकीं मुख्य दान काय सांगितलें आहे ? ९५. युधिष्ठिर सांगतोः— स्वधर्माचे ठिकाणीं स्थिरता असणें हें स्थैर्य होय; इंद्रियनिग्रह हें धैर्य होय; मनाचा मळ काढून टाकणें हें स्नान होय; आणि (जीवदान देऊन) प्राणिमात्राचें रक्षण करणें हें उत्कृष्ट दान होय ९६. यक्ष प्रश्न करितोः— पंडित पुरुष कोणाला समजावें ? नास्तिक कोणाला ह्मणतात ? मूर्ख कोण ? काम कोणता ? आणि मत्सर कोणता ? ९७. युधिष्ठिर सांगतोः— धर्मज्ञ पुरुषाला पंडित समजावें; नास्तिकाला मूर्ख असें ह्मणतात; संसाराला कारणीभूत जी वासना तो काम होय आणि अंतःकरणाचा संताप हा मत्सर होय ९८. यक्ष प्रश्न करितोः— अहंकार कशाला ह्मटलें आहे ? दंभ कोणता कथन केला आहे ? उत्कृष्ट दैव कशाला ह्मटलें आहे ? आणि पैशून्य ह्मणून काय सांगितलें आहे ? ९९. युधिष्ठिर सांगतोः— मोठें अज्ञान हा अहंकार होय; ध्वजाप्रमाणें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आणण्याच्या हेतूनें केलेला जो धर्म तो दंभ होय; दानाचें फल हें उत्कृष्ट दैव होय; आणि परनिंदा हें पैशून्य होय १००. यक्ष प्रश्न करितोः— धर्म, अर्थ व काम हे परस्पर विरुद्ध

भार्या च परस्परवशानुगौ । तदा धर्मार्थकामानां त्रयाणामपि संगमः २ यक्ष उवाच ॥ अक्षयो नरकः केन प्राप्यते भरतर्षभ । एतन्मे पृच्छतः प्रश्नं तच्छीघ्रं वक्तुमर्हसि ३ युधिष्ठिर उवाच ॥ ब्राह्मणं स्वयमाहूय याचमानमकिंचनम् । पश्चान्नास्तीति यो ब्रूयात्सोऽक्षयं नरकं व्रजेत् ४ वेदेषु धर्मशास्त्रेषु मिथ्या यो वै द्विजातिषु । देवेषु पितृधर्मेषु सोऽक्षयं नरकं व्रजेत् ५ विद्यमाने धने लोभाद्दानभोगविवर्जितः । पश्चान्नास्तीति यो ब्रूयात्सोऽक्षयं नरकं व्रजेत् ६ यक्ष उवाच ॥ राजन्कुलेन वृत्तेन स्वाध्यायेन श्रुतेन वा । ब्राह्मण्यं केन भवति प्रब्रूह्येतत्सुनिश्चितम् ७ युधिष्ठिर उवाच ॥ शृणु यक्ष कुलं तात न स्वाध्यायो न च श्रुतम् । कारणं हि द्विजत्वे च वृत्तमेव न संशयः ८ वृत्तं यत्नेन संरक्ष्यं ब्राह्मणेन विशेषतः । अक्षीणवृत्तो न क्षीणो वृत्ततस्तु हतो हतः ९ पठकाः पाठकाश्चैव

आहेत. तेव्हां, नेहमीं परस्परांशीं विरुद्ध असणाऱ्या ह्या तिघांचा एकत्र मेळ कसा बसतो ? १ युधिष्ठिर सांगतो:— आपलें धर्माचरण आणि भार्या ह्यांमध्यें विरोध नाहींसा होऊन जेव्हां ती एकमेकांच्या अनुरोधानें वागूं लागतात तेव्हां (ह्मणजे आपल्या धर्मानुष्ठानाला जेव्हां भार्या अनुकूल होते आणि धर्मही जेव्हां भार्येला अनुकूल होतो तेव्हां धर्म अर्थसंपादन करून देत असल्यामुळें आणि भार्या कामना तृप्त करीत असल्यामुळें) धर्म, अर्थ, आणि काम त्या तिघांचाही एके ठिकाणीं समावेश होतो २. यक्ष प्रश्न करितो:—हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, अक्षय्य नरक कशानें प्राप्त होतो ? या मी विचारीत असलेल्या प्रश्नाचें तूं सत्वर उत्तर दे ? ३. युधिष्ठिर सांगतो:— निर्धन ब्राह्मणाला स्वतः बोलावून आणून तो मागूं लागला असतां नाहीं असें जो त्याला ह्मणतो त्याला अक्षय्य नरक प्राप्त होतो ४. वेद, धर्मशास्त्र, द्विज, देव आणि पितृधर्म यांसंबंधानें जो असत्य वर्तन करितो त्याला अक्षय्य नरक प्राप्त होतो ५. द्रव्य असतांना लोभामुळें जो दान देत नाहीं अथवा त्याचा उपभोगही घेत नाहीं आणि द्रव्य नजरेसमोर असतांनाही जो नाहीं ह्मणून सांगतो त्याला अक्षय्य नरक प्राप्त होतो ६. यक्ष प्रश्न करितो:—कुल, आचरण, वेदाध्ययन आणि वेदार्थज्ञान ह्यांपैकीं ब्राह्मण्य कशामुळें येतें हें निश्चयपूर्वक तूं मला सांग ७. युधिष्ठिर सांगतो:—यक्षा श्रवण कर. बाबारे, कुल, वेदाध्ययन आणि वेदार्थज्ञान ह्यांपैकीं कोणतेंच खऱ्या द्विजत्वाचें कारण नव्हे; सदाचरण हेंच द्विजत्वाचें निःसंशय कारण होय ८. ब्राह्मणानें विशेषतः प्रयत्नपूर्वक आपल्या सद्वर्तनाचें रक्षण केलें पाहिजे; जोंपर्यंत ब्राह्मणाचें वर्तन सुटलें नाहीं, तोंपर्यंत त्याला हीनता प्राप्त होत नाहीं; परंतु,

ये चान्ये शास्त्रचिन्तकाः । सर्वे व्यसनिनो मूर्खा यः क्रियावान्स पण्डितः ११० चतुर्वेदोपि दुर्वृत्तः स शूद्रादतिरिच्यते । योग्निहोत्रपरो दान्तः स ब्राह्मण इति स्मृतः ११ यक्ष उवाच ॥ प्रियवचनवादी किं लभते विमृशितकार्यकरः किं लभते । बहुमित्रकरः किं लभते धर्मे रतः किं लभते कथय १२ युधिष्ठिर उवाच ॥ प्रियवचनवादी प्रियो भवति विमृशितकार्यकरोधिकं जयति । बहुमित्रकरः सुखं वसते यश्च धर्मरतः स गतिं लभते १३ यक्ष उवाच ॥ को मोदते किमाश्चर्यं कः पन्थाः का च वार्तिका । वद मे चतुरः प्रश्नान्मृता जीवन्तु बान्धवाः १४ युधिष्ठिर उवाच ॥ पञ्चमेहनि षष्ठे वा शाकं पचति स्वे गृहे । अनृणी चाप्रवासी च स वारिचर मोदते १५ अहन्यहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम् । शेषाः स्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमतः परम् १६

एकदां वर्तनापासून तो च्युत झाला ह्मणजे मात्र त्याचा घात होतो ९. वेदाचें अध्ययन करणारे, अध्ययन सांगणारे आणि इतरही वेदाचा विचार करणारे हे सर्व (अध्ययनादिरूप) व्यसनांचे अधीन असलेले मूर्ख होत; व वेदांत सांगितल्याप्रमाणें आचरण करणारा जो असेल तोच पंडित होय ११०. चतुर्वेदी असूनही जर दुर्वृत्त असेल तर तो शूद्रापेक्षांही हीन होय आणि अग्निहोत्राविषयीं तत्पर व जितेंद्रिय जो असेल तोच ब्राह्मण होय ११. यक्ष प्रश्न करितोः—प्रिय भाषण करणाऱ्याला काय प्राप्त होतें ? विचार केल्यानतर कार्य करणाऱ्याला काय मिळतें ? पुष्कळांशीं मैत्री करणाऱ्याला काय फलप्राप्ति होते आणि धर्माचे ठिकाणीं रत असणाऱ्याला काय लाभ होतो ? हें तूं मला कथन कर १२. युधिष्ठिर सांगतोः—प्रिय भाषण करणारा सर्वांना प्रिय होतो; विचार केल्यानंतर कार्य करणाऱ्याचा उत्तरोत्तर विजय होतो; पुष्कळांशीं मैत्री करणारा सुखानें राहतो आणि धर्माचे ठिकाणीं रत असणाऱ्याला उत्तम गति प्राप्त होते १३. यक्ष प्रश्न करितोः—आनंदानें कोण राहतो ? आश्चर्य कोणतें ? (अवलंबन करण्यास योग्य असा) मार्ग कोणता ? आणि वार्ता कोणती ? ह्या माझ्या चार प्रश्नांचीं तूं उत्तरें दे; ह्मणजे तुझे हे मृत झालेले बंधु जिवंत होतील १४. युधिष्ठिर सांगतोः—पांचव्या अथवा सहाव्या दिवशीं कां होईना जो स्वतःचे घरींच असेल तो भाजीपाला उकडून खातो, जो ऋण काढीत नाहीं आणि प्रवास करीत नाहीं तो, हे यक्षा, आनंदानें राहतो १५. प्रत्यहीं प्राणी यमसदनाला जात असतात आणि येथें अवशिष्ट राहिलेले लोक आपली शाश्वती आहे असें समजत असतात ह्यापेक्षां दुसरें आश्चर्य तें कोणतें ? १६. तर्कानें

तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम् । धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः १७ अस्मिन्महामोहमये कटाहे सूर्याग्निना रात्रिदिवेन्धनेन । मासर्तुदर्वीपरिघट्टनेन भूतानि कालः पचतीति वार्ता १८ यक्ष उवाच ॥ व्याख्याता मे त्वया प्रश्ना याथातथ्यं परन्तप । पुरुषं त्विदानीं व्याख्याहि यश्च सर्वधनी नरः १९ युधिष्ठिर उवाच ॥ दिवं स्पृशति भूमिं च शब्दः पुण्येन कर्मणा । यावत्स शब्दो भवति तावत्पुरुष उच्यते १२० तुल्ये प्रियाप्रिये यस्य सुखदुःखे तथैव च । अतीतानागते चोभे स वै सर्वधनी नरः २१ यक्ष उवाच ॥ व्याख्यातः पुरुषो राजन्यश्च सर्वधनी नरः । तस्मात्त्वमेकं भ्रातॄणां यमिच्छसि स जीवतु २२ युधिष्ठिर उवाच ॥ श्यामो य एष रक्ताक्षो बृहच्छाल इवोत्थितः । व्यूढोरस्को महाबाहुर्नकुलो यक्ष जीवतु २३ यक्ष उवाच ॥ प्रियस्ते भीमसेनोयमर्जुनो वः परायणम् । स कस्मान्नकुलं

कोणताही निर्णय होत नाहीं ! श्रुति पहाव्यात तीं अर्थदृष्ट्या भिन्न भिन्न दिसतात ! श्रुतींचें व्याख्यान करणारे ऋषि पहावे तों ज्याचें मत (इतर वचनांशीं विरुद्ध न येतां) प्रमाण मानितां येईल असा एकही ऋषि दृष्टीं पडत नाहीं आणि धर्माचें तत्व गुप्त ठिकाणीं ठेविलेलें आहे. ह्यास्तव, मोठे लोक ज्या मार्गानें गेले असतील तोच (सामान्य जनांचा अनुकरणीय) मार्ग होय १७. ह्या महामोहमय जगद्रूप कढई-मध्यें टाकिलेले प्राणी अहोरात्ररूप इंधनानें युक्त असलेल्या सूर्यरूप अग्नीची आंच लावून आणि महिने व ऋतु ह्या पळ्यांनीं ढवळून ढवळून काल शिजवीत आहे हीच (नेहमींची मुख्य) वार्ता होय १८. यक्ष ह्मणतोः—हे शत्रुतापना युधिष्ठिरा, तूं माझ्या प्रश्नांचीं यथायोग्य उत्तरें दिलीं आहेस. आतां पुरुष कोणाला ह्मणावें हें तूं मला सांग आणि सर्वसंपत्तिमान् पुरुष कोण हेंही मला कथन कर १९. युधिष्ठिर सांगतोः—पुण्य-कर्माच्या योगानें स्वर्गामध्यें आणि पृथ्वीवर होत असलेली कीर्ति जोंपर्यंत कायम राहते तोंपर्यंत मनुष्य पुरुष ह्या संज्ञेला पात्र असतो १२०. प्रिय व अप्रिय, सुख व दुःख आणि येऊन गेलेलें व प्राप्त होणारें हीं उभयतां ज्याला सारखींच असतात तो पुरुष सर्व संपत्तिमान् होय २१. यक्ष ह्मणतोः—हे राजा, पुरुष कोण आणि सर्व संपत्ति-मान् कोण हें तूं मला कथन केलेंस. आतां ह्या मृत झालेल्या भ्रात्यांपैकीं जो तुला हवा असेल तो एक उठेल २२. युधिष्ठिर ह्मणतोः—हे यक्षा, श्याम वर्ण, आरक्तवर्ण नेत्र आणि विशाल वक्षःस्थल ह्यांनीं युक्त व प्रचंड शालवृक्षाप्रमाणें उन्नत असा जो हा महापराक्रमी नकुल तो जिवंत होऊं दे २३. यक्ष ह्मणतोः—हा भीमसेन तुला

राजन्सापत्नं जीवमिच्छसि २४ यस्य नागसहस्रेण दशसङ्ख्येन वै बलम् । तुल्यं तं भीममुत्सृज्य नकुलं जीवमिच्छसि २५ तथैनं मनुजाः प्राहुर्भीमसेनं प्रियं तव । अथ केनानुभावेन सापत्नं जीवमिच्छसि २६ यस्य बाहुबलं सर्वे पाण्डवाः समुपासते । अर्जुनं तमपाहाय नकुलं जीवमिच्छसि २७ युधिष्ठिर उवाच ॥ धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः । तस्माद्धर्मं न त्यजामि मा नो धर्मो हतोवधीत् २८ आनृशंस्यं परो धर्मः परमार्थाच्च मे मतम् । आनृशंस्यं चिकीर्षामि नकुलो यक्ष जीवतु २९ धर्मशीलः सदा राजा इति मां मानवा विदुः । स्वधर्मान्न चलिष्यामि नकुलो यक्ष जीवतु ३० कुन्ती चैव तु माद्री च द्वे भार्ये तु पितुर्मम । उभे सपुत्रे स्यातां वा इति मे धीयते मतिः ३१ यथा कुन्ती तथा माद्री विशेषो नास्ति मे तयोः । मातृभ्यां सममिच्छामि नकुलो यक्ष जीवतु ३२ यक्ष उवाच ॥ यस्य तेऽर्थाच्च कामाच्च आनृशंस्यं परं मतम् । तस्मात्ते

प्रिय आहे आणि अर्जुन तर तुमचा मुख्य आधारच आहे. परंतु, हे राजा, तूं कशाकरितां आपला सापत्न भ्राता जिवंत राहण्याची इच्छा करीत आहेस ? २४. अरे, दहा हजार हत्तींचें ज्याला सामर्थ्य आहे त्या भीमसेनाला सोडून देऊन तूं नकुलच जिवत होण्याची इच्छा करीत आहेस (ह्याला काय ह्मणावें ?) २५. अरे, हा भीमसेन तुला प्रिय आहे असें लोक ह्मणत असतांना कोणता उद्देश मनामध्यें धरून तूं हा सापत्न भ्राता जिवत राहण्याची इच्छा करीत आहेस ? २६. अरे, ज्याच्या पराक्रमावर सर्व पांडव अवलंबून असतात त्या अर्जुनाला सोडून देऊन तूं नकुल जिवंत होण्याची इच्छा करीत आहेस ! (ह्याचा अर्थ काय ?) २७. युधिष्ठिर ह्मणतो:—धर्माचा घात केला असता तोच आपला घात करितो आणि धर्माचें रक्षण केलें असतां तोच आपलें रक्षण करितो. तस्मात्, आपल्या हातून धर्माचा घात झाल्यामुळें त्यानें आपला घात करूं नये, एतदर्थ मी धर्माचा त्याग करीत नाहीं २८. निष्पक्षपातीपणा हाच परमार्थदृष्टीनें उत्कृष्ट धर्म होय असें मला वाटतें आणि ह्मणून निष्पक्षपातानेंच वागण्याची माझी इच्छा आहे, त्यास्तव हे यक्षा, नकुल जिवंत होऊ दे २९. हे यक्षा, हा राजा सर्वदां धर्मशील असे मला लोक समजत आहेत. तस्मात्, मी स्वधर्मापासून ढळणार नाहीं. नकुल जिवंत होऊ दे ३०. कुंती आणि माद्री ह्या ज्या माझ्या पित्याच्या दोन भार्या त्या उभयतांही पुत्रवती असाव्यात असें माझ्या बुद्धीला वाटतें ३१. मला जशी कुंती तशी माद्री. त्या उभयतांविषयीं माझी भेदबुद्धि मुळींच नाहीं. दोन्हीही मातांशीं एकसारखें* वर्तन ठेवण्याची माझी इच्छा आहे.

भ्रातरः सर्वे जीवन्तु भरतर्षभ १३३ [११९४२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्यारणेयपर्वणि यक्षप्रश्ने त्रयोदशाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥ ३१३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततस्ते यक्षवचनादुदतिष्ठन्त पाण्डवाः । क्षुत्पिपासे च सर्वेषां क्षणेन व्यपगच्छताम् १ युधिष्ठिर उवाच ॥ सरस्येकेन पादेन तिष्ठन्तमपराजितम् । पृच्छामि को भवान्देवो न मे यक्षो मतो भवान् २ वसूनां वा भवानेको रुद्राणामथ वा भवान् । अथ वा मरुतां श्रेष्ठो वज्री वा त्रिदशेश्वरः ३ मम हि भ्रातर इमे सहस्रशतयोधिनः । तं योधं न प्रपश्यामि येन सर्वे निपातिताः ४ सुखं प्रतिप्रबुद्धानामिन्द्रियाण्युपलक्षये । स भवान्सुहृदस्माकमथ वा नः पिता भवान् ५ यक्ष उवाच॥ अहं ते जनकस्तात धर्मो मृदुपराक्रम । त्वां दिदृक्षुरनुप्राप्तो विद्धि मां भरतर्षभ ६ यशः सत्यं दमः शौचमार्जवं ह्रीरचापलम् । दानं तपो ब्रह्मचर्यमित्येतास्तनवो मम ७ अहिंसा समता शान्तिस्तपः शौचममत्सरः ।

ह्यास्तव, हे यक्षा, नकुल जिवंत होवो १२. यक्ष ह्मणतोः—ज्याअर्थी अर्थ व काम ह्यांपेक्षां निष्पक्षपातरूप धर्मच श्रेष्ठ ह्मणून तुला अभिमत आहे त्याअर्थी, हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, तुझे सर्वही भ्राते जिवंत होवोत १३३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरणेयपर्वांपैकीं यक्षप्रश्नसंबंधीं तीनशें तेरावा अध्याय समाप्त झाला ॥३१३॥

वैशंपायन सांगतात:— तदनंतर यक्षाच्या ह्मणण्याप्रमाणें ते पांडव उठले आणि सर्वांची क्षुधा व तृषा हीं एका क्षणांत नाहींशीं झालीं १. युधिष्ठिर ह्मणतोः— सरोवरामध्यें एका पायावर उभा राहिलेला असा तूं कोण अजिंक्य आहेस हें मी विचारीत आहें. आपण कोणते देव आहां ? आपण यक्ष आहां असें मला वाटत नाहीं २. आपण अष्टवसूंपैकीं अथवा रुद्रांपैकीं एक आहांत किंवा मरुद्गणांमध्यें श्रेष्ठ असा स्वर्गाधिपति वज्रपाणि इंद्रच आपण आहांत ३. कारण, हे माझे भ्राते लाख लाख योध्यांशीं एकेकटे युद्ध करणारे आहेत आणि ह्मणूनच ज्यानें ह्या सर्वांचा निःपात केला तो सामान्य योद्धा असावा असें मला वाटत नाहीं ४. शिवाय, स्वस्थपणानें जागे झालेल्या ह्या भ्रात्यांचीं इंद्रियें मला (सर्व शाबूत) दिसत आहेत. तस्मात्, आपण कोणी आमचे सुहृद् तरी आहांत किंवा आमचे जनक तरी आहांत ५. यक्ष ह्मणतोः— बा भरतवंशजश्रेष्ठा सौम्यपराक्रमी धर्मराजा, मी तुझा जनक तुझी परीक्षा पाहण्याकरितां येथें आलों आहें असें तूं समज ६. यश, सत्य, इंद्रियदमन, शौच, सरलता, ह्रीं, मनाचें स्थैर्य, दान, स्वधर्माचरण आणि ब्रह्मचर्य ह्या माझ्या तनु आहेत ७; आणि

द्वाराण्येतानि मे विद्धि प्रियो ह्यसि सदा मम ८ दिष्ट्या पञ्चसु रक्तोसि
दिष्ट्या ते षट्पदी जिता । द्वे पूर्वे मध्यमे द्वे च द्वे चान्ते साम्परायिके ९
धर्मोहमिति भद्रं ते जिज्ञासुस्त्वामिहागतः । आनृशंस्येन तुष्टोस्मि वरं
दास्यामि तेनघ १० वरं वृणीष्व राजेन्द्र दाता ह्यस्मि तवानघ । ये हि
मे पुरुषा भक्ता न तेषामस्ति दुर्गतिः ११ युधिष्ठिर उवाच ॥ अरणीस-
हितं यस्य मृगो ह्यादाय गच्छति । तस्याग्नयो न लुप्येरन्प्रथमोस्तु वरो
मम १२ यक्ष उवाच ॥ अरणीसहितं ह्यस्य ब्राह्मणस्य हृतं मया । मृग-
वेषेण कौन्तेय जिज्ञासार्थं तव प्रभो १३ वैशम्पायन उवाच ॥ ददानी-
त्येव भगवानुत्तरं प्रत्यपद्यत । अन्यं वरय भद्रं ते वरं त्वममरोपम १४
युधिष्ठिर उवाच॥ वर्षाणि द्वादशारण्ये त्रयोदशमुपस्थितम्। तत्र नो नाभि-
जानीयुर्वसतो मनुजाः क्वचित् १५ वैशम्पायन उवाच ॥ ददानीत्येव भग-

---

अहिंसा, चित्ताची समता, शांति, तपश्चर्या, शौच व अमत्सर हीं माझ्या प्राप्तीचीं
द्वारें आहेत असें तूं समज. तूं मला सर्वदां प्रिय आहेस ८; पंचमहायज्ञाविषयीं तूं नेहमीं
उद्युक्त आहेस; व काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर ही षट्पदी तूं सुदैवानें जिंकिली
आहेस. ह्या सहा पदांपैकीं काम व क्रोध हीं दोन पदें कारणरूप आहेत; पुढलीं दोन
लोभ व मोह हीं मध्यम आहेत आणि मद व मत्सर हीं शेवटलीं दोन पदें विपत्तीला
कारणीभूत होणारीं आहेत ९. हे निष्पापा, तुझें कल्याण असो. मी धर्म आहें आणि
तुझी परीक्षा करण्याकरितां येथें आलों आहें. तुझ्या निष्पक्षपातानें मी संतुष्ट झालों
असून तुला वर देण्यास उद्युक्त झालों आहें १०. हे राजाधिराज, तूं वर माग; मी
तुला देईन. जे पुरुष माझे भक्त आहेत त्यांना दुर्गति कधींही प्राप्त होत नाहीं ११.
युधिष्ठिर ह्मणतो:—ज्याच्या दोन्ही अरणी घेऊन मृग गेला आहे त्या ब्राह्मणाचे
अग्नि लुप्त होऊं नयेत हा प्रथम वर मला मिळावा १२. यक्ष ह्मणतो:—हे प्रभो
कुंतीपुत्रा, तुझी परीक्षा करण्याकरितां मृगवेष धारण करून मींच ह्या ब्राह्मणाच्या
दोन्ही अरणी हरण करून नेल्या १३. वैशंपायन सांगतात:—असें बोलून " हा वर
मी तुला देतों " असें उत्तर भगवान् धर्मानें युधिष्ठिराला दिलेंच आणि, " हे देवतुल्य
युधिष्ठिरा, तुझें कल्याण असो, तूं आणखी एक वर माग " असेंही तो त्या
युधिष्ठिराला ह्मणाला १४. युधिष्ठिर ह्मणतो:—बारा वर्षें आरण्यांत जाऊन आतां
हें तेरावें वर्ष येऊन ठेपलें आहे. तस्मात्, ह्या संवत्सरामध्यें, आह्मी वास्तव्य करीत असतां
लोकांनीं आह्मांला ओळखूं नये १५. वैशंपायन सांगतात: —ह्यावर " हा वर दिला "
एवढेंच उत्तर भगवान् धर्मानें दिलें आणि " पुनरपि त्या सत्यपराक्रमी कुंतीपुत्र

वानुत्तरं प्रत्यपद्यत । भूयश्चाश्वासयामास कौन्तेयं सत्यविक्रमम् १६ यद्यपि स्वेन रूपेण चरिष्यथ महीमिमाम् । न वो विज्ञास्यते कश्चित्त्रिषु लोकेषु भारत १७ वर्षं त्रयोदशमिदं मत्प्रसादात्कुरूद्वहाः । विराटनगरे गूढा अविज्ञाताश्चरिष्यथ १८ यद्वः संकल्पितं रूपं मनसा यस्य यादृशम् । तादृशं तादृशं सर्वे छन्दतो धारयिष्यथ १९ अरणीसहितं चेदं ब्राह्मणाय प्रयच्छत । जिज्ञासार्थं मया ह्येतदाहृतं मृगरूपिणा २० प्रवृणीष्वापरं सौम्य वरमिष्टं ददानि ते । न तृप्यामि नरश्रेष्ठ प्रयच्छन्वै वरांस्तथा २१ तृतीयं गृह्यतां पुत्र वरमप्रतिमं महत् । त्वं हि मत्प्रभवो राजन्विदुरश्च ममांशजः २२ युधिष्ठिर उवाच ॥ देवदेवो मया दृष्टो भवान्साक्षात्सनातनः । यं ददासि वरं तुष्टस्तं ग्रहीष्याम्यहं पितः २३ जयेयं लोभमोहौ च क्रोधं चाहं सदा विभो । दाने तपसि सत्ये च मनो मे सततं भवेत् २४ धर्म उवाच ॥ उपपन्नो गुणैरेतैः स्वभावेनासि पाण्डव । भवान्धर्मः पुनश्चैव यथोक्तं ते भविष्यति २५ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वान्तर्दधे

युधिष्ठिराला आश्वासन देण्याकरितां तो ह्मणाला १६ " हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, जरी स्वतःच्या रूपानें तुह्मी ह्या पृथ्वीवर संचार करून राहिला तरीसुद्धां त्रैलोक्यामध्यें कोणी तुह्मांला ओळखणार नाहीं १७. हे कुरुवंशजश्रेष्ठहो, हें तेरावें वर्ष तुह्मी गुप्तपणें विराटाच्या नगरामध्यें रहा; माझ्या प्रसादामुळें तुह्मांला कोणी ओळखणार नाहीं १८. ज्यानें जें रूप धारण करण्याचें मनामध्यें आणिलें असेल तें तें रूप तुह्मी आपल्या इच्छेप्रमाणें धारण करा १९. आतां ह्या दोन्ही अरणी ब्राह्मणाला देऊन टाका. तुझ्या परीक्षेकरितां मृगवेष धारण करून मीं ह्या हरण केल्या होत्या २०. हे विनयसंपन्न, तूं आणखी एक इष्ट वर मागून घे; मी तुला देईन. हे पुरुषश्रेष्ठा, तुला वर देतांना मला पुरेसेंच होत नाहीं २१. हे पुत्रा, अप्रतिम असा तिसरा एक मोठा वर तूं मागून घे. हे राजा, तू माझ्यापासून उत्पन्न झाला असून विदुरही माझ्या अंशापासूनच उत्पन्न झालेला आहे " २२. युधिष्ठिर ह्मणतोः—हे तात, साक्षात् सनातन भगवान् देवाधिदेवाचें मला दर्शन झालें आहे. तस्मात्, संतुष्ट होऊन जो वर आपण मला द्याल त्याचा मीं आनंदानें स्वीकार करीन २३. हे प्रभो, लोभ, मोह व क्रोध हे मीं नेहमीं जिंकावे आणि दान, तप व सत्य ह्यांविषयीं माझें मन एकसारिखें आसक्त होऊन रहावें २४. धर्म ह्मणतोः—हे पांडुपुत्रा, स्वभावतःच तूं ह्या गुणानीं संपन्न आहेस आणि मूर्तिमान् धर्मच तूं आहेस. तथापि तुझ्या ह्मणण्याप्रमाणें होईल २५. वैशंपायन सांगतातः—असें बोलून लोकरक्षक भगवान् धर्म गुप्त झाला.

धर्मो भगवाँल्लोकभावनः । समेताः पाण्डवाश्चैव सुखसुप्ता मनस्विनः२६ उपेत्य चाश्रमं वीराः सर्व एव गतक्लमाः । आरणेयं ददुस्तस्मै ब्राह्मणाय तपस्विने २७ इदं समुत्थानसमागतं महत्पितुश्च पुत्रस्य च कीर्तिवर्धनम्। पठन्नरः स्याद्विजितेन्द्रियो वशी सपुत्रपौत्रः शतवर्षभाग्भवेत् २८ न चाप्यधर्मे न सुहृद्विभेदने परस्वहारे परदारमर्शने । कदर्यभावे न रमेन्मनः सदा नृणां सदाख्यानमिदं विजानताम् २९[११९७१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्यारणेयपर्वणि नकुलादिजीवनादिवरप्राप्तौ चतुर्दशाधिकत्रिशततमोऽध्यायः॥३११॥

वैशम्पायन उवाच ॥ धर्मेण तेऽभ्यनुज्ञाताः पाण्डवाः सत्यविक्रमाः । अज्ञातवासं वत्स्यन्तश्छन्ना वर्षं त्रयोदशम् १ उपोपविष्टा विद्वांसः सहिताः संशितव्रताः । ये तद्भक्ता वसन्ति स्म वनवासे तपस्विनः २ तानब्रुवन्महात्मानः स्थिताः प्राञ्जलयस्तदा । अभ्यनुज्ञापयिष्यन्तस्तं निवासं धृतव्रताः ३ विदितं भवतां सर्वं धार्तराष्ट्रैर्यथा वयम् । छद्मना हृतराज्याश्च निःस्वाश्च बहुशः कृताः ४ उषिताश्च वने कृच्छ्रे वयं द्वादशवत्सरान् । अज्ञा-

---

नतर सुखानें झोंपा लागून उठलेले ते विचारी पांडव एकत्र जुळले २६; श्रमपरिहार झालेले ते सर्वही वीर आश्रमासमीप आले व त्यांनीं त्या तपस्वी ब्राह्मणाला दोन्ही अरणा देऊन टाकिल्या २७. पांडवांचं उत्थान, आणि पिता यमधर्म व पुत्र युधिष्ठिर ह्यांचा हा कीर्ति वृद्धिंगत करणारा समागम हीं ज्यांत आहेत असें हें आख्यान जो जितेंद्रिय व मनोनिग्रही पुरुष नेहमीं पठण करितो तो पुत्रवान् व पौत्रवान् होऊन शतायु होतो २८. हें शुभ आख्यान नेहमीं ध्यानात ठेवणाऱ्या पुरुषांचें मन—अधर्म, मित्रांमध्यें भेद पाडणें, परस्वाचा अपहार करणें, परस्त्रीचा समागम आणि नीचता—ह्याविषयीं कधींही रत होत नाहीं २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरणेयपर्वापैकीं नकुलादिकांचें जीवन वगैरे वर प्राप्त झाल्याविषयीं तीनशें चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१४ ॥

वैशंपायन सांगतातः—धर्मानें अनुज्ञा दिल्यानंतर ते सत्यपराक्रमी पांडव तेरावे वर्षीं गुप्त राहून अज्ञातवासाचा बेत करण्याकरितां सर्वही एकमेकाला चिकटून बसले, आणि वनामध्यें त्यांचे भक्त जे तपस्वी त्यांच्याबरोबर वास्तव्य करीत होते त्यांना ते सर्वही निर्मल आचरण करणारे ज्ञानी, व्रतस्थ व महात्मे पांडव हात जोडून त्या अज्ञातवासाविषयीं त्यांची अनुज्ञा घेण्याकरिता ह्मणाले १,२,३." धृतराष्ट्राच्या पुत्रांनीं कपटानें आमचें राज्य हरण करून अनेकवेळां आह्मांला निर्धन केलें आहे हें सर्व तुह्मांला विदितच आहे ४.

तवाससमयं शेषं वर्षं त्रयोदशम् ५ तद्वसामो वयं छन्नास्तदनुज्ञातुमर्हथ । सुयोधनश्च दुष्टात्मा कर्णश्च सहसौबलः ६ जानन्तो विषमं कुर्युरस्मास्वत्यन्तवैरिणः । युक्तचाराश्च युक्ताश्च पौरस्य स्वजनस्य च ७अपि नस्तद्भवेद्भूयो यद्वयं ब्राह्मणैः सह । समस्ताः स्वेषु राष्ट्रेषु स्वराज्यस्था भवेमहि ८ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा दुःखशोकार्तो शुचिर्धर्मसुतस्तदा । संमूर्छितोभवद्राजा साश्रुकण्ठो युधिष्ठिरः ९ तमथाश्वासयन्सर्वे ब्राह्मणा भ्रातृभिः सह । अथ धौम्योब्रवीद्वाक्यं महार्थं नृपतिं तदा १० राजन्विद्वान्भवान्दान्तः सत्यसन्धो जितेन्द्रियः । नैवंविधाः प्रमुह्यन्ते नराः कस्यांचिदापदि ११ देवैरप्यापदः प्राप्ताश्छन्नैश्च बहुशस्तथा । तत्र तत्र सपत्नानां निग्रहार्थं महात्मभिः १२ इन्द्रेण निषधान्प्राप्य गिरिप्रस्थाश्रमे तदा । छन्नेनोष्य कृतं कर्म द्विषतां च विनिग्रहे १३ विष्णुनाश्वशिरः प्राप्य तथादित्यां निवत्स्यता । गर्भे वधार्थं दैत्यानामज्ञातेनोषितं

आह्मी गहन वनामध्यें बारा वर्षें वास्तव्य केलें असून तेरावें वर्ष हा आमच्या अज्ञातवासाचा समय असल्यामुळें ५ तो अज्ञातवास आह्मी गुप्त राहून करणार आहोंत. ह्यास्तव, तुह्मी आह्मांला येथून जाण्याची अनुज्ञा द्या. कारण, दुरात्मा सुयोधन, कर्ण व शकुनि ६ आमच्याशीं अत्यंत वैरभावानें वागत असून ते स्वतः दक्ष आहेत आणि त्यांनीं हेरही आमच्याकरितां ठेविले आहेत. ह्यास्तव, त्यांना जर आह्मी अमुक ठिकाणीं रहात आहोंत अशी बातमी लागली तर आमच्या आश्रयाला राहिलेल्या आमच्या माणसांना व नगरवासी जनांनाही ते अपकार करितील ७. (ह्यास्तव, आपण आह्मांला अनुज्ञा द्यावी) ह्मणजे आम्ही पुनरपि सर्वजण आपआपल्या राष्ट्रामध्यें ब्राम्हणांसहवर्तमान स्वराज्याचा अनुभव घेत राहूं " ८. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें त्यांची प्रार्थना केल्यावर तो शुद्ध धर्मपुत्र युधिष्ठिरराजा दुःख व शोक ह्यांनीं व्याकुल झाला; अश्रूंनीं त्याचा कंठ दाटून आला व तो मूर्च्छित झाला ९. तेव्हां सर्व ब्राह्मणांनीं भ्रात्यांसहवर्तमान त्याला धीर दिला आणि गंभीर अर्थानें युक्त असें भाषण धौम्यमुनि त्या राजाशीं करूं लागले १०. (ते ह्मणाले) " हे राजा, तूं विद्वान्, जितेंद्रिय, सत्यप्रतिज्ञ आणि मनोनिग्रही आहेस. अशा प्रकारचे पुरुष कोणत्याही संकटामध्यें धीर सोडीत नाहींत ११. देवांनाही संकटें प्राप्त झालीं आहेत आणि त्याही महात्म्यांनीं शत्रूंचा निग्रह करण्याकरितां वारंवार गुप्त राहून ठिकठिकाणीं वास्तव्य केलें आहे १२. निषध देशाला जाऊन एका पर्वतशिखरावरील आश्रमामध्यें इंद्रानें गुप्त रीतीनें वास्तव्य करून शत्रूंचा निग्रह करण्याविषयीं कर्म केलें आहे १३

चिरम् १४ प्राप्य वामनरूपेण प्रच्छन्नं ब्रह्मरूपिणा । बले-
र्यथा हृतं राज्यं विक्रमैस्तच्च ते श्रुतम् १५ हुताशनेन यच्चापः प्रविश्य
च्छन्नमासता । विबुधानां कृतं कर्म तच्च सर्वं श्रुतं त्वया १६
प्रच्छन्नं चापि धर्मज्ञ हरिणारिविनिग्रहे । वज्रं प्रविश्य शक्रस्य यत्कृतं
तच्च ते श्रुतम् १७ और्वेण वसता च्छन्नमूरौ ब्रह्मर्षिणा तदा । यत्कृतं
तात देवेषु कर्म तत्तेनघ श्रुतम् १८ एवं विवस्वता तात च्छन्नेनोत्तम-
तेजसा । निर्दग्धाः शात्रवाः सर्वे वसता भुवि सर्वशः १९ विष्णुना
वसता चापि गृहे दशरथस्य वै । दशग्रीवो हतश्छन्नं संयुगे भीमकर्मणा २०
एवमेव महात्मानः प्रच्छन्नास्तत्र तत्र ह । अजयञ्छात्रवान्युद्धे तथा
त्वमपि जेष्यसि २१ तथा धौम्येन धर्मज्ञो वाक्यैः संपरितोषितः । शास्त्र-
बुद्ध्या स्वबुद्ध्या च न चचाल युधिष्ठिरः २२ अथाब्रवीन्महाबाहुर्भीम-
सेनो महाबलः । राजानं बलिनां श्रेष्ठो गिरा संपरिहर्षयन् २३ अवेक्षया

अदितीच्या उदरामध्यें वास्तव्य करणाऱ्या विष्णूनें अश्वाचें मस्तक प्राप्त करून घेतलें आहे आणि दैत्यांच्या वधाकरितां गर्भाशयामध्यें अज्ञात राहून पुष्कळवेळ वास्तव्य केलें आहे १४. वामनावतारी ब्राह्मणवेष धारण करून विष्णूनें तीन पावलांनीं बलीचें राज्य कसें हरण केलें हें तुला विदित आहेच १५. अग्नीनें उदकामध्यें प्रवेश करून व तेथें गुप्त राहून देवांचें कार्य केलें हेंही सर्व तुला ज्ञात आहेच १६. हे धर्मवेत्त्या युधिष्ठिरा, शत्रूचा निग्रह करण्याकरितां इंद्राच्या वज्रामध्यें प्रवेश करून हरीनें काय कर्म केलें हेंही तुझ्या कर्णपथावर आलेलेंच आहे १७. बा निष्पापा युधिष्ठिरा, और्व ब्रह्मर्षींनीं मांडीमध्यें गुप्त राहून देवांचें कार्य केलें हेंही तुझ्या कानावर आलेलेंच आहे १८. ह्याचप्रमाणें, बा युधिष्ठिरा, पृथ्वीवर सर्व ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या महातेजस्वी सूर्यानेंही गुप्त राहून आपले सर्व शत्रु दग्ध केले आहेत १९ आणि दशरथाच्या घरीं गुप्तपणें वास्तव्य करणाऱ्या भयंकरपराक्रमी विष्णूनेंही संग्रामामध्यें रावणाचा वध केला आहे २०. सारांश, अशा रीतीनें ज्याप्रमाणें अनेक महात्म्यांनीं ठिकठिकाणीं गुप्त राहून युद्धामध्यें आपले शत्रु जिंकिले आहेत त्याप्रमाणें तूंही जिंकिशील " २१. ह्याप्रमाणें शास्त्रदृष्टीनें आणि स्वतःच्या बुद्धीनें धौम्यमुनींनीं धर्मवेत्त्या युधिष्ठिराला अनेक भाषणांनीं संतुष्ट केलें असतांही तो सद्वर्तनापासून ढळला नाहीं (म्हणजे कपटानें शत्रूचा वध करण्याचें त्यानें कबूल केलें नाहीं) २२. नंतर महापराक्रमी, महाबलाढ्य व बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेला भीमसेन वाणीनें हर्ष उत्पन्न करीत करीत धर्मराजाला म्हणाला २३ " हे महाराजा, तुझ्याकडे लक्ष्य देऊन व

महाराज तव गाण्डीवधन्वना । धर्मानुगतया बुद्ध्या न किंचित्साहसं कृतम् २४ सहदेवो मया नित्यं नकुलश्च निवारितौ । शक्तौ विध्वंसने तेषां शत्रूणां भीमविक्रमौ २५ न वयं तत्प्रहास्यामो यस्मिन्मोक्ष्यति नो भवान् । भवान्विधत्तां तत्सर्वं क्षिप्रं जेष्यामहे रिपून् २६ इत्युक्ते भीमसेनेन ब्राह्मणाः परमाशिषः । प्रयुज्यापृच्छ्य भरतान्यथास्वान्स्वान्ययुर्गृहान् २७ सर्वे वेदविदो मुख्या यतयो मुनयस्तथा । आसेदुस्ते यथान्यायं पुनर्दर्शनकाङ्क्षया २८सह धौम्येन विद्वांसस्तथा पञ्च च पाण्डवाः। उत्थाय प्रययुर्वीराः कृष्णामादाय धन्विनः २९ क्रोशमात्रमुपागम्य तस्माद्देशान्निमित्ततः । श्वोभूते मनुजव्याघ्राश्छन्नवासार्थमुद्यताः ३० पृथक्शास्त्रविदः सर्वे सर्वे मन्त्रविशारदाः । सन्धिविग्रहकालज्ञा मन्त्राय समुपाविशन्३१[१२००२*][२३४७४]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्यारणेयपर्वण्यज्ञातवासमन्त्रणे पञ्चदशाधिकत्रिशततमोऽध्यायः ॥३१५॥आरणेयपर्व समाप्तम्॥समाप्तं चेदमारण्यकं पर्वेति॥

धर्माकडेच आपल्या बुद्धीचा कल ठेवून गांडीवधनुर्धारी अर्जुनानें कांहींएक साहस केलें नाहीं २४; आणि त्या शत्रूंचा विध्वंस करण्यास समर्थ असलेल्या प्रचंडपराक्रमी नकुलसहदेवांचेंही मी नेहमीं निवारणच करीत आलों आहें २५. सारांश, तूं जिकडे आमची योजना करिशील तें आह्मी सोडणार नाहीं. काय करावयाचें असेल तें सर्व तूंच कर; आह्मी तेव्हांच शत्रूंना जिंकूं" २६. ह्याप्रमाणें भीमसेनानें भाषण केलें असतां ब्राह्मणांनीं त्यांना उत्कृष्ट आशीर्वाद दिला आणि त्या भरतकुलोत्पन्न पांडवांचा निरोप घेऊन ते आपआपल्या घरीं चालते झाले २७. परंतु, सर्व वेदवेत्ते, मुख्य यति व मुनि पांडवांची फिरून भेट होण्याच्या इच्छेनें आपआपल्या योग्यतेप्रमाणें तेथेंच बसले २८. तदनंतर धौम्यमुनींसहवर्तमान ते पांचही धनुर्धारी व विद्वान् वीर पांडव तेथून उठले, आणि द्रौपदीला घेऊन चालते झाले २९; त्या प्रदेशांतून प्रस्थानाकरितां एक कोसभर दूर गेल्यावर दुसऱ्या दिवसापासून अज्ञातवास करण्यास ते पुरुषश्रेष्ठ पांडव उद्युक्त झाले ३०; आणि आपआपल्यापरीं ते सर्वेही शास्त्रवेत्ते व सर्वेही मसलतींमध्यें निपुण असून सख्य व युद्ध ह्यांचा समय जाणणारे ते पांडव कांहीं विचार करण्याकरितां तेथें बसले ३१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरणेयपर्वांपैकीं अज्ञातवाससंबंधीं विचाराविषयीं तीनशें पंधरावा अध्याय समाप्त झाला॥ ३१५ ॥

॥ ह्या ठिकाणीं आरणेयपर्व संपूर्ण होऊन वनपर्वही समाप्त झालें ॥

* अध्याय ३२, ३६ व ५० ह्यांचे वरतीं दिलेल्या बेरजेंत चूक आहे ती दुरुस्त केली ह्मणजे एकंदर श्लोकसंख्या १२००२ होते.

अस्याग्रे विराटपर्व भविष्यति । तस्यायमाद्यः श्लोकः ॥ जनमेजय उवाच ॥ कथं विराटनगरे मम पूर्वपितामहाः । अज्ञातवासमुषिता दुर्योधनभयार्दिताः ॥ १ ॥ अस्मिन्पर्वणि संख्यानं व्यासेनोक्तं महात्मना । अध्यायानां शते द्वे तु प्रसंख्याने तपोधन २ एकोनसप्ततिश्चैव तथाध्यायाः प्रकीर्तिताः । एकादश सहस्राणि तथा नव शतानि च ३ चतुःषष्टिस्तथा श्लोकाः पर्वैतत्परिकीर्तितम् । वृत्तानां च तथा ख्याता नवतिर्द्वे च कीर्तिते । अथास्मिन्पर्वणि संग्रहः । पाण्डवप्रव्राजनम् । पौरानुगमनम् । पौरवाक्यम् । पौरजनविसर्जनम् । ब्राह्मणानुगमनम् । युधिष्ठिरचिन्ता । शौनकवाक्यम् । धौम्यस्तवः । आदित्यनामाष्टशतम् । विदुरनिर्वासनम् । विदुरागमनम् । धृतराष्ट्रस्य संतापः । व्यासागमनम् । सुरभीन्द्रसंवादः । अर्जुनवाक्यम् । मैत्रेयागमनम् । मैत्रेयशापः । किर्मीरवधः । काम्यकप्रवेशः । द्रौपदीशोककरणम् । वासुदेववाक्ये द्रौपदीवाक्यम् । शाल्ववधवर्णनम् । द्वैतवनप्रवेशः । युधिष्ठिरद्रौपदीवाक्यम् । भीमसेनवाक्यम् । व्यासदर्शनम् । कौन्तेयगमनम् । लोकपालागमनम् । विद्यालाभः । शस्त्रप्राप्तिः । किरातयुद्धम् । इन्द्रलोकगमनम् । नलोपाख्यानम् । अक्षज्ञानप्राप्तिः । नारदागमनम् । पौलस्त्यतीर्थयात्रा । लोम-

---

ह्यानंतर विराटपर्व असून त्याचा पहिला श्लोक " कथं विराटनगरे मम पूर्वपितामहाः ॥ अज्ञातवासमुषिता दुर्योधनभयार्दिताः ॥ " असा आहे १. ह्या वनपर्वांतील अध्यायांची वगैरे संख्या महात्म्या व्यासमुनींनीं सांगितली आहे ती येणेंप्रमाणें:—हे तपोधन शौनक मुने, दोनशें* एकुणहत्तर अध्याय गणतीमध्यें असून अकरा हजार नऊशें चौसष्ट श्लोक त्या पर्वामध्यें आहेत आणि ब्याण्णव वृत्तांत आहेत २, ३, ४.

---

* कांहीं कांहीं प्रतमिध्यें दोन दोन अध्यायांचा एकेक अध्याय असें बरेच ठिकाणीं आढळतें; तेव्हां एकंदर ग्रंथाच्या संख्येंत जर कांहीं विशेषशी तफावत नसेल तर अध्यायांची संख्या जरी प्रतिज्ञेप्रमाणें जुळली नाहीं तरी चिंता नाहीं. श्लोकांची संख्या अकराहजार नउशें चौसष्ट सांगितली आहे व वर दिलेली संख्या अडतिसांनीं जास्त भरत आहे. परंतु, जुन्या प्रतींतून अनेक ठिकाणीं तीन तीन अर्धांवर श्लोकांचे आंकडे असून ह्या प्रतींत—संबंध जुळण्याकरितां एकदां तीन अर्धांवर आंकडा घालावयाचा व हे जास्त गेलेलें श्लोकार्ध बेरजेंत भरून काढण्याकरितां पुढें संबंध नीट तुटावा एतदर्थं आंकड्यांत फिरवाफिरव करण्याची पाळी आली ह्मणजे एका श्लोकार्धालाच आंकडा घालावयाचा—अशी पद्धत ठेविली असल्यामुळें श्लोकसंख्या अडतिसापेक्षांही जास्त होण्याचा संभव आहे. जुन्या लेखी प्रतींतून तीन श्लोकार्धांवर अंक अशीं जीं स्थळें आहेत त्यांच्या मानानें एका श्लोकार्धावर अंक अशीं स्थळें अगदीं अपवादास्पद अशीं आढळतात व तींही कांहीं थोड्या प्रतींतूनच आढळतात.

शागमनम् । तत्तीर्थयात्राप्रस्थानम् । अगस्त्यप्रभावः । विन्ध्यशैलचरितम् । वातापिनाशनम् । समुद्रशोषणम् । कालेयवधः । सगरपुत्रवधः । गङ्गावतारः । ऋष्यशृङ्गोपाख्यानम् । वृष्णिपाञ्चालागमनम् । हलधरवाक्यम् । वासुदेववाक्यम् । जामदग्न्यचरितम् । सौकन्यम् । मान्धातुरुपाख्यानम् । श्येनकपोतीयम् । अष्टावक्रीयम् । गन्धमादनप्रवेशः । औत्पातिकम् । घटोत्कचगमनम् । जटासुरवधः । आर्ष्टिषेणाश्रमनिवासः । हनुमद्भीमसमागमः । पुष्पाभिहरणम् । यक्षयुद्धम् । वैश्रवणसमागमः । निवातकवचवधः । अर्जुनागमनम् । शस्त्रदर्शनम् । आजगरम् । काम्यकागमनम् । वासुदेवसत्यभामागमनम् । नारदागमनम् । मार्कण्डेयागमनम् । मार्कण्डेयसमास्या । भविष्यम् । ब्राह्मणमाहात्म्यम् । धुन्धुमारोपाख्यानम् । सरस्वतीतार्क्ष्यसंवादः । मनुचरितम् । मण्डूकोपाख्यानम् । पतिव्रतोपाख्यानम् । धर्मव्याधोपाख्यानम् । मधुकैटभोपाख्यानम् । कुमारोत्पत्तिः । द्रौपदीसत्यभामासंवादः । घोषयात्रा । दुर्योधनकर्म । प्रावृड्वर्णनम् । इन्द्रद्युम्नोपाख्यानम् । आङ्गिरसम् । स्कन्दजननम् । धार्तराष्ट्रयज्ञः । व्यासदर्शनम् । मृगस्वप्नदर्शनम् । व्रीहिद्रौणिकम् । द्रौपदीप्रमाथः । दुर्वासउपाख्यानम् । रामोपाख्यानम् । सावित्र्युपाख्यानम् । कुण्डलाहरणम् । आरणेयम् । यक्षप्रश्नाः । समाप्तोयं वृत्तान्ताध्यायः ॥

*इदमारण्यकं श्रुत्वा महापापैः प्रमुच्यते । अधनो धनमाप्नोति पुत्रपौत्रसमन्वितः १ यं यं प्रार्थयते कामं तं तं प्राप्नोत्यसंशयम् । नारी वा पुरुषो

ह्या श्लोकाचे ऐवजी एका प्रतीत असे श्लोक आढळलात:--महीं विजयते राजा शत्रूनुन्मूल्य तिष्ठति । श्रुत्वा चारण्यकं पुण्यं दीर्घमायुश्च विन्दति १ इदं तु चरितं श्रुत्वा पाण्डवानां महात्मनाम् । वेदविद्यो भवेद्विप्रः क्षत्रियो राज्यमाप्नुयात् २ धनधान्य तथा वैश्यः शूद्रश्च सुखमाप्नुयात् ३ श्लोकपाद पठेद्यस्तु शृणोति सुसमाहितः । इहलोके सुखं भुक्त्वा विष्णुलोकं स गच्छति ४ पुण्यं पवित्रं सुखद यशस्करं सौभ्रातृकं बुद्धिविवर्धन च । श्रोतव्यमेतन्नियतैश्च सद्भिरायुष्यमूर्जस्करवृद्धिकामैः ५ कुटुम्बवृद्धि धनधान्यसञ्चयं स्त्रियश्च मुख्याः सुखमुत्तमं सदा । लभेच्च लक्ष्मीं विपुलां नरोत्तमो यथाभिलाषं भुवि मानवानाम् ६ महत्त्वारण्यकं श्रुत्वा भारते पर्व चोत्तमम् । दक्षिणा का प्रदातव्या वाचकाय तदुच्यताम् ७ निशम्यारण्यकं पर्व वाचकं प्रतिपूजयेत् । गन्धालंकारवासोभिः प्रणिपत्य पुनःपुनः ८ आरण्यकैर्मूलफलैस्तर्पयेत द्विजोत्तमान् । प्रदद्याज्जलकुम्भांश्च पूर्णकामसमन्वितान् ९ तर्पणानि च मुख्यानि वनमूलफलादिभिः । सर्वकामगुणोपेतमन्नं दद्याद्द्विजातये १० यद्यदिष्टतमं वस्तु तत्तदस्मै प्रदीयते । सुवर्णं रजतं गावो धान्यं भूमिस्तथैव च ११ पात्राणि ताम्रकांस्यानि वासांसि विविधानि च । वाचके परितुष्टे तु तुष्टाः स्युः सर्वदेवताः १२ 'वाचकस्तोषमायाति तथा कार्यं विपश्चिता ॥

वापि शुचिः प्रयतमानसः २ आरण्यके श्रुतेऽधीते ब्राह्मणान्यायसाद्विधिः ।
भोजयेद्वस्त्रगोस्वर्णदानै रत्नैः प्रपूजयेत् ३ ब्राह्मणेषु च तुष्टेषु संतुष्टाः
पाण्डुनन्दनाः । ब्रह्मा विष्णुस्तथा रुद्रः शक्रो देवगणास्तथा ४ भूतानि
मुनयो देव्यस्तथा पितृगणाश्च ये । वाचकं पूजयेच्छक्त्या वस्त्राद्यैः स्वर्ण-
भूषणैः ५ विशेषतस्तु कपिला देया तु जपपाठके । कांस्यदोहा रौप्य-
खुरा स्वर्णशृङ्गी सभूषणा । पाण्डूनां परितोषार्थं दद्याद्दक्षं द्विजातये ६
आरण्यकाख्यमाख्यानं शृणुयाद्यो नरोत्तमः । स सर्वकाममाप्नोति पुनः
स्वर्गतिमाप्नुयात् ७ इत्यारण्यकश्रवणमहिमा दानविधिश्च समाप्तः ॥



National Library,
Calcutta-27.